म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

# तात्यासाहेब कोल्हटकर यांचे चरित्र.

अथवा

प्रकाशक

REFBK-0003047

इ.नं. 396
आ
नं.
ना.

ॐ तत्सत्

मराठी ग्रंथ संग्रहालय
र. न. नं. 3१०
ता. ........

# तात्यासाहेब कोलते यांचें चरित्र.

लेखक—

**जगन्नाथ गणपत ढवण, वाङ्मय विशारद.**

प्रकाशक—

**गणपत विठोबाशेट मोरे,**

चिटणीस—कों वैश्यज्ञातिसमाज व फंड. मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 30८0

REFBK-0003047

तात्यासाहेब कोलते पुण्यातिथ

श्रावण व. ४ शके १८४८

## खरा वैश्य.

जी संपत्ति देवदयेनें आपणांला मिळाली आहे, ती केवळ स्वतःच्या चैनीकरितां मिळालेली नसून राष्ट्रकार्यार्थ खर्च करण्याकरितां आपणांजवळ ठेवलेली ती राष्ट्राची ठेव आहे, अशी अंतःकरणाची भावना करणें हीच खरी वैश्यवृत्ति; आणि ही वृत्ति ज्याच्या अंतःकरणांत वास करते तोच खरा वैश्य.

स्वामी रामतीर्थ.

ॐ

# अर्पणपत्रिका.

ज्या कोंकणस्थ
वैश्यसमाजाकरिता तात्या-
साहेब कोलते यांनीं देह झिजविला,
त्या समाजाची ज्यांनीं आजपर्यंत सेवा
केली, जे सांप्रत करीत आहेत,
आणि जे पुढें करतील त्या
सर्वांस हा ग्रंथ अर्पण
केला आहे.

ग्रंथकर्ता.

# दोन शब्द.

कै. बाळकृष्ण नामदेवशेट ऊर्फ तात्यासाहेब कोलते यांचें श्री. जगन्नाथ गणपत ढवण वाङ्मयविशारद यांनीं लिहिलेलें स्फूर्तिदायक चरित्र आज तात्यासाहेबांचे द्वितीय पुण्यतिथीच्या दिवशीं प्रसिद्ध होत आहे. हें चरित्र वाचून तात्यासाहेबांचें कार्य नेटानें चालविणारी मंडळी समाजांतून निघोत आणि पुढें तात्यांचें कार्य अखंड चालो एवढीच, तात्यांचें पुण्यस्मरण करून, त्यांच्या स्वर्गीय आत्म्यास साक्षी ठेऊन अखिल समाजाचे वतीनें ईश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.

तात्यासाहेब कोलते पुण्यतिथि
श्रावण व. ४ शके १८४८ कों.
वैश्य ज्ञातिफंडाची महाजनवाडी
नं. १, कांदेवाडी, मुंबई नं. ४.

समाजाचा नम्र सेवक,
**गणपत विठोबाशेट मोरे,**
चिटणीस—कों. वैश्य ज्ञातिसमाज व फंड, मुंबई.

# हृद्गत.

**विभूतिपूजा जेथें नाहीं असलें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं, व ज्या समाजांत या गुणाचा लोप होत जातो तो समाज मरणोन्मुख झाला असें समजावें.**

—लोकमान्य टिळक.

तात्यासाहेब कोलते हे मिति श्रावण व. ४ शके १८४६ सोमवारीं दिवंगत झाले. ही दुःखद गोष्ट त्याच दिवशीं आश्रमांत समजली त्या वेळीं त्यांचें चरित्र लिहून समाजास साजर करावें अशी इच्छा उत्पन्न झाली. व चरित्राकरितां माहिती मिळविण्याच्या मार्गास मी लागलों. तात्यांच्या चरित्रासाठीं मिळविलेल्या माहितीचीं जीं टाचणें केलीं त्यांतील पहिलें टाचण भाद्रपद शु. २ शके १८४६ चें आहे. पुढें शके १८४६ च्या बलीप्रतिपदेस प्रसिद्ध झालेल्या वैश्य धर्मोन्नतिमालेच्या १६ व्या पुष्पांत तात्यांचें चरित्र लिहिण्याचा संकल्प मी जाहीर केला. आणि त्याच वेळीं तात्यांच्या परिचयाच्या व निकट सहवासाच्या इष्टमित्रमंडळींस 'तात्यासाहेबांविषयीं आपणांस जी कांहीं माहिती असेल ती आमचेकडे लिहून पाठवावी.' अशी नम्र विनंतिही केली.

'कोणाकडूनहि तशी माहिती लिहून आली नाहीं' हा बहुतेक सर्वच चरित्रकारांचा पाढा वाचीत बसण्यांत काय हंशील ? शके १८४६ व ४७ च्या कार्तिक महिन्यामध्यें सालाबादप्रमाणें आश्रमकार्यार्थ दोन दौरे काढले. आश्रमाकरितां अगदीं लहानसान गांवींहि जाणें इष्ट असल्यामुळें तात्यांच्या परिचयाची कित्येक मंडळी भेटली व त्यांच्याकडून जी माहिती मिळे तिचें मी टांचण करून ठेवीत असे. तात्यांच्या जन्मस्थानचें दोनवेळां दर्शन घेतलें. तात्यांचे आप्तस्वकीय,

इष्टमित्र, सहकारी यांना ठिकठिकाणीं भेटलों. त्यांचे सहाध्यायी मलकापूरचे श्री. वासुदेव रामशेट बेंडे यांना भेटलों. तात्यांनीं ज्या पेढीवर पंधरा वर्षे नोकरी केली त्या पेढीचे हल्लींचे मालक शेट विरजी पेराज यांची भेट घेतली. फार काय पण तात्यांना अंगाखांद्यावर खेळविणाऱ्या आंवेगांवच्या ९० वर्षांच्या रावजी पाटिलाचीहि गांठ घेतली. तात्यांच्या चरित्राविषयीं ज्या ज्या ठिकाणीं कांहीं माहिती मिळेल असें वाटलें त्या त्या ठिकाणीं जाऊन माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला. वरील मंडळीकडून जी माहिती मला मिळाली ती जर मिळाली नसती तर तात्यांचें चरित्र कसें लिहिलें गेलें असतें? करतां ही माहिती देणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहें. मला मिळालेल्या माहितीची शक्याशक्य योग्यायोग्य अशी निवड करून त्या माहितीचा मी स्वीकार केला असल्यामुळें सर्वांची सर्वच माहिती येथें दिसणार नाहीं, त्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी. त्याचप्रमाणें तात्यासाहेबांची भरपूर माहिती ज्यांना आहे अशा कित्येकांची भेट घेतां आली नसल्यास त्यांचीही मी क्षमा मागतों.

मिळालेल्या माहितींत ज्या अनेक विसंगत अशा गोष्टी होत्या त्यांत तात्यांचें वय ही मुख्य गोष्ट होय. तेव्हां त्या गोष्टीचा निर्णय कसा केला एवढेंच सांगितलें म्हणजे इतर गोष्टींविषयीं सामान्य कल्पना वाचकांस करतां येईल. तात्यांचें खरें वय ६२ वर्षांचें. परंतु कोणी सत्तर, कोणी पाऊणशें, कोणी ऐंशीं, अशीं निरनिराळीं वयें सांगितलीं. त्यांत कित्येक साठबासष्ट असेंही सांगणारे आहेत. परंतु या सर्वांला स्मरणशक्तीशिवाय दुसरा कोणताच आधार नाहीं. अशा स्थितींत जन्मशक कसा ठरवावयाचा हा एक भानगडीचा प्रश्नच होता. परंतु खालील आधार मिळतांच तो शक मला निश्चित ठरवितां आला.

तात्यांचे वर्गबंधु श्री. वासुदेव रामशेट बेंडे हे मलकापुरास एक व्यापारी आहेत. त्यांचा जन्म त्यांनीं आपल्या जन्मपत्रिकेवरून शके १७८६ मधील असा सांगितला. यावरून तात्यांचे मरणसमयीं बेंडे यांचें वय ६० वर्षांचें होतें. सदर बेंडे व तात्या हे मराठी तिसऱ्या इयत्तेंत एका वर्गांत शिकत होते. मराठी दुसऱ्या तिसरींत असलेल्या मुलांचे वयांत दहा वीस वर्षांचें अंतर असणें शक्यच नाहीं. फारतर दोन तीन वर्षांचें अंतर असूं शकेल. तात्यांचें शिक्षणास उशिरा सुरवात झाली असल्यामुळें

तात्या त्यांच्यापेक्षां दोन तीन वर्षांनीं वडील असण्याचाच जास्त संभव आहे असें वाटलें. तात्यांचें व बेड्यांचें शिक्षण ज्या मलकापुरच्या शाळेंत झालें त्या शाळेचे अधिकारी श्री. वामन बाळाजी प्रभावळकर यांचे मेहरबानीनें त्या शाळेचे जुने कागदपत्र मला पहावयास मिळाले. ता. ११ जून सन १८७० मध्यें तात्यांचें नांव शाळेंत दाखल झालें असून त्या वेळीं त्यांचे वय ८ वर्षांचें लाविलें आहे. ( त्या विद्यार्थ्यांच्या नोंदीत अशा रीतीनें सर्वांच्याच वयाची नोंद केलेली होती. ) यावरून जन्मशक १७८४ हा येतो. त्याचप्रमाणें ता. १ मार्च सन १८७३ मध्यें त्यांचें नांव पुनः घातलें आहे. त्या ठिकाणीं वय ११ वर्षे असें आहे. त्यावरूनहि जन्मशक १७८४ हा येतो. इतका लेखी पुरावा मिळाल्यावर मी शके १७८४ हाच तात्यांचा जन्मशक मानला. त्यावरून तात्यांचें वय मरण समयीं ६२ वर्षांचें होतें. आणि त्यांचे सहाध्यायी श्री. बेडे यांचे शके १८४६ मध्यें वय ६० वर्षांचें होतें. म्हणजे शाळेंत मिळालेल्या लेखी आधारावरून मानलेल्या जन्मशकाला बेडे यांच्या वयाचा पडताळा बसतो. म्हणून तात्यांचा जन्मशक सन १७८४ हाच निश्चित होय. जन्मशकाचे बाबतींत हा खुलासा करण्याचें कारण कित्येकांना तात्यांचें वय यापेक्षां जास्त आहे असें वाटत असतें म्हणून होय. असो.

चरित्र लिहिण्याची मूळ कल्पना केव्हां झाली व पुढें ती कल्पना मूर्तस्वरूपांत येण्यास कोणाकडून मदत कशी झाली हें वर सांगितलें. परंतु ती कल्पना इतक्या लवकर सिद्धीस जाण्यास जो एक प्रसंग कारणीभूत झाला तो या ठिकाणीं अवश्य सांगितला पाहिजे. आश्रमांतील तात्यांच्या प्रथम पुण्यतिथि प्रसंगीं श्री. अण्णासाहेब मोरे हे मुख्य वक्ते होते. अण्णांचें परिणाम कारक असें भाषण ऐकल्यावर आश्रमांतील एक विद्वान अध्यापक श्री. विष्णू लक्ष्मण काणे, बी. ए. यांनीं ' हें चरित्र लिहिलें गेल्यास तें भावी पिढीला स्फूर्तिदायक व मार्गदर्शक असें होईल ' असें म्हटलें. त्याच वेळीं मी आश्रमांतील ब्रह्मचाऱ्यांस—भावी पिढीस—तात्यांच्या पुढील पुण्यतिथीच्या दिवशीं तात्यांचें एखादें चरित्र आपणांपुढें ठेवीन ' असें आश्वासन दिलें.

प्रथम मालेंतून जाहीर रीत्या हें चरित्र लिहिण्याची जबाबदारी शिरावर घेतली होती परंतु ती जबाबदारी केव्हां पार पाडीन अशी कालमर्यादा घातली नव्हती. आतां पहिल्या पुण्यतिथीच्या वेळीं त्याला कालमर्यादा घालून टाकिली. आश्रमाच्या नित्यनैमित्तिक कामांतून तात्यासारख्या पुरुषाचें चरित्र कसें लिहिलें जातें ही काळजी मला लागली. जवळ जवळ वर्ष होत आलें तरी चरित्र लेखनास माझी सुरवात नाहीं. प्रिय ब्रह्मचारी

मित्रांकडून पृच्छा होऊं लागली. सहकाऱ्यांकडून सूचना येऊं लागल्या. 'लवकरच सुरवात करतों' असें माझें उत्तर त्यांना मिळे. आतां हें कार्य दिरंगाईवर टाकणें शक्यच नाहीं असें वाटून मी लेखनास उद्युक्त झालों.

इतक्यांत आश्रमाचा एक नैमित्तिक कार्यक्रम आला. पावसाळ्याचे दिवसांत कोठेंतरी प्रौढ ब्रह्मचाऱ्यांची सफर काढावी असें ठरलें. मलाहि चरित्रलेखनास फुरसत पाहिजेच होती. ब्रह्मचाऱ्यांबरोबर मी निघालों. कनकेश्वरच्या पश्चिमेस शिरोळी या गांवीं आह्मी आलों. मी तेथील 'गोविंदधामांत' उतरलों. गोविंदधाम हा एका रामदासी साधूचा मठ आहे. तेथें आषाढ व० १४ शके १८४८ रोजीं सकाळीं लेखनास सुरवात केली व दोन दिवसांत पहिलीं पांच प्रकरणें लिहून काढली. आमचा सफरीचा कार्यक्रम संपतांच परत आश्रमांत यावें लागलें आणि वैश्यविद्याश्रमापासूनची पुढील प्रकरणें आश्रमांतच दोन दिवसांत लिहिलीं गेलीं. अशा रीतीनें चार दिवसांत चरित्राचा कच्चा खर्डा तयार झाला.

तात्यांचें चरित्र म्हणजे केवळ एका व्यक्तीचें चरित्र नव्हे. तो समाजांतील सार्वजनिक चळवळीचा इतिहास असल्यामुळें छापण्यास जाण्यापूर्वीं तें चरित्र अनेकांच्या दृष्टींखालून जाणें जरूर होतें. आश्रमांतील ब्रह्मचारी व सहकारी चरित्रलेखनाचे सुरवातीपासूनच मी मागेन तशी फुरसत मला देतच होते. त्यांनीं तेथील नित्य कार्यक्रमांतून मला फुरसत देतांच तो कच्चा खर्डा घेऊन मुंबईस आलों. कांहीं मंडळींना तो दाखविला, योग्य त्या सुधारणा केल्या. आणि शेवटीं हें चरित्र छापून पूर्वसंकल्पाप्रमाणें प्रसिद्ध झालें.

चरित्राचा पक्का खर्डा करीत असतांना ज्ञातिफंडाच्या दप्तराचा मला अतीशय उपयोग झाला, शेट विरजी पेराज व श्री. एकनाथ बाळशेट गांधी यांनीं दिलेली माहिती फार उपकारी झाली, आणि श्री. अण्णासाहेब मोरे यांची कल्पनातीत मदत झाली. शेवटीं ज्यांनीं ज्यांनीं म्हणून या कामीं मला मदत केली त्या सर्वांचा मी आभारी आहे. एवढेंच नमूद करून केवळ तात्यांच्याच स्फूर्तीनें उभारलेलें हें त्यांचें 'वाङ्मयस्मारक' आहे एवढेंच सुचवितों.

वैश्यविद्याश्रम, सासवनें,
पो.–आवास,
जि.–कुलाबा.

सर्वांचा नम्र,
**जगन्नाथ गणपत ढवण.**

# तात्यासाहेब कोलते यांचें चरित्र.

## अनुक्रमणिका.

प्रकरण— पृष्ठ.


( १ ) कुलवृत्तान्त. ... ... ... ... १
( २ ) बालपण. ... ... ... .... ४
( ३ ) धंदा–रोजगार. ... ... ... ... ११
( ४ ) कों. वैश्यज्ञातिफंड ऊर्फ पैसाफंड. ... ... ३०
( ५ ) महाजनवाडी. ... ... ... ... ७७
( ६ ) वैश्य विद्याश्रम. ... ... .... ... ९१
( ७ ) अखेर. ... ... ... ११७
( ८ ) सामाजिक कामगिरीचें स्वरूप.... ... ... १३१
( ९ ) व्यक्तिमहात्म्य. ... ... ... ... १४१
( १० ) उपसंहार. ... ... ... ... १५२


## परिशिष्ट.


( १ ) फंडस्थापनेच्या वेळचा सात कलमी ठराव ... ... १५३
( २ ) फंडाचा पहिल्या वर्षाचा अहवाल. ... .... १५५


## सूचिपत्र.


तात्यासाहेब कोलते यांच्यासंबंधीं ठळक गोष्टींची सूचि.........१५७

# चरित्रांत घातलेलीं चित्रें.


पृष्ठ.

(१) कै. बाळकृष्ण नामदेवशेट ऊर्फ तात्यासाहेब कोलते. १

(२) कों. वैश्यज्ञातिफंडाचे ट्रस्टी ( शके १८३७ ) ४८

(३) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची धर्मशाळा. ४९

(४) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची पहिली महाजनवाडी. ७६

(५) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची दुसरी महाजनवाडी. ७७

(६) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाचें श्रीदत्तमंदीर. ७७

(७) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाचें वैश्य विद्याश्रमाच्या मोरे-स्मारक देणगींतून घेतलेलें घर. ... ... ... ९०

(८) कों. वैश्यज्ञातिफंडास तात्यासाहेब कोलते यांची देणगी श्रीआंबेश्वरभुवन. ... ... ... ... ९०

(९) कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची शाखा—वैश्य विद्याश्रम, सासवनें. ... ... ... ... ९१


**सूचना**:—छापण्याच्या घाईमुळें कांहीं किरकोळ चुका राहून गेल्या आहेत, परंतु त्या सहज समजण्यासारख्या असल्यामुळें शुद्धिपत्र दिलें नाहीं.

कै. बाळकृष्ण नामदेवशेट ऊर्फ तात्यासाहेब कोलते.



जन्म—
भाद्रपद शु. २ शके १७९४. ]

अवसान—
[ श्रावण व. ४ शके १८४६.

९२३२
ग्रं. ३९६
२-२२

ॐ तत्सत्

# तात्यासाहेब कोलते यांचें चरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३०८४

## प्रकरण पहिलें.

## कुलवृत्तान्त.

शुद्ध बीजापोटीं । फळें रसाळ गोमटीं ॥

—तुकाराम.

कोलते हे मुळ रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वराजवळील धामणी–गोळवली येथील रहाणारे. आपले चरित्रनायक बाळकृष्ण नामदेवशेट ऊर्फ तात्यासाहेब कोलते यांच्या पूर्वींच्या आठव्या पिढींतील बापूशेट हे, स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजांच्या वंशजाकडे असलेल्या कोल्हापूर संस्थानांतील विशाळगडावर आलेले, कोलते घराण्याचे मूळ पुरुष होत. ते चांगले सधन होते व विशाळगड संस्थानांत मोठ्या मानमान्यतेस चढलेले होते. त्यांचेकडे सरकारचें कोठावळ्याचें काम होतें. असें सांगतात कीं, वेळीं अवेळीं जरूर पडल्यास सरकारास पैसाअडका पुरविण्याइतकी त्यांची सांपत्तिक स्थिति होती. विशाळगडावर कोलत्यांच्या चार पिढ्या झाल्या. विशाळगडचा दरबार मलकापुरास आला त्या वेळीं सरकारस्वारीबरोबर राघोबा महादशेट हे मलकापुरास आले. हे राघोबाशेट तात्यांचे पणजे होत. याच सुमारास राघोबाशेटचे भाऊ बापूशेट चिपळूणाकडे गेले व चुलतबंधु

गणशेट हे संगमेश्वर तालुक्यांतील सालपें या बाजूला वळले. चार घार-दिशेला गेले व विशाळगडावरील कोलते यांचें घराणें मोडलें. सांप्रत विशाळगडावर कोलत्यांचें कांहींएक नाहीं.

मलकापुरच्या पश्चिमेस दहा मैलांवर आंबा हा लहानसा गांव आहे. येथूनच खालीं कोंकणांत उतरण्यास घाट आहे. त्याला आंबाघाट म्हणतात. राघोबाशेट यांनीं आंब्याच्या दस्तुरीचा मक्ता घेतल्याकारणानें ते आंब्या-सहि राहूं लागले. राघोबाशेट व त्यांच्यामागून त्यांचा मुलगा म्हणजे तात्यांचे आजे गोविंदशेट ऊर्फ अण्णासाहेब यांना मलकापूरदरबारांत बरेंच महत्त्व होतें. कोंकणस्थ वैश्यांपैकीं कोलते व वायकूळ या दोन घराण्यांचा राज-दरबारशीं फार संबंध असून दरबारांत त्यांना चांगला मानहि होता. यांपैकीं दरबारांत कोणी कोणी वाकिली करीत.दरबारांतील इतर मंडळींवर कोलत्यांचा फार दरारा असल्यामुळें कित्येक त्यांना पाण्यांत पहात. कांहीं ब्राह्मण-मंडळींचा कोलत्यांवर फार दांत असे. या हेव्यामुळेंच दरबारांतील कोलते-वायकूळ यांचें वर्चस्व कमी झालें. असो. तात्यांचे आजोबा गोविंदशेट हे दरबारांत मानकरी असून न्यायमनसुब्याचें कामीं त्यांची सल्लामसलत घेतली जाई. त्या वेळच्या मानानें गोविंदशेट हे चांगले जाणते म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना ज्योतिष अवगत होतें. ते मोठे धार्मिक वृत्तीचे होते. स्नानपूजा, जपजाप्य त्यांचें नियमानें चाले. पांडवप्रताप, हरिविजय वगैरे ग्रंथांतील थोडाफार भाग वाचल्याविना ते अन्नग्रहण करीत नसत. ते शाखाहारी होते. गोविंदशेट सत्तर वर्षांचे होऊन आंब्यास वारले. आजोबांच्या या धार्मिक वृत्तीचा त्यांच्या नातवावर बराच परि-णाम झालेला आहे. परंपरागत असे कांहीं गुण घराण्यामध्यें कित्येकदां पिढ्यानुपिढ्या रहातात ते हे असें.

पूर्वीपासून कोलत्यांचा सरकारदरबाराशीं संबंध आल्यामुळें त्याच बाजूनें ते पुढें आले. त्यामुळें व्यापारधंदा असा त्यांचा नव्हता. वर सांगितल्या-

प्रमाणें दरबारांतून त्यांचें उच्चाटण झाल्यावर या घराण्याला फार वाईट दिवस आले. गोविंदशेटच्या मागून या कुटुंबाची फार हलाखीची स्थिति झाली. तात्यांचे वडील नामदेवशेट एक साधे सरळ गृहस्थ होते. आंब्यास शेतीहळी करून आपल्या कुटुंबाचा ते कसातरी गुजराणा करीत. बैलावरून घाटी माल कोंकणांत राजापूर, संगमेश्वर वगैरे ठिकाणीं नेऊन विकावा व तेथून नारळ, सुपारी आणून मलकापूर, कोल्हापूर येथें विकावी असा त्यांचा व्यवसाय असे. शिक्षण नाहीं, कोणाचा पाठिंबा नाहीं यामुळें या व्यापारांत त्यांना फारसी किफायत झाली नाहीं. पुढें पुढें ते तुपलोण्याचा व्यापार करूं लागले. पिढीजात व्यापार नसल्यामुळें ते एकंदर जुजबी व्यापार करून आपल्या कुटुंबाचा प्रामाणिकपणें कसा तरी गुजारा करीत असत. कित्येकदां तर आजचा दिवस गेला उद्यांचा कसा जातो अशी पंचाईत पडत असे. परंतु नामदेवशेटचा पंढरीच्या पांडुरंगावर मोठा विश्वास असे व ते पूर्ण समाधानवृत्तीनें संसार चालवीत असत. त्यांना खोटें बिलकूल खपत नसे. नामदेवशेटच्या पत्नी म्हणजे तात्यांच्या मातोश्री राधाबाई या साठवलीच्या बेर्डे घराण्यापैकीं होत. त्या अगदीं बालबोध वळणाच्या असून स्वभावानें मोठ्या गोड होत्या. आपल्या कुटुंबाविषयीं त्यांना मोठा अभिमान असे व घरांतील न्यून त्या कधीं कोणास दिसूं देत नसत. त्या एक मानी मनाच्या माउली होत्या.

अशा सुप्रसिद्ध कोलते वंशांत धर्मनिष्ठ, सुशील, परोपकारी पण गरीब आईबापांच्या पोटीं आंबा येथें भाद्रपद शु. २ शके १७८४ बुधवारीं सायंकाळीं दिवे लावण्याचे वेळीं कोलतेकुलदीपक तात्यांचा जन्म झाला.

# प्रकरण दुसरें.

# बालपण.

## मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

आंबा ही तात्यांची जन्मभूमि हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. आज आंब्यास कोलत्यांचीं घरें सडकेच्या दोहों बाजूंस आहेत. तात्यांच्या जन्मकाळीं हीं घरें आज आहेत तेथें नव्हतीं. आंब्यांतून खालीं मुर्शीला उतरणारी हल्लींची सडक शके १८०८ मध्यें बांधली गेली. तत्पूर्वी हल्लींच्या सडकेच्या उत्तरेस ३।४ फर्लांग अंतरावरून बैलांचा रस्ता जात होता. या जुन्या रस्त्याच्या खाणाखुणा पटण्याइतकी रस्त्याच्या बाजूंचीं जुनाट झाडें अद्याप तेथें दिसतात. या बैलमार्गाच्या उत्तरेस पूर्वीचें गांवठण होतें व तेथेंच कोलत्यांचीं घरें होतीं. आतां या ठिकाणीं एकहि वैश्याचें घर नाहीं. तात्यांचा जन्म ज्या ठिकाणीं झाला तेथें आतां घरदार तर नाहींच पण घराच्या कांहीं खाणाखुणाहि नाहींत. तेथें फक्त भातजमीन आहे. ज्या घरांत तात्या जन्मास आले त्या घराला लागून असलेलें एक पूर्वीचें फणसाचें झाड मात्र अद्याप खुण म्हणून त्या ठिकाणीं आहे. या ठिकाणचे जवळ पूर्वीपासूनच पाटील व गुरव यांची वस्ती आहे. तात्यांच्या जन्मस्थानच्या बाजूनें नेहमीं वाहता असा एक पाण्याचा पाट आहे. तो पाहून क्षणभर असा भास होतो कीं, ज्या स्थलीं तात्यासारखा पुरुष जन्मास आला त्या स्थलाचें पावित्र्य सतत कायम राखण्याकरितां सृष्टीदेवीनें धरलेला तो अभिषेकच असावा. किंवा त्या सदा वाहणाऱ्या पाण्याचा खळखळाट ऐकून असें वाटूं लागतें कीं, ‘ या पवित्र स्थलीं जन्मलेल्या पुरुषाचें कार्य माझ्यासारखेंच सतत चालू राहील ’ असे कर्णमधुर ध्वनि

त्यांतून निघताहेत. वारणेला मिळणाऱ्या कडवी नदीचा उगम जवळच असून ' येथें जन्मास आलेल्या पुरुषाचें कार्य अत्यंत गोड होईल ' असें विरोधानें सुचवीत तिचा ओघहि तात्यांच्या जन्मस्थानच्या शेजारूनच जात आहे. अशा या स्थलीं उभें राहिलें कीं सभोंवतीं सृष्टीचें सुंदर स्वरूप दृष्टीस पडतें. भोंवतालीं घाटमाथ्यावरील टेंकड्या व त्यांवरील दुरून ठिपक्यासारखीं दिसणारीं तीं खुरटीं झाडें पाहून सह्याद्रीच्या माथ्यावरील कोणाच्याहि पुढें कधींहि न वाकलेला व कोणालाहि हिसकावून घेतां न आलेला जो वैभवकिरीट त्याचे पाच आदि रत्नांनीं जडविलेले लहान लहान कळस म्हणजे या टेंकड्या असाव्यात असें कोणासहि वाटेल. पश्चिमेस लगतच आंबाघाट असून तेथून उंचावरून खालीं दूरवर दिसणाऱ्या अत्यंत भव्य व आल्हाद-जनक देखाव्याची कल्पना शब्दांनीं करून देणें अशक्य आहे. शेजारीं भीवथळीचा डोंगर असून तेथून उभे तुटलेले सह्याद्रीचे कडे इतके भयं-कर आहेत कीं ते पहातां क्षणींच भोंवळ यावी. अशा या रम्य स्थानाचें वर्णन करण्याचें कवीचें काम आहे तें चरित्रकाराला कसें साधेल ? येथील पाणी पाचक व रुचकर असून हवा उत्साहवर्धक अशी आहे. येथील अवर्णनीय सृष्टिसौंदर्यामुळें व येथील उत्कृष्ट हवापाण्यामुळें मलकापूर सरकारचें हवा खाण्याचें निवासस्थान येथें असून रत्नागिरीच्या सरकारी अधिकाऱ्याकरितांहि येथें बंगला आहे. सारांश निसर्गशोभा, हवा व पाणी या सर्व गोष्टींनीं युक्त असें हें तात्यांचें रमणीय जन्मस्थान आहे.

तात्यांचें सर्व बाळपण आंब्यास व मलकापुरास गेलें. तात्यांचें मूळ नांव आत्माराम असें होतें. परंतु आईनें लाडकें नांव ' बाळ ' असें ठेविलें. त्याच ' बाळाचें ' वडिलांनीं ' बाळकृष्ण ' केलें. तात्यांनीं हेंच नांव लोकांत प्रगट केलें असलें तरी सर्व समाज त्यांना 'तात्यासाहेब' याच नांवानें आज ओळखीत आहे. लहानपणीं ते अतीशय हूड होते. वडील तुपलोण्याचा व्यापार करीत असल्यामुळें घरीं दुधदुभतें असे. तें खावें-

प्यावें आणि सह्याद्रीच्या त्या पठारावरून भटकावें हा त्यांचा उद्योग. घरांत पाय थरला तर बहीणभावांशीं दंगामस्ती कर. धाकटा भाऊ रामकृष्ण याला जर आईनें वाटींत दहीं वाढलें तर 'मलाहि वाटींतच दहीं हवें' म्हणून या लाडक्या बाळानें हटून बसावें. आईनें सर्वांच्या हातावर एखादे वेळीं लोणी ठेविलें आणि आपणास लोणी कमी मिळालें अशी बाळास शंका आली कीं, त्यानें आईकडून तागडी आणवावी, आणि सर्वांचें लोणी जोखवावें. भावंडांशीं वागण्यांत तात्या मोठे तर्कट असून कळ काढण्यांत तर पटाईत होते. तथापि त्यांचा स्वभाव नेहमीं आनंदी असे. तात्या आईबापांचे मोठे लाडके होते. लहानपणच्या खोडकर व खेळकर वृत्तीमुळें व आईबापांच्या फाजील लाडामुळें तात्यांचें शिक्षणाकडे बिलकूल लक्ष नसे. मलकापुरच्या मराठी शाळेंत त्यांचें तिसऱ्या ईयत्तेपर्यंत शिक्षण झालें. वयाचें आठव्या वर्षीं त्यांनीं पाठशाळेचें तोंड पाहिलें. तीन वर्षें त्यांचें नांव शाळेंत होतें. या तीन वर्षांत त्यांच्या अनियमितपणामुळें शाळाधिकाऱ्यांना तीन वेळ त्यांचें नांव काढावें लागलें आहे. 'बाळ' सर्वांचा लाडका असल्यामुळें त्याला वाटल्यास मलकापुरास वडील बहिणीकडे—अक्काकडे—रहावें, वाटल्यास आंब्यास रहावें. यामुळें शाळेंतील शिक्षणाचे बाबतींत तात्यांची पूर्ण हेळसांड झाली.

परंतु दुसऱ्या दृष्टीनें तात्यांना या बालपणाच्या रहाणीचा फायदा मात्र मिळाला. गोपाळकृष्णाप्रमाणें या बाळकृष्णानें दुधतुप खावें प्यावें, समवयस्क भावंडांशीं निर्व्याज खेळ खेळावेंत आणि सृष्टिसौंदर्ययुक्त अशा रानामाळावरून भटकावें. हाच तात्यांचा लहानपणाचा व्यवसाय. शाळेची धांदल नाहीं, अभ्यासाची कांचणी नाहीं, कोणाचा धाक नाहीं. मन अगदीं स्वैर. वयाच्या विशिष्ट मर्यादेपर्यंत अशा मनःस्थितींत मुलांना वागविण्यांतच त्यांचें कल्याण असतें. नाहींतर चार वर्षांपासून मुलाचे पाठीमागें पाटीपुस्तकाचा ससेमिरा. कित्येक बाप तर आपल्या मुलानें खूप शिकावें, मोठें विद्वान् व्हावें अशा सद्धेतूनें मास्तरांस आमच्या

मुलाच्या एका वर्षांत दोन 'यत्ता' झाल्या पाहिजेत अशी ताकीद देतात. आणि शाळेंत ४।५ तास एका ठिकाणीं डांबून मास्तरांनीं त्याला पाजलेले ज्ञानामृताचे 'डोस' पुरेसे न वाटून घरीं आणखी शिकवणी ठेवून त्यांला अकालीं विद्वान् करण्याचा कारखाना काढतांना दिसतात. परंतु सद्धेतूनेंहि मनुष्याकडून चुका होत असतात. अकालीं बुद्धीच्या आतिरिक्त वाढीमुळें बुद्धि कायमची कमकुवत होते. शरिराची सर्वस्वी नासाडी होते. उत्साह, धाडस वगैरे गुणांची खच्ची होते. मनुष्याचा पूर्ण नाश करणारे हे सर्व दोष मुलाची लहानपणची शाळा कोणती हें न समजल्यामुळें घडत असतात. असो शिक्षणशास्त्रांतील हा विषय आहे, त्याचें येथें जास्त विवेचन करतां येत नाहीं. परंतु एवढी गोष्ट खरी कीं, तात्यांना बाळपणीं जी परिस्थिति मिळाली तीमुळें ते जसे शरीरानें सुदृढ झाले तसें मनानेंहि सुदृढच बनले. तात्यांचे आईबाप मत्स्याहारी होते. परंतु तात्यांना दुधतुपाची गोडी लागल्यामुळें त्यांनीं तिकडे ढुंकूनहि केव्हां पाहिलें नाहीं, कीं आईबापांनीं कधीं त्यांना मुद्दाम तें खाऊं घातलें नाहीं. अलीकडील कित्येक बाप चाहादि आपल्या व्यसनांची परंपरा आपल्या मुलानें जणूं काय पुढें कायम राखावी म्हणून तीं लहान अर्भकें बोंडल्यानें दूध पिऊं लागल्यापासून मुद्दाम त्यांना आपल्या व्यसनांचें बाळकडु पाजीत असतात. आपल्या या फाजील लाडाचे दुष्परिणाम आपल्या मुलांस भोगावे लागणार आहेत हें जर त्या प्रेमळ पित्यांना कळतें तर खात्रीनें असे प्रकार घरोघरीं दिसले नसते. मुलांच्या जबाबदारीविषयीं किती गाढ अज्ञान हें! परंतु या वेळीं हीहि मुख्य गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्ञानार्जनाला पूर्ण योग्य अशा वयाचे तात्या झाले तेव्हां शाळेंत घातले असतांना त्यांच्या शिक्षणाकडे जें सर्वस्वी दुर्लक्ष्य झालें त्याचाहि परिणाम तात्यांच्या पुढील आयुष्यावर झालेला आहे.

अशा रीतीनें तात्यांचे बाळपणचे दिवस भराभर चालले असतांना त्यांच्यावर एकाएकीं एक मोठी जबाबदारी येऊन पडली. मलकापुरचे

प्रसिद्ध व्यापारी कै. भिकशेट गांधी हे भागवत संप्रदायापैकीं होते. ते बहुश्रुत असे असून ज्ञानेश्वरी, भागवत, वगैरे ग्रंथांवर चांगलें निरूपण करीत असत. तात्यांच्या घराण्यांतहि वारकरीसांप्रदाय चालूच होता. अर्थात् तात्यांचे वडील नामदेवशेट व भिकशेट गांधी यांचा स्नेहसंबंध बरेंच दिवसांपासून होता. पुढें तर नामदेवशेटनीं आपली वडील मुलगी सखूबाई ही भिकशेटचा मुलगा कृष्णशेट यास देऊन आपल्या स्नेहसंबंधास सोयरे-संबंधानें जखडून टाकिलें. हे कृष्णशेट पंढरीच्या वारीवर असतांना शिराळ मुक्कामीं मरण पावले. नामदेवशेटचा मित्र व सोयरा यांचा असा अक-स्मात् अंत होऊन त्यांचा संसार उघडा पडला. अशा वेळीं कृष्णशेटचा व्यापार, सावकारी, देणेंघेणें वगैरे सर्व व्यवहार पहाण्याकरितां नामदेव-शेटना आंब्याहून मलकापुरास यावें लागलें. बरोबर मुलेंमाणसें आलीं. तात्याहि वडिलांबरोबर आपल्या वडील बहिणीकडे–अक्काकडे–आले. मित्राच्या मागें त्याच्या व्यवहाराची जितकी व्यवस्था ठेवावयाची तितकी नामदेवशेटनीं ठेविली. यावरून नामदेवशेट हे कसे नमुनेदार सोयरे होते याची सहज कल्पना येईल. शके १७९४ च्या सुमारास नामदेव-शेट येळवण येथें वसूलास गेले असतां आजारी पडले व मलकापूर येथें येऊन मित्राच्या घरींच त्यांचा अंत झाला. वडील वारले तेव्हां तात्या दहा वर्षांचे होते. त्यांचें तें खेळण्याचें वय. अक्षरांचीहि नीटसी ओळख त्यांना झाली नव्हती. अशा स्थितींत आपल्या कुटुंबाची व अक्काच्या कुटुंबाची अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर पडली. तात्यांच्या कुटुंबांत आई, धाकटा भाऊ रामचंद्र, व लग्नाच्या दोन बहिणी इतकी मंडळीं असून जवळ कांहीं माया नव्हती. कै. कृष्णशेटचें कुटुंब म्हणजे अक्का व दहा वर्षांचे आंतील दोन मुलगे. शिवाय तात्यांची दुसरी परत आलेली बहीण काशी-बाई याहि अक्काकडेच होत्या. अशी कच्चाबच्च्यांचीं दोन कुटुंबें या दहा वर्षांच्या बच्चावर पडलीं. लेचापेचा असतां तर या दुहेरी जबाबदारींतच

चिरडून गेला असता. परंतु अक्काच्या हिंमतीवर आलेल्या स्थितीशीं तोंड देण्याचा तात्यांनीं निश्चय केला.

अक्का मोठ्या संसारी होत्या. आपला सर्व व्यवहार त्या जातीनें पाहूं लागल्या. गांवीं वसूलावर जातांना त्यांनीं तात्यांना बरोबर न्यावें. वसूलाची सर्व माहिती अक्कानीं तात्यांना देण्यास हळुहळु सुरवात केली. व्यवहाराचा ' श्रीगणेशा ' तात्या आपल्या बहिणीजवळ शिकूं लागले. दोन वर्षे ते अक्काचा व्यवहार त्यांच्या देखरेखीखालीं पहात होते. त्यांनीं देण्याघेण्याची व हिशेब ठिशेबाची या दोन वर्षांत वयाच्या मानानें चांगलीच माहिती करून घेतली. यावरून तात्यांची बुद्धि किती कुशाग्र होती याची साक्ष पटते. आपला सर्व व्यवहार आपल्या आटोक्यांत आहे, असें पाहून तात्यांना तिथेंच गुरपटून ठेवण्यापेक्षां कोठेंतरी धंद्या रोजगारास पाठवावें असें अक्काला वाटूं लागलें. तात्या मुळचेच हाडापेरानें मजबूत. बारा वर्षांच्या वयामध्येंच ते एखाद्या तरुणाप्रमाणें दांडगे व मोठे दिसत असत. त्यांना जवळच कोल्हापुरास नोकरीकरितां पाठविण्यांत आले. तेथें P. W. D. मध्यें त्यांना मुकादम म्हणून बदली मिळाली. वर्ष सव्वावर्ष त्यांनीं मुकादम म्हणून काम केलें. परंतु तात्यांचें P. W. D. म्हणजे सार्वजनिक कार्यक्षेत्र निराळ्याच ठिकाणीं निराळेंच नियोजित होतें. ईश्वर तात्यांना भलत्याच ठिकाणीं कसा खितपत ठेवील ? एके दिवशीं तात्यांच्या वरिष्ट अधिकाऱ्यानें ' अरे पोरा ' म्हणून त्यांना हटकलें. पुढें थोर होणाऱ्या तात्यांना ' अरे तुरे, आणि पोर ' म्हणलेले कसलें खपतें ? त्यांनीं लागलेंच " मला अरेतुरे म्हणण्याचें कारण नाहीं. माझ्या कामांत कांहीं कसूर नसतांना मी काय म्हणून तुमचें गुरगुरणें ऐकेन ? मला तुमच्या नोकरीची किंमत नाहीं ? " असें म्हणून सर्व कागदपत्र वरिष्ठाचें अंगावर फेंकले व मलकापुरास हा चाकरमान्या परत आला.

मलकापुरास त्यावेळीं देवीची सांथ होती. म्हणून तात्यांना मलकापुरीं ठेवून न घेतां अक्कांनीं तांबडतोब साठवलीस आजोळीं बेडे यांचेकडे

पाठविलें. तेथें बेर्डे मामानीं त्यांच्याचें अक्षर घटवून घेतलें व त्यास जमाखर्चाची माहिती करून दिली. मामाकडे तात्या फार दिवस राहिले नाहींत. तेथून निघून ते आंब्यास आले व कोणी भाऊबंद कांहीं कामकाज लावून देतात कीं काय तें त्यांनीं पाहिलें. आंब्यास कांहींएक न जमल्यामुळें ते परत अक्काकडे मलकापुरास आले. ते वसूलाचे हंगामी दिवस होते. अक्कांनीं त्यांना ठेवून घेतले. एका गांवीं वसुलास गेले असतां कुळाची व त्यांची तक्रार झाली. शेवटीं कुळानें सांगितलें, “ मी तुला ओळखीत नाहीं. जा मालकास घेऊन ये. मग वसूल देईन. ” तात्यांच्या अंतःकरणाला ते शब्द जाऊन भिडले. “ हा गांवढळ मनुष्य मला म्हणतो कीं मी तुला ओळखीत नाहीं आणि मी तें सहन करतों ! हा यःकश्चित मनुष्य मला ओळखीत नाहीं ! धिक्कार असो मला ! ” असे विचार तात्यांच्या डोक्यांत घोळूं लागले.

**लोकांचिया एक शिरीं सजावें ।**
**वनींच कीं एक सुकोनी जावें ॥**

असा मानी माणसांचा बाणा असतो. हा शेतकरी ‘ मी तुला ओळखीत नाहीं ’ असें कां म्हणाला याचाच ते एकसारखे विचार करूं लागले. ‘ मी स्वावलंबी नाहीं म्हणूनच त्याला माझी ओळख पटत नाहीं ’ असा तात्यांनीं स्वतःशीं निर्णय केला व रागानें घरीं येऊन त्यांनीं अक्काला सर्व प्रकार सांगितला. झालेल्या प्रकारांत विशेष कांहीं नसल्यामुळें अक्कांनीं ती गोष्ट निमुटपणें ऐकून घेतली तात्यांचा मानी स्वभाव ‘मी तुला ओळखीत नाहीं’ या शब्दांनीं डिंवचला गेला होताच. अक्काकडून त्या कुळाचें पारिपत्य होईल असें त्यांना दिसेना. तात्यांचा पहिला निर्णय कायम झाला. ‘ माझी ओळख कोणासच पटत नाहीं अं ? ’ असा उद्विग्न मनाला प्रश्न करीत कोणाला न पुसतांसवरतां जगाला व विशेषतः आपल्या समाजाला आपली ओळख पटविण्याकरितां पंधरा सोळा वर्षांच्या तात्यांनीं मुंबईची वाट धरली. हें साल शके १८०० असावें.

ग्रंथ संग्रहालय नं. ३९८ ता. ठा. णे

## प्रकरण तिसरें.

# धंदा-रोजगार.

बरवें दुकानीं बैसावें। श्रवण मनन असावें ॥

—तुकाराम.

शके १८०० मधील मुंबई म्हणजे बाहेर गांवच्या लोकांना विलायत वाटत असे. मुंबईला जाणें म्हणजे परदेशगमन. मचव्याचा त्या वेळीं प्रवास. कोण त्रास! काय जोखीम! जिथें आज पांच तासांत बोटीनें जातां येतें तिथें त्यावेळीं पंधरापंधरा दिवस लागत. गांवची हकीकत मुंबईला व मुंबईची खुशाली गांवाला आतांसारखीं झटपट कळत नसे. अशा अनेक कारणामुळें मुंबई आहे त्यापेक्षां किती तरी दूर वाटत असे. अशा मुंबईला कोणाला न विचारतांपुसतां मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तात्या निघाले. ते कोठें गेले याचा कोणासहि कांहीं अंदाज करतां येई ना. बाळानें आपल्या जिवाचें कांहीं बरेंवाईट तर केलें नाहीं नां? अशी शंका येऊन घरांत रडारड सुरूं झाली. तात्यांच्या मातोश्रीचे डोळ्यांतून जो अश्रूप्रवाह सुरूं झाला तो तीन वर्षांनीं तात्या परत आल्यावर त्यांनीं पुसला तेव्हांच थांबला.

तात्या मलकापुराहून एकटेच निघाले ते पायवाटेनें संगमेश्वरास आले. तेथें ते मुंबईस जाणाऱ्या मचव्यांत बसले. त्यांना मचव्यांत आपल्या समाजांतील कांहीं लोक भेटले. त्यांत रोजगारांकरितां मुंबईस जात असलेले मलकापुरचे कै. विठोबाशेट गांधी हेहि एक होते. घरून निघाले तेव्हां तात्यांच्या खिशांत अवघे दोन रुपये होते. मचव्याला आठ आणे भाडें पडलें. ठिकठिकाणीं थांबत व बंदरें करीत संगमेश्वर सोडल्यापासून

बारा दिवसांनीं मचवा मुंबईस आला व तात्यांनीं आपल्यां कर्मभूमींत पाय ठेविला. ज्या वेळीं तात्यांनीं मुंबापुरीला स्पर्श केला त्यावेळीं तिला काय वाटलें असावें ? मालवणचे, बाणकोटचें जे चाकरमाने मुंबईत येत, त्यांपैकींच हा एक सोळा वर्षांचा मुलगा असावा असें तिला वाटलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु याच मुलानें अडीच तपांतच नाक्यानाक्यावर असलेल्या पानतंबाकूच्या दुकानांत पैसाफंड चालू करून आपली नाकेबंदी केली हें पाहून मात्र त्या मुंबापुरीला पुढें मोठें आश्चर्य वाटत असेल. असो.

तात्या मुंबईस प्रथम आपले चुलतचुलते कै. शंकर लक्ष्मणशेट कोलते धोबीतलावावर रहात होते त्यांचेकडे उतरले. शंकरशेटना वाटलें कीं, इतर सामान्य चाकरमान्याप्रमाणें पोट भरण्यास हा बाळ मुंबईला आला असावा. त्यांनीं ताबडतोब एका तंबाकूच्या दुकानावर त्यांना नोकरी लावून दिली. सुमारें एक पंधरवडा तात्या तंबाकूच्या गादीवर बसले. एके दिवशीं त्यांच्या मालकानें त्यांना धुणीं धुण्यास सांगितलें. तात्यांच्या डोक्यांत विचारमालिका सुरू झाली. ते स्वतःला विचारूं लागले, " तूं कोल्हापूर कां सोडलेंस ? मलकापूर कां सोडलेंस ? मुंबईस कशाला आलास ? लोकांची धुणीं धुण्याकरितांच कां ? " असें एक कां दोन हजारों प्रश्न त्यांच्या स्वाभिमानी मनानें त्यांना विचारले. यजमानाच्या पायावर पाणी ओतणारा रामा शागीर्द पेशव्यांच्या दरबारांतील मुख्य न्यायाधीश रामशास्त्री होतो तो कां ? हे तात्यांना जरी त्या वेळीं ठाऊक नसलें तरी ते एवढें खात्रीनें जाणत होतें कीं आपला जन्म लोकांचीं धुणीं धुण्याकरितां नाहीं. क्षणाचाहि विलंब न लावतां त्यांनीं आपल्या धन्याला तसे स्वच्छ सांगून दुकानांतून ते बाहेर पडले.

बाहेर पडले पण पुढें काय ? अफाट मुंबई. जिकडे जावें तिकडे रस्ता मोकळा. अपमान झाल्यावर नातेवाईकाकडे जाणें तात्यांच्या मानी

मनाला मानवलें नाहीं. कोल्हापुरांत अपमान, मलकापुरांत अपमान, मुंबईंत अपमान. इजा बिजा तिजा' झाला. आतां मात्र अपमानाचा कडेलोट झाला असें त्यांना वाटलें. मी 'पोर' म्हणून मला कोणी 'ओळखीत नाहीं' आणि म्हणूनच ' धुणीं धुण्याचें ' काम माझ्यावर आलें. तेव्हां आतां जेथें आपल्या ओळखीदेखीचे कोणी नाहींत अशा ठिकाणीं जाऊनच नशीब काढलें पाहिजे असें वाटून पाय नेतील तिकडे ते जाऊं लागले. आपले पाय आपणास कोठें नेत आहेत हें तात्यांना कळलें नसेल. पण त्रिवार अपमान झाल्यानें त्यांचें अंतःकरण अगदीं तळापासून हादरून गेले असल्यामुळें त्यांची मनोदेवता आतां जागृत झाली होती व ती त्या पायांना योग्य मार्ग दाखवीत होती. त्यांच्या पायांनीं त्यांना इष्ट स्थळीं आणून पोंहचविलें. आपण इथेंच कां आलों हे त्या वेळीं तात्यांनाहि कळलें नाहीं. ते वडाच्या गादीवर नव्या बारदान गल्लींत एका वखारींत बारदानचे गठ्ठे बांधण्याचें व त्यांवर नंबर घालण्याचें काम चाललें होतें तेथें आले. तेथें एक कच्छी–लोहाणा गृहस्थ चाललेलें काम पहात उभे होते. तात्यांनीं त्या गृहस्थाकडे पाहिलें. त्या गृहस्थानेंहि आपणाकडे पहात असलेल्या तात्याकडे पाहून स्मित केलें. दोघांचीहि दृष्टिभेट झाली. त्याबरोबर जणूं काय पूर्वजन्मींची ओळख पटली व तात्या एकदम उभे राहिले. त्या कच्छी गृहस्थांकडे पुढें होऊन 'मी हें काम करतों' असें तात्यांनीं म्हटलें. 'ठीक आहे.' असें म्हणून दुसऱ्या एका मनुष्यास कांहीं सांगून ते गृहस्थ तेथून निघून गेले. तात्यांना दिलेलें काम त्यांनीं सायंकाळीं ४।५ वाजेपर्यंत संपविलें. तात्यांना एक आणा मिळाला. त्या आण्याचे चणेकुरमुरे घेऊन तात्यांनीं खाल्ले व अंगावर किनतान घेऊन हमाल वगैरे होते त्यांच्यांतच ते त्या रात्रीं झोंपले. दुसरे दिवशींहि त्यांना तेथेंच काम मिळालें व तेंहि आदल्या दिवसाप्रमाणें तात्यांनीं ठराविक वेळांत संपाविलें. त्या दिवशीं कालच्या दुप्पट पगार मिळाला. तिसरे दिवशींहि त्यांनीं तेंच काम केलें. त्या तिसऱ्या दिवशीं ते पहिल्या दिवसाचे गृहस्थ गाडींत बसून आले. तेच

मालक असावेत हें तात्यांनीं तडिलें. मालक जाऊं लागले तेव्हां तात्यांनीं त्यांच्या गाडीपुढें उभे राहून ‘ माझें काम बघा वे मला नोकरी द्या ’ अशी मागणी केली. पंधरासोळा वर्षांच्या मुलाचा तो धीटपणा व बाणेदारपणा पाहून ते शेटजी फार खुष झाले व त्यांनीं तात्यांना नोकरी दिली. पगार दरमहा तीन रुपयेप्रमाणें ठरला.

ज्या पेढीवर तात्या नोकरीला लागले त्या पेढीचें नांव ‘ प्रागजी हिरजी आणि कंपनी ’ असें होतें व तात्यांना पाहून कौतुकानें हंसणारे ते गृहस्थ म्हणजे शेट प्रागजी पेराज. तात्या त्या बारदान गल्लींतून जातात, त्यांना प्रागजी पेराज शेटजींची गांठ पडते आणि या शेट-जींच्या सहवासामुळें तात्यांच्या एकंदर आयुष्याला वळण लागतें या गोष्टींमधील कार्यकारणभाव आपणा मूढ मानवांस कसा कळणार ? तो जगत्सूत्रधार जीं सूत्रें हलवीत असतो तीं आपल्या चर्म-चक्षूंना कशीं दिसणार ? या शेटजींच्या सहवासामुळें तात्यांना नोकरी मिळाली व त्यांची पोटापाण्याची सोय लागली. पण पोट भरण्याकरितां तात्या थोडेच मुंबईला आले होते ! त्यांना पोटच भरावयाचें असतें तर कोल्हापूर होतें, मलकापूर होतें आणि मुंबईतील तंबाकूची गादी होती. शेटजींच्यामुळें तात्यांच्या जीवितकार्याला जें वळण मिळालें त्याचा विचार प्रसंगोपात्त पुढें करण्यांत येईलच. या ठिकाणीं फक्त शेटजींचा व तात्यांचा संबंध धनी व नोकर असा जो होता तेवढ्यापुरताच विचार करूं.

प्रागजी हिरजी कंपनीमध्यें तात्यांना नोकरी तर मिळाली. परंतु तात्यांना काय माहिती होती ? शाळेंतील भांडवल मराठी तिसरीपर्यंतच. जमाखर्चाची माहिती होती परंतु गुजराथी येत नसल्यामुळें तिचा कांहीं उपयोग नव्हता. तेव्हां प्रथम त्यांना गठ्ठ्यावर नांव घालण्याची, खटाऱ्यांना चिठ्ठ्या देण्याचीं; असलीं कामें करावीं लागलीं. तात्यांनीं आपणांस काय पाहिजे तें ओळखलें. पेढीवरील दुसऱ्या कारकुनांकडून गुजराथी मुळाक्ष-

शांचा धडा घ्यावा. फावल्या वेळीं तो पाठ करावा. रात्रीच्या शाळेत जाऊनहि गुजराथी शिकावें. नव्या हनुमान गल्लींत राधाबाई खातु नांवाच्या बाईची एक खाणावळ होती. तिथें तात्या जेवत असत. तीन रुपये पगारांत दोन रुपये खाणावळ देऊन ते जागेचें भाडें काय देणार व इतर खर्च काय करणार ? त्यांना रहाण्यास स्वतंत्र जागा घेणें शक्यच नव्हतें. अर्थात् रस्त्यावरील म्युनिसिपालटीच्या फाणसाखालीं कांहीं दिवस अभ्यास करून त्यांनीं थोड्याच दिवसांत सफाईनें गुजराथी लिहितां बोलतां येण्याइतकें प्राविण्य मिळविलें. पेढीवरील नित्य सरावानें ते कच्छीहि शुद्ध बोलूं लागले. तात्या कच्छी व गुजराथी या भाषा अगदीं मातृभाषेप्रमाणें बोलत असत. तात्या जात्याच कुशाग्र बुद्धीचे असल्यामुळें प्रागजी हिरजी कंपनीची नोकरी चांगली करतां येण्यास आपणास काय शिकलें पाहिजे तें त्यांनीं स्वतःच ताडलें आणि ताबडतोब ते त्या उद्योगाला लागले व लवकरच त्यांत प्रवीण झाले. प्रागजी पेराज शेटजींनीं त्यांची ही कौतुकास्पद हुशारी पाहून त्यांना वरच्या दर्जाचीं अशीं कामें दिलीं व त्यांच्या पगारांतहि वाढ होत गेली. तात्यांनीं शेटजींना व शेटजींनीं तात्यांना प्रथम पहातां क्षणींच त्यांचा एकमेकांवर ' व्यतिषजति पदार्थानन्तरः कोऽपि हेतुः ' या न्यायानें लोभ जडलेलाच होता. आतां एकमेकांच्या सहवासामुळें त्यांना परस्परांची योग्यता प्रत्यक्ष कळून आली. शेटजी आपल्या गुणांचें चीज करतील हें तात्यांना कळून चुकलें व हा नोकर केवळ पोटार्थी नाहीं हें शेटजींच्याहि पूर्ण ध्यानांत आलें. अशीं तीन वर्षें गेलीं. एकदां शेटजींनीं तात्यांना जवळ बोलावलें व त्यांच्या घरची सर्व हकीकत विचारली. ती ऐकून घेतल्यावर शेटजींनीं सांगितलें " तूं आतां घरीं जा, आईबहिणींना भेट, आणि लग्न करून ये." आईला मागें दुःखांत सोडून आल्याला तीन वर्षें झालीं होतीं. तात्यांच्याहि मनांतून आईला भेटण्याचें होतेंच. अर्थात् शेटजींच्या सांगण्यावरून त्यांनीं घरीं जाऊन सर्वांना भेटून लग्न करण्याचा बेत निश्चित केला.

तात्या मलकापुराहून आल्याला तीन वर्षें झालीं. हीं तीन वर्षें ते

मुंबईंत एकटेच होते. शिरावर कोणी दुसरा जबाबदार नाहीं. स्वतः स्वतःचे मालक अशी स्थिति. वय अठरा एकोणीस वर्षांचें. त्यांत हातार्शी पैसा सुद्धां होता. परंतु अशा स्थितींतहि तात्या पूर्ण निर्व्यसनी राहिले. कुठें जाणें नाहीं येणें नाहीं, नाटक नाहीं तमाशा नाहीं, नोकरी कीं आपलें घर, असा त्यांचा क्रम असे. सकाळीं ९ वाजतां पेढीवर यावें तें रात्रौ ९ वाजतां घरीं जावें. या त्यांच्या क्रमांत कधीं म्हणून बदल झाला नाहीं. सकाळीं घरून खाऊन निघावयाचें तें रात्रौ घरीं परत गेल्यावर खाणें. मध्यंतरीं चहा नाहीं, सोडा नाहीं, पान नाहीं, तंबाकू नाहीं. इतकेंच काय पण ते पेढीवर असतांना पाणीहि तोंडांत घालीत नसत. गोदीमध्यें वगैरे माल उतरून घेण्यास ते गेले व भर उन्हाळा असला तर एखादें संत्र घ्यावें व तेवढें खावें. अशा पूर्ण मनोनिग्रहानें तीन वर्षें काढल्यामुळें त्यांनीं तिनशें रुपये संग्रहीं टाकले होते. या तिनशें रुपयांचें त्यांनीं सोनें घेतलें होतें. मागें आपल्यावर अवलंबून आपली आई, बहीण, भाऊ आहेत यांची तात्यांना मुंबईंत क्षणभरहि विस्मृति न पडल्यामुळें व त्यांनीं अत्यंत काटकसरीनें खर्चवेंच केला असल्यामुळें थोडक्या पगारांतूनहि त्यांना तीन वर्षांत तिनशें रुपये शिल्लक टाकतां आले हें मुंबईत नोकरीकरतां आलेल्या चाकरमान्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तिनशें रुपये खिशांत असा हा मुंबईकर आपल्या आईला व बहिणीला भेटण्यास तीन वर्षांनीं घराकडे आला. तात्यांचे बालपणचे दिवस अक्काकडे गेले असल्यामुळें त्यांना अक्काचा विशेष ओढा होता. ते प्रथम मलकापुरास आले. तीन वर्षांनीं बहीणभावाची भेट झाली. तात्यांचा बाणेदार स्वभाव अक्काला माहीत असल्यामुळें तात्या जिवाचें बरेंवाईट करून घेणारा भ्याड नव्हे असें अक्काला खात्रीनें वाटत होतें आणि तेंच तात्या भेटल्यावर खरें ठरलें. तात्यांची आई आंब्यास होती. म्हणून ते आईला व भाऊबंदांस भेटण्यास तिकडे गेले. तात्यांनीं गेल्याबरोबर आईला मिठी मारली. आपला नाहींसा झालेला 'बाळ' आपणांस भेटतो आहे यावर त्या माउलीचा प्रथम विश्वासच बसेना ? त्यांनीं तात्यांना आनंदाश्रूंनीं

न्हाऊं घातलें.व तात्यांनीं आपल्या हातांनीं आईचे अश्रु पुसले. तात्या कांहीं दिवस घरीं राहिले. एके दिवशीं त्यांनीं आपल्या लग्नाची गोष्ट काढली व त्यासाठीं तिनशें रुपये कमवून आणल्याचें सांगितलें. भाऊबंदांनीं " आणखी तिनशें रुपये कमवून आण आणि मग लग्नाची गोष्ट काढ. " असा नकार दर्शविल्यामुळें हिरमुसलें तोंड करून तात्या अक्काकडे आले.

याच वेळीं एक अकल्पित गोष्ट घडून आली आणि तात्यांचें लग्न झालें. ती गोष्ट अशीः—रत्नागिरीजवळील पोमेंडी येथील कै. तुकारामशेट गांधी हे घोड्यांवरून उतारूंना आणण्यानेण्याचा धंदा करीत असत. रत्नागिरीहून कोल्हापुरास उतारूंना नेतांना ते मलकापुरास तात्यांच्या अक्काकडे उतरत. नित्याप्रमाणें ते या वेळीं तेथें उतरले. तात्या सहाजिक त्यांच्या दृष्टीस पडले. तात्या मुळचेच सशक्त व नाकीं डोळीं सरळ असून त्यांचा आंगलोटहि ठाकठीक होता. पूर्ण निर्व्यसनी राहिल्यामुळें त्यांच्या चेहेऱ्यावर पावित्र्याचें तेज झळकत होतें. आतां ते अठरा एकोणीस वर्षांचे होते. भर तारुण्यांत नुकताच प्रवेश करीत होते. ओंठावर कोठें मिसूट फुटत होतें. असा मुलगा कोणाच्याहि डोळयांत पहातां क्षणींच भरणार. तात्यांना पहातांच तुकाराम शेटच्या मनावर अतीशय चांगला परिणाम झाला. हा मुलगा कोण, कुठला वगैरे त्यांनीं अक्काला विचारलें व अक्कांनीं आपल्या भावाची त्यांना ओळखहि करून दिली. सर्व हकीकत ऐकून घेऊन तुकाराम शेटनीं अक्काला "माझी गरीबाची मुलगी या मुलाला कराल का ? " असा एकदम प्रश्न टाकला. अक्काला ताबडतोब उत्तर देतां येणें शक्य नव्हतें; तरी त्यांनीं काय करावयाचें तें मनाशीं नक्की ठरविलें व त्यांना इतकेंच सांगितलें कीं आम्ही मुलासह मुलगी पहाण्यास येतों. दुसरे दिवशींच तात्यांना घेऊन अक्का आंब्यास आल्या व तात्यांच्या आईला व दुसऱ्या मंडळींना तात्यांची 'नोवरी' पहाण्यास चला म्हणून त्यांनीं सांगितलें. सर्वांनीं मोडता घातला. तात्यांच्या आईच्या मनांतून तात्यांचें लग्न ताबडतोब व्हावें असें होतें तरी सर्वांच्या

विरुद्ध त्यांना बोलतां येत नव्हतें. अक्कानें तर मनाशीं निश्चयच केलेला होता. त्या तात्यांना घेऊन तुकारामशेट बरोबर त्यांच्या गांवीं निघाल्या. मंडळी पोमेंडीला तुकारामशेटच्या घरीं आली, व वेसकट ओलांडून आंत शिरली. सर्वांच्यापुढें तुकाराम शेट होतेच. त्यांची मुलगी विहीरीवर रहाटानें पाणी ओढीत होती. तिला तुकारामशेटनीं ' तुला पाहण्यास आले आहेत ' अशी डोळ्यांनीं खूण केली. मुलगी लाजून घरांत पळाली. अक्काला मुलगी एकदम पसंत पडली व एक आठवड्याच्या आंत तात्यांच्या भाऊबंदाची संमति नसतांनाहि अक्कानें हें लग्न घडवून आणलें. जसे तात्या करारी तशाच त्यांच्या अक्काहि करारी !

तात्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई पांचपन्नास बायकांत शोभण्यासारख्या होत्या. त्यांच्या बाह्य सौंदर्याबरोबर त्यांच्या अंत:सौंदर्याचीहि छाप पहाणारावर ताबडतोब पडत असे. त्यांचा स्वभाव अत्यंत साधा व मनमिळाऊ असा होता त्यांची संसारांतील दक्षताहि वाखाणण्यासारखी होती. आपल्या नात्यागोत्याच्या मंडळींना आपणांकडून थोडीफार तरी मदत व्हावी असें त्यांना नेहमीं वाटत असे. या त्यांच्या इच्छेला तात्यांची पूर्ण संमतिच नव्हे तर प्रोत्साहनहि होतें. 'कार्येषु मंत्री वचनेषु दासी' अशा पत्नीचा सहवास श्रावण शु. १५ शके १८३४ पर्यंत तात्यांना घडला. व ' परस्परं भावयन्त: ' त्यांनीं आपला संसार सुखाचा असा केला. याप्रमाणें लग्न आटोपून अक्का तात्यांसह आंब्यास आल्या. तात्या रेशीमकांठी व हळदीचें पिंवळलेलें धोतर नेसलेले होतें. त्यांचें पिंवळें धोतर त्यांच्या आईनें पाहून "बाळ, तुझ्या धोतरास हळद कोठली लागली ? अरे तुझें लग्न झालें कीं काय ?" असे एकदम उद्गार काढले. अक्कानें नंतर सर्व हकीकत सांगितली. आपल्या बाळाचें लग्न आपणास पहाण्यास मिळालें नाहीं म्हणून आईला जरी थोडेसें वाईट वाटलें असलें तरी त्याचें लग्न झालें म्हणून त्यांना कितीतरी समाधान वाटलें असेल. मुलीच्या—अक्काच्या—करारीपणाचें आधीं कौतुक करावें, मुलाच्या भाग्याबद्दल आगोदर

त्याचें अभिनंदन करावें कीं आपलीं मुलें अशीं करारी निघालीं म्हणून प्रथम स्वतः धन्यता मानावी हेंच त्यांना समजलें नसेल. लाडक्या बाळाचा संसार थाटला गेला हें पाहून त्यांना पूर्ण समाधान वाटलें. बाळ चांगला कमवता आहे धाकट्या भावाचें व बहीणींचीं लग्नें तो सहज करील, असें वाटून त्यांच्या मनाची सर्व काळजी नाहींशी झाली व त्यांना कृत-कृत्यता वाटली. आज संसारी बनलेल्या तात्यांचा पुढील नमुनेदार संसार या माउलीनें पुढें बराच वर्षें पाहिला. आपल्या बाळाचा वाढता व्यापारधंदा व मानमरातब स्वतःच्या डोळ्यांनीं त्यांनीं पाहिला तेव्हां आपल्या डोळ्याचें पारणें फिटलें असें वाटून या माउलीनें पौष शु. ३ शके १८२८ रोजीं मुंबईंत डोळे मिटले.

सर्व लग्नसोहळा झाल्यावर तात्या मुंबईस आले. पहिल्यानें आपल्या पहिल्या शेटजींकडे जाऊन त्यांना सर्व हकीकत त्यांनीं सांगितली व पूर्ववत् आपल्या कामावर ते रुजू झाले. या एकाच पेढीवर तात्या स्वतंत्र व्यापार काढीपर्यंत पंधरा वर्षें एकनिष्ठपणें राहिले. तात्यांची हळुहळु त्या व्यापारांत बरीच प्रगति झाली व त्यांच्यावर जबाबदारीचीं कामें पडूं लागलीं. तीं कामें त्यांनीं इतक्या चोख रीतीनें बजावली कीं पेढीवरील मुख्य मुनिमांत त्यांची गणना झाली व त्यांना दरमहा २५ रु. प्रमाणें पगार मिळूं लागला. मालकाचा त्यांचेवर फारच लोभ जडला व तो शेवट-पर्यंत कायम टिकला. प्रागजी पेराजचे मागून त्यांचे भाऊ चिना पेराज पेढीचे मालक झाले. आज ही पेढी मांडवींत 'चतुर्भुज पेराज आणि कंपनी' या नांवानें चालत असून शेट विरजी पेराज हे तिचे मालक आहेत. पेढीवर इतका फेरफार झाला परन्तु तात्यांचे विषयीं पेढीच्या मनांत जो आदर उत्पन्न झाला तो अद्याप कायम आहे, आणि तात्यांच्याहि मनांत आपल्या आयुष्यास दिशा दाखविणाऱ्या पेढीविषयीं शेवटपर्यंत पूज्यभाव कायम राहिला. तात्यांना आपल्या धन्याविषयीं इतका अभिमान वाटत असे कीं, धन्याच्या नात्यागोत्याची मंडळीहि त्यांना शेटजीप्रमाणेंच पूज्य वाटे. तात्यांनीं

स्वतंत्र धंदा काढला तरी त्यांना आपला पूर्वीचा शेटजी हाच आपला मालक असें वाटे. पेढीवरील कोणी तात्यांच्या दुकानावर आले तर तात्यांनीं बैठकीवरून उतरून खालीं यावें व हात जोडून 'काय शेटजींचा हुकुम आहे?' म्हणून विचारावें. आपलें काम सांभाळून तात्या पहिलीं एकदोन वर्षें रोज थोडा वेळ नियमित आपल्या शेटजींच्या पेढीचेंहि काम पहात होते. शेटजीकडे कांहीं लग्नकार्य असलें तर तात्यांकडे मेवामिठाईचा करंडा जावा. अशा रीतीनें सेव्यसेवकभावाचें रूपांतर परम स्नेहांत झालें. तात्यांचे शेटजीसारखे धनी व शेटजींना लाभलेले तात्यासारखे एकनिष्ठ सेवक जगांत दुर्मिळच असणार. कमी पगारांत नोकरांकडून भरपूर काम कसें करून घेतां येईल याचा धन्यानें रात्रंदिवस विचार करीत असावें आणि नोकरानें धन्याच्या डोळ्यांत धूळ फेंकून आपली तुंबडी कशी भरतां येईल याचा जप करावा. असेच धनी व नोकर प्रत्येक ठिकाणीं आज दिसत आहेत. धनीनोकराची अशी जेथें एकमेकांकडे पाहण्याची दृष्टि तेथें धन्याला यश कसें मिळणार आणि नोकराचें तरी पोट कसें भरणार? धनी व नोकर यांचे हितसंबंध जणुं काय परस्परविरुद्ध आहेत अशी सध्यां उभयतांची समजूत झालेली दिसते. धनी समजत असतो कीं, नोकराचे मोठ्यांत मोठ्या नुकसानांत माझा मोठ्यांत मोठा फायदा आहे आणि नोकर मानीत असतो कीं धन्याचे मोठ्यांत मोठ्या नुकसानांत माझा मोठ्यांत मोठा नफा आहे. एकाच्या फायद्यांत दुसऱ्याचा फायदा आहे असें मानणारे जसे धनी दुर्मिळ झाले तसे नोकरहि दुर्मिळच झाले. असो. शेटजींच्या मनांत तात्यांविषयीं जो आदरभाव उत्पन्न झाला त्याचें मुख्य कारण त्यांची वागणूक. तात्या इतके नियमित होते कीं पेढीवरील घड्याळ त्यांच्या जाण्यायेण्यावरून लावावें. त्यांची टापटिपीची आठवण अद्यापहि त्या पेढीवरील मंडळींना होत असते. गुजराथी मुनिमांना साधत नसे इतका उत्तम प्रकारें ते जमाखर्च ठेवीत. हिशेबठिशेब करण्यांत त्यांचा हातखंडा होता. इतकें असूनहि ते पराकाष्ठेचे प्रामाणिक होते.

तात्यांच्या हातून जबाबदारीनें हजारों रुपयांची उलाढाल होत असे परंतु त्यांच्याकडून कांहीं अफरातफर होईल अशी त्यांच्या मालकींना कधीं शंकाहि आली नाहीं. कारकून जमाखर्च ठेवण्यांत जितका जास्त प्रवीण तितका तो आपल्या धन्याला ठकविण्यांत जास्त तरबेज असे दुर्दैवानें कित्येक धन्यांना जे अनुभव येतात ते ऐकिले कीं विचार कुंठितच होतात. तात्यांना ज्याप्रमाणें नाटकतमाशयांना जाण्याचें व वाटेल तें खाण्यापिण्याचें व्यसन नव्हतें त्याचप्रमाणें त्यांना कपड्यालत्त्याचाहि शोक नव्हता. वर्षांतून फक्त एकदां कपडालत्ता ते करीत. नेसायला जगन्नाथी धोतरजोडा, अंगांत एक बाराबंदी व वर एक तपकिरी रंगाचा आंगरखा, खांद्यावर उपरणें व डोक्यावर पगडी हा त्यांचा नेहमींचा पोशाख असे. त्यांनीं आपला खर्च इतका टापटिपीचा ठेविला होता कीं, खर्चासाठीं कोणाजवळ उधार मागण्याचा किंवा धन्याकडे अगाऊ पगार मागण्याचा त्यांच्यावर कधीं प्रसंगच आला नाहीं. सारांश तात्यांची टापटिपीची रहाणी, योग्य काटकसर, निर्व्यसन, नियमितपणा, नम्रपणा, कार्यकुशलता, प्रामाणिकपणा वगैरे अनेक गुणांमुळें त्यांच्या गुणज्ञ शेटजींच्या मनावर परिणाम होऊन त्यांना तात्या नोकर असे वाटेनासे झाले. अशा प्रकारें सुमारें पंधरा वर्षें तात्यांनीं नोकरी केली. इतक्यांत एक प्रकार घडला व त्यामुळें तात्यांना नोकरी सोडून स्वतंत्र धंदा काढावा लागला. एकदां मलकापुराहून तात्यांना एक अत्यंत जरूरीची तार आली व त्यांना ताबडतोब जी पहिली गाडी मिळेल ती पकडून गांवीं जाणें भाग पडलें. धन्याची परवानगी घेण्यासही फुरसत नव्हती. ते गाडींत जाऊन बसले न बसले तोंच गाडी सुरू झाली. परंतु आपण धन्याची परवानगी न घेतां निघालों हा आपला सेवाधर्म नव्हे, असें त्यांचें मन त्यांना सांगूं लागलें. आपण चूक केली असें त्यांना वाटूं लागलें. पंधरा वर्षें जी इमानेंइतबारें नोकरी केली तिला आज काळीमा लागला असें त्यांचें मनानें घेतलें. त्यांच्या मनांत कालवाकालव सुरू झाली. गाडी पुढें कोल्हापुराकडे भरधांव

चालली होती पण तात्यांचें मन तीपेक्षांही जास्तवेगानें मागें मुंबईस त्यांच्या मालकाकडे धांवत होतें. शरीर एका दिशेला व मन उलट दिशेला अशी त्यांची त्रेधा उडाली. शेवटीं एका स्टेशनवर उतरून धन्याला तारेनें आपण गांवीं निकडीच्या कामासाठीं जात आहों असें कळवून त्यांची क्षमा मागितली तेव्हांच कोठें थोडेसें त्यांच्या मनाचें समाधान झालें. मग घरीं गेल्यावर पत्रानें सविस्तर हकीकत शेटजींना त्यांनीं कळविली. काम आटोपतांच ते मुंबईला आले हें सांगावयास नकोच.

याच संधीला त्यांच्या शेटजींच्या पेढीवरील दुसरेही मुनीम कोणी कांहीं कामासाठीं, कोणी कांहीं कामासाठीं असे गैरहजर राहिले. ५।६ मुनिमांपैकीं एकहि मुनीम पेढीवर हजर नव्हता. शेटजींची मोठी त्रेधा उडाली. अशा स्थितींत मनाला उद्वेग वाटणें साहजिक होतें. इतक्यांत तात्या आले, त्यांनीं शेटजींना नमस्कार केला व आपल्या बैठकीवर जाऊन बसून ते नित्य कामांत व्यग्र झाले. धनी आंतल्या बाजूला दुसऱ्या कोणाजवळ आपल्या धंद्यारोजगाराविषयीं बोलत बसले. गोष्टीवरून गोष्टी निघतां निघतां पेढीवरील नोकरांविषयीं त्या निघाल्या. शेटजींना माणसांच्या गैरहजेरीमुळें अगोदरच मनस्वी त्रास झालेला होता. त्यांत तात्याहि आलेले होते. त्यांना पाहिल्याबरोबर शेटजींना आपल्या धांदलीची आठवण झाली आणि बोलतां बोलतां मोठमोठ्यांनीं ते माणसांना दोष देऊं लागले. कदाचित् तात्यांच्या कानावर जावें म्हणून मुद्दामहि ते मोठ्यानें बोलूं लागले असतील. तात्या जरी आपल्या कामांत बाहेर व्यग्र झालेले होते तरी त्यांच्या कानावर नोकरांवर चाललेली टीका पडली. त्यांचें हृदय धडधडूं लागलें. इतक्यांत आंतून 'बधा नोकर बेमान केम थया ? ( सर्वच नोकर बेइमान कसे ? )' असें शेटजींनीं संतापाच्या भरांत उच्चारलेले शब्द तात्यांनीं ऐकले व त्यांचें डोकें भणभणूं लागलें. त्यांच्या डोळ्यांतून गंगायमुना सुरू झाल्या व समोरच्या वहीवर आंसवांनीं त्यांनीं आपला राजिनामा तत्काळ लिहून टाकला.

काय करावें म्हणजे आपला इमानीपणा आतां शेटजींना सिद्ध करून देतां येईल हें त्यांना कळेना. सव्वा तप इमानेंइतबारें नोकरी केली आणि तिचा शेवट असा व्हावा याचें त्यांना अत्यंत वाईट वाटलें. ‘ हें फळ काय मम तपाला ! ’ असें त्यांना वाटूं लागलें. खरें पहातां केवळ संतापाच्या भरांत मालकांनीं ते शब्द उच्चारले होते. परंतु तात्यांच्या कोंवळ्या मनावर त्यांचा विपरीत परिणाम झाला. ‘ बधा नोकर बेमान केम थया ? ’ या द्वादशाक्षरी मंत्रानें पंधरा वर्षें सेवाधर्मांत गढून गेलेलें त्यांचें अंतःकरण एकदम जागें झालें. कितीहि इमानेंइतबारें केली तरी ‘नोकरी ती नोकरीच’ असें त्यांना वाटूं लागलें. ‘ सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ’ हें तत्त्व त्यांना पटलें व नोकरीला रामराम ठोकण्याचा त्यांनीं मनाशीं निश्चय केला.

नेहमीं आनंदानें आपलें काम करण्यांत तल्लीन असलेले तात्या एखाद्या लहान मुलाप्रमाणें रडत आहेत हें तेथील इतर माणसांनीं पाहिलें व ते तात्यांची समजूत घालूं लागले. शेटजींच्या धाकट्या बंधूंनीं खालीं मान घालून रडत असलेल्या तात्यांना हातीं धरून उठवून आपल्या घरीं नेलें व त्यांनीं झालेल्या प्रकारांत इतकें दुःख करण्यासारखें कांहीं नाहीं असें नानाप्रकारें सांगून पाहिलें. शेवटीं प्रत्यक्ष शेटजींनीं त्यांची समजूत घातली तेव्हां त्यांचें रडें थांबलें. तात्या बेइमान झाले असें म्हणण्याचा धन्याचा रोख नव्हता हें उघडच आहे व तात्यांनाहि थोड्या वेळानें तें पटलें. त्यांना त्या दुःखाचा विसरहि पडला. परंतु त्या द्वादशाक्षरी मंत्रानें ‘नोकरी ती नोकरीच’ हें जें तत्त्व त्यांना शिकविलें तें मात्र विसरण्यास ते तयार नव्हते. कोल्हापूर काय, मलकापूर काय आणि मुंबई काय कोठेंही गेलें तरी ‘पळसाला पानें तिनच’ अशी त्यांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली व एके दिवशीं ‘ माझ्या मनांतून स्वतंत्र कांहीं तरी धंदा करावयाचा आहे ’ असें त्यांनीं आपल्या शेटजींना कळविलें.

इतकीं वर्षें इतक्या इमानानें काम करणारा नोकर नोकरी सोडून जात आहे याचें शेटजीसाहि फार वाईट वाटलें. आपल्या ' बेमान ' शब्दानें बेफाम होऊन ते जात नाहींत अशी शेटजींनीं प्रथम खात्री करून घेतली व त्यांना आनंदानें सोडण्यास ते तयार झाले. आपली नोकरी करीतच नोकरानें जन्मभर खितपत पडून रहावें असें समजणारा धनी कसला, तो शत्रुच होय. खरा धनी आपल्या नोकराच्या अभ्युदयाचे आड कधींहि येत नसतो. तात्यांचा शेटजी हा खरा ' धनी ' होता. तो मनाचा उदार होता. त्यांनीं तात्यांच्या स्वतंत्र धंदा करण्याच्या कल्पनेला पूर्ण संमति दिली व ' तुला लागेल ती मदत मी करीन ' असें वर आश्वासनहि दिलें. धन्य तो धनी ! धन्य तो नोकर ! ! कोण कोणापेक्षां श्रेष्ठ हें ठरविणें फार कठीण आहे ! ! !

तात्यांना त्यांच्या हितकर्त्या धन्यानें वर दिलेला द्वादशाक्षरी मंत्र ऐकविला. तात्यांनीं नोकरी सोडून स्वतंत्र धंदा करण्याचा निश्चय केला. आणि शेवटीं धन्याचें त्यांना पूर्ण पाठबळ मिळालें. हें सर्व व्हावयाचें तसेंच झालें. परंतु स्वतंत्र धंदा म्हणजे काय ? तो कोठें कसा सुरू करावयाचा याचा विचार मात्र तात्यांनीं अद्याप केलेला नव्हता. तो विचार करण्याचें त्यांना कारणच नव्हतें. एका धन्याचें अन्न घ्यावयाचें व दुसऱ्या धन्याची नोकरी करावयाची असा बेइमानीपणा तात्यांच्या ठिकाणीं नव्हता. म्हणूनच नोकरींत असतांना स्वतंत्र धंदा कोठें कसा काढावयाचा हा विचार तात्यांच्या मनाला केव्हांहि शिवला नाहीं. शरिरानें एका धन्याची सेवा आणि मनानें दुसऱ्या धन्याची नोकरी असा व्यभिचार तात्यांकडून कधींहि झाला नाहीं. एका धन्याजवळ तुमची नोकरी मी अखण्ड करीन असें तोंडानें आश्वासन द्यावयाचें व त्याच वेळीं दुसऱ्या धन्याकडे ' मला नोकरी दिली असतां तुमचे उपकार मी जन्मभर विसणार नाहीं ' असा लेखी अर्ज करावयाचा, असलें पाप करणारांपैकीं तात्या नव्हते. म्हणूनच नोकरी सुटली किंवा सोडली तरी पुढें

कोठें काय करावयाचें तें तात्यांनीं अगाऊ ठरवून ठेविलेलें नव्हतें. पुढला विचार जरी तात्यांना ताबडतोब नक्की करतां येण्यासारखा नव्हता तरी नोकरी सोडावयाची एवढा विचार त्यांचा पक्का झालेला होता. त्याप्रमाणें नोकरी सोडण्याचा दिवस आला. प्रवासामध्यें एक वेळ जरी एखाद्या झाडाखालीं आपण विश्रांति घेतली तरी त्या झाडाला सोडून जातांना थोडेंसें वाईट वाटतें. मग पंधरा वर्षें आनंदानें दिवस काढलेलें स्थान सोडून जातांना तात्यांना अगदीं भडभडून आलें तर यांत काय आश्चर्य ? तात्यांनीं शेटजींच्या पायांवर डोकें ठेविलें. शेटजींनीं तात्यांना उचलून हृदयाजवळ धरलें. तात्यांना दूर होतां येईना. त्यांना शेटजींचा एकदम धनीनोकर हा संबंध तोडवेना. 'रोज थोडा वेळ पेढीवर येऊन मी काम करीत जाईन' असा शेटजींशीं त्यांनीं आपला संबंध ठेविला तेव्हां त्यांना दूर होतां आलें. आपल्या शेटजीकडे रोज एक दोन तास नियमित जाऊन लिहिण्याचें वगैरे काम तात्यांनीं पुढें एक दोन वर्षें केलें व त्याबद्दल त्यांना दरमहा पांच रुपये मिळतहि असत. तसेंच जोखमाचें आणि भानगडीचें काम असलें, तर ते शेटजी तात्यांना मुद्दाम बोलवीत असत व त्यांची सल्लामसलतहि घेत असत.

याप्रमाणें तात्या नोकरीच्या बेडींतून एकदांचे मोकळे झाले व नंतर काय करावयाचें तें पाहूं लागले. पुढें काय करावयाचें हें जरी तात्यांना ताबडतोब ठरवितां आलें नाहीं तरी काय करावयाचें नाहीं हें मात्र त्यांनीं नक्की ठरवून ठेविलें होतें. जेणेंकरून आपल्या धन्याचे धंद्याला तोशीस लागेल असा कोणताही धंदा करावयाचा नाहीं असें तात्यांनीं ठाम ठरवून टाकलें होतें. साधारणतः नोकरी सुटली किंवा सोडली म्हणजे पूर्वीच्या धन्याच्या शेजारीं किंवा समोर तोच धंदा सुरू करून आपला इमानीपणा प्रकट करण्याची वृत्ति आपल्याकडे नोकरांत दिसून येते. या वृत्तीचा धनी व नोकर दोघांवरहि अनिष्ट परिणाम होत असतो. आज नोकरी करीत असलेला मनुष्य उद्यां भांडून—तंडून किंवा कसाही येथून निघाला तरी शेजारीं हाच व्यापार मांडून आज त्याचे ओळखीचे झालेले

आपले गिऱ्हाइक फोडील या भीतीनें धनी कधींही नोकराला आपल्या धंद्यातल्या खुब्या कळूं देत नाहीं. धनी-नोकर यांच्यामध्यें झिरझिरत कां असेना पण संशयाचा पडदा नेहमीं राहतो. त्यामुळें नोकर त्या व्यापारांत खरा वाकबगार होत नाहीं व त्याचा दर्जा नोकराचे वर वाढूं शकत नाहीं. असा हा अर्धाकच्चा नोकर मग पहिल्या धन्याच्याच शेजारीं दुकान काढून त्याच्याशीं स्पर्धा करूं लागतो. बऱ्याबुऱ्या बऱ्याच प्रसंगांतून तावून सुलाखून निघालेल्या व्यापाऱ्याशीं या अर्धवट, अननुभवी मनुष्यास स्पर्धा करण्याकरितां असेल नसेल तें सर्व भरीस घालावें लागतें व शेवटीं चोपड्या पालथ्या घालाव्या लागतात. पहिल्या धन्याशीं बेईमान झालेल्या या मनुष्यास मग कोणीहि सच्चा व्यापारी नोकरीस ठेवीत नाहीं. अशा रीतीनें त्याची ' इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ' अशी स्थिति होऊन जाते. नोकरांच्या या वृत्तीमुळें धन्याचेंही थोडेंफार नुकसान होतेंच. आज नोकर असलेला हा मनुष्य उद्यां ' कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ' होणार अशी धन्याची समजूत असल्यामुळें धनी त्याला विश्वासांत घेऊंच शकत नाहीं व जबाबदारींचीं सर्व कामें एकाकी धन्यास करावीं लागतात. नोकरांची खरी मदत धन्याला होत नाहीं. खाल्ल्याघरचे वासे मोजावयाचे नाहींत असा जर नोकरांनीं तात्यासारखा बाणा ठेविला तर धनीहि त्यांच्यावर विश्वास टाकील. धन्याच्या विश्वासाबरोबर त्यांच्याकडे जबाबदारीचीं कामें येऊं लागतील व त्यांच्यांत पात्रता वाढूं लागेल. हळुहळु धंद्याचें सर्व रहस्य त्यांच्या लक्षांत येऊन ते त्यांत चांगले वाकबगार होतील. मग ते नोकर कुठेंहि गेले व त्यांनीं कसलाहि धंदा केला तरी त्यांत वर येऊं शकतील. तात्यांचीं पंधरा वर्षें कच्छी—लोहाणा व्यापाऱ्यांत गेलेलीं होती. ' जर एखादा भागीदार भागींतून निघाला तर त्यानें त्या टापूंत एक वर्षपर्यंत पहिला धंदा करूं नये, किंवा जर एखादा नोकर नोकरींतून बाहेर पडला तर त्यानेंहि त्यांच धंद्यांतील नोकरी एक वर्षपर्यंत त्या टापूंत करूं नये. ' असा त्या लोकांचा शिरस्ता तात्यांनीं पाहिला होता.

कच्छी–लोहाण्यांतील हा शिरस्ता तात्यांनीं शिरसावंद्य मानला व ज्या बाजारांत आपण नोकरी केली त्या बाजारांत पूर्वींच्याच धन्याचा व्यापार करावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें. एका धंद्यांतील अनुभव दुसऱ्या धंद्यांत चालत नाहीं असें नाहीं. धंदा कोणताहि असो, धंदा करण्याचें सामान्य शास्त्र सर्व ठिकाणीं सारखेंच असतें. शिवाय धंदा करणारास एकच पेठ तेवढी थोडीच मोकळी असते त्याला सर्व जग मोकळें असतें. व्यापार करणारा मात्र पाहिजे. पूर्वींच्या धन्याकडे जो अनुभव मिळविला त्याचा उपयोग दुसऱ्या व्यापारांत करून घ्यावयाचा असें तात्यांनीं ठरविलें व ते कोणता धंदा करावयाचा तें पाहूं लागले.

ते दिवस पावसाळ्याचे सुरवातीचे होते. प्रथम त्यांनीं थोड्याशा छत्र्या घेऊन फेरीनें विकून पाहिल्या. त्यांत त्यांना दोन पैसे मिळाले. तेव्हां छत्र्यांचाच धंदा करावयाचा असा त्यांनीं विचार केला. इतक्यांत पायधुणीवर एक छत्र्यांचें दुकान विकावयाचें आहे असें त्यांना समजलें. तात्या त्या दुकानदाराकडे गेले. त्याच्याशीं विचार विनिमय केला व त्यांना तो सौदा पटला. दुकानांतील मालाची लागलींच नोंद करण्यांत आली. लेखहि लिहिण्यांत आला. फक्त पैसे मोजावयाचें व दुकान ताब्यांत घ्यावयाचें एवढेंच शिल्लक राहिलें. पैशासाठीं कांहीं तात्यांना दुसरीकडे जावयास नको होतें. ते आपल्या पूर्वींच्या शेटजीकडे आले व त्यांना सर्व हकीकत त्यांनीं सांगितली. शेटजींनीं सांगितलें, " तुला पैशाची काळजी नको. पण तुला कोणी ठकवील वगैरे तें पहा. " तात्यांनीं त्यांचीं पूर्ण खात्री करून दिली व शेटजींनीं केवळ तात्यांच्या शब्दावर रात्रौ अकरा वाजतां २२००रु.त्यांच्या स्वाधीन केले. दुसरे दिवशीं तात्यांनीं रुपये भरले. अशा रीतीनें शके १८१५ मध्यें त्यांनीं छत्र्यांचा धंदा स्वतंत्रपणें सुरू केला.

तात्या शेटजीकडे नोकरीस असतांनाच त्यांचे धाकले भाऊ रामचंद्रशेट यांना तात्यांनीं मुंबईस रोजगाराकरितां आणिलें होतें. ते पान तंबाकूचें दुकान चालवीत असत. तात्यांनीं स्वतंत्र धंदा 'रामचंद्र नामदेव ' या नांवानें सुरू

केला. रामचंद्रशेट कार्तिक शु.९ शके १८२८ मध्यें वारले पण तात्यांनीं धंद्याचें पूर्वींचेंच नांव कायम ठेविलें. पुढें छत्रीच्याच दुकानांत त्यांनीं कोरडा चहा कांहीं दिवस ठेविला. जोडधंदा म्हणून सोड्याची फॅक्टरी कांहीं दिवस चालविली, व पुस्तकेंही कांहीं दिवस विकिलीं. अशा रीतीनें छत्रीच्या कृपाछत्राखालीं असे दोन तीन धंदे तात्यांनीं करून पाहिले. परंतु छत्रीच्या सावटीखालीं ते न वाढल्यामुळें त्यांनीं ते हळुहळु कमी केले व छत्रीचाच धंदा त्यांना वाढवितां आला तितका वाढविला. पहिल्या दुकानाचे उजवे हातास त्यांनीं दहाबारा वर्षांनीं दुसरें दुकान घातलें व पुढें पांचसात वर्षांनीं डाव्या हातास तिसरें दुकान उघडलें. हीं तिन्हीं दुकानें तात्यांनीं शेवटपर्यंत चालविलीं. दुकानालाच पोषक म्हणून त्यांनीं छऱ्यांचे सुटे भाग परदेशाहून मागवून त्यांच्या छऱ्या तयार करण्याचे दोन कारखानेही कांहीं वर्षें चालविले. छत्रीच्या व्यापारांत ते इतके पुढें आले कीं आपल्या समाजाबाहेर ते पुष्कळांस आज 'छत्रीवाले' म्हणूनच प्रसिद्ध आहेत.

तात्या आपल्या व्यापारांत जे पुढें आले ते केवळ आपल्या उपजत बुद्धीच्या बळावर होय. तात्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचीं उदाहरणें मागें अनेक आलीं असतील व पुढेंहि आणखी येतील. तात्यांच्या घराण्यांत पिढीजात व्यापार नव्हता हें आपण पहिल्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. तात्यांचे वडील व्यापार करीत असत पण तो अगदीं किरकोळ होता. सारांश तात्यांना व्यापाराचें बाळकडू नव्हतें म्हणण्यास हरकत नाहीं. तात्यांना व्यापाराचें बाळकडू जसें मिळालें नाहीं तसें बुद्धि विशाल करणारें शिक्षणही मिळालें नाहीं. हेंहि आपण मागें पाहिलें आहे. या दोन्ही प्रतिकूल गोष्टींचा तात्यांच्या व्यापारांतील प्रगतीला थोडाफार तरी अडथळा झालेला आहे ही गोष्ट व्यापारीपेशा सोडून नोकरीच्या मागें लागणाऱ्या व फक्त हिशेबठिशेब करतां आले, अक्षर मोत्यासारखें काढतां आलें व जमाखर्चाची लपेटी साधली कीं झालें शिक्षण असें मानणाऱ्या उभयतांनींहि लक्षांत ठेविली पाहिजे.

व्यापाराला प्रतिकूल अशी मूळ परिस्थिति असतांना तात्यांनीं व्यापारांत जो नांवलौकिक व पैसा कमावला तो केवळ आपल्या सचोटीच्या बळावर होय. त्यांनीं परदेशाशीं व्यापार केला नाहीं, मुंबईचा छत्रीचा व्यापार कबज्यांत घेतला नाहीं, परंतु त्यांनीं 'सच्चा व्यापारी' हें नांव मात्र मिळविलें. तात्यांच्या दुकानाशेजारींच करीम इब्राइम यांचें छत्रीचें दुकान आहे. करीम इब्राइम हा धाडसी मुसलमान आज छत्रीच्या व्यापारांत अग्रगण्य आहे. मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं त्यांचा व्यापार आहे. असें बडें प्रस्थ जरी शेजारीं आलें तरी तात्यांना त्याची बिलकूल भीति वाटली नाहीं. अशा व्यापाऱ्यांशीं टक्कर देणें सोपें काम नाहीं. परंतु तात्यांनीं ती दिली व शेवटपर्यंत आपलीं तिन्हीं दुकानें चालविलीं. व्यापार करण्याची तात्यांची हातोटी शिकून कोणास येणारी नाहीं. ते गिऱ्हाइकाजवळ निष्कारण घासाघीस घालीत बसत नसत. गिऱ्हाइकाजवळ उगाच वायफळ बडबड केल्यानें त्याच्या मनावर विपरीत परिणाम होत असतो. नेमके कारणापुरते गोड शब्दांनीं तात्या बोलत असल्यामुळें त्याचा परिणाम गिऱ्हाइकाच्या मनावर कायमचा होई. एखाद्या गिऱ्हाइकाला सौदा पटला नाहीं तरी तात्या त्याच्यावर न संतापतां ' बरें बाबा तुला दुसरीकडे तुला पाहिजे तसा, तूं म्हणतोस त्या किंमतींत माल मिळाला तर खुशाल घे. ' अशा शब्दांनीं त्याची बोळवण करीत असत. त्यामुळें तें गिऱ्हाइक माल घेऊन गेलें नाहीं तरी तात्यांचा शांत स्वभावाचा विचार करीत मात्र जाई व म्हणून पुन्हा तें प्रथम तात्यांच्याच दुकानीं येई. आपणाला आवरणार नाहीं असा आपल्या व्यापाराचा पसारा करण्याचें धाडस त्यांचेकडून झालें नाहीं. परंतु त्यांनीं त्या व्यापारांत पहिल्या प्रतीची पत मात्र अखेरपर्यंत राखिली.

एवंच ' जोडोनियां धन उत्तम वेव्हारें ' या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें तात्यांनीं कसें धन जोडलें हें आपण पाहिलें. आतां पुढल्या प्रकरणांतून ' उदास विचारें वेंच करी ' हा त्याच उक्तींचा उत्तरार्ध त्यांनीं कसा पुरा केला तें पाहूं.

---

## प्रकरण चौथें.

# कों. वैश्यज्ञातिफंड ऊर्फ पैसाफंड.

"पैसाफंड ही खरोखर कामधेनु आहे आणि पैसाफंडाचें काम करीत असतां स्वार्थत्याग, निरपेक्ष मदत, आणि सहकारीपणा हे सद्गुण तुमच्या अंगीं येऊन तुमचा उत्कर्ष होणें हें राष्ट्रीय दृष्ट्या पैसाफंडाच्या मूर्त फळापेक्षांही अधिक योग्यतेचें फळ होय."

—लोकमान्य टिळक.

तात्या आंब्यास जन्मास आले, त्यांचें बाळपण मलकापुरास गेलें, आणि मुंबईस येऊन त्यांनीं आपला धंदा—रोजगार केला. एवढेंच जर त्यांचें चरित्र असतें तर ते एका चरित्राचे विषयच झाले नसते. त्यांच्या ठिकाणीं अनुकरणीय अशा अनेक गुणांचा उत्कर्ष झालेला होता परंतु तात्यांच्या चरित्राकडे आज अखिल कोंकणस्थ वैश्य समाजाच जें लक्ष वेधलें गेलें आहे तें त्यांच्या ठिकाणीं असलेल्या गुणसमुच्चयामुळें नव्हे. तात्या जे एका चरित्राचे विषय होऊं शकले, आणि तात्यांच्या चरित्राकडे त्यांच्या सर्व समाजाचें जें लक्ष लागलें त्याचें मुख्य कारण त्यांनीं केलेली सार्वजनिक कामगिरी होय. तात्यांनीं धंदा—रोजगार केला, इतरहि अनेक लोक तसा करतात. तात्यांनीं त्यांत दोन पैसे मिळविले इतरहि तसे किंवा त्यापेक्षांहि पुष्कळ मिळवितात. यांत काय मोठेंसें आहे? तात्यांना जो मोठेपणा आला तो त्यांच्या श्रीमंतीमुळें नाहीं तर त्यांच्या सार्वजनिक कार्यामुळेंच होय. तात्यांनीं जें

सार्वजनिक कार्य केलें त्याला मूळ स्फूर्ति कोणापासून झाली, सुरवात कशी झाली, आडव्या आलेल्या अडथळयांना न जुमानतां त्याची वाढ कसकशी होत गेली हाच इतिहास, तात्यांचें सर्व आयुष्य सार्वजनिक कार्यांत गेलें असल्यामुळें, या चरित्रांत प्रामुख्यानें येणार हें उघडच आहे.

केव्हांहि आणि कोठेंहि झालें तरी सत्समागमाला अत्यंत महत्त्व दिलें जातें. अध्यात्मशास्त्रांत सत्समागम हें मोक्षाचे एक मुख्य द्वारच मानलें आहे. म्हणजे सत्समागमाशिवाय मनुष्यास मोक्ष प्राप्तच होत नाहीं. योगवासिष्ठांत सत्समागम ही गंगा मानली असून ज्यांनीं तिच्या पात्रांत प्रवेश करून स्नान केलें आहे त्यांना दानें, तपें, तीर्थें, यज्ञ अधिक तें काय देणार असें वसिष्ठ ऋषि सांगतात. अर्वाचिन् मुनी तुकाराम बोवा यांनीं ज्या मुक्तीकरितां घरदारावरील प्रीति सोडली व पांडुरंगाची अखंड भक्ति केली ती ‘ मुक्तिहि नलगे ’ पण ‘ सदा संतसंग देई ’ असाच ते देवाजवळ हट्ट धरून बसतात. कविवर मोरोपंत ‘ सुसंगति सदा घडो ’ असाच टाहो फोडतात. कारण ती घडली कीं मनुष्य स्वोन्नतीच्या मार्गास लागतो हें ते जाणून होते. सारांश सत्समागमाचें महत्त्व प्राचीन अर्वाचिन् अनेक ऋषिमुनींनीं वर्णिलें आहे, तसेंच कवींनींहि गाइलें आहे. हा सत्समागम केवळ परमार्थांत लागतो असें नाहीं तर ऐहिक गोष्टींतहि तो जरूर लागत असतो. ‘सद्गुरुवांचूनी सांपडे ना सोय’ हा अनुभव धंद्यारोजगारांत प्रत्येक बाबींत येतो. परमार्थ आणि स्वार्थ या गोष्टींत सत्समागमाशिवाय जसें मनुष्याचें चालत नाहीं तसेंच त्यांच्यामध्यें असलेल्या परार्थांत म्हणजे सार्वजनिक कर्मांतहि तो सत्समागम असल्याशिवाय त्याचें भागत नाहीं.

वैकुंठवासी प्रागजी पेराज यांची व तात्यांची जी गांठ पडली तीमुळें तात्यांच्या सार्वजनिक आयुष्यास वळण लागलें. तात्यांच्या आयुष्यांतील तो अत्यंत महत्वाचा क्षण होय. येथून तात्यांच्या नवीन आयुष्यक्रमास सुरवात झाली. प्रागजी शेटनीं तात्यांना नोकरी दिली व पुढें स्वतंत्र धंदा

काढण्यास भांडवल दिलें हें कबूल. पण नोकरी दिली तर तात्यांनीं तीबद्दल काम केलें आहे व भांडवल दिलें तर तें त्यांनीं पुढें फेडलें आहे. मग निराळे असे कोणते उपकार त्यांचे तात्यांवर झाले ? असा कोणी यावर प्रश्न करतील. आपणावर कोणाचे किती उपकार झालेले आहेत, आपण कोणाचे किती ऋणी आहोंत याची जाणीव मनुष्यास नसते. प्रागजी शेटनीं मुख्यतः आपणांवर कोणत्या बाबतींत न फिटणारे असे उपकार केले याची जाणीव तात्यांना शेवटपर्यंत होती आणि म्हणूनच ते आपल्या शेटजींना शेवटपर्यंत विसरले नाहींत. प्रागजी शेटजी व तात्यांची गांठ निर्हेतुक पडलेली नव्हती. त्यांत ईश्वरी योजना होती. कांहीं दिवस ती ईश्वरी योजना तात्यांनाहि दिसली नसेल. अशा कित्येक अकल्पित गोष्टी आपल्या आयुष्यांत घडत असतात कीं त्यांचा कार्यकारणसंबंध आपणास समजत नाहीं व समजून घेण्याचा आपण प्रयत्नहि करीत नाहीं, आणि आळशावरून गंगा जावी तशी आपली स्थिति होते. तात्यांचें मोठें भाग्य हें कीं, त्या शेटजींच्या भेटींतील ईश्वरी योजना त्यांना थोड्या दिवसांतच दिसली. त्यांनीं इतस्ततः हेलकावे खाणाऱ्या आपल्या आयुष्यनौकेला निश्चित दिशा दाखविली व त्यांच्या पूर्व पुण्याईनें व प्रयत्नानें ती नौका नियोजित स्थळीं जाऊन शेवटीं पोंहचली.

तात्यांची व शेटजींची गांठ यदृच्छेनें पडली खरी पण पुढें जें कांहीं मिळवावयाचें तें मात्र तात्यांनीं स्वतःच्याच बुद्धीनें व अभ्यासानें मिळविलें. गुजराथी लोक स्वाभाविकच जास्त श्रद्धाळू असतात. मुख्यतः ते व्यापारांतच असल्यामुळें त्यांच्या हातीं पैसा खेळतो व त्याचा दानधर्म करण्यास त्यांना दिक्कत वाटत नाहीं. आपणा दाक्षिणी लोकांपेक्षां त्यांचे धर्मफंड फार मोठे आहेत याचें कारणहि हेंच आहे. तात्यांचे शेटजी हे एक उदार मनाचे दानशूर गृहस्थ होते. ' मनुष्य मिळवितो तें सर्व त्यांनीं स्वतःकरितां खर्च करणें हें पाप आहे; त्यांतील कांहीं भाग तरी त्यानें परोपकारार्थ लाविला पाहिजे.' असें जें तात्या नेहमीं म्हणत त्याचा प्रथम

धडा आगजी शेटपासूनच ते शिकले होते. कारण शेटजींचा सर्व जमाखर्च तात्या लिहीत असल्यामुळें त्यांचा दानधर्म किती होतो, याची त्यांना चांगली कल्पना आली होती. तात्यांच्या सार्वजनिक कार्याला सुरवात शके १८०५ पासून झाली. तत्पूर्वी पांच वर्षें शेटजींच्या व्यवहारामुळें त्यांना गुजराथी, भाटे यांचेमध्यें फिरावयास मिळालें होतें. तात्या चौकस असल्या-मुळें डोळे उघडे ठेऊन फिरत होते. त्यामुळें त्या लोकांच्या अनेक सार्वज-निक संस्थांची तात्यांना चांगली माहिती झाली. त्या संस्था कशा पोसल्या जातात हें त्यांनीं समजून घेतलें. त्या लोकांच्या धर्मशाळा, महाजनवाड्या, शिक्षणसंस्था त्यांनीं स्वतः डोळयांनीं देखिल्या होत्या. शेटजींच्या धर्मादा-याचा हिशेब त्यांनीं हातांनीं केलेला होता. या सर्वांचा त्यांच्या श्रद्धाळू मनावर परिणाम होऊन आपल्या समाजांतहि कांहींतरी कार्य व्हावें अशी अस्फुट कल्पना त्यांच्या डोक्यांत डोकावूं लागली. तशांत त्यांच्या शेट-जींचा त्यांच्यावर फार लोभ असल्यामुळें केव्हां केव्हां त्यांनींहि आपल्या समाजाची माहिती तात्यांना मोठ्या कळकळीनें द्यावी. आपल्या समाजाचे हातीं ज्याप्रमाणें आज मुंबईत प्रामुख्यानें तंबाकूचा व्यापार आहे त्याच-प्रमाणें कच्छी लोहाणा समाजाचे हातीं अनाज म्हणजे धान्याचा व्यापार आहे. खंडोगणती धान्य मुंबईत येलें जातें. खंडीमागें ( चार गोणीमागें ) चार आणे ( सध्यां सहा आणे ) याप्रमाणें त्यांनीं धर्मादाय ठेवला असून धर्मादाय म्हणून जमलेल्या या हजारों लाखों रुपयांचा विनियोग ते लोक मुख्यतः आपल्या समाजाकरितां करीत असतात. आज मुंबई-मध्यें त्या समाजाचीं जीं बोर्डिंगें म्हणजे छात्रालयें व ज्या स्वतंत्र शिक्ष-णसंस्था आहेत त्या सर्वांचा योगक्षेम या ‘ थेंबें थेंबें ’ जमलेल्या धर्मा-दायांतून होत असतो. वगैरे अनेक गोष्टी तात्यांनीं अनेकदां शेटजींच्या तोंडून ऐकल्या होत्या. शेटजींनीं सहजगत्या पण अत्यंत कळकळीनें दिलेल्या या माहितीचा परिणाम तात्यांच्या डोक्यांत समाजकार्याची ओझरती उत्पन्न झालेली कल्पना दृढ करण्यांत झाला आणि आपल्याहि समाजांत

या गुजराथी लोकांप्रमाणें कांहींतरी सार्वजनिक कार्य झालें पाहिजे हा विचार त्यांच्या अंतःकरणांत कायमचा ठाणें देऊन बसला. अशा रीतीनें तात्यांच्या सुपीक मनोभूमींत सार्वजनिक कार्याचें प्रथम बीजारोपण झालें.

घरींदारीं त्यांचा हाच विचार ! इष्टमित्रांजवळ त्यांच्या याच गोष्टी ! ! आपल्या समाजासाठीं कांहीं तरी सार्वजनिक कार्य करावें असें त्यांना एक वेडच लागून गेलें ! ! ! तात्यांच्या विचाराला ही दिशा लागली तेव्हां ते जुन्या हनुमान् गल्लींत रहात होते. त्या वेळीं जुन्या हनुमान् गल्लींत वैश्य मंडळींचा मोठा भरणा होता. या गल्लींतील वाडीला 'बारभाईची वाडी' असें जें नांव होतें तें अगदीं यथार्थ होतें. कारण बारा गांवांहून शें शेंपाऊणशें वर्षांपासून मुंबईस आलेले हे कोंकणस्थ वैश्य भाई याच वाडींत प्रथम उतरण्यास येत. तेथेंच जवळ विठ्ठलवाडींत राधाबाईची खाणावळ होती. येथें आपल्या समाजांतीलच लोक जेवावयास जात.जुन्या हनुमान् गल्लींतील देवळेकरांचे घरांत म्हणजे मुख्य वैश्य वस्तींत तात्या रहात व राधाबाईच्या खाणावळींत आपल्या भाईबंदाशेजारीं नेहमीं जेवत. त्यांना सार्वजनिक कार्याचा निदिध्यास लागला असल्यामुळें ते उठतांबसतां आपल्या समाजबंधूंशीं याच गोष्टी करीत. या राधाबाईच्या खाणावळींतच कै. विठोबा बाळशेट मोरे हे त्या वेळीं जेवत असत. त्यांच्याशीं तात्यांचें इतकें संघटन झालें कीं पुढें तात्यांना सार्वजनिक कार्यांत विठोबाशेटची अखेरपर्यंत मदत झाली. त्या वेळीं आपल्या समाजांत कै. रघुनाथ बापूशेट देवळकर हे फार प्रसिद्ध होते. मुंबईतच नव्हे तर मुंबईच्या बाहेरहि त्यांच्या शब्दाला फार मान असे. रघुनाथशेट हे चांगले सधन होते. बारभाईच्या वाडींत त्यांच्या चाळी असून ' बापू हरशेट देवळेकर ' नांवाचा त्यांचा छापखाना होता. या त्यांच्या छापखान्यांत आपल्या समाजाच्या पूर्वी बैठकी बसत असत. शिमग्याच्या वार्षिक संमेलनांना तर त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें फार मोठा रंग चढत असे. रघुनाथशेटचा आपल्या समाजांत इतका दरारा असे कीं, आपल्या समाजांत अत्यंत करारी म्हणून

प्रसिद्ध असलेले कै. गोविंद दशरथशेट खेडेकर हे एकदां पगडी न घालतां जरीची तो टोपी घालून एका शिमग्यांतील बैठकीला गेले. दुरून देवळेकरांनीं टोपी घातलेले खेडेकर पाहिले व ते ' कोण रे तो टोपी घालून येत आहे ? म्हणावें टोपी काढून ये. ' असें भले मोठ्यानें गरजले. खेडेकरांना गुपचुप टोपी काढावी लागली व बोडक्यानें बसावें लागलें. सारांश सर्वच बाबतींत त्या वेळीं देवळेकर पुढें होते. त्यांच्याच घरांत तात्या रहात असल्यामुळें त्यांच्याशींहि तात्यांनीं आपले विचार बोलून दाखवावे. ' काय पोर आणि काय थोर विचार ' म्हणून देवळकरांनीं तात्यांची प्रथम थट्टाच केली. वडील मंडळींना मुलांचे विचार प्रथम एकदम पटत नाहींत असा सार्वत्रिकच अनुभव आहे. ' कोणी वंदा कोणी निंदा ' तात्यांनीं आपले विचार प्रसार करण्याचें मिशनरीचें काम चालूच ठेविलें. त्यांत बिलकूल खंड पडू दिला नाहीं. तशांत तात्या समाजाच्या भर वस्तींत रहात असल्यामुळें त्यांना तें सुलभही गेलें.

गुजराथी व कच्छी-लोहाणा लोकांप्रमाणें आपल्या समाजांत सार्वजनिक कार्य झालें पाहिजे हा तात्यांचा विचार नक्की झाला व त्या विचाराचा त्यांनीं प्रचाराहि सुरू केला. परंतु तशीं सार्वजनिक कामें करण्याइतकी आपल्या समाजाची सांपत्तिक स्थिति नाहीं हेंहि तात्या ओळखून होते. आज ज्याप्रमाणें मुंबईत मुख्यतः तंबाकूच्या व्यापारांत आपले लोक पुढें आहेत त्याप्रमाणें त्या वेळीं ते नव्हते. मुंबईत तंबाकूच्या व्यापारांत कों. वैश्य ज्ञातिफंडाचे अगदीं पहिले ट्रस्टी कै. बाबाजी गणशेट थरवळ, कै. केशव गणशेट गांधी, (मृत्यु वैशाख व॥ १४ शके १८२९) कै. गोविंद दशरथ खेडेकर एवढीच मंडळी होती. आपल्या समाजांस निपाणीची पेठ चिपळूणचे कै. विठोबाशेट देवळेकर व दाभोळचे कै. हरशेट मोरे यांनीं प्रथम दाखविली, असें ह्मणतात. नांव घ्यावयाला रघुनाथशेट देवळेकरांबरोबरच कै. बापू सदाशिवशेट हेगिष्टे यांचा प्रेस, कै. नारायण भिकशेट खातु व कै सखाराम भिकशेट खातु यांचे प्रेस असे चार छापखाने होते. यांच्याशिवाय इतर बहुतेकांच्या हातीं किरकोळ धंदे होते. आज जसे कोणी

तंबाकूचे व्यापारांत, कोणी कापडाचे व्यापारांत, कोणी पानाचे व्यापारांत, कोणी दलालीचे व्यापारांत दिसतात तसे त्या वेळीं नव्हते. त्यामुळें सार्वजनिक कामाची आपली इच्छा कशी पूर्ण होणार अशी तात्यांच्या मनाला काळजी वाटूं लागली. गुजराथी लोकांप्रमाणें आपले समाजाला सार्वजनिक कार्याला परिस्थिति अनुकूल नव्हती खरी परंतु परिस्थितीच्या बागुलबोवाला भिणाऱ्या भेकड भिऱ्याकडून काय होणार ? तात्यांचा निश्चय ध्रुवाप्रमाणें अढळ होता. पवित्र निश्चय कधींहि मरत नसतो. तो पूर्ण करण्याची जबाबदारी ईश्वरावर असते व तोच आपणास मार्ग दाखवितो. लवकरच असा एक प्रसंग आला आणि तात्यांच्या निश्चयाला सार्वजनिक रीत्या वाचा फटली.

शके १८०५ मध्यें माधवबागेंत गुजराथ्यांच्या एका महाजनवाडींत मुंबईंतील आपल्या समाजाची कांहीं सामाजिक कामानिमित्त बैठक भरली होती. फक्त तेथील भय्याला विचारून मंडळींनीं सभेकरतां जागा मिळविली होती. भय्यानें सांगितलेल्या वेळांत सभा आटोपली नाहीं. तेव्हां भय्याजी हातपाय आपटीत सभेच्या ठिकाणीं आले आणि मोठ्यानें ओरडून, " चलो निकलो इदरसे. बखत हो गया. " ( चला निघा येथून. वेळ होऊन गेली. ) असा हुकूम सोडला. मंडळींना नाक मुठींत धरून गुपचुप बाहेर पडावें लागलें. समाजांतील सर्व प्रमुख मंडळी या सभेला हजर होती एकोणीस वर्षांचे तात्याहि निमुटपणें तें सर्व पहात होते. झालेला प्रकार सर्वांनाच अपमानास्पद वाटला. तात्यांना हा अपमान समाजाचा झाला नसून आपलाच झाला असें वाटलें. केवळ आपल्या समाजाची सत्तेची जागा नाहीं म्हणून हा असा अपमान व्हावा याबद्दल सर्वांच्या मनांत उद्वेग उत्पन्न झाला होता. तवा तापलेला होता, भाकरी भाजून घेणारा पाहिजे होता. तात्यांनीं प्रसंग ओळखला. आपल्या कार्याकरितां देवानेंच हा प्रसंग पाठवून दिला असें त्यांना वाटलें व त्यांनीं त्या

प्रसंगाचा आपल्या सार्वजनिक कार्याकडे उपयोग करून घेण्याचें मनांत ठरविलें.

प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत असे कित्येक प्रसंग येत असतात कीं, त्यांचा उपयोग करून घेण्याची जर प्रत्येकांत योजकता असती तर जगांतील प्रत्येक मनुष्यच थोरपदास चढला असता. थोर माणसांना आपण 'परिस्थितीचे जनक' म्हणतों. पण परिस्थिति जी निर्माण होते ती सृष्टींतील अनेक गोष्टींमुळें होय. आणि त्या सर्व गोष्टींवर मनुष्यमात्राचा सर्वस्वी ताबा केव्हांहि नसतो. जर परिस्थितीच्या कारणपरंपरेवर कोणाहि मनुष्याची संपूर्ण सत्ता चालूं शकत नाहीं, तर मग थोर माणसांना परिस्थितीचे जनक असें आपण म्हणतों याचा अर्थ काय ? याचा अर्थ हाच कीं, ते सामान्य लोकांच्या अगोदर परिस्थिति ओळखतात आणि तिचा उपयोग आपल्या इष्ट सिद्धीकडे कसा करावा हेंहि जाणतात. सामान्य लोक परिस्थिति केव्हां कशी आली याचें ज्ञान नसल्यामुळें तींत गुरफटून जातात आणि थोर लोक तें ज्ञान असल्यामुळें तिला वाटेल तशी वांकवतात. म्हणूनच कवि 'स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र' असे सामान्य लोकांविषयीं म्हणतात आणि थोर माणसांना 'परिस्थितीचा जनक' अशी पदवी देतात. परिस्थिति सर्वांना सारखीच मिळत असली तरी तिचा फायदा करून घेणारे योजक जगांत क्वचितच असल्यामुळें 'योजकस्तत्र दुर्लभः' असें म्हणावें लागतें. राज्याची उलथा पालथ करणारे रणधुरंधर, मुत्सद्दी हे सर्व परिस्थितीचा फायदा घेणारे योजक असतात. लोकांचे संघ बनवून त्या संघांकडून मोठमोठीं कार्यें करवून घेणारे पुढारीहि परिस्थिति ओळखून तिला वळवणारे असतात. व्यापारांत तेजीची लाट सर्वांवरच आली तरी तिचा फायदा जो योजक आहे तोच घेऊं शकतो. म्हणूनच समर्थासारखे पुरुष 'प्रपंचसमयो वोळखावा' असा उपदेश योद्धे, मुत्सद्दी, पुढारी

आदि करून सर्वांना देत असतात. परिस्थिति निघन गेली आणि नंतर कितीहि खटपट केली तरी तिचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. जमीन भाजून तयार आहे, पाऊस पडण्याचा सुमार आहे, अशा वेळीं जो पेरणी करील तोच साधील. जमीनींत पाणीच पाणी झाल्यावर केलेल्या पेरणीचा काय उपयोग? समाजाचा अपमान होऊन जी परिस्थिति उत्पन्न झाली तिचा फायदा जसा या प्रसंगीं तात्यानीं घेतला तसा आणखी कित्येक प्रसंगीं घेऊन त्यांनीं आपली असामान्य योजकता सिद्ध केली आहे.

आपल्या समाजाचा अपमान झाल्यामुळें सर्वांना खालीं मान घालावी लागली. सर्वांना अतीशय वाईट वाटलें. परंतु असा अपमान पुनः होणार नाहीं अशी कांहींतरी योजना केली तरच या वाईट वाटण्याचा उपयोग? असें आपलें स्पष्ट मत जमलेल्या कित्येक थोर पुढाऱ्यांजवळ तात्यांनीं व्यक्त केलें. ती परिस्थितिच अशी होती कीं तें मत त्यांना ताबडतोब पटलें व दुसरे दिवशीं झाल्या गोष्टीचा विचार करण्यासाठीं नळबाजारांतील कै. बाबाजी गणशेट थरवळ यांच्या दुकानाचे वरील दिवाणखान्यांत सर्वांनीं जमण्याचें ठरलें. त्याप्रमाणें मंडळी जमली. व आदल्या दिवसासारखा समाजाचा पुनः अपमान होणार नाहीं याला काय उपाय योजावा म्हणून विचार सुरू झाला. त्या वेळीं तात्यांनीं उभें राहून आपले विचार समाजापुढें मांडले. प्रथम त्यांनीं गुजराथी लोकांनीं महाजनवाड्या, धर्मशाळा, शालागृहें कशीं बाधलीं व समाजदृष्ट्या ते लोक कसे सुखी आहेत याची स्वानुभवयुक्त अशी माहिती सांगितली. व शेवटीं 'आपल्या समाजाची महाजनवाडी–समाजाची सत्तेची जागा–जर असती तर दुसऱ्याच्या जागेंत जमण्याचा आपल्यावर प्रसंग आला नसता व आपल्या समाजाचा असा अपमानहि झाला नसता. येथें जमलेल्या सर्व मंडळींनीं शक्त्यनुसार आंकडे घातले, व ती पट्टी सभेला न आलेल्या इतर बंधूंकडे फिरविली तर महाजनवाडी बांधण्या इतकी रक्कम सहज उभी होईल.' अशी थोड-

क्यांत आपली योजना समाजापुढें ठेविली. त्याच वेळीं आपला एक वर्षाचा पगार देण्याचें तात्यांनीं जाहीर केलें. तात्यांचें स्वानुभवाचें व कळकळीचें भाषण सभेंत जमलेल्या सर्वांना पटलें व ताबडतोब एक पट्टी करण्यांत आली. सभा आटोपल्यावर मंडळी घरोघर निघून गेली!

येथें महाजनवाडी या ध्येयाबद्दल तात्यांच्यावर जो आक्षेप घेतला जातो त्याचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. 'तात्यांनीं आपल्या आयुष्याचें महाजनवाडी हें ध्येय ठरविलें. शिक्षणाचें महत्व त्यांना न समजल्यामुळें शिक्षण हें ध्येय त्यांना ठरवितां आलें नाहीं. सार्वजनिक कामाचा बराच अनुभव आल्यानंतर शिक्षणाशिवाय आपल्या समाजाचा तरणोपाय नाहीं हें त्यांना आयुष्याच्या शेवटीं शेवटीं कळूं लागलें व म्हणून ते शिक्षणाकडे वळले. सारांश तात्या व त्यांच्या बरोबर महाजनवाडीवाले महाजन यांना समाजांत शिक्षण प्रसार नको होता.' असा आक्षेप कांहीं लोकांचा तात्या आदिकरून मंडळीवर असतो. हा आक्षेप कसा निर्मूल खोटा आहे याचा विचार पुढें होईल. या ठिकाणीं, एखाद्या मनुष्यानें जें कार्य केलें नाहीं त्यावरून त्याची किंमत ठरविण्यापेक्षां, त्यानीं जें कार्य केलें त्यावरून त्याची किंमत ठरविण्याचा राजमार्ग सोडून, हे आक्षेपक मुद्दाम कसे आडरानांत जातात, एवढेंच दाखवावयाचें आहे. क्षणभर वादविवादासाठीं असें गृहित धरू कीं, महाजनवाडीवाल्या मंडळींनीं शिक्षण प्रसाराप्रीत्यर्थ कांहीं प्रयत्न केले नाहींत. परंतु त्यांनीं महाजनवाडी उघडून जें समाजकार्य केलें त्याची किंमत तुम्ही कशी कमी करू शकतां? सिद्धीच्या कारणपंचकांत प्रत्यक्ष भगवंतानेंच गीतेंत 'अधिष्ठान' हें एक मुख्य कारण सांगितलें आहे. आणि तेंच 'अधिष्ठान' समाजसुधारणेचें पहिलें साधन म्हणून तात्या आदि मंडळींनीं मानलें त्यांत ते चुकले कोठें? माझाच तेवढा मार्ग खरा इतरांचा खोटा हा जो अहंपणा त्यामुळेंच दुसऱ्याच्या कार्याची किंमत कमी लेखण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होत असते. आणि याचमुळें या मंडळींनीं तात्यांच्या महाजनवाडीच्या प्रयत्नावर आक्षेप घेतले आहेत. जागेच्या

अभावामुळें समाजाचा अपमान होतो व तो अपमान पुनः होणार नाहीं याकरितां उपाय योजावयाचा होता. अर्थात् त्याच्यावर उपाय म्हणजे ' समाजाच्या मालकीची जागा असणें ' हें एखादें शाळेंतलें मूलहि सांगूं शकेल. परंतु ज्या अहंमन्यांना ही साधी गोष्ट समजत नाहीं त्यांची कोण समजूत घालूं शकणार ? असो.

महाजनवाडीकरितां आंकडे घालून मंडळी घरोघर निघून गेली. सार्वजनिक कामाचा असा एक अनुभव असतो कीं, मंडळी सभेला बसली कीं सर्वांना विचार—योजना उत्तम सुचतात. बृहस्पतीलाहि लाजविणारीं भाषणें होतात. टाळयांचा कडकडाटांत ठराव पास होतात. परंतु सभासद सभागृहाच्या बाहेर पडल्यावर त्यांना बाहेरची हवा लागूं लागते व घरीं पोंहचले नाहींत तोंच त्या ठरावांचा विसर पडतो. सभेंत आपण काय बोललों ? काय ठरविलें ? याची आठवण जर सभागृहाचे बाहेर येती तर बोलणें आणि चालणें यांमध्यें एकवाक्यता दाखविण्याकरितांच जीं वाग्युद्धें होतात तीं कां झालीं असतीं ? सार्वजनिक कामाचा हा अनुभव तात्यांना पहिल्याच प्रथम आला. ' प्रथमग्रासे मिक्षिकापात ' झाला. महाजनवाडीची ती योजना जागच्या जागींच राहिली. अगदीं थोड्या लोकांनीं तिची आठवण ठेविली असेल. अपमान झाला म्हणून सभा भरली, योजना ठरली, पट्टी काढली. परंतु पुढें चार वर्षे सामसुम.

लोक तात्यांची कल्पना विसरले पण तात्यांना आपल्या कल्पनेचा कल्पांतींहि विसर पडणें शक्य नव्हतें. तात्यांनीं परिस्थितीचें निरीक्षण केलें. घाऊक देणग्या जमवून महाजनवाडी घेण्याइतकी रक्कम जमण्यासारखी समाजाची सांपत्तिक परिस्थिति नाहीं हें तात्यांनीं ताडलें व झेंपणार नाहीं असा भार घालून समाजकार्य चालणें शक्य नाहीं हें त्यांनीं ओळखलें. मोठमोठ्या देणग्या आल्या तर ठीकच परंतु न आल्या तरीहि ' थेंबें थेंबें तळें सांचें ' या न्यायानें 'कामास सुरवात करावयाची

असें त्यांनीं ठरविलें. 'गांव करील तें राव करूं शकत नाहीं' हें तत्व जाणून त्यांनीं सर्वांना सहज साध्य अशी एक योजना ठरविली. हीच पैसाफंडाची मूळ कल्पना. आज महाराष्ट्रालाच नव्हे तर आखिल हिंदुस्थानला 'पैसा-फंड' म्हणजे काय तें ठाऊक आहे. पैसाफंडाची कल्पना श्री. अंताजी दामोदर काळे यांना शके १८१८ मध्यें सुचली. याच कल्पनेचें विशदी-करण लोकमान्य टिळकांनीं शके १८३९ मध्यें मुंबईत माधवबागेंत नाम-दार मनमोहनदास रामजी यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या प्रचंड जाहीर सभेंत केलें. 'पैसा या शब्दांत कांहीं अर्थ नाहीं. फंड या शब्दांतहि कांहीं राम नाहीं. परंतु हे दोन शब्द जवळ आले म्हणजे जी शक्ति उत्पन्न होते ती शक्ति म्हणजेच पैसाफंड होय. हा मध्यम-पदलोपी समास असून त्यांत लोपून असलेली शक्ति जाणल्याशिवाय पैसा पैसा करून जमलेल्या पैशाची खरी किंमत कशी समजणार ? एका मनुष्याकडून आलेला एक रुपाया आणि पैसा पैसा करून चौसष्ट इसमांनीं जमवलेला एक रुपाया यांत दुसऱ्या रुपायाचीच मला जास्त किंमत आहे.' अशा प्रकारचें लोकमान्यांनीं पैसाफंडाचें सुबोध विवरण केलें. हीच पैसा-फंडाची कल्पना आपल्या समाजांतील एका पंचवीसवर्षांच्या तरुणास शके १८०९ मध्यें सुचली याबद्दल कोणा वैश्यास अभिमान वाटणार नाहीं ? तात्यांना 'पैसाफंड' हा जो चिंतामणि सांपडला, तो केव्हां समाजबंधूंच्या हवालीं करूं असें त्यांना होऊन गेलें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

तात्यांनीं समाजांतील अनेक प्रमुख पुढाऱ्यांच्या गांठी घेतल्या व आपली पैसाफंडाची कल्पना त्यांच्यापुढें ठेविली. कल्पना अर्थात् सर्वांस पसंत पडली व समाजाची एक जाहीर सभा भरण्याचें ठरून तसें जाहीर करण्यांत आलें. 'आपले नम्र सेवक कांहीं ज्ञातीगृहस्थ' अशा सहीनें एक 'जाहीर खबर' 'जुलै ता. ३० शनवार सन १८८७ इ०' रोजीं

प्रसिद्ध करण्यांत आली. ही जाहीर खबर ‘ ना. भि. खा. प्रे. मा. ’ ( म्हणजे नारायण भिकशेट प्रेस मालक ) येथें छापलेली आहे हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ही जाहीर खबर अनेक दृष्टींनीं विचारार्ह असल्यामुळें जशीच्या तशीच खालीं अवतरण चिन्हांत उद्धृत करतों.

“ आमचे समस्त वैश्यज्ञाती बांधवांनीं या धर्मकृत्याकडे पूर्ण लक्ष दिलें पाहिजे कारण कीं या पूर्वीं किती एक वर्षें या मुंबई शहरांत आपले ज्ञातीबांधवांस येऊन व्यवहार धंदा, चाकरी, उद्योग वगैरे हरतऱ्हा केल्या परंतु या धर्म कृत्याकडेस कोणीच लक्ष दिलें नाहीं. पूर्वींपासून लक्ष दिलें असतें तर आतां इतके श्रम झाले नसते कारण लहान झाड असतें त्यास पाणी खत वगैरे घातल्यानें मोठें होऊन त्याचीं फळें मिळालीं असतीं व तेणेंकरून आमचे ज्ञातीबांधवांचे जिवास फार आनंद झाला असता आणि त्यापासून आमचे ज्ञातिबांधवांच्या मनांतही अनेक कल्पना उत्पन्न झाल्या असत्या. जसें पर्जन्याचे योगानें नदीस पूर येऊन सर्व ठिकाणीं पाण्याचा प्रवाह वाढतो तसेंच आमचे ज्ञातीबांधवांनीं एक मत्त होऊन धर्म कृत्यरूपी प्रवाह वाढविण्यास कांहीं दिवसांपूर्वीं आपल्या ज्ञातींतील लोकांचे मनांत येऊन व तें बहुमतानें पसंत ठरून कांहीं धर्मकृत्य योजिलें. पुढें त्याकरितां कांहीं पैसाही जमा झाला परंतु तेवढ्याच रक्कमेनें तें काम सिद्धीस जात नाहीं सबब ज्ञातीपैकीं दोन गृहस्थ ज्ञातीनें नेमावे व त्या दोन गृहस्थांनीं दररोज फिरून दर दुकानास दररोज १ दिडकी (पैसा) व चाकरीवाले लोकांकडून दरमहा १ रुपया, आठआणे, चारआणे, दोनआणे, याप्रमाणें शक्तिनुसार त्यांस देत जावें. व मागें ज्या ज्या मंडळीनें पैसे दिले नाहींत ते सुद्धां द्यावेत असें केल्यानें योजिलेलें कार्य सिद्धीस जाऊन ज्ञातीस ज्या अनेक अडचणी सोसाव्या लागतात त्या दूर होऊन ज्ञातीचें नांवही होईल.

“ वर दर्शविलेल्या विचाराहून दुसरा कांहीं उत्तम विचार ज्ञातीस

पसंत वाटल्यास कृपा करून याचवेळेस या सभेपुढें सादर केल्यास मोठी मेहरबानी होईल. ”

'वरील उतारा भाषेचा नमुना म्हणून दिलेला नाहीं हें या ठिकाणीं सुचविलें पाहिजे असें नाहीं. या खबरीवरून त्या वेळच्या पुढाऱ्यांच्या सार्वजनिक कार्यपद्धतीवर बराच प्रकाश पडतो. समाजांत कांहीं चळवळ असेल, तरच कोणास कांहीं नवीन कल्पना सुचतील व त्यांचा फायदा समाजास मिळूं शकेल. चळवळ नसेल तर नवीन कल्पना नाहीं व ज्ञातीची सुधारणाहि नाहीं ही गोष्ट त्यावेळच्या पुढाऱ्यांना चांगली अवगत होती. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे फंड वसूल करण्यास ज्ञातींतील गृहस्थ नेमणें ही होय. ‘ कोणत्याहि ज्ञातीची सुधारणा करणें झाल्यास त्या ज्ञातीखेरीज बाहेरच्या लोकांनीं त्यांत पडून फारसा उपयोग होत नाहीं. ’ या लो. टिळकांच्या विचाराप्रमाणेंच ज्ञातिकार्याविषयीं आपल्या पुढाऱ्यांचे विचार दिसून येतात. ज्ञातिकार्य करणें तें स्वतःच्या नांवलौकिकाकरितां नाहीं कीं दुसऱ्या कोणत्याहि स्वार्थाकरितां नाहीं. तें फक्त ज्ञातीचें नांव व्हावें म्हणून होय. हा त्या पुढाऱ्यांचा बाणा किती अभिमानास्पद आहे ! शेवटच्या ‘प्याऱ्यांत’ तर परमतसहिष्णुता हे प्रातिनिधिक संस्थांचें धोरण स्पष्ट मांडलें आहे. फंडामध्यें प्रथम पासूनच ‘ हम करेसो कायदा ’ हें धोरण आहे, ‘ दुसऱ्यांच्या मताविषयीं पर्वा नाहीं ’ असें म्हणणारांनीं वरील जाहीर खबरींतील शेवटचा प्यारा मुद्दाम वाचावा अशी विनंति आहे. शके १८०५ मधील सभेंत जे आंकडे पडले होते, त्यांतील कांहीं या सभेपर्यंत रोख आले असून कांहीं वसूल होणें राहिल्याचेंहि या खबरीवरून दिसतें. परिशिष्ट २ मध्यें जो पहिल्या वर्षाचा अहवाल छापला आहे त्यांत ‘सन १८८३ सालापैकीं मागील शिल्लक’ म्हणून ४८६॥ रु. जमा आहेत व ‘मोठ्या वर्गणीबद्दल’ हि १०२३। रु. जमा आहेत. त्यावरून पैसाफंडाचे स्थापनेनंतर शके १८०५ मधील घातलेले आंकडे ज्यांनीं भरले नव्हते त्यांनीं भरल्याचें

दिसतें. आपल्या समाजामध्यें पूर्वीपासूनच एक प्रवृत्ति दिसून येते. सार्वजनिक कार्यासाठीं पट्टी घातली म्हणजे ते पैसे दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें प्रत्येकास वाटत असतें. तो आंकडा हें आपणांवरील कर्ज आहे: ही भावना अद्यापपर्यंत सतत जागृत आहे. याच वृत्तीला उद्देशून कै. गुरुवर्य विजापूरकर यांनीं आश्रमास आशीर्वाद दिला आहे त्यांत 'इतरत्र न लाभणारे सत्यवनची श्रद्धावान द्रव्यसहाय्यक मंडळ' असे आपल्या समाजाविषयीं उद्गार काढले आहेत.

सभेचें आमंत्रण सर्व समाजाला देण्यांत आलें व 'जाहीर खबर' काढून सभेचा उद्देश अगाऊ जाहीर करण्यांत आला. कै. बाबाजी गणशेट थरवळ यांच्या दुकानाच्या माडीवर समाजाची सभा ठरल्याप्रमाणें भरली. मुंबईतील बहुतेक पुढारी मंडळी सभेस हजर होती. तात्यांनीं पैसाफंडाची आपली कल्पना सर्वांना विदित केली. 'दररोज दर दुकानास एक पैसा' ही तात्यांची कल्पना गरीबापासून श्रीमंतापर्यंत, लहानापासून थोरापर्यंत सर्वांना शक्य असल्यामुळें ताबडतोब सभेस पसंत पडली. आणि चौतीस पंचाच्या सह्यांचा एक सात कलमी ठराव ( परिशिष्ट १ ) करण्यांत येऊन कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची ऊर्फ पैसाफंडाची: स्थापना करण्यांत आली. कों. वैश्यसमाजाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमुद करण्यासारखी ही गोष्ट श्रावण शु. १३ शके १८०९ सोमवारीं घडली. त्या दिवशीं मूळ नक्षत्र होतें.

पैसाफंड ही आपल्या समाजांतील एक अत्यंत महत्वाची अभिमानास्पद अशी संस्था आहे. मुंबईत काय किंवा मुंबईबाहेर काय आपल्या समाजांत ज्या ठिकठिकाणीं संस्था दिसतात त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पैसाफंडापासूनच स्फूर्ति मिळालेली आहे. आपल्या समाजामध्यें आज जी जागृति दिसते तिचें खरें कारण शके १८०९ मध्यें स्थापलेला पैसाफंड होय. आपल्या समाजांत ज्या निरनिराळ्या चळवळी दिसतात त्या

सर्वांचा खरा प्रेरक सव्वा तीन तपापूर्वीं सुरू झालेला पैसाफंड होय. आपल्या समाजाचा उद्यां जो भाग्योदय होणार त्याचा खरा पायाहि पैसाफंडच होय. ज्या राष्ट्राला जुना इतिहास नाहीं त्याला भावी कालहि नीटसा दिसत नाहीं. पैसाफंड ही आपल्या समाजांतील जुन्यांत जुनी संस्था आहे एवढ्याचमुळें तिला महत्व आहे असें नाहीं तर ती एक कार्यक्षम संस्था आहे म्हणून तिची खरी किंमत आहे. पैसाफंडावर अनेक गण्डांतरें आलीं असतां त्यांतून निभावून आज सर्व समाजकार्यकर्त्यांना मार्गदर्शक झालेली ही संस्था भावी काळांतील समाजसेवकांनाहि आदर्शभूत होईल यांत बिलकूल संशय नाहीं.

पैसाफंडाची स्थापना झाली, व्यवस्थापक पंच निवडले, ठराव झाला, सर्व कांहीं विधियुक्त झालें. परंतु स्थापना झाली, व्यवस्थापक निवडले, ठराव केले म्हणजे संस्था थोडीच चालत असते. अशा रीतीनें संस्था चालत्या तर प्रत्येकास रोज कितीतरी संस्था काढतां आल्या असत्या. कार्यकर्ते असतील तरच संस्था स्थापल्याचा उपयोग व तरच संस्था चालणार. दुसरे दिवशीं फिरण्यास तात्यांनाच सर्वांचे पुढें निघावें लागलें. वसूल किती तर अवघा सहा आणे. ज्यांनीं सातकलमी ठराव केला त्या प्रत्येकानें एक एक पैसा दिला असता तरीहि फंड साडे आठ आणे जमावयास पाहिजे होता. झालें टीका करणारास जागा मिळाली. ‘ सहा आण्यांत आतां हे महाजनवाडी बांधणार ! ’ म्हणून कित्येकांनीं टवाळी करण्यास सुरवात केली. परंतु तात्यांनीं त्या टीकेची विशेष पर्वा केली नाहीं कीं उत्साह खचू दिला नाहीं. ‘ देईल तोहि दाता न देईल तोहि दाता ’ हा त्यांचा फंडवसूल करण्याचा दंडक होता. त्यांनीं नोकरी सांभाळून फिरण्याचें आपलें काम चालूं ठेविलें. जो वसूल होईल तो कै. नारायण भिकशेट खातु यांच्याकडे जमा करावा. याप्रमाणें टीका उपहास यांच्या कचाटींतून फंडाचें पहिलें वर्ष निर्विघ्नपणें पार पडलें व पहिल्या वर्षाचा अहवाल

( पारिशिष्ट २ ) पांच व्यवस्थापकांच्या सहींनीं बाहेर पडला. पहिल्या दिवसाच्या सहा आण्याला हंसणारांना वर्षाचे रु. २२५४।= पाहून काय वाटलें असेल याची कल्पना ज्याची त्यानेंच करावी. त्या पहिल्या वर्षाचे अहवालाविषयीं एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, पहिल्या वर्षीं जितका पैसाफंड जमला तितका आज एकोणचाळीस वर्षांत कधींहि जमला नाहीं. दुसरी गोष्ट सहज दिसून येते ती ही कीं, सातकलमी ठरावांत दुकानवाले बंधू प्रमाणें नोकरी वाल्यांनींहि शक्त्यनुसार कांहींना द्यावें, असें जे कलम आहे त्याप्रमाणें पहिल्या वर्षीं प्रयत्न केलेला दिसतो.पुढील अहवालांतून नोकरीवाल्यांकडून विशेष जमा झाल्याचें दिसत नाहीं. महाजनवाडी उघडल्यानंतर एकदां पुनः प्रयत्न झाला परंतु तोहि सिद्धीस जाऊं शकला नाहीं. सारांश आजपर्यंत जो कांहीं फंड जमला तो दुकानदारी करणाऱ्या बंधूंकडूनच जमला आहे. नोकरी करणाऱ्या बंधूंकडून विशेष मदत झालेली नाहीं.

चांगल्या कार्यांत नेहमींच विघ्नें येत असतात. वाईट कार्यांत तीं येतीं तर विघ्नें नकोत असें कोण म्हणेल ? पहिल्या वर्षाचे शेवटीं फंडाजवळ तीन साडेतीन हजार रुपये शिल्लक होती. पांच प्रमुख पंच म्हणजेच ट्रस्टी नेमलेले होते. त्या पांच जणांकडे ती शिल्लक विभागून ठेवण्यांत आली. परंतु दुर्दैवानें त्या पांच ट्रस्टींपैकीं एक ट्रस्टी फुटले व त्यांचेकडे असलेला फंड ते अडकवून बसले. पुढें योग्य मार्गानेंच फंडाची शिल्लक त्यांच्याकडून वसूल करण्यांत आली. झालेल्या प्रकारावरून, एक गोष्ट मात्र मंडळी शिकली कीं, फंडाची शिल्लक रोकड ह्मणून कोणाजवळ शिल्लक ठेवावयाची नाहीं. आणि तेव्हांपासून शिल्लक जमली कीं ती स्थावर मिळकतींत गुंतवून टाक असें फंडाचें अलिखित धोरण आंखलें गेलें. इतकेंच नव्हें तर फंडावर नेहमीं थोडें फार तरी कर्जच ठेवण्यांत आलेलें दिसतें. परंतु या कर्जापायीं अद्यापपर्यंत फंडाची मिळकत कधींहि कोणाकडे गहाण पड-

लेली नाहीं. हा चालकांचा स्वाभिमान लक्षांत ठेवण्यासारखा आहे. दुसरे वर्षीच फंडाची जमलेली सर्व शिल्लक आणि कांहीं कर्ज अशी रक्कम ठाकुरद्वार येथें एका घरांत गुतवण्यांत आली. शके १८१० मध्यें घेतललें हें घर कांदेवाडींतील महाजनवाडी घेण्याचे वेळीं शके १८३६ मध्यें जरी विकलें तरी विकत घेतल्यापासून आतां पर्यंत ' फंडाचें घर ' याच नांवानें संबोधलें जात आलें आहे. फंडांतून फुटून निघालेल्या गृहस्थानीं नंतर फंडांत बखेडा घालण्याचे पुष्कळ प्रयत्न चालविले. फंडांतील नऊ पंच त्यांना मिलाफी झाले. शेवटीं शके १८१० च्या पौष महिन्यामध्यें कै. बाबाजी गणशेट थरवळ यांचे माडीवर समाजाची सभा होऊन फंडातील बखेडा नाहींसा व्हावा म्हणून ते बखेडा घालणारे गृहस्थ व त्यांना मिलाफी असलेले नऊ पंच यांना फंडांतून कमी करण्यांत आले. त्या मंडळींनीं नंतर दुसरा फंड काढला. तो कांहीं दिवस चालला. पण पुढें त्याचें काय झालें तें मात्र कळलें नाहीं. अशा रीतीनें दुसऱ्याच वर्षी पैसाफंडावर दुफळीचें पहिलें गंडांतर आलें. त्या विरुद्ध मंडळींच्या टीकेची पर्वा न करतां ' आडवें आलें कीं कापून टाकलें पाहिजें ' या धोपट धोरणानें वागून, तात्या आदिकरून फंडाचे चालकांनीं या वर्षदीड वर्षाच्या बालकाला वांचविलें.

एका मानवी संकटांतून फंड बाहेर पडला व शके १८१८ पर्यंत साधारण सुरळीत रीतीनें चालला. साधारण म्हणण्याचें कारण जो दुसरा फंड सुरू झाला त्याचा थोडा फार परिणाम पैसा फंडावर झालाच. सार्वजनिक कार्यांतील खरीं वा खोटीं कशींहि भांडणें असोत तीं चव्हाट्यावर आलीं कीं त्यांचा परिणाम त्या कार्यावर झालाच म्हणून समजावा. कारण ' न देत्याचा वार शनिवार ' असतो. त्याला या भांडणाच्या मागें खुशाल लपावयास मिळतें. त्या दुसऱ्या फंडामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीशीं तोंड देत देत फंड नऊ वर्षें चालू राहिला. परंतु इतक्यांत

एक दैवी आपत्ति कोसळली व फंड सहा वर्षें बंद पडला. ही दैवी आपत्ति म्हणजे शके १८१८ मधील पळापळ सुरू करणारा प्लेग ऊर्फ बद्यात्ताप होय. प्लेगच्या भीतीनें मुंबईतील आपले धंदे रोजगार सोडून तो जो जीव बचावण्यास गांवची वाट धरूं लागला. या प्लेगमुळें मुंबईचा केवळ व्यापार-धंदाच बंद पडला असें नाहीं, तर कोर्ट कचेऱ्याहि बंद होऊं लागल्या. जीव बचावण्यासाठीं कोंकणांत मंडळी गेली तों तिकडे दुष्काळांत सांपडली. प्लेग आणि दुष्काळ या दोन दैवी संकटांमुळें लोक हवालदील झाले. अशा वेळीं फंड बंद पडला त्याला कोण काय करणार ? या आपत्तींतून डोकें वर काढण्यास चारपांच वर्षें सहज लागली. प्लेगनंतर मुंबईमध्यें पूर्ववत् कोंकणांतून मंडळी आली व त्यांचे व्यापार धंदे सुरू झाले. अशा वेळीं शके १८०५ प्रमाणेंच एक प्रकार घडला. त्याचा फायदा घेऊन तात्यांनीं सहा वर्षें दैवी आपत्तीमुळें जवळजवळ निद्रिस्त असलेल्या फंडास चालना दिली.

शके १८२४ च्या कार्तिक मासमध्यें आपल्या समाजांतील एक और्ध्वदेहिक कृत्य चर्निरोडवरील पांचकळश्यांचे धर्मशाळेंत चाललें होतें. सोनापुरच्या गल्लींतील फंडाची धर्मशाळा होण्याचे पूर्वी आपले समाजांतील और्ध्वदेहिक कृत्यें अशींच कोठें तरी होत असत. वर सांगितलेंलें कृत्य चाललें आहे इतक्यांत पांचकळशी समाजांतील एक तसलेंच कृत्य तेथें करण्याकरितां त्या समाजांतील मंडळी आली. ज्यांची मालकीची जागा त्यांनीं काय म्हणून अडचण सोसावी ? त्यांनीं धर्मशाळा मोकळी करून देण्यास आपल्या मंडळीस सांगितलें. तसेंच अर्धवट ते पिंड उचलून मंडळी समुद्रकाठीं भर उन्हांत आली व त्या उत्तरक्रियेचा राहिलेला उत्तर भाग त्यांनीं उघड्या वाळवंटावर पूर्ण केला. आपली स्वतःची धर्मशाळा नाहीं म्हणून काय हा अपमान ? असा विचार तेथें असलेल्या प्रत्येकाचे मनांत आला. तात्या त्या मंडळीमध्यें होतेच. काळ, वेळ,

## कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाचे ट्रस्टी ( शके १८३७ )



शेट शेट्ये, कै. बाळकृष्ण नामदेवशेट कोलते, कै. विठोबा बाळशेट चिखले, कै. तात्याबा व
बसलेले-कै. नारायण विठःबाळकृष्ण अनंतशेट बेडे, श्री. गणपत विठोबाशेट मोरे, श्री. तुकाराम पुंडलीकशेट शेट्ये बाजीशेट रेडीज.
उभे-कै.

कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची




धर्मशाळा ( ठि. सोनापूर गल्ली )

प्रसंग अगदीं उद्वेग उत्पन्न करण्यासारखा होता. समाजाची धर्मशाळा पाहिजेच असें जो तो म्हणूं लागला. धर्मशाळेसंबंधीं विचार करण्याकरितां दुसरे दिवशीं कै. सीताराम सखारामशेट मापुस्कर यांचे भेंडीबाजारांतील पानाचे वखारींत जमण्याचें ठरवून मंडळी घरोघर निघून गेली.

स्मशानांत उत्पन्न झालेला विचार स्मशानवैराग्यासारखा मात्र ठरला नाहीं. कारण ठरल्या वेळीं आपले समाजांतील बरीच मंडळी हजर झाली. बहुतेक पुढारी आले होते. धर्मशाळा बांधावयाची याबद्दल वादच नव्हता. लागलीच पट्टी झाली व जागचे जागीं चार साडेचार हजार रुपयांचे आंकडे पडले. कै. विठोबा बाळशेट ऊर्फ अण्णासाहेब चिखले हे तेथें होते. अण्णासाहेब चिखले हे खतेंपत्रें लिहिण्याचा धंदा करीत असत त्यामुळें कोणाची जागा विकावयाची आहे वगैरे त्यांना माहिती असे. मंडळींनीं समाजाकरितां धर्मशाळेला योग्य अशी जागा पहाण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविलें. याच वेळीं प्लेग व दुष्काळ यामुळें सहा वर्षें बंद पडलेला फंड सुरूं करण्याविषयीं तात्यांनीं मंडळींना विनंति केली. फंडाच्या घराचें कायमचें उत्पन्न असल्यामुळें फंडाजवळहि थोडीशी शिल्लक जमली होती. तीहि धर्मशाळेकडे खर्चण्याचें ठरून दुसऱ्या दिवसापासूनच पैसाफंड सुरूं करण्याचें ठरलें. सारांश धर्मशाळेच्या अभावीं झालेल्या अपमानामुळें पैसाफंडास चालना मिळाली व तो जो शके १८२४ मध्यें सुरू झाला तो आजपर्यंत अखण्ड चालू आहे.

पुढें दोन चार दिवसांतच अण्णासाहेब चिखले यांना सोनापुरच्या गल्लींत एक जागा आढळली. ती मंडळींस पसंत पडली व कार्तिक व. ५ शके १८२४ मध्यें धर्मशाळेच्या जागेचें साठेखत झालें. लवकरच इमारतीच्या कामास सुरवात झाली. शेट सरीफभाई थावर खोजा हे घरें बांधण्याचें काम करीत असतात. ते आपल्या समाजांतील अनेक मंडळींशीं चांगले परिचित आहेत. त्यांनीं चार सहा महिन्यांचे आंत धर्मशाळा बांधून दिली. तेव्हां पासून आपल्या समाजांतील और्ध्वदेहिक कृत्यें

आपल्या समाजाच्या मालकीच्या जागेंत होऊं लागली. या धर्मशाळेच्या बाबतींत घडलेला एक प्रकार लक्षांत ठेवण्यासारखा आहे म्हणून तो सांगतों. फंडाजवळची होती नव्हती तेवढी शिल्लक व आलेल्या देणग्या यांतून धर्मशाळेचा खर्च पुरा होईना. धर्मशाळेचें काम पूर्ण झालें तरी फंडास रक्कम पुरी करतां येइना. शेवटीं निरुपायास्तव धर्मशाळा गहाण टाकावी असें ठरलें. त्याप्रमाणें स्टँप आणून गहाणखत लिहिलें गेलें. एक दोन ट्रस्टींच्या सह्याहि झाल्या व सही करण्यासाठीं तो कागद कै. तात्याबा बाबाजीशेट रेडीज ( मृत्यु माघ व. ४ शके १८३७ ) या ट्रस्टीकडे नेण्यांत आला. तात्याबाशेटनीं विचारलें ' हा कसला कागद आहे ? ' फंडाची मिळकत गहाण टाकणारा तो कागद आहे हें कळतांच तो कागद दूर फेकून देऊन त्यांनीं म्हटलें, " मी असल्या कागदावर सही करीत नाहीं. तुम्हीं सावकाराला जें व्याज द्याल तें मला द्या. मी एक हजार रुपये कर्ज देतों. " लागलीच उठून त्यांनीं एक हजार रुपयांच्या नोटा काढून त्या कागद घेऊन आलेल्या मंडळीच्या स्वाधीन केल्या. तात्याबासारखा गृहस्थ एकदम एवढी मोठी रक्कम काढून देतो याचें आलेल्या मंडळीस फार आश्चर्य वाटलें. तात्याबाशेटचा जात्यभिमान पाहून इतर मंडळींना-हि स्फुरण आलें व पाहिजे होती तेवढी रक्कम सहज जमली. जात्यभिमान कोणाच्यांत कधीं उत्पन्न होईल व कोणाकडून काय करवील तें सांगतां येणार नाहीं.

याच सुमारास आपल्याच समाजांतील कांहीं मंडळींच्या केवळ दुराग्रहामुळें व कांहीं ब्राह्मणांच्या चिथावणीमुळें एक प्रकरण उपस्थित झालें व पैसाफंडाचीं दोन शकलें होतात कीं काय अशी नाजुक स्थिति उत्पन्न झाली. परंतु केवळ तात्यांच्या कार्यैकदृष्टीमुळेंच या तिसऱ्या गण्डांतरांतून फंड यशस्वी रीतीनें पार पडला. असें हें प्रकरण म्हणजे एक वेळ खेडोंपाडीं जिकडे तिकडे पसरलेलें यज्ञोपवीत प्रकरण होय. जानवेवाले व बिन-जानवेवाले या शब्दांत आज कांहीं विशेष अर्थ उरलेला नाहीं. परंतु

वीस वर्षांपूर्वीची मात्र परिस्थिति भिन्न होती. केवळ जेवण्यासाठीं त्या वेळीं गांवोगांव तट पडले, सोयरेधायरे तुटले, लग्नकार्यांत बखेडे माजले, आणि इतर पंक्तींतून अपमान होऊं लागले. कांहीं वर्षेंतरी या यज्ञोपवीत प्रकरणाचें समाजांत बंड माजून राहिलें होतें. ‘ यज्ञोपवीता-संबंधीं चळवळीचा इतिहास ’ शके १८३० मध्यें कै. नारायण विठशेट शेट्ये ( मृत्यु आश्विन शु. १० शके १८४० ) आदि करून बारा पुढाऱ्यांच्या सहीनें पुस्तक रूपानें प्रसिद्ध झालेला आहेच. या ठिकाणीं थोडक्यांत या वादाचें स्वरूप सांगून फंडाशीं त्याचा संबंध कसा पोंहचत होता व तात्यांनीं मोठ्या दूरदर्शीपणानें फंडाला या वादापासून कसें अलग ठेविलें हें आपण पाहूं.

या चळवळीला उत्पन्न होण्यास कोल्हापुरापेक्षां योग्य ठिकाण दुसरें कोठें मिळणार ? कोल्हापूर संस्थानांत ती प्रथम उत्पन्न होऊन तेथून रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण वगैरे वैश्यवस्तीच्या प्रमुख ठिकाणीं पसरत शके १८२८ मध्यें मुंबईस आली. कोल्हापुरांत श्री. आत्माराम रामचंद्रशेट लांजेकर व रत्नागिरींत श्री. महादेव कृष्णशेट लाड यांनीं ही चळवळ उचलून धरिली होती. व्यापारानिमित्त गांवोगांवची बरीच मंडळी मुंबईंत एकत्र असल्यामुळें मुंबईंत तिला विशेष महत्व आलें. शके १८२६ मध्यें शारदामठाचे श्रीशंकराचार्य मुंबईस आले होते. कै. जगन्नाथ केशवशेट देवळेकर यांनीं ज्ञातीनें त्यांच्याविरुद्ध केलेल्या ठरावाची दाद लागावी म्हणून शंकराचार्यांकडे अर्ज केला. या देवळेकर प्रकरणसंबंधांत तात्या आदिकरून पुढारी मंडळीस शंकराचार्यांकडे जावें लागलें. शंकराचार्यांसारख्या विभूतीविषयीं त्यांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला व त्यांची पाद्यपूजा आपल्या समाजाकडून व्हावी असें वाटूं लागलें, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. इतक्यांत कै. गोविंद दशरथशेट खेडेकर यांनीं मांडवींत स्वतःच्या घरीं शंकराचार्यांना नेऊन त्यांची पाद्यपूजा केली. समाजातर्फेंहि शंकराचार्यांची पाद्यपूजा करण्याचा प्रश्न जोरानें पुढें आला.

वर्गणी जमविण्यांत आली व ठाकुरद्वार येथील दत्तमंदिरांत आश्विन व १० शके १८२६ मध्यें शंकराचार्यांची पाद्यपूजा झाली. पूजाप्रसंगीं मुंबईतील आपला बराच समाज जमला होता. पूजाविधि ज्ञातींतील पुढारी कै. पांडुरंग अनंतशेट बेर्डे यांचे हस्तें झाला. पाद्यपूजेनंतर उपसंहारादाखल शंकराचार्यांनीं उपदेशपर भाषण केलें. धर्माची महति किती आहे हें प्रथम सांगून शेवटीं जमलेल्या वैश्य मंडळीस उद्देशून त्यांनीं म्हटलें, " जरी तुम्हीं स्वतः वैश्य आहां, तरी तुमच्याकडून विहित वैश्य धर्माप्रमाणें आचरण घडत असावें असें वाटत नाहीं. वैश्यधर्मापासून तुम्हीं च्युत झालां आहांत. तुम्हांला वैश्य धर्माची ओळख नाहीं, तुमच्या जवळ फक्त स्नान व रोटला एवढेंच कायतें राहिलें आहे. " शंकराचार्यांचें भाषण मंडळी तटस्थपणें ऐकत होती. त्यांचें शेवटचें वाक्य कानावर पडतांच मंडळींच्या मनांत कालवाकालव सुरू झाली. तात्या या पाद्यपूजेंत प्रामुख्यानें होतेच. त्यांच्या व कै. गोविंदशेट खेडेकर, कै. नारायण विठशेट शेट्ये, कै. अण्णासाहेब चिखले इत्यादि पुढारी मंडळींच्या मनाला ते शब्द जात्यभिमानामुळें झोंबले. पाद्यपूजा आटोपल्यावर मंडळी घरोघर गेली. मुंबईमध्यें शंकराचार्यांच्या भाषणानें एकच गडबड उडवून दिली. कांहीं दिवस लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या तोंडीं ' च्युत, स्नान आणि रोटला ' हे शब्द बसले. कै. गोविंदशेट खेडेकर आदिकरून पुढारी मंडळींची या परिस्थितीचा विचार करण्याकरितां एक खाजगी बैठक होऊन बराच विचार करण्यांत आला. " वैश्य धर्माप्रमाणें आमचे धार्मिक विधि यथाविधि होतात किंवा नाहीं हें कांहीं शंकराचार्यांनीं आमच्या घरीं जाऊन पाहिलें नव्हतें, कीं जोशी उपाध्याय यांचेकडे चौकशी करून त्यांना समजलें नव्हतें. मग आम्हीं वैश्यधर्माप्रमाणें वागतों कीं नाहीं हें शंकराचार्यांना समजलें कसें ? द्विजत्वाची केवळ खूण असें जें जानवें, तें पूजेला बसलेल्या बेर्डे यांचे गळ्यांत दिसलें नाहीं, म्हणून ' वैश्यधर्मापासून च्युत ' हा दाखला शंकराचार्यांनीं एकंदर समा-

जाचे गळ्यांत बांधला ?" वगैरे विचार होऊन वैश्यवर्णाश्रमविहित कर्माबद्दल माहिती मिळवावी म्हणून शारदापीठाकडे अर्ज करण्याचें ठरून पौष शु. ७ शके १८२६ रोजीं कै. गोविंदशेट खेडेकर आदिकरून सोळा प्रमुख मंडळींच्या सह्यांचा अर्ज पाठविण्यांत आला. त्याचें उत्तर बरोबर पंधरवड्यानें पौष व. ७ रोजीं आलें व त्यांत सोळा संस्कार त्याचप्रमाणें पंचमहायज्ञ, पंचायतन पूजा सुरू करण्याविषयीं पीठाकडून आज्ञा झाली. हें आज्ञापत्र येतांच सर्वांना अत्यंत समाधान वाटलें. पीठाकडून झालेली आज्ञा म्हणून ती एक 'धार्मिक सनद' आहे असें लोकांना वाटूं लागलें. 'या सनदेच्या जोरावर आम्हीं धार्मिक सुधारणा घडवून आणूं' असें पुढारी मंडळीस वाटूं लागलें, व त्या दिशेनें प्रयत्न करण्यासहि त्यांनीं आरंभ केला.

हें आज्ञापत्र जाहीर रीतीनें सर्व समाजापुढें मांडण्याकरितां श्रावण शु० १ शके १८२८ रोजीं लोहाणा महाजनवाडीमध्यें आपले समाजाची सभा, वांकेडचे कै. राघोबा केशवशेट शेट्ये यांचे अध्यक्षतेखालीं भरली. यज्ञोपवीतादि संस्कारविधि सुरू करण्याविषयींचा ठराव सभेपुढें मांडण्यांत येऊन त्यावर मंडळींचीं अनुकूल अशीं भाषणें झालीं. इतक्यांत कै. गोविंदशेट खेडेकर हे उभे राहिले व त्यांनीं ठरावास प्रतिकूल असें भाषण केलें. गोविंदशेट या प्रश्नांत अगदीं सुरवातीपासून असतांना आज असें काय करतात, त्यांस कोणी चिथवलें याचा कोणास बोध होईना. 'गोविंदशेट सारखा करारी, निग्रही व शेवटपर्यंत 'आपलें तें खरें' या बाण्याचा पुरुष विरुद्ध बाजूला व विशेषतः सुधारणेच्या उलट दिशेला जात आहे हें पाहून' कित्येकांस अतिशय वाईट वाटलें. गोविंदशेटच्या भाषणानें सभेंत बरीच गडबड उडून कोणताहि ठराव न होतां सभा विसर्जन झाली.

येथपासून हें यज्ञोपवीतप्रकरण खरें पेटलें व त्याच्या ज्वाळा खेडोपाडींही जाऊन पोंहचल्या. एकदां एक बाजू धरली मग 'शेंडी तुटो कीं

पारंवी तुटो ' ती सोडावयाची म्हणून नाहीं असा गोविंदशेटचा स्वभाव होता व या यज्ञोपवीतप्रकरणांत त्यांनीं शेवटपर्यंत तो तसाच ठेविला. महायात्राप्रसंगीं द्वारकाक्षेत्रास जाण्याकरितां याच सुमारास शिवगंगा मठाचे स्वामी मुंबईस आले होते. त्यांच्याकडे गोविंदशेटनीं प्रथम धांव घेतली. व त्यांच्याकडून आपणास पाहिजे तसें पत्रक मिळविलें. अशा रीतीनें शारदा पीठाचे शंकराचार्य व शिवगंगाभठाचे स्वामी यांच्यांत वाद सुरू झाला. यज्ञोपवीतास अनुकूल अशा प्रमुख मंडळींनीं एक विनंति अर्ज पुनः शारदापीठाकडे पाठविला व नांदोद मुक्कामीं शंकराचार्यांची गांठ घेतली. ज्येष्ठ शु. ८ शके १८२९ रोजीं शारदापीठाकडून एक खुलासेवार असें आज्ञापत्र आलें. गोविंदशेटचा विरुद्ध पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न सारखा वाढत चालला. याच वेळीं मिरजकरस्वामी, ब्रह्मनाळकर स्वामीशीं त्यांच्या चाललेल्या वादांत लोकमतें मिळविण्याकरितां, मुंबईस आले होते. त्यांना गोविंदशेटनीं आपल्या बाजूनें या वादांत घेतलें. आपल्या समाजांतील कित्येक मंडळींकडे धर्मकृत्यें करण्यास जात असलेले व स्वतःस अनधिकारानें ' आम्हीं तुमचे समाजाचे उपाध्ये ' असें म्हणवून घेणारे, मुगभाट येथील कै. नारायण रघुनाथ जोशी ( पुढें एका अरेरावी वर्तनामुळें याच जोश्यांना महाजनवाडींत वगैरे फिरण्याची फंडानें बंदी केली. ) हेच जानव्याचे विरुद्ध मंडळींना मागून चालना देत होते. मिरजकर स्वामींच्या बोलावण्यावरून या प्रश्नाचा विचार करण्याकरितां जानवेवाली मंडळी सदरी जोश्यांचे येथें मिरजकरस्वामींच्या प्रतिनिधींशीं विचारविनियम करण्यास गेली. परंतु स्वामीमहाराजांनीं जानवेवाल्या मंडळींच्या म्हणण्याचा कांहीं एक विचार न करतां गोविंदशेट यांना एक आज्ञापत्र दिलें. हें आज्ञापत्र पाहून ' हात दाखवून अवलक्षण करून घेण्याची दुर्बुद्धि ' आपणास कोठून झाली असेंच गोविंदशेटना वाटले असेल. गोविंदशेट जे भांडत होते ते त्यांना आपल्या वैश्यत्वाचा अभिमान नव्हता म्हणून थोडेच होते. परंतु मिरजकर स्वामींच्या आज्ञापत्रांत तर ' कोकणस्थ वैश्य म्हणविणारे ' असे शब्द घालून वैश्यत्वाबद्दलच संशय प्रकट केलेला. जानवेवाल्यामंडळींनीं हें

आज्ञापत्र शारदापीठाकडे निर्णयार्थ पाठविलें. त्याची बोळवण माघ शु. ५ शके १८२९ रोजीं त्या पीठानें ' जी जाहिरात पाठविली आहे. ती जाहीरात कोणी मनुष्यानें कल्पित पीठाचे नांवें छापिलेली आहे. त्यामध्यें कित्येक बालिश शब्द वापरलेले आहेत. कोणी वंध्यापुत्र सार्वभौम म्हणून घेत असेल तर त्याचें खंडन करा हें म्हणणें हास्यास्पद आहे.' या शब्दांत केली आहे. यावरून मिरजकर स्वामींच्या 'जाहिराती' ची किंमत स्पष्ट कळून येते. शके १८२९ च्या फाल्गुनमासीं संस्थान बद्रिकाश्रम शारदामठ वैराट क्षेत्र येथील स्वामी मुंबईस आले होते. त्यांच्याकडे नंतर गोविंदशेट गेले व फाल्गुन शु. १५ शके १८२९ रोजीं त्यांनीं त्यांचेकडून एक आज्ञापत्र मिळविलें. परंतु त्यांत 'वैश्यांचें यज्ञोपवीत मेंढीच्या लोंकरीचें असावें' असें सांगून त्यांनीं गोविंदशेटचीच बाजू लंगडी केली. अशा प्रकारें जानवेवाले व बिनजानवेवाले यांच्यामधला हा लढा माजून राहिला होता. गोविंदशेट खेडेकर यांनीं हें यज्ञोपवीत प्रकरण जें इतकें लढविलें त्यांत त्यांची कोणत्याहि प्रकारची स्वार्थबुद्धि नव्हती ही मुद्याची गोष्ट ही हकीकत वाचीत असतांना लक्षांत ठेवली पाहिजे. उलट यज्ञोपवीताला अनुकूल मंडळींचे जसे गांठचे हजार पांचशें रुपये खर्च झाले असतील, तसेंच यज्ञोपवीताला प्रतिकूल होऊन गोविंदशेटनींहि हजार पांचशें रुपयांचा आपल्या खिशाला चाट दिला असेल. हा वाद फार दिवस चालणेंच शक्य नव्हतें, कारण प्रतिकूल मंडळींना धर्मशास्त्राचा कोणत्याहि प्रकारें आधार नव्हता. त्यांचा आधार काय तो 'रूढी' होय. केवळ रूढीच्या आधारावर चालविलेल्या भांडणांत अपयश ठेवलेलेंच असतें. तेव्हां यज्ञोपवीताचा वाद जरी थोड्या वर्षांत नाहींसा झाला तरी त्या वादामुळें जे खेडोपाडीं तट पडले ते मात्र अजीबात नष्ट झाले नाहींत. आतां यज्ञोपवीताचें कारण नसलें तरी दुसऱ्या कसल्या ना कसल्या तरी नांवाखालीं ते तट आहेतच.

यज्ञोपवीताच्या धार्मिक चळवळीपासून एक चौवीस वर्षांचे तरुण समाजसेवक समाजकार्यांत हळुहळु पुढें येऊं लागले होते. ते समाज-

सेवक म्हणजे श्री. गणपत बिठोबाशेट ऊर्फ अण्णासाहेब मोरे होत. आश्विन व. १० शके १८२६ रोजीं शंकराचार्यांची पाद्यपूजा झाली व तेव्हांपासून समाजाची पूजा बांधण्याकरितां अण्णासाहेब मोरे यांनीं पुढें येण्यास सुरवात केली. पुढें फंडाची महाजनवाडी उघडल्यानंतर ते जबाबदारीनें पुढें आले व त्यांनीं आपल्या कार्यमहात्म्यानें सर्व समाजाचे डोळे आपल्याकडे वेधून घेतले. ती हकीकत पुढें येईलच. या ठिकाणीं यज्ञोपवीताच्या चळवळीनें एका धडाडीच्या कार्यकर्त्याचें लक्ष समाजाकडे ओढून घेतलें, हा एक अपरोक्ष महत्वाचा फायदा या प्रकरणामुळें समाजाचा झाला, एवढेंच आपणास पहावयाचें आहे. यज्ञोपवीत चळवळीमुळेंच धार्मिक प्रश्नांकडे आपल्या समाजाचें लक्ष लागलें व त्याचाच परिणाम पुढें बारा वर्षांनीं वैश्यधर्मोन्नतिफंड या स्वरूपांत समाजाच्या दृष्टीस पडला.

खरें पहातां यज्ञोपवीताच्या चळवळीचा व ज्ञातिफंडाचा कांहीं एक संबंध नव्हता. शंकराचार्यांची पाद्यपूजा झाली, त्यांच्याकडे अर्ज पाठविले, सभा केल्या वगैरे कोणत्याहि कामासाठीं फंडांतून एक पैहि खर्च झालेला नाहीं. शंकराचार्यांकडे जो सोळा सह्यांचा पहिला अर्ज झाला, त्यांत जशी फंडांत काम करणारी मंडळी होती, तशीच फंडांत काम न करणारी व मुंबईच्या बाहेरीलहि कांहीं मंडळी होती. परंतु यज्ञोपवीताला प्रतिकूल असलेल्या मंडळींनीं ही चळवळ ज्ञातिफंडवाले करीत आहेत, अशी आरडा–ओरड करण्यास सुरवात केली. गोविंदशेट सारखा करारी व वजनदार गृहस्थ यज्ञोपवीताच्या बाबतींत उलट गेलेलाच होता. जर कां गोविंदशेट ओरड करणारांना मिळाले तर फंडावर मोठीच आपत्ति येणार हें तात्यांना स्पष्ट दिसूं लागलें. मागील दोन गण्डांतरांपेक्षां हें तिसरें गण्डांतर फंडाला फार जाचक होणार असें तात्यांनां वाटूं लागलें. तात्या तर वयाच्या विसाव्या वर्षांपासून यज्ञोपवीत धारण करणारे होते. ज्ञातिफंडापैकीं कांहीं मंडळी यज्ञोपवीत धारण करणारी आहेत, या स्थितीचा फायदा घेऊन फंडांत बखेडा आणणारांकडे गोविंदशेट झुकूं नयेत

म्हणून यज्ञोपवीत खुंटीला लावावें, कीं गळयांत यज्ञोपवीत हवें म्हणून गोविंदशेट सारख्याला गमवावें असा तात्यांपुढें मोठा पेंच होता. धार्मिक बाबू कोणतीहि असो ती मनुष्याला विकारवश करणारी असते. तात्या फक्त यज्ञोपवीत गळ्यांत अडकविणारे नव्हते तर तदंगभूत सर्व विधि करणारे होते. तेव्हां यज्ञोपवीत काढून टाकणें त्यांना शक्यच नव्हतें. बरें फंड तर त्यांचें जिवितकार्य आणि गोविंदशेट फुटले तर फंडाचें नशीबच फुटलें अशी स्थिति होती. तात्यांना जसें यज्ञोपवीत सोडावयाचें नव्हतें तसें गोविंदशेटनाहि फंडांतून जाऊं द्यावयाचें नव्हतें. त्यांना दोन्हीं गोष्टी साधावयाच्या होत्या. आणि त्यांची कार्यैकदृष्टि असल्यामुळें त्यांनीं त्या दोन्हीं गोष्टी साधल्याहि. तात्यांनीं त्या वेळीं जें धोरण ठेविलें तें सार्वजनिक कार्य करणाऱ्या प्रत्येकानें हृदयावर कोरून ठेवण्यासारखें आहे. तात्यांच्या पुढें 'एका बाजूला आड आणि दुसऱ्या बाजूला विहीर' अशी जी परिस्थिति उभी होती, तशी परिस्थिती समाजकार्य करीत असतांना प्रत्येक कार्यकर्त्यापुढें केव्हांना केव्हां तरी उभी रहाते. परंतु आडांत किंवा विहीरींत कशांतहि न पडणारे मात्र क्वचितच आढळतात. तात्यासाहेब अशा क्वचित् लोकापैकींच होत. शंकराचार्यांच्या पाद्यपूजेपासून तों यज्ञोपवीताचा इतिहास छापून काढीपर्यंत, यज्ञोपवीत बाबत प्रत्येक गोष्टींत त्यांचा संबंध होता. म्हणजे यज्ञोपवीत प्रकरणांत ते गोविंदशेटच्या विरुद्ध होते. परंतु त्यांनीं या चळवळींत असें स्पष्ट धोरण ठेविलें कीं गोविंदशेटनांहि वाटावें कीं तात्यांचें मुख्य कार्य ज्ञातिफंड हें आहे. ज्ञातिफंड हें आपलें अढळ जीवितकार्य आणि प्रसंगोपात्त उत्पन्न झालेलें जानवें प्रकरण हें केवळ प्रासंगिक कार्य, असें बोलण्याचालण्यांत तात्यांनीं एकसूत्रि धोरण ठेविल्यामुळें, यज्ञोपवीतांत चिडून गेलेले गोविंदशेट, फंडांत तात्यांच्या खांद्याशीं खांदा लावून काम करीत शेवटपर्यंत राहिले. गोविंदशेट हे अखेर पर्यंत (मृत्यु फाल्गुन शु. ४ शके १८३१) फंडाचे अभिमानी राहिले व कोणी विरुद्ध गेलेला दिसला कीं ते त्याला शेलक्या शब्दांनीं शहाणपण शिकवीत

असत. अशा रीतीनें तात्यांनीं स्वतः जानवेवाले पक्षांत शेवटपर्यंत राहून बिनजानवेवाल्या पक्षाला फंडांतून फुटूं दिलें नाहीं. फंड कीं यज्ञोपवीत अशा कचाट्यांत सांपडलेल्या तात्यासारख्या जबाबदार पुढाऱ्यांच्या त्या वेळच्या वर्तनावर ' गुळमुळीत ' अशी टीका कित्येकांनीं केलेली आहे. व्यक्तिगत तत्वपालनासाठीं सार्वजनिक कार्याची नासाडी करणाऱ्यांना तात्यांनीं यज्ञोपवीत प्रकरणीं ठेवलेलें धोरण खात्रीनें मार्गदर्शक होईल.

शके १८२८ मध्यें यज्ञोपवीत प्रकरणामुळें फंडांत फूट होण्याचा समय आला असतां तात्यांनीं ती होऊं दिली नाहीं आणि फंडाचें कार्य एकजुटीनें चालूं राहिलें. परंतु पुढें लवकरच फंड एका विचित्र वावटळींत सांपडला. ही वावटळ म्हणजे स्वयंसेवक मंडळाची होय.

माघ व. ३ शके १८३३ रोजीं भरलेल्या समाजाच्या पंचांच्या सभेंत समाजाची खाने सुमारी करण्याचा प्रश्न विचारार्थ निघाला. समाजामध्यें त्या वेळीं यज्ञोपवीत चळवळीमुळें जागृति उत्पन्न केलेली होती. कित्येक मंडळींच्या मनांत समाजसुधारणेविषयीं कल्पना घोळूं लागल्या होत्या. परंतु समाजाच्या एकंदर अंतर्गत स्थितीविषयीं विश्वसनीय अशी माहिती संकलित नसल्यामुळें समाजसुधारणेला कसा निरनिराळ्या बाजूंनीं हात घातला पाहिजे हें समजणार कसें ? सुधारणेच्छूंना स्वस्थितीचें ज्ञान असणें अवश्य आहे. समाजाची सुधारणा जर करावयाची तर अगोदर समाजाची एकंदर खाने सुमारी झाली पाहिजे असे विचार त्या वेळीं कांहीं मंडळींनीं या समाजाचे सभेंत मांडले व समाजाची खानेसुमारी करण्याचें ठरलें. समाजाची खानेसुमारी करण्याचा प्रथम प्रयत्न शके १८२६ मध्यें फंडातर्फे थोडासा करण्यांत आलेला होता. परंतु तो पुढें पुरा झाला नाहीं. १८२६ पेक्षां या वेळीं समाजांत जास्त जागृति दिसत होती व म्हणून हा दुसरा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व्हावा अशी सर्वांची अपेक्षा होती. समाजाची खानेसुमारी अवश्य झाली पाहिजे हें ठरलें. परंतु घरोघर जाऊन आणि अगदीं बारीक सारीक

माहिती घेऊन तिची व्यवस्थेशीर नोंद करणार कोण ? हा प्रश्न होताच. पगारी माणसें ठेवून त्यांजकडून हें कार्य व्हावें असाहि मार्ग कांहीं लोकांनीं सुचविला. खानेसुमारी सारखे वरचेवर न होणारे, व अत्यंत काळजीपूर्वक झालें पाहिजे असलें काम पगारी माणसांकडून होणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं असें वाटून सभेंतल्या सभेंतच कांहीं मंडळींनीं स्वयंस्फूर्तीनें हें काम करण्याची आपली तयारी असल्याबद्दल नांवें दिलीं. खानेसुमारीचें काम करण्यास स्वयंस्फूर्तीनें पुढें आलेल्या या मंडळीचेंच हळु हळु 'स्वयंसेवक मंडळ' ह्या संस्थेंत रूपान्तर झालें. 'स्वयंस्फूर्तीनें समाजाची सेवा' करण्यास निघालेल्या ह्या मंडळाबद्दल कोणाला अभिमान वाटणार नाहीं ? पंचांच्या सभेंतील कांहीं मंडळी ही 'स्वयंसेवा' म्हणजे 'स्वयंस्फूर्तीनें समाजाची सेवा' करण्यास प्रथम निघाली असल्यामुळें, स्वयंसेवक मंडळांत फंडांतील कित्येक पंचांचीं नांवें आढळतात त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तात्या आदिकरून ज्ञातिफंडाचे पुढाऱ्यांची या स्वयंसेवक मंडळाच्या कार्याला प्रथम पूर्ण सहानुभूति होती. या मंडळाच्या पहिल्या पहिल्या समारंभामध्यें तात्या आदिकरून फंडांतील मंडळी प्रामुख्यानें भाग घेत होती. श्रावण व. ३० शके १८३४ मध्यें 'खानेसुमारीचे उद्देशापैकीं वारंवार ज्ञातीचें संमेलन व्हावें हा जो मुख्य उद्देश आहे त्याला या शुभप्रसंगानेंच सुरवात व्हावी' असा हेतु आमंत्रण पत्रिकेंत जाहीर करून हिराबागेंत स्वयंसेवक मंडळाचे विद्यामानें श्रीसत्यनारायणपूजा झाली तींत मुख्य भाषण तात्या यांचेंच 'ज्ञात खानेसुमारीचे उद्देश व त्यापासून होणारे फायदे' या विषयावर ठेवलेलें होतें. पुढें मुरारबागेंत कै. विठोबा बाळशेट ऊर्फ आण्णासाहेब चिखले यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या पहिल्या दसरा संमेलनांत श्री. अण्णासाहेब मोरे यांचें 'वैश्य पैसाफंडाचा उद्देश' या विषयावर भाषण झालें. हेंच समाजापुढील मोरे यांचें पहिलें भाषण होय. सारांश त्या वर्षाच्या संक्रांतिसंमेलनापर्यंत जे जे

समारंभ झाले त्या त्या सर्व समारंभांत फंडाचीं प्रमुख मंडळी भाग घेत होती. अशा रीतीनें सर्वांच्या सहानुभूतीनें स्वयंसेवक मंडळ ' स्वयंसेवा ' करीत होतें. परंतु पौष शु. ६ शके १८३४ रोजीं हिराबॅग जें. रा. तुकाराम भिकशेट रेडीज यांचे अध्यक्षतेखालीं संक्रांति संमेलन झालें त्या संमेलनाच्या छापी आमंत्रण पत्रिकेंत, या मंडळानें आपले उद्देशांत बदल केल्याचें दिसल्यावरून फंडांतील कित्येक प्रमुख मंडळींचीं मतें स्वयंसेवकमंडळाच्या कार्याविषयीं साशंक झालीं. या संमेलनांत अण्णासाहेब मोरे यांचें ' समाज ऐक्या पासून फायदे ' या विषयावर भाषण होणार म्हणून जाहीर झालें होतें. परंतु वरील कारणामुळें त्यांना त्या समारंभांत भाग घेतां आला नाहीं व त्यांनीं सकारण तसें संमेलनाचे अध्यक्षांस लेखी कळविलेंहि.

संक्रांति संमेलनापासून स्वयंसेवकांच्या धोरणांत संक्रमण होऊन पुढें तें धोरण कोणत्या थराला गेलें, ही हकीकत पहाण्या पूर्वीं ' ज्ञात समाजाचें आज्ञेवरून ज्ञात स्वयंसेवकांनीं' जें खानेसुमारीचें काम हातीं घेतलें होतें, त्या कामाचें काय झालें हें अवश्य पाहिलें पाहिजे. खानेसुमारीच्या कामाला स्वयंसेवक तयार होतांच समाजाचे चिटणीस बाळकृष्ण अनंतशेट बेडे यांच्या सहीची जाहीर पत्रिका समाजांत वाटली गेली. तींत खानेसुमारी कां केली जात आहे हें प्रथम सांगून शेवटीं ' ज्ञातीचे स्वयंसेवक नेमल्या तारखे ः आपल्याकडे येतील त्यावेळीं त्यांस त्यांच्यापाशीं असलेल्या नोंदीचे कागदांतील कोष्टकास अनुसरून माहिती देण्याची मेहरबानी करावी ' अशी समाजबंधूस विनंति करण्यांत आली. पुढें स्वयंसेवकांनीं मुंबईतील निरनिराळ्या विभागांत फिरून खानेसुमारी करण्यास सुरवात केली. खानेसुमारीचें काम किती कष्टाचें, जिगजिगीचें, व नाजूक आहे याची कल्पना तें काम करणारांशिवाय इतरांस येणें शक्य नाहीं. परंतु उत्साही अशा स्वयंसेवकांनीं तें बरेच यशस्वी रीतीनें पार पाडलें याबद्दल त्यांचें कोणीहि अभिनंदनच करील. जरी खानेसुमा-

रीचें काम पुढें पूर्ण झालें नाहीं तरी त्यांनीं जें कार्य केलें तें फारच महत्वाचें असें केलें यांत शंका नाहीं. मोठ्या कष्टानें, चिकाटीनें व मिनतवारीनें जी माहिती स्वयंसेवकानीं संकलित केली ती जर त्याच वेळीं नीट व्यवस्थेशीर अशा स्वरुपांत समाजापुढें आली असती तर समाजसुधारणा करणारांना तिचा अतीशय उपयोग झाला असता. परंतु मोठ्या प्रयासानें मिळविलेली माहिती तशीच स्वयंसेवकांचे अध्वर्यूंकडे धूळ खात पडून राहिली, हें मात्र इष्ट झालें नाहीं.

शके १८३४ च्या संक्रांतिसंमेलनापासून स्वयंसेवक मंडळाच्या धोरणाविषयीं फंडांतील प्रमुख चालकांचीं मनें साशंक झालीं होतीं. संक्रांति संमेलनांत फंडाचे प्रमुख मंडळींनीं भाग न घेतल्याबद्दल त्यांच्याविषयीं गैरसमज उत्पन्न करणारीं मंडळाच्या अध्वर्यूंचीं भाषणें झालीं. व संमेलनाचे अध्यक्षांच्या सहीची ‘ फंडाचा आजपर्यंतचा हिशेब पंधरा दिवसाचे आंत सादर करावा न केल्यास त्यांना तसें करण्यास भाग पाडावें लागेल. ’ अशी धमकी वजा नोटीस फंडाचे चिटणीसांना लागली. त्यानंतरच्याहि त्यांच्या चळवळीचें धोरण फंडाचे चालकांविषयीं लोकांचीं मनें कलुषित करणारें असें राहिल्यामुळें कित्येक मंडळींच्या तक्रारी फंडाकडे आल्या. तेव्हां मिति अश्विन शु. ९ शके १८३५ रोजीं समाजाचे व फंडाचे चिटणीस बाळकृष्ण अनंतशेट बेडें यांच्या सहीनें ‘ १३ जानेवारीपासून स्वयंसेवक मंडळ जीं कामें करीत आलें आहे व पुढें जीं करील त्या कामांशीं व स्वयंसेवक मंडळाशीं समाजाचे अगर फंडाचे पुढाऱ्यांचा कांहींएक संबंध नाहीं. स्वयंसेवक मंडळ जीं कामें करीत आहेत तीं सर्व तें आपल्या जबाबदारीवर करीत आहेत. ’ असा जाहीर खुलासा प्रसिद्ध करावा लागला. वरील खुलाशांतील ‘ १३ जानेवारीपासून, म्हणजे शके १८३४ च्या संक्रांति संमेलनापासून होय. यावरून शके १८३४ च्या संक्रांतिसंमेलनापर्यंत फंडाचे पुढाऱ्यांची स्वयंसेवकांचे कार्याविषयीं जी सहानुभूति होती ती पुढें राहिली नाहीं, आणि एक वर्षाच्या आंतच

स्वयंसेवकमंडळाचा आणि फंडाचा कांहींएक संबंध नाहीं असें फंडाला जाहीर करावें लागलें. स्वयंसेवक मंडळाच्या एकंदर चळवळीविषयीं लिहीत बसलें तर तो एक ग्रंथच होईल. परंतु एवढी गोष्ट खरी कीं त्यांच्या अध्वर्यूंच्या कारवाईमुळें फंडाच्या कामाविषयीं बराच गैरसमज लोकांत पसरला. आणि फंडाचे व्यवस्थापक पंचांपैकीं एक पंच श्री. गोविंद भागशेट रेडीज यांनीं फंडासंबंधीं विचार करण्यासाठीं माघ शु. २ शके १८३४ रोजीं ठाकुरद्वार येथील फंडाचे घरांत समाजाची सभा बोलाविली. बरीच मंडळी सभेस आली होती. तात्या आदिकरून फंडाची प्रमुख चालक मंडळी सर्व कागदपत्र घेऊन सभेला गेली होती. परंतु ज्यांनीं सभा बोलाविली तेच हजर नसल्यामुळें सभेचें काम न चालतां मंडळी घरोघर निघून गेली. स्वयंसेवक मंडळीच्या सर्व कामगिरीचा पाढा वाचावयाचें कारण नाहीं हें खरें, परंतु एका गोष्टीच्या उल्लेख करणें जरूर आहे. ही उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे ' वैश्य-प्रिंटिंग प्रेस.' प्रत्येकीं दहा रुपयांचा असे भाग काढून हा छापखाना चिपळूणचे सन्माननीय पुढारी कै. रामचंद्र नागूशेट ऊर्फ बाळशेट शेट्ये ( मृत्यु फाल्गुन शु. २ शके १८३७ ) यांचे अध्यक्षते खालीं माघ व. १४ शके १८३४ महाशिवरात्रीच्या दिवशीं उघडण्यांत आला. छापखाना काढण्याच्या उद्देशहि छापखाना उघडण्याच्या आमंत्रणपत्रिकेंत ' वैश्य समाजाची हरएक प्रकारें उन्नति व्हावी अशा उद्देशानें वैश्यस्वयंसेवक मंडळ जे प्रयत्न करणार आहे त्यांचा सर्वत्र प्रसार होण्यासाठीं मंडळातर्फे लवकरच एक वर्तमान पत्र काढण्यांत येणार आहे, तें छापण्यासाठीं मंडळाच्या मालकीचा एक छापखाना काढण्याचें ठरविलें आहे.' अशा शब्दांत नमूद केलेला होता. स्वयंसेवकमंडळानें 'स्वयं सेवा' म्हणजे स्वतःचे मनास आवडेल तशी 'स्वैर सेवा' अशा प्रकारचें धोरण ठेवल्यामुळें आणि विध्वंसक अशाच टीका करीत बसल्यामुळें, शेवटीं ' स्वयंसेवकमंडळ ' नांवाचें राहिलें, ' लवकरच सुरू होणारा वैश्य समाचार' कल्पनासृष्टींतच विराम पावला आणि छापखान्याचे धिंडवडे निघाले.

अशा या वावटळींत फंडाचे तारूं पहिल्या तीन गंडांतरांतून सुटून चौथ्या गंडांतरांत सांपडलें. परंतु फंडाचे मुख्य कर्णधार तात्या मोठे कुशल होते. त्यांनीं अशा स्थितींत शान्त डोकें ठेविलें आणि ' अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति ' या न्यायानें हें वादळ आपोआपच शांत होऊं दिलें. ज्याप्रमाणें स्वयंसेवकांच्या अध्वर्यूंच्या हातांत ' वैश्य मासिक ' होतें त्याच प्रमाणें ज्ञातिफंडाचे हातांत प्रत्येक खेड्यापाड्यांत जाणारी 'वैश्यधर्मोन्नतिमाला' होती. परंतु त्यांच्याकडून करण्यांत आलेल्या टीकांचा विचार करण्याच्या भरीस ते पडले नाहींत. फक्त एकच जाहीर खुलासा फंडाच्या अहवालांतून व मालेंतून प्रसिद्ध करण्यांत आला तो जाहीर खुलासा येणेंप्रमाणें:—

" कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाचे कार्यावर सभ्यपणा, शिष्टाचार, जबाबदारी सारी गुंडाळून ठेवून व सत्य गोष्टींचा विपर्यास करून वाटेल तसे तोंडसुख घेण्याचा विडा उचलेला, एक कंपू मुंबईत आमचे सर्व ज्ञातिबांधवांना महशूर आहेच. फंडाचे सरळ कार्यांत घोटाळे उत्पन्न करणारीं कारस्थानें त्यांचेकडून आजपर्यंत कसकशीं झालीं हें मुंबईतील सर्व बंधूनां माहित आहे. अशा या शिष्ठ मंडळीचा फंडाचे कार्यावर प्रत्यक्ष परिणाम होऊं नये ह्मणून त्यांना आपले कार्यापासून दूर ठेवणें फंडाला भाग पडलें आहे. परंतु त्यांचे अध्वर्यूंचे हातांत ' मासिक ' पडल्यापासून सर्वच ताळतंत्र सोडून वाटेल त्या युक्त्या क्लृप्त्या काढून टीका ( ? ) करण्यास त्यानें सुरवात केली आहे. त्यांच्या त्या खोट्या, द्वेषमूलक, जाणून बुजून विपर्यास करणाऱ्या टीकांचा विचार करणें म्हणजे त्यांना नसतें महत्व देणें व कालक्षेप करणें होय. या खोटसाळ टीकांचा परिणाम फंडाचे कोणाहि आश्रयदात्याचे मनावर झालेला नाहीं. परंतु दुसऱ्या ज्या कोणास त्या विषयीं खुलासा करून घेणें असेल त्यानें समक्ष येऊन सेक्रेटरीस भेटावें. "

फंडावर ज्या टीका झाल्या त्या बाबतींत लो. टिळकांच्या चरित्रांत दे.

म. तात्यासाहेब केळकर यांनीं सार्वजनिक फंडाचे बाबतींतला आपला एक अनुभव दिलेला आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. " सार्वजनिक वर्गण्यांच्या बाबतींतला सामान्य नियम असा अनुभवास येतो कीं, ज्यांनीं वर्गण्या दिल्या त्यापेक्षां ज्यांनीं न दिल्या त्यांनाच फंडाच्या विनियोगाविषयीं अधिक काळजी वाटते ! एकानें वर्गणी द्यावी, व दुसऱ्यानें त्याच्या खर्चाची चिंता वहाण्याचा बहाणा करावा हाहि एकप्रकारचा श्रमविभागच होय. ' आपल्या तात्यांनाहि एकेचाळीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत अनेकवार हा अनुभव आलेला होता त्यांनीं ' निंदकाचें घर असावें शेजारीं ' या तुकोबाचे उक्तीप्रमाणें धोरण ठेवलें व प्रत्यक्ष कार्यानें त्या लोकांना उत्तरें दिलीं. अशा रीतीनें या चौथ्या गण्डांतरांतून तात्यांनीं आपल्या उदार धोरणानें फंडाचा बचाव केला. हेंच तात्यांचें धोरण तात्यांच्या अनुयायांनीं तात्यांच्या मृत्यूनंतर कायम ठेवून ' आक्षेपार्ह ' म्हणून मानल्या गेलेल्या व्यक्तींवरील आक्षेपार्हपणा आषाढ शु० १२ शके १८४७ रोजीं काढून टाकला आहे. ' गेलें तें गंगेस मिळालें ' असें म्हणून सर्वांना जवळ केलें आहे. ' कोळसा कितीहि उजळला तरीहि काळाच ' असा अनुभव येणार नाहीं अशी आशा आहे.

अशा रीतीनें संकटपरंपरेंतून मार्ग काढीत ज्ञातिफंड आपल्या ध्येयाकडे चालला होता. मध्यंतरीं दुसऱ्या एका प्रकरणांत फंडास ओढण्याचा प्रयत्न करण्यांत आला असतां, तात्यांनीं त्या प्रकरणापासून फंडास अलग राखिलें. हें दुसरें प्रकरण केवळ गैरसमजामुळें उत्पन्न झालेलं आहे आणि तें ज्या स्वरूपांत चाललें त्याबद्दल कोणासहि वाईटच वाटेल. वैश्य विद्यावर्धक समाजानें बेंडे यांच्या एक हजार रुपयांच्या देणगीबद्दल सुरू केलेला वाद म्हणजेच हें प्रकरण होय. हें प्रकरण कसें उपस्थित झालें हें सांगण्यापूर्वीं ज्या वैश्यविद्यावर्धक समाजानें तें सुरू केलें त्या समाजाचा थोडक्यांत पूर्वेतिहास पाहूं. ' वैश्य विद्यार्थी समाज ' या नांवानें ही संस्था ज्ञातिफंडाचे घरांत शके १८२६ मध्यें कै. नारायण धोंडशेट कामेरकर

बी. ए. व प्रो. विश्वनाथ गोपाळ शेट्ये बी. ए. यांच्या परिश्रमामुळें स्थापन झाली. या संस्थेच्या छापून प्रसिद्ध केलेल्या अगदीं पहिल्याच रिपोर्टांत ( चवथा वार्षिक रिपोर्ट ) मुख्य उद्देश ' स्वज्ञातींतील विद्यार्थ्यांनीं एके ठिकाणीं जमून एकमेकांची ओळख करून घेणें व एकमेकांना मदत करणें, व जेणें करून स्वज्ञातींत विद्येची अभिरुचि वाढून तिचा प्रसार होईल असा प्रयत्न करणें ' असा नमूद केलेला आहे. या संस्थेचा पाया उभारण्याला जी मदत झाली तींत ' समाजाच्या प्रारंभाला वैश्यफंडाच्या बंगल्याचा वरचा मजला फंडाचे सेक्रेटरी व हितचिंतक रा. रा. बाळकृष्ण नामदेवशेट कोलते यांनीं दयाळु अंतःकरणानें ज्ञातीकडून देवविला ' असें म्हणून तात्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आहे. केवळ शिक्षणाचा प्रसार करणारी आपल्या समाजांतील ही पहिलीच संस्था होय. तिच्या विषयीं कोणाचेंहि दुमत नव्हतें. सुरवातीला या विद्यार्थी समाजाचे ८।१० सभासद होते. परंतु पुढें संख्या वाढली. फंडाचे घरांतील जागा अपुरी पडूं लागली, तेव्हां ज्ञातिफंडानें मधील भिंती पाडून मोठा दिवाणखाना करून दिला. याप्रमाणें सर्वांच्या सहानुभूतीवर हा विद्यार्थीसमाज वाढूं लागली, आणि दोन वर्षांत पूर्वीचें स्वरूप बदलून त्यामध्यें बराच फेरफार करण्यांत आला. संस्थेला कायमचें स्वरूप यावें म्हणून तीन ट्रस्टी नेमण्यांत आले. त्यांत कै. नारायण विठशेट शेट्ये हे अध्यक्ष, रा. परशुराम नारायण वायकूळ हे चिटणीस व रा. गणपत विठोबाशेट मोरे हे खजिनदार असे निवडले आहेत. या प्रसिद्ध झालेल्या पहिल्या रिपोर्टांत संस्थेच्या लायब्ररीकरितां ज्या मदती प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांत मोठ्यांत मोठा आंकडा १०१ रु. चा असून तो श्री. अण्णासाहेब मोरे यांचाच आहे. त्याचप्रमाणें कै. अण्णासाहेब चिखले, तात्या यांचेहि आंकडे आहेत. सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, समाजांतील पुढाऱ्यांची या विद्यार्थीसमाजाचे कार्याविषयीं पूर्ण सहानुभूति असून त्या सहानुभूतीचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक या संस्थेच्या पहिल्या कित्येक रिपोर्टांतून केलेला

आढळतो. परंतु संस्थेच्या दैवदुर्विपाकानें या संस्थेचे उत्पादक ना. धों. कामेरकर हे कार्तिक शु. ४ शके १८३० रोजीं दिवंगत झाले. तथापि कामेरकरांच्या स्फूर्तीनें विद्यार्थीसमाजाचें काम तसेंच नेटानें चालू राहिलें. आणि शके १८३१ मध्यें संस्थेनें 'वैश्य विद्यावर्धकसमाज' असें नांव धारण केलें. अशा रीतीनें समाजाचे पुढाऱ्यांच्या सक्रिय सहानुभूतीनें आणि प्रो. विश्वनाथ गोपाळ शेटये बी. ए. श्री. दत्तात्रय गोविंद लुब्री, श्री. दत्तात्रय गणपत कामेरकर बी. ए., एलूएलू. बी., श्री. सदाशिव बापूजी कोकाटे, बी. एस्सी. वगैरे मंडळींच्या कळकळीनें व मेहनतीनें विद्यावर्धक समाजाचें कार्य समाधानकारक चाललें होतें. ज्ञातिफंडाचे घरात मार्गशीर्ष शु. १० शके १८३४ रोजीं रत्नागिरीचें सन्मान्य गृहस्थ श्री. लक्ष्मण मुकुंद शेटये यांचे अध्यक्षतेखालीं नववा वार्षिक समारंभ भरला आणि भरसमारंभांत विद्यावर्धकसमाजाचे एका प्रमुख चालकांकडून विकारवशतेच्या भरांत सभ्यपणाला न शोभणारे असे अश्लिल शब्द बाहेर पडले व तेव्हांपासून कांहीं मंडळींचीं मनें दुखवलीं गेलीं. हा जो प्रकार घडला त्याला कोणतें कारण झालें याचा विचार थोडक्यांत करूं. हा एक मागेंच मेलेला वाद असून केवळ घडलेली गोष्ट म्हणून तिचा उल्लेख येथें करावा लागत आहे.

वैश्य ज्ञातिफंडाचे चिटणीस पांडुरंग अनंतशेट बेर्डे हे मुंबईस आषाढ व. १० शके १८३२ रोजीं मरण पावले. मरणसमयीं त्यांनीं शिक्षणाप्रीत्यर्थ एक हजार रुपये खर्च करण्याची आपली इच्छा आपले बंधु कै. बाळकृष्ण अनंतशेट बेर्डे यांचेजवळ प्रदर्शित केली. बाळकृष्णशेटचा व कै. अण्णासाहेब चिखले यांचा फार घरोबा असल्यामुळें पांडुरंग शेटची ही इच्छा बाळकृष्णशेटनीं अण्णासाहेब चिखल्यांना निवेदन केली. शिक्षणाप्रीत्यर्थ एवढी मोठी रकम निघाल्याचे वैश्य विद्यावर्धक समाजास कळतांच विद्यावर्धक समाजाच्या पुढाऱ्यांनीं अण्णासाहेबांची गांठ घेऊन ही रकम विद्यावर्धक समाजाकडे यावी अशी अण्णांच्या मध्यस्थीनें खट-

पट चालविली. हें योग्यच होतें. शिक्षणाप्रीत्यर्थ वडील बंधूच्या इच्छे-प्रमाणें बाळकृष्णशेट रक्कम खर्च करणार हेंहि निश्चित होतें. फक्त ही रक्कम आपल्याच पेढीवर जमा ठेवून तिचें व्याज विद्यार्थ्यांकडे खर्च करण्याची बाळकृष्णशेटची इच्छा होती. अण्णासाहेब चिखल्यांचें सांगण्यावरून वैश्य विद्यावर्धक समाजाच्या ८ व्या वार्षिक रिपोर्टांत ‘ विद्यावर्धक समाजास विशेष प्रोत्साहन मिळणारी दुसरी गोष्ट ’ म्हणून या देणगीचा गौरवपूर्वक उल्लेख करून पुढें ‘ ती रक्कम समाजफंडाकडे जमा करीपर्यंत सदर रकमेचें उत्पन्न समाजाकडे दिलें जाईल व त्या उत्पन्नांतून कै. पांडुरंग अनंतशेट बेर्डे या नांवाची स्कालरशिप एका वैश्य विद्यार्थ्यास देण्यांत यावी. असें ठरविलें आहे.’ असा त्या देणगीबद्दल व तिच्या विनियोगाबद्दल विशेष खुलासा केलेला आहे. त्यानंतर पुढल्या नवव्या वर्षाच्या रिपोर्टांत ‘रा. रा. बाळकष्ण अनंतशेट बेर्डे यांनीं देऊं केलेली रक्कम रुपये १००० आमचे हातीं अद्यापि आलेली नाहीं....तरी राजश्री बेर्डे हे सदर रक्कम लवकर जमा करतील अशी आशा आहे. ’ असा त्या देणगीचा उल्लेख केलेला आहे.

फंड वसूल करण्याची ही पद्धत पाहून कोणालाहि आश्चर्यच वाटेल. सार्वजनिक फंडाकारितां फिरत असतांना पैसा जोडण्यापेक्षां माणसें जोडण्याकडेच जास्त लक्ष असावें लागतें. लोकांची सहानुभूति राखण्याचा प्रयत्न सार्वजनिक कार्यांत प्रथम करावा लागतो. सहानुभूतीच्या मागून पैशाचा ओघ आपोआप येत असतो. ‘ राखावीं बहुतांचीं अंतरें ’ भाग्य येतें तदनंतरें ’ हें श्रीसमर्थांनीं उपदेशिलेलें मिशनरी धोरण समाजकार्यांत पडणाऱ्या प्रत्येकानें ठेवणें जरूर आहे. असो. विद्यावर्धक समाजानें जाहीर रीत्या अशा प्रकारें बेर्ड्यांच्याकडे देणगीबद्दल मागणी केली यांत कार्यकर्त्यांचें धोरण थोडेंसें चुकलें असलें तरी तेंहि, विद्यावर्धकसमाजाचें पवित्र कार्य पाहून, विसरून जाण्याइतकें बेर्ड्यांचें अंतःकरण उदार होतें. शके १८३४ मध्यें विद्यावर्धक समाजाचा जो वार्षिक सभा-

रंभ झाला त्या समारंभांत, संस्थेचा हा नवाा रिपोर्ट वाचला गेला. कै. बाळकृष्णशेट बेर्डे, कै. तात्यासाहेब कोलते, कै. अण्णासाहेब चिखले, श्री. अण्णासाहेब मोरे, वगैरे मंडळी समारंभाला हजर होती. रिपोर्टवाचून झालें. 'वैश्यविद्यावर्धक समजाचे हातीं आपण एक हजार रुपये करतों' असें केव्हांहि म्हटलें नसतांना जाहीर रीत्या विद्यावर्धक समाज आपल्या-जवळ देणगीची मागणी करतो हें बाळकृष्णशेटनीं ऐकलें व हा काय प्रकार आहे म्हणून अण्णासाहेब चिखले यांना त्यांनीं तेथेंच विचारलें. 'या गोष्टीची चर्चा जाहीर समारंभांत इष्ट नाहीं. समारंभ आटोपल्या-नंतर त्याचा विचार करतां येईल व गैरसमज सहज दूर होतील.' असें अण्णा चिखले यांनीं सांगितलें तेव्हां बेर्डे स्वस्थ बसले. समारंभाचें कार्य पुढें चालूच होतें. इतक्यांत स्वयंसेवक मंडळाचे अध्वर्यूंनीं रिपोर्टांमधील बेर्डे यांच्या देणगीविषयींच्या उल्लेखाचा अर्थ काय? म्हणून सभेला प्रश्न विचारला. तेव्हां मात्र बेर्ड्यांच्या देणगीविषयींचा खुलासा भर समारंभांत अण्णासाहेब चिखले यांना करणें भाग पडलें. अण्णासाहेब चिखले यांनीं प्रांजलपणें प्रथम दिलगिरी प्रदर्शित करून बेर्डेंची इच्छा सभेला सांगितली. त्यानंतर मंडळींचीं मनें दुखविणारा असा वर उल्लेखलेला प्रकार घडला. बाळकृष्णशेट बेर्डे यांना व त्यांच्या इष्ट मित्रांना झालेल्या प्रकाराबद्दल अतीशय वाईट वाटलें.

तथापि हा वाद वैश्यविद्यावर्धक समाज आणि बाळकृष्णशेट बेर्डे व त्यांची इष्ट मित्र मंडळी यांच्या मधला होता. ज्ञातिफंडाचा त्याच्याशीं कांहीं एक संबंध नव्हता. पूर्वींप्रमाणेंच विद्यावर्धक समाजाच्या सभा फंडाच्या घरांत व नंतर फंडाचे महाजनवाडींत होत होत्या. तात्या हे पांडुरंगशेटचे व बाळकृष्णशेटचे परम स्नेही होते. पांडुरंगशेट व बाळ-कृष्णशेट यांची तात्यांना फंडाचे कामांत कल्पनातीत अशी मदत झाली होती व होत होती. बाळकृष्णशेटचा भर सभेंत अश्लिल शब्दांनीं झालेला अपमान तात्यांच्या अंतःकरणाला बाळकृष्णशेटप्रमाणेंच लाग-

त्याशिवाय कसा राहील ; त्यांचें मन अतिशय दुखवलें गेलें. परंतु 'व्यक्ति म्हणजे संस्था नव्हे' हें तत्व तात्या जाणत होते, म्हणून या वादाचा त्यांनीं फंडाशीं बिलकुल संबंध येऊं दिला नाहीं. वैश्य मासिकांतून या बाबतींत जो पुढें निरर्थक पत्रव्यवहार झाला त्यांत वैश्य ज्ञातिफंडाला गोंवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. व्यक्तिगत भांडणाचा संस्थेशीं संबंध आणून संस्थेच्या कार्यांत भलतेच वाद उपस्थित होऊं द्यावयाचे नाहींत या तात्यांच्या धोरणामुळें, या गैरसमजुतीनें उत्पन्न झालेल्या वादांतून ज्ञातिफंड अलग राहिला.

ज्या ज्ञातिफंडाच्या घरांत विद्यावर्धक समाजाचा जन्म झाला व वाढ झाली त्या ज्ञातिफंडाशीं 'येन केन प्रकारेण' विद्यावर्धक समाजाचा खटका उडावा ही विद्यावर्धक समाजाच्या कांहीं मंडळींची हौस दुसऱ्याच रीतीनें त्यांनीं पुरवून घेतली. हा प्रसंग ज्ञातिफंडाचें मुख्य ध्येय महाजनवाडी हें तडीस गेल्यानंतर घडलेला आहे. परंतु ज्ञातिफंडाचा विद्यावर्धकाशीं असलेला संबंध एकत्रच दाखविणें इष्ट असल्यामुळें तो प्रसंगहि याच ठिकाणीं सांगतों. चैत्र शु. ४ शके १८४० रोजीं, ज्ञातिफंडाच्या महाजनवाडींत चिपळूणचे सन्माननीय पुढारी श्री. गोविंद धोंडशेट कोलवणकर यांचे अध्यक्षतेखालीं वैश्यविद्यावर्धक समाजाचा १४ वा वार्षिक समारंभ झाला. या समारंभाकारितां महाजनवाडीच्या नियमाप्रमाणें जो छापी अर्ज भरून द्यावा लागतो, तो विद्यावर्धक समाजाचे चिटणीस यांच्या सहीनें झाला असून 'समाजाचे व फंडाचे आक्षेपार्ह व्यक्तींस समारंभात भाषण करूं देणार नाहीं' असें सदरी चिटणीसांनीं त्याच अर्जावर लिहून दिलें. विद्यावर्धक समाजाचे हे चिटणीस समाजाचे व फंडाचे व्यवस्थापक पंचहि होते. समारंभांत आक्षेपार्ह म्हणून मानलेल्या व्यक्तींपैकीं एक आपला निबंध वाचूं लागली. त्या वेळीं ज्ञातिफंडाच्या चिटणीसांनीं हें नियमाविरुद्ध होत आहे असें समारंभाच्या अध्यक्षांच्या नजरेस आणून दिलें. विद्यावर्धक समाजाच्या चिटणीसांनीं आपणांस

आक्षेपार्ह व्यक्ति माहित नाहींत, असें अज्ञानें दाखविल्यामुळें ज्ञातिफंडाच्या चिटणीसांनीं आक्षेपार्ह व्यक्तींची नांवें आपल्या सहीनें लिहून दिलीं. तेव्हां तें निबंधवाचन थांबविण्यात आलें आणि निषेध प्रदर्शित करून समारंभ अर्धा बंद करून सभा आटोपली. या प्रसंगीं वैश्यविद्यावर्धक समाज व ज्ञातिफंड यांचा उघड उघड संबंध आला. तथापि वैश्य विद्यावर्धक समाज या संस्थेचें कार्य अत्यंत पवित्र असल्यामुळें चालकांकडून गैर समजुतीनें वा जाणून बुजून जरी कांहीं चुका घडल्या असल्या, तरी ती समाजाची संस्था आहे म्हणून तिच्या कार्याविषयीं कोणाचीहि सहानुभूतिच राहील यांत शंका नाहीं. कारण वैश्य विद्यावर्धक समाज ही आपल्या समाजांतील, समाजांत शिक्षणप्रसार करणारी पहिली संस्था आहे. या संस्थेनें विद्यादानाचें आपलें पवित्र कार्य अत्यंत नेटानें आज बावीस वर्षें सतत चालविलें आहे. विद्यावर्धक समाजाचें हें कार्य कोणीहि कधीं विसरणार नाहीं. सार्वजनिक संस्थेकडे पाहतांना संस्थेच्या चालकांपेक्षां संस्थेच्या प्रत्यक्ष कार्याकडेच तात्यांची नेहमीं दृष्टि असे. म्हणूनच विद्यावर्धक समाजाच्या किंवा इतर संस्थांच्या कार्याविषयीं बोलतांना ते नेहमीं कार्याकडे दृष्टि ठेवूनच बोलत असत.

शके १८०९ मध्यें पैसाफंडाची स्थापना झाली व त्याला कोणकोणत्या प्रसंगांतून कसकसें जावें लागलें हें आपण पाहिलें. महाजनवाडी हें फंडाचें ध्येय होतें खरें, परंतु मध्यंतरीं समाजाच्या ज्या ज्या अडचणी आल्या त्याहि दूर करीतच फंडाला पुढें जावें लागलें. ( १ ) निराश्रित असा कोणी मयत झाल्यास त्याचे प्रेतसंस्कारासाठीं मदत करणें, ( २ ) ज्या कोणाचा स्वतः अगर पर्यायानें निर्वाह होत नाहीं असा कोणी निराश्रित असल्यास त्याची रहाण्याची व अन्नवस्त्राची व्यवस्था लावणें, ( ३ ) ज्यांचा कोणी पालनकर्ता नाहीं अशा निराश्रित मुलांच्या अन्नवस्त्राची व शिक्षणाची सोय लावणें, ( ४ ) प्राथमिक शिक्षणाकरितां फी व पाटीपुस्तकांकरितां मदत करणें, अशीं समाजोपयोगीं कामें आपलें

मुख्य ध्येय महाजनवाडी हें पूर्ण होण्यापूर्वीच फंडानें आपले शिरावर घेतलीं होतीं. सभोंवतीं चाललेल्या टीकांना उत्तरें प्रत्युत्तरें देत बसून कालक्षेप व शक्तिविक्षेप करीत तात्या बसले असते, तर फंडाला हीं कामें करतांच आलीं नसतीं. टीकाकार खुशाल टीका करीत आहेत आणि इकडे तात्या आदि करून फंडाचे कार्यकर्ते आपल्यापुढील कार्य नेटानें करीत आहेत. याचमुळें टीकेच्या वावटळींतहि फंडाच्या कार्याची एकसारखी वाढ होत गेली. फंडाची जमलेली शिल्लक कोठें तरी स्थावर मिळकतींत टाकावी असें फंडाचें धोरण असल्यामुळें मध्यंतरीं शके १८३२ मध्यें खोताचे वाडींतील घर फंडानें खरेदी केलें. या घराबरोबरच एक दत्तमंदीरहि फंडाच्या ताब्यांत आलें. फंडानें वरील मुख्य चार कामें चालविलीं होतीं आणि तीं कामें कोणत्याहि परिस्थितींत बंद पडूं नयेत म्हणून ठाकुरद्वार येथील घर, खोताचे वाडींतील घर आणि धर्मशाळा अशा तीन स्थावर मिळकती करून ठेविल्या होत्या. फंडाचे जमलेले पैसे केवळ अडकवून टाकण्यासाठीं घेतलेलीं दोन्हीं घरें महाजनवाडीला योग्य अशीं नव्हती. कांदेवाडीसारख्या मध्यवर्ती ठिकाणीं तसें घर सांपडतांच पहिलीं दोन्हीं घरें शके १८३६ मध्यें विकण्यांत येऊन हल्लींच्या महाजनवाडीचें घर लागलेंच खरेदी घेण्यांत आलें. मात्र खोताचे वाडींतील घर विकतांना ८० वार जागेसह दत्तमंदीर फंडानें आपलेकडेच ठेविलें. हेंच खोताच्या वाडींतील घर निराळ्या स्वरूपांत परत फंडाकडे कसें आलें तो इतिहास पुढें येईलच. जें पाऊल टाकावयाचें तें पक्कें. त्यांत माघार घ्यावयाची नाहीं असा फंडाचा बाणा होता. केवळ हुरळून जाऊन नसती जबाबदारी फंडानें कधींहि अंगावर घेतली नाहीं. अशा प्रकारें काम चाललें असतांना अशी एक गोष्ट घडून आली कीं तीमुळें फंडाचें मुख्य ध्येय जें महाजनवाडी तें पूर्ण होण्याचा योग आला.

शके १८३७ च्या चातुर्मास्याचे शेवटीं तात्या तीर्थयात्रेला म्हणून कोणाला न पुसतां निघून गेले. त्यांच्या दुकानावरील मंडळींना किंवा

फंडांतील त्यांच्या सहकाऱ्यांनाहि तात्या कोणीकडे गेले तें समजलें नाहीं. तात्यांना पोथी पुराणाचा तरुणपणांतच त्यांच्या शेटजींच्या सहवासामुळें नाद लागलेला होता. पुढें पुढें गीता उपनिषदें या ग्रंथांशीं त्यांचा परिचय होऊन त्यांतील तत्वांचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. ऐहिक गोष्टींची असारता त्यांना पटलेली होती. ते धंदा-रोजगार करीत होते खरे, पण त्यांचें खरें लक्ष त्यामध्यें नव्हतें. धंदारोजगाराकडे पहाण्याची त्यांची दृष्टि सामान्य लोकांहून अगदीं भिन्न होती. उद्दीमधंदा आपल्या उन्नतीला सहाय्यक म्हणून करावयाचा. आपल्या उन्नतीला अडथळा आणील इतकें त्याला महत्व द्यावयाचें नाहीं. अशी त्यांची आपल्या व्यापारधंद्याकडे पहाण्याची विशिष्ट दृष्टि होती. आणि याच दृष्टीनें ते आपला धंदारोजगार सांभाळीत होते. धंदारोजगार हें साध्य नव्हें तर तें साधन होय असें ते मानीत असल्यामुळें धंदारोजगार सोडून ते तीर्थयात्रेला गेले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आश्चर्य याचेंच कित्येकांना वाटेल कीं, तात्यांनीं पैसाफंड या संस्थेस जन्म दिला. अहर्निश पैसाफंडाची काळजी वाहिली. आणि पैसाफंडाचें ध्येय जें महाजनवाडी तें तर तडीस गेलेलें नव्हतें. मग तें तडीस गेलें नसतांना व टीकाकार हात धुऊन फंडाच्या मागें लागले असतांना तात्यांना तीर्थयात्रा सुचली कशी ? परंतु तात्यांच्या मनाची वाढ कसकसी होत गेली व या वेळीं ते मनानें किती उच्च भूमिकेवर उभे राहिले होते हें जाणणारांना यांत बिलकूल आश्चर्य वाटणार नाहीं. मनुष्यानें कितीहि उच्च असें ऐहिक ध्येय ठरविलें, आणि तत्प्रीत्यर्थ अगदीं रात्रंदिवस सर्वस्वीं त्यानें स्वतःला वाहून घेतलें, तरी मनुष्याचें तें परम साध्य होऊं शकत नाहीं. अशा दृष्टीनें आयुष्याकडे पहाणारांपैकीं तात्या होते हें त्यांच्या वर्तनाचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करणारांना सहज दिसलें असेल. समाजाचें कार्याशीं मनानें पूर्ण एकरूप होऊन तात्यांनीं तें एकेचाळीस वर्षें चालविलें परंतु त्यांच्या अंतःकरणाचें अंतःकरण मात्र आयुष्याच्या

परमसाध्याकडे–पारमार्थिक उन्नतीकडे–लागलेलें होतें. ही तात्यांची उच्च मनोभूमिका नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. साडेतीन तपें सार्वजनिक कार्यानें नेट लावून घेऊन त्यानीं समाजाचें कार्य केलें पण त्यांचें खरें मन पारमार्थिक मार्गाकडेच नेहमीं वळलेलें असें. धंदारोजगार हें जसें साधन तसें सार्वजनिक कार्य हेंहि एक अत्यंत उच्च प्रतीचें साधन अशीच त्यांची दृष्टि होती. आणि त्या दृष्टीनें समाजकार्याकडे ते पहात असल्यामुळें परमार्थ साधनांतील एक उत्कृष्ट साधन जी तीर्थयात्रा तिजकडे त्यांच मन लागलें यांत आश्चर्य कसलें ? पन्नासीच्या पुढें साधारणतः तात्यांचें लक्ष ऐहिक गोष्टींतून बरेंच उडालेलें दिसतें. ह्मणूनच 'आता आमचें कार्य संपलें आम्हीं रामाच्या हुकुमाची वाट पहात आहों.' असें ते नेहमीं ह्मणत असत. मनुष्याच्या आयुष्यक्रमणाच स्वरूप

**शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।**
**वार्द्धके मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥**

याप्रमाणें कविकुलगुरु कालिदासानें रघुवंशांत वर्णिलें आहे. पहिल्या दोन आश्रमांतून बाहेर पडल्यावर तात्या मुनिवृत्तीनें रहात होते. धंदा-रोजगार चालविण्यास ज्याप्रमाणें त्यांनीं आपल्या नातागोत्याची कांहीं मंडळी जवळ केली होती, त्याचप्रमाणें सार्वजनिक कार्यांत कै. नारायण विठशेट शेट्ये, कै. अण्णासाहेब चिखले, कै. बाळकृष्णशेट बेंडें, रा. तुकाराम पुंडलीकशेट शेट्ये, रा. सीताराम सदाशिवशेट कापडी वगैरे फंडाविषयीं अतीशय कळकळ बाळगणारी व अनुभवी मंडळी त्यांना मिळाली होती व रा. अण्णासाहेब मोरे यांसारखी नवीन जोमाची मंडळी मिळत होती. फंडाचें कार्य आतां पडत नाहीं अशी त्यांची खात्री होती. अशा स्थितींत त्यांचें मन पारमार्थिक मार्गाकडे वळलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. कोणालाहि न कळवितां ते गेले, त्याचें कारण कदाचित् ही मंडळी आपणास अडथळा करतील असें त्यांना वाटलें असावें. यदाकदाचित् त्यांनीं अडथळा केला नाहीं तरी आपला

ठावठिकाणा त्यांना माहीत झाल्यास पत्रव्यवहार करून आपलें मन तिकडे मागें ओढतील, या भीतीमुळेंच कोणालाहि न कळवतां एके दिवशीं ते तीर्थयात्रेला निघून गेले. जाण्यापूर्वीं आपलें ' मृत्युपत्र ' त्यांनीं करून ठेविलें होतें असें म्हणतात.

तात्या प्रथम काशीप्रयाग या बाजूला गेले. तिकडून ते चारपांच महिन्यांनीं मुंबईस परत आले, व लगेच दुसऱ्या महिन्यांत रामेश्वराकडे गेले. द्वारका, बद्रिकेदार, जगन्नाथ व रामेश्वर या चार धामांची यात्रा करून तात्या शके १८३८ च्या चातुर्मास्यांत परत आले. तीर्थयात्रेवरून आणलेलें तीर्थ ' गंगापूजन ' करून आपल्या इष्टमित्रांना देण्याची वहिवाट असते. तसें करण्याची तात्यांचीहि इच्छा होती. एके दिवशीं कै. बाळकृष्णशेट बेर्डे यांचे पानाचे वखारींत कै. अण्णासाहेब चिखले, कै. बाळकृष्णशेट बेर्डे, श्री. अण्णासाहेब मोरे वगैरे मंडळी बसली असतां ' आतां यात्रेवरून मी परत आलों आहे. गंगापूजन करून सर्व ज्ञातगंगेला ती गंगा वाटावी अशी मनीषा आहे.सर्व समाजबंधूंचे हात एकवेळ भिजावेत अशी शेवटची इच्छा आहे.कोठें तरी जागा पहा व एवढा समारंभ घडवून आणा.' अशी तात्यांनीं इच्छा प्रदर्शित केली.त्यावर 'दुसरी जागा कशाला? आपल्या समाजाची महाजनवाडी होऊं द्या व तेथेंच हा गंगापूजनाचा व तीर्थप्रसादाचा समारंभ होऊं द्या.' असें श्री. अण्णासाहेब मोरे यांनीं सांगितलें.अण्णांचे विचार सर्वांना पसंत पडले. लोकांच्याहि टीका होत्या. 'लोकांचे पैसे खाल्ले' असें फंडाचे अहवाल न वाचतां म्हणणाऱ्यांना, महाजनवाडी उघडून त्याचे पैसे कोणत्या स्वरूपांत आहेत हें दाखविणें जरूरच होतें. टीकाकारांच्या केवळ गैरसमज पसरविणाऱ्या टीकांच्या भाडिमारामुळें फंडांतील कित्येक कार्यकर्त्यांनाहि असें होऊन गेलें होतें कीं, एकदांची महाजनवाडी उघडावी, जें कांहीं कर्ज असेल तें आपआपसांत पट्टी काढून फेडून टाकावें. ही कटकट नको आणि त्या टीकाहि नकोत. तात्या तीर्थयात्रेनिमित्त जवळ जवळ वर्षभर बाहेर असल्यामुळें त्या टीकांचा

असा विपरीत परिणाम होत होता. अशा वेळीं महाजनवाडी उघडून सर्व टीकांना समर्पक कृतीनें उत्तर देण्याची फंडाचे जीविताचे दृष्टीनें फारच आवश्यकता होती. अशा स्थितींत अण्णा मोरे यांची सूचना एकजात सर्वांना पसंत पडली व महाजनवाडीला योग्य अशी जागा फंडाचे कांदेवाडींतील घरांत तयार करण्याच्या कामास सुरवात करण्यांत आली.

श्री. बाळकृष्ण बाबाजीशटे कोकाटे यांनीं महाजनवाडीची जागा तयार करण्याचें काम स्वयंस्फूर्तीनें अंगावर घेतलें व एकदोन महिन्यांचे आंत महाजनवाडी तयार झाली. नंतर महाजनवाडी उघडण्याचा दिवस व अध्यक्ष हे ठरविण्याकरितां बाळकृष्णशेट बेर्डे यांच्या वखारींत सभा भरली. दिवस सर्वानुमतें मुक्रर झाला. अध्यक्ष कोण हें सर्व समाजाचे दृष्टीनें मुक्रर झाल्यासारखेच होते. फंडाची मूळ कल्पना ज्यांनीं काढली व अडीच तपें ज्यांनीं तो फंड अत्यंत चिकाटीनें चालविला त्या तात्यापेक्षां दुसरा कोणता योग्य अध्यक्ष समाजाला महाजनवाडी उघडण्यास सांपडणार ? रीतसर त्यांचें नांव सुचविण्यांत आलें. परंतु तात्या तयार होईनात. मंडळींनीं जंग जंग पछाडले, तरी तात्या कसलें कबूल करतात. शेवटीं अण्णा मोरे यांनीं 'मग आम्हांला महाजनवाडी उघडावयाचीच नाहीं.' असें आपलें निर्वाणीचें शस्त्र काढलें. तेव्हां तात्या गुपचुप कबूल झाले. सर्वांना आनंद झाला. आमंत्रण पत्रिका छापून त्या समाजभर वांटण्यांत आल्या. एकच गडबड उडाली. समाजभर उल्हास उड्या मारूं लागला. समारंभाचा पुण्य दिवस उजाडला. ठरीव वेळेच्या पूर्वींपासूनच मंडळी जमूं लागली. कोटापासून दादरपर्यंत पसरलेले सर्व समाजबंधूंनीं सभागृह चिकार भरून गेलें. बाहेर उभे रहाण्यासहि जागा राहिली नाहीं. प्रथम श्रीसत्यनारायणपूजा साजरी झाली. रीतसर अध्यक्षांची निवड करण्यांत आली. सर्वांना साष्टांग नमस्कार घालून अध्यक्ष स्थानापन्न झाले. आणि शेवटीं अध्यक्षांनीं आपल्या गंभीर आवाजांत महाजनवाडी उघडल्याचें जाहीर केलें ! त्या वेळीं जो टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला, तो फंडस्थापनेपासून फंडाचे कार्य करणारे

तात्यांचे स्वर्गवासी सहकारी यांना स्वर्गांत ऐकूं गेला असेल आणि आपलें कार्य आज तडीस गेलें म्हणून त्यांनीं त्यावेळीं आनंदाश्रु ढाळले असतील. महाजनवाडी उघडल्यानंतर तात्यांनीं प्रथमपासून संगतवार अशी फंडाच्या कामाची माहिती सांगितली. सर्व श्रोतृजन तटस्थ होऊन तो इतिहास ऐकत होते. ' फंड ' ' फंड ' एवढेंच लोकांना ठाऊक होतें. सुरवातीस तात्यांबरोबर काम करणारांपैकीं पांच सात मंडळी तेथें हजर होती. बाकीच्या सर्व मंडळींना ती हकीकत अगदीं नवीन वाटली. प्रस्तुत लेखकहि त्या वेळीं तो इतिहास ऐकत श्रोतृमंडळींत बसलेला होता. तेव्हां त्याला कल्पनाहि नव्हती कीं, हा स्फुर्तिदायक इतिहास आपणास पुढें एखादेवेळीं लिहावा लागेल. असो. असा हा आनंद सोहळा पौष शु. १२ शके १८३८ शनिवार रोजीं झाला.

समारंभाचा कार्यक्रम आटोपल्यावर तात्यांनीं सर्व समाजबंधूनां साष्टांग नमस्कार घालून दुसरे दिवशीं गंगापूजनास व तीर्थप्रसाद घेण्यास येण्याविषयीं आग्रहाचें आमंत्रण केलें. ' ही माझी शेवटची इच्छा सर्वांनीं पूर्ण करावी ' असें सद्गदित अंतःकरणानें त्यांनीं सांगितलें. गंगापूजनाचा समारंभ दुसरे दिवशीं मोठ्या थाटानें पार पडला. तात्यांच्या इच्छेप्रमाणें मुंबईतील आपला बहुतेक समाज तीर्थप्रसाद ग्रहणास दुपारीं ११ पासून रात्रौ ११ पर्यंत येत होता. तात्यांची 'शेवटची इच्छा' भेदभाव न ठेवतां सर्वांनीं पूर्ण केली. सर्व समाजांतील आळस व पाप धुऊन काढण्याकरितांच तात्यांनीं जणूं काय चारी धामांची गंगा आणिली होती. तिचा सर्वांनीं स्वीकार केला, आणि पुढील चळवळ करण्याकरितां सर्व सज्ज झाले.

कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची



पहिली महाजनवाडी ( ठि. कांदेवाडी )

कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची



दुसरी महाजनवाडी ( ठि. एल्फिन्स्टन रोड. )

कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाचें



श्रीदत्तमंदीर ( ठि. खोताचीवाडी. )

## प्रकरण पांचवें.

# महाजनवाडी.

**सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ॥**
**परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥**

**—श्रीसमर्थ.**

महाजनवाडी उघडली. शके १८०९ मध्यें ज्ञातिफंड सुरू झाला आणि शके १८३८ मध्यें त्याचें मुख्य ध्येय तडीस गेलें. ‘ महाजनवाडी उघडण्यास २९ वर्षें लागलीं ! एक महाजनवाडी आणि तिला २९ वर्षें ? ’ असें म्हणणाऱ्यांना महाजनवाडी म्हणजे दगडमातीचुना यांची एक इमारत दिसत असते. बाहेरून दगड, माती आणि चुना यांनीं बनलेल्या या महाजनवाडीच्या अंतरंगांत प्रवेश करून तींत काय भरलेलें आहे, ती कशाची बनविलेली आहे, हें जाणण्याची ज्यांच्यांत ताकद नाहीं त्यांना एक महाजनवाडी करण्यास २९ वर्षांचा दीर्घकाल लागला असें वाटणारच. त्याला कोण काय करणार ?

परंतु सर्व साधारण समाजास महाजनवाडी म्हणजे काय तें कळलें. महाजनवाडी म्हणजे सामर्थ्य. महाजनवाडी म्हणजे आत्मविश्वास. ज्यांनीं एक एक पैसा दिला त्यांना त्या पैशांतून बनलेली महाजनवाडी पाहून आपल्या पैशांतील सामर्थ्य दिसून आलें आणि त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. कोणतीहि चळवळ करण्यास स्वसामर्थ्याची जाणीव व आत्मविश्वास अवश्य असावा लागतो. सामर्थ्याशिवाय आत्मविश्वास येत नाहीं आणि आत्मविश्वासाशिवाय कोणतीहि चळवळ यशस्वितेस पोंहचत नाहीं. या दोन गोष्टींची जाणीव समाजामध्यें उत्पन्न करण्याचें

महत्वाचें कार्य ज्ञातिफंडानें, २९ वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानें महाजनवाडी उघडून केलें. महाजनवाडी उघडण्याच्या पूर्वींची आपल्या समाजाची स्थिति पहा आणि महाजनवाडी उघडल्यानंतरची पहा. दोन स्थितींमध्यें जो फरक दिसेल तो फरक घडवून आणण्याचें कार्य महाजनवाडीनेंच केलें. हा जो फरक महाजनवाडीनें घडवून आणला तो सामर्थ्य आणि आणि आत्मविश्वास हे दोन दैवी गुण समाजांत उत्पन्न करूनच होय. महाजनवाडी उघडल्याबरोबर समाजाचे डोळेच उघडले, व समाजाला आपल्या ठिकाणचें सामर्थ्य दिसून येऊन आत्मविश्वासाचे बळावर त्यानें निरनिराळ्या चळवळी सुरू केल्या. महाजनवाडी उघडतांच वृद्ध, तरुण, बाल या सर्वांनाच आपलें सामर्थ्य दिसूं लागलें आणि सर्वांनीं आपआपल्या चळवळी हातीं घेतल्या.महाजनवाडी उघडल्यावर समाजामध्यें नवीन वारें वाहूं लागलें. नवजीवन संचारूं लागलें. चैतन्य नाचूं लागलें. हें त्यानंतरच्या चळवळींचें सूक्ष्म अवलोकन करणारांस सहज दिसून येईल. मनुष्य जागा झाला म्हणजे त्याचे सर्व अवयवांमध्यें एकदमच चेतना सुरू होते. डोकें तेवढें जागें आणि हातपाय स्वस्थ घोरत अशी स्थिति नसते. त्याचप्रमाणें राष्ट्र काय किंवा समाज काय जागा झाला म्हणजे त्याच्या सर्व अवयवांत—सर्व प्रकारच्या लोकांत—चैतन्य एकदम सुरू होतें. आणि हुबेहुब तशीच स्थिति महाजनवाडी उघडल्यानंतर आपल्या समाजास प्राप्त झाली.

महाजनवाडी उघडल्यावर आपल्या समाजांत जो जिवंतपणा दिसूं लागला तो समाजाबाहेरच्याहि मंडळींच्या दृष्टीस पडून ते थक्क झाले. आणि कित्येकांनीं तर ज्या महाजनवाडीनें हें नवीन वारें आपल्या समाजांत उत्पन्न केलें ती महाजनवाडी पहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. म्हणून मुंबईतील आपल्या समाजाबाहेरील कांहीं हितचिंतकांच्या दृष्टीस महाजनवाडी पडावी या हेतूनें जेष्ठ व. १३ शके १८३९ रोजीं पानसुपारी समारंभ करण्यांत आला. श्री. सी. के. बोले, रा. ब. विठलराव वंडेकर,

श्री.दा.सा.यंदे, निर्णयसागर प्रेसचे मालक, नाथमाधव वगैरे मंडळी तत्प्रसंगीं आली होतीं. समाजांतील जागृति पाहून त्यांनीं संतोष व्यक्त केला.

महाजनवाडी उघडल्यानंतर प्रत्येकाला वाटूं लागलें कीं, आपण समाजाकरितां कांहीं तरी कार्य करावें. समाजकार्याला कांहीं तरी हातभार लावावा, अशी प्रत्येकांत इच्छा उत्पन्न झाली. महाजनवाडीनें सर्वांमध्येंच कार्य करण्याची इच्छा उत्पन्न केली खरी परंतु तरुणांत ती उत्पन्न केली हें विशेष होय. तरुणपिढींत समाजसेवेची इच्छा उत्पन्न होणें हें कार्य अखिल समाजाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें आहे. मनुष्यांत तरुणपणीं एखादें कार्य करण्याची इच्छा उत्पन्न झाली, तरच तो तें कार्य नेटानें व जोमानें तडीस नेतो. धर्मकारण करणारे शंकराचार्य, ज्ञानेश्वर, रामदास यांना तरुणपणींच ती इच्छा उत्पन्न झाली. राजकारण करणारे शिवाजी, लोकमान्य हे तरुण होते तेव्हांच कार्याला लागले. जगांतील कोणतीहि यशस्वी चळवळ पहा तरुणांनींच तिची तड पोंचविलेली दिसेल. फार कशाला ? तात्यांनीं जें यशस्वी समाजकारण केलें त्याची इच्छा त्यांना केव्हां झाली ? भर तारुण्यांतच नां ? सारांश तरुणांमध्यें समाजसेवेची आवड उत्पन्न होणें हें अत्यंत महत्वाचें कार्य महाजनवाडीनें केलें. अर्थात् फंडस्थापनेपासून महाजनवाडी उघडण्याचे काळास, ‘ भूमिका तयार करण्याचा काळ ’ असें यथार्थ नांव देतां येईल. कारण महाजनवाडी उघडीपर्यंत फंडानें एकएक पैसा एकत्र करून लोकांची अंतःकरणें एकत्र केलीं होतीं. समाजाचीं अंतःकरणें एकत्र करून सार्वजनिक कार्याची जमीन तयार करून ठेविली होती. सार्वजनिक कार्याचा पाया घातला गेला होता. पुढें महाजनवाडी उघडून आपल्या समाजांत एका नवीन काळास सुरवात झाली. या नवीन काळास ‘चळवळीचा काळ’ असें सार्थ नांव अनेक दृष्टींनीं देतां येईल. तें नांव सार्थ कसें तें या प्रकरणांत आपण पाहूं. या काळांत ज्या चळवळी झाल्या त्या सर्वांत तात्या जरी प्रत्यक्ष पुढाकारी नव्हते तरी खर

‘ स्फूर्तीचा झरा ’ तेच होते हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यांनीं २९ वर्षे मेहनत घेऊन ज्या जमीनीची मशागत केली त्या जमीनींतून पीक काढण्याकरितां निरनिराळ्या मंडळींचे निरनिराळे चाललेले यत्न पाहून त्यांना समाधान वाटत होतें, व ते त्यांना प्रोत्साहनहि देत होते.

महाजनवाडी उघडल्यानंतर महिना दीडमहिन्याचें अंत म्हणजे माघ व. १३ शके १८३८ रोजीं महाजनवाडींत, कै. विठोबा बाळशेट ऊर्फ अण्णासाहेब चिखले यांचे हस्तें फंडाचें मोफत वाचनालय उघडण्यांत आलें. महाजनवाडी उघडून जर समाजाचे डोळे उघडले तर त्या उघड्या-डोळ्यांनीं सभोंवतीं काय चाललें आहे तें पाहणें जरूर होतें. ज्या जगांत आपण आहोंत त्या जगांत काय घडामोडी चालल्या आहेत, याचें ज्ञान प्रत्येकास असणें अवश्य आहे. कोणत्या उपायांचा अवलंब करून इतर लोक पुढें येत आहेत ? आपण प्राप्तस्थिति बदलण्यास कोणते उपाय योजिले पाहिजेत हें सभोंवतीं पाहिल्याशिवाय कसें कळणार ? विहिरीं-तील बेडकाला विहीर एवढेंच जग वाटत असतें. तो जर विहिरीच्या बाहेर आला तरच त्याला विस्तृत जग दिसूं लागणार. सारांश दृष्टि विस्तृत व्हावी म्हणून महाजनवाडी उघडल्यावर प्रथम ‘ वाचनालय ’ उघडणें क्रमप्राप्तच होतें. या प्रसंगीं तात्या प्रत्यक्ष हजर होतेच. व समाजाची होत असलेली विस्तृत दृष्टि ते पहात होते.

अशा रीतीनें डोळे उघडून भोंवतालची परिस्थिति पहात असतांना समाजाच्या उन्नतीचा एक उत्तम मार्ग समाजाला दिसला. तो मार्ग म्हणजे धार्मिक चळवळ होय. मागें शके १८३६ मध्यें शंकराचा-र्यांची पाद्यपूजा झाली, तेव्हां या धार्मिक चळवळीचा उगम झाला होता. परंतु त्यावेळीं मुख्यतः यज्ञोपवीतामध्येंच ती चळवळ गुरफटून गेली होती, व म्हणूनच जास्त गुंतागुंतीची झाली. शिवाय त्यावेळीं त्या चळवळीचा पुरस्कार जबाबदार अशा संस्थेकडून झालेला

नव्हता. केवळ व्यक्तिशः ती चालविण्यांत आली होती. परंतु आतां मात्र व्यापक पायावर ही चळवळ सार्वजनिक रीत्या चालविल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून शके १८४० च्या विजयादशमीस श्री. बाळकृष्ण केशवशेट शेट्ये यांचे अध्यक्षतेखालीं वैश्यधर्मोन्नतिफंड, कों. वैश्यज्ञातिफंडाची शाखा म्हणून स्थापन करण्यांत आला. धर्मोन्नतिफंडाचे उद्देशहि त्याचवेळीं छापून प्रसिद्ध करण्यांत आले. त्या उद्देशपत्रिकेंत प्रथम 'कोणत्याहि राष्ट्राला, समाजाला व व्यक्तीला उन्नतावस्था प्राप्त करून घेण्यास धर्माचरणासारखें दुसरें साधन नाहीं.' असें सांगून हातून धर्माचरण घडण्यास धर्माची माहिती पाहिजे, हें तत्व गृहीत धरलें आहे. व्याख्यानद्वारा व ग्रंथप्रकाशनद्वारा धर्मासंबंधीं माहिती समाजास करून देणें, सार्वजनिक धार्मिकोत्सव करणें व उपनयन संस्कारास मदत करणें असें ध्येय पुढें ठेऊन हा फंड स्थापन करण्यांत आला. महाजनवाडींत पूजासमारंभ, संमेलनें भरत, त्यांतून वैश्यधर्माविषयीं व्याख्यानें देऊन धर्मासंबंधीं माहिती करून देण्यास सुरवात करण्यांत आली. त्याचप्रमाणें वैश्यधर्मोन्नतिमाला सुरूं करून वर्षास तीन पुष्पें याप्रमाणें पुस्तकें प्रसिद्ध करून धर्मभावना उत्पन्न करण्याचा या धर्मोन्नतिमालेच्या द्वारें प्रयत्न करण्यांत आला. वैश्यधर्मोन्नतिमालेचें पहिलें पुष्प शके १८४१ च्या बलीप्रतिपदेस निघून आजपर्यंत वर्षास तीन अशीं एकंदर सात वर्षांत एकवीस पुष्पें समाजांत अगदीं मोफत वाटण्यांत आलीं. वैश्यधर्मोन्नतिमालेनें टीकात्मक पत्रव्यवहाराला बिलकूल थारा दिला नसून समाजाच्या उन्नतीकरितां होणाऱ्या सर्व प्रकारच्या चळवळींना पोषक असेच लेख प्रसिद्ध करण्याचें धोरण आंखलेलें असल्यामुळें माला थोड्याच दिवसांत आपल्या समाजांत सर्वमान्य अशी झाली. इतकेंच नव्हे तर मराठींतील नियतकालिकांत तिच्या अंतर्बाह्य सौंदर्यामुळें तिला विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. वैश्यधर्मोन्नतिफंड स्थायिक असा पांच हजा-

रापर्यंत जमला असून बलीप्रतिपदेचा पाडवा फंडहि दरवर्षास जमविण्यांत येतो. धर्मोन्नतिफंडानें सुरू केलेली चळवळ तात्यांना इतकी प्रिय होती कीं, या चळवळीला चिरस्थायित्व यावें म्हणून त्यांनींच सर्वांच्या आधीं आपला एक हजार पंचवीस रुपयांचा आंकडा घातला. या बाबतींत एके काळीं तात्या कांहीं लोकांना ‘ गुळमुळीत ’ दिसत होते. परंतु त्याच तात्यांनीं हें कार्य आज इतकें उचलून धरल्याचें पाहून कित्येकांना आश्चर्य वाटलें. योग्य वेळ येईल तेव्हां करून दाखवावें उगाच वायफळ बडबड कशाला ? या मताचे तात्या होते.

तरुणांमध्यें समाजकार्याची प्रेरणा या वेळीं झाली होती त्याचें ढळढळीत उदाहरण म्हणजे ‘ वैश्य विद्यार्थी संघ ’ होय. विद्यार्थ्यांत चैतन्य उत्पन्न करण्याचें संघानें जें कार्य केलें, तशाच प्रकारचें कांहींसें कार्य आपल्या समाजांत प्रथम ‘ वैश्य ज्ञानवर्धक सभा ’ या नांवाच्या संस्थेनें थोडें फार केलेलें होतें. ‘ आपल्या अंगीं वक्तृत्व शक्ति यावी, ज्ञान वाढावें व आपणांमध्यें ऐक्याची वृद्धि व्हावी इत्याद्यनेक उद्देशांनीं ही सभा ता. ४ माहे अक्टोबर सन १८८९ रोजीं नवेवाडींत फ्यामेली प्रींटींग प्रेसच्या समोरिल राजाराम रामकृष्ण भागवत यांच्या शाळेंत स्थापन झाली. ’ असा या संस्थेच्या पहिल्या वार्षिक समारंभाच्या आमंत्रणपत्रिकेंत, संस्थेचे अध्यक्ष श्री. शिवराम गणपत पाथरे यांनीं सभेचे उद्देश व स्थापना या विषयीं उल्लेख केलेला आहे. ही आमंत्रणपत्रिकाहि ‘ नारायण भिकशेट खातु प्रेस ’ मध्यें छापलेली आहे. यावरून ज्ञातिफंडाचे स्थापनेनंतर दोन वर्षांनीं म्हणजे शके १८११ मध्यें आपल्या समाजांतील विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांच्यांत चळवळ करण्याचा हा अगदीं पहिलाच प्रयत्न असावा. सदरी सभेचे अध्यक्ष श्री. पाथरे हे पुढें वैश्य विद्यार्थी संघाच्या कामांतहि अतीशय कळकळीनें भाग घेत असत. त्यानंतरचा प्रयत्न मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें वैश्य विद्यावर्धक समाजानें केला. या

संस्थेचा ' मुख्य उद्देश म्हटला म्हणजे स्वज्ञातींतील विद्यार्थ्यांनीं एके ठिकाणीं जमून एकमेकांची ओळख करून घेणें...... ' असाच होता. पुढें कार्यकर्त्यांच्या चिकाटीनें विद्यार्थी समाजाचें परिवर्तन ' विद्यावर्धक समाजांत ' झालें. शिष्यवृत्या, फी वगैरे देऊन समाजांत विद्यावर्धनाचें कार्य करीत असतांना विद्यार्थ्यांना एकत्र जमविण्याचेंहि कार्य विद्या-वर्धक समाजानें सुरू ठेविलें होतेंच. पुढें असाच एक प्रयत्न शके १८३५ मध्यें प्रो. विश्वनाथ गोपाळ शेट्ये यांच्या प्रोत्साहनानें त्यांच्याच बिऱ्हाडीं ( ग्रँटरोड ) स्थापन झालेल्या ' वैश्य ज्ञानैक्यसंघ ' या संस्थेनें केला होता. ' शाळेंतून अगर पाठशाळेंतून नांव निघाल्यावर या संस्थेचा सभासद म्हणून संस्थेच्या पटावर नांव ठेवतां येत नाहीं. अर्थात् निवळ विद्यार्थ्यांनाच या संस्थेंत घेतां येतें. उत्तम लेखक, उत्तम वक्ते होण्याची पूर्व तयारी करणें, उपयुक्त वाङ्मयाचें अध्ययन करणें, स्वतः शिकणें व दुसऱ्यास यथाशक्ति शिकविणें व एकीचें तत्व वाचेनें प्रतिपादन करण्यास व कृतीनें अंमलांत आणावयास शिकणें अशी या संस्थेच्या द्वारा होणाऱ्या कार्याची दिशा आहे. ' असें या संस्थेचें धोरण त्यावेळीं वैश्यमासिकांतून प्रसिद्ध करण्यांत आलें. तथापि या ज्ञानैक्य संघाचें जीवित अल्प ठरलें व त्या संघाच्या सभा लवकरच बंद झाल्या.

विद्यार्थ्यांत चळवळ करण्याचे हे असे प्रयत्न विद्यार्थीसंघाच्या पूर्वीं झाले होते. यांतील शेवटच्या दोन संस्थांच्या सभांतून वैश्य विद्यार्थी संघाच्या मूळ प्रवर्तकांनीं प्रामुख्यानें भाग घेतलेला होता. त्या सभांतील गुणदोष त्यांनीं स्वतः पाहिले होते. व विद्यार्थ्यांत विशेष आपलेपणा उत्पन्न होण्यास कोणतें धोरण ठेविलें पाहिजे हेंहि त्यांनीं ओळखिलें होतें. महाजनवाडी निघाल्यानंतर केवळ विद्यार्थ्यांत कांहीं तरी भरींव कार्य करावें असें श्री. दत्तात्रय काशीनाथ भिंगार्डे व श्री. जगन्नाथ गणपत ढवण यांना वाटून त्यांनीं ' केवळ विद्यार्थ्यांची व विद्यार्थ्यांनींच चालवावयाची ' या धोर-

णावर संस्था काढावयाचें ठरविलें. तात्या, श्री. अण्णासाहेब मोरे, प्रो. विश्वनाथ गोपाळ शेटचे यांची सल्लाहि घेतली गेली. व संघ सुरूं करण्याचें निश्चित ठरलें. महाजनवाडींत श्री. बाळकृष्ण केशवशेट शेटचे यांचें अध्यक्षतेखालीं मिति श्रावण शु. २ शके १८३९ रोजीं समाजाची सभा भरवून वैश्यविद्यार्थीसंघ ही संस्था स्थापन झाली. त्या वेळीं महाजनवाडींतील सभागृह मंडळींनीं चिक्कार भरून गेलें होतें. त्यांत विशेष आल्हादजनक जो देखावा दृष्टीस पडला तो हा, कीं सभागृहाच्या एका बाजूस ज्ञातिगृहस्थ बसले होते तर समोरची बाजू पाठशाळा महाविद्यालयांतील आपल्या विद्यार्थ्यांनीं भरून टाकिली होती. आपल्या समाजांतील इतके विद्यार्थी एकत्र जमण्याचा हा कदाचित् पहिलाच प्रसंग असेल. या संघाचे मुख्य उद्देश सद्ग्रंथवाचनाकडे प्रवृत्ति करणें, वक्तृत्वशक्ति वाढविणें, समाजसेवेची गोडी लावणें, ऐक्यभाव वृद्धिंगत करणें, आणि समाजसेवक तयार करणें असे आहेत. या उद्देशांप्रमाणें संस्थेच्या कार्यास सुरवात होऊन संघातील बहुतेक सभासद पुढें शके १८४३ मध्यें स्थापन झालेल्या वैश्य विद्याश्रमांत गेल्यामुळें संघालाहि आश्रमामध्येंच जाणें भाग पडलें. चार वर्षे या संघाचें कार्य मुंबईत चाललें होतें. दर आठवड्याला त्याच्या भरणाऱ्या सभा, मधून मधून करण्यांत येणारीं संमेलनें, व अत्यंत उत्साहजनक अशा कार्यक्रमांनीं युक्त अशीं वार्षिक संमेलनें ज्यानीं पाहिलीं असतील त्यांनाच संघांतील सभासदांत कोणतें चैतन्य वास करीत होतें याची खरी कल्पना येईल. संघानें आठ आठ दहा दहा वर्षांचीं अर्भकें बरोबर घेऊन कनकेश्वर ( शके १८४१ ) व रायगड ( शके १८४२ ) अशा दूरच्या व अत्यंत जोखमाच्या सफरी उत्कृष्ट रीतीनें पार पाडल्या. श्रोतृवृंदांनीं गजबजून गेलेल्या मोठमोठ्या सभा साजऱ्या करतांना चालकांचा जो उत्साह दिसत असे, तोच उत्साह एखादे वेळीं चार पांच मंडळींत सभा भरवावी लागली तरीहि कायम राहात असे. वैश्य धर्मोन्नति फंडाचा पाडवा फंड

मागण्याकरितां स्वयंसेवकाचे पट्टे गळ्यांत घालून बलीप्रतिपदेच्या दिवशीं एकाच वेळीं मुंबईच्या सर्व भागांत ज्या वेळीं संघाचे सभासद् पसरत, त्यावेळीं हे चिमुकले बालवीर ' जय जय रघुवीर समर्थ ' या गर्जननें सगळी मुंबई जणुं काय, हालवून सोडीत असत. वर्षात एक दीड दिवस हे विद्यार्थी स्वयंसेवक समाजांत फिरून त्यांनीं आतांपर्यंत पांच हजाराच्यावर पाडवा फंड जमवून धर्मोन्नति फंडाकडे दिलेला आहे. संघानें 'नवजीवन' नांवाची हस्तलिखित मालाहि सुरू केली असून संघाचें स्थलांतर झाल्यावर त्या नांवाचें ' शारदा ' या नावांत रुपांतर होऊन ती वाचकांना नानाविध स्वरुपाच्या लेखांनीं व कवनांनीं रिझ-वीत आहे. आणि हें सर्व कार्य केवळ विद्यार्थीच करीत असत व आहेत. श्री. यशवंत भिकाजी कामेरकर, श्री. विठ्ठल बाळकृष्ण गांधी, श्री. राजाराम सीताराम कापडी, श्री. दत्तात्रय सीताराम खेडेकर, श्री. शिवराम बाळकृष्ण मलुष्टे, श्री. बाळकृष्ण केरो लुमण, श्री. दत्तात्रय सदाशिव पाथरे, श्री. शंकर बाळकृष्ण शेट्ये वगैरे सभासदांची मदत मुख्यतः संघाच्या अभ्यु-दयाला जशी पूर्वी कारणीभूत झाली, तशीच आज विद्याश्रमांतील ब्रम्ह-चाऱ्यांची मदतहि कारणीभूत होत आहे. कोणत्याहि संस्थेशीं विरोध न करतां सर्व लहानथोर मंडळींच्या सहानुभूतीवर व विद्यार्थ्यांच्याच जबा-बदारीवर चाललेली ही नमुनेदार संस्था पाहून तात्यांना किती आल्हाद वाटत होता याची एक दोनच उदाहरणें घेऊं. संघाच्या सभा रविवारीं भरत. त्या मुलांच्या सभा. परंतु थोरांत थोर असे तात्या मुलांत मूल होऊन बसत असत. तात्या हजर नव्हते अशी सभा क्वचितच झाली असेल. ज्याप्रमाणें संघाच्या सभासदांवर कोणतीहि वर्गणी ठेवावयाची नाहीं, त्याचप्रमाणें फंड वगैरे जमवावायचें नाहींत असें संघाचें अलिखित धोरण होतें. आपलें कार्य जर सर्वांना केव्हांहि मान्य होणारें असें आहे तर जेव्हां जरूर पडेल तेंव्हां त्यास मदत आलीच पाहिजे असें संघानें

ठरविलें होतें. त्याप्रमाणें खर्चाचीं अशीं अनेक कामें अंगावर घेऊन तीं स्वयं-स्फूर्तीनें येणाऱ्या मदतीवर संघानें पार पाडलीं. असें कोणतेंहि खर्चाचें काम निघालें कीं तात्यांनीं व श्री. अण्णासाहेब मोरे यांनीं सांगावें "तुम्हांला किती मदत मिळते ती पहा व शेवटीं जितकी जरूर लागेल तितकी सर्व माझ्याकडून घेऊन जा.' एकदा धार्मिक विषयाकरितां तात्यांनीं बक्षिसें ठेविलीं होतीं. बक्षिसाकरितां बऱ्याच विद्यार्थ्यांनीं तयारी केलेली होती. वार्षिक संमेलनाचे दिवशीं विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन बक्षिसें वाटावयाचीं होतीं. तात्यांना आदल्या दिवशीं सुचविण्यांत आलें कीं, 'बऱ्याच विद्यार्थ्यांनीं तुमच्याकडून बक्षिसें घेण्याचा निश्चय केलेला दिसतो.' दुसरे दिवशीं संमेलनाचे वेळीं एक भली रुपयांनीं भरलेली थैली घेऊन तात्या आले व ती अध्यक्षांच्या पुढें त्यांनीं ठेविली. सारांश विद्यार्थी संघानें विद्यार्थ्यांत जें चैतन्य उत्पन्न करण्याचे प्रयत्न केले ते पाहून तात्यांचा निरातिशय असा संघाचे कार्यावर विश्वास बसला. व संघांतील मंडळी खात्रीनें भरीव अशी समाजसेवा करतील, असा त्यांचा आत्मविश्वास होता.

मुंबईतील एकंदर समाजांत महाजनवाडीनें जें नवजीवन आणलें त्यामुळें जिकडे तिकडे चळवळीच चळवळी सुरू झाल्या. सार्वजनिक पूजा, कीर्तनें, सप्ताह, भजनें वगैरे अनेक प्रसंग महाजनवाडींत साजरे होऊं लागले. फंडाविषयीं कोणाच्या कांहीं तक्रारी असल्यास त्या समजून याव्यात, याकरितां ज्ञातिफंडानें एक मंडळ निवडलें. त्या मंडळानें मुंबईच्या निरनिराळया भागांत फिरून शके १८४२ मध्यें सभा करविल्या. अशाप्रकारें महाजनवाडींत व महाजनवाडीबाहेर जिकडे तिकडे एकच हालचाल सुरू झाली. चळवळीशिवाय नवीन कल्पना सुचत नाहींत, आणि नवीन कल्पनांशिवाय सुधारणा होत नाहींत, हें सर्वमान्य तत्व आहे. व तें फंडस्थापनेच्या वेळींच मान्य झालेलें होतें. महाजनवाडीमुळें ज्या नानाविध चळवळी सुरू झाल्या, चळवळीची जी लाट उसळली त्यामुळें समाजोपयोगीं निरनिराळ्या कल्पना सुधारणेच्छूंना

सुचूं लागल्या. पैकीं ज्ञातिफंडापुढें तीन प्रामुख्यानें मांडण्यांत आल्या. शके १८४१ च्या विजयादशमीस वैश्य विद्याश्रमाची योजना एका वैश्यबंधूनीं मांडली. वैश्य विद्याश्रमाचा विचार पुढील प्रकरणांत स्वतंत्र रीत्या होईलच. दुसरी कल्पना ‘ दुसऱ्या महाजनवाडीची. ’ शके १८४२ मध्यें ज्ञातिफंडानें निवडलेल्या मंडळाच्या ज्या निरनिराळ्या सभा झाल्या त्यांत श्री. हरी भाऊ संभुशेट शेट्ये यांचें अध्यक्षतेखालीं, काळी चौकी येथें मिती अधिक श्रावण व ३० शके १८४२ रोजीं भरलेल्या सभेंत श्री. बाळकृष्ण केशवशेट शेट्ये यांनीं ‘ कांदेवाडींतील महाजनवाडी भायखळा पुलापलीकडे राहणाऱ्या आपल्या बंधूंस दूर पडत असल्यामुळें इकडच्या मंडळीस मध्यवर्ती अशी एक महाजनवाडी अवश्य पाहिजे. ’ अशी जोराची सूचना मांडली. गेल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, खोताच्या वाडींतील घर विकलें तेव्हां दत्तमंदीर फंडानें ठेवून घेतलें होतें. त्या दत्तमंदीराच्या जीर्णोद्धाराचा प्रश्न त्या वेळेपासूनच कित्येक मंडळींच्या मनांत होता त्या प्रश्नालाहि या चळवळीच्या काळांत चालना मिळून दत्तमंदीराविषयींच्या सूचना कांहीं मंडळीकडून करण्यांत आल्या. वैश्य विद्याश्रम, दुसरी महाजनवाडी व दत्तमंदीर या तिन्हीं प्रश्नांचा खल करून व त्यावर विचार करून हे तिन्ही प्रश्न शके १८४२ च्या विजयादशमीस वैश्य ज्ञातिफंडानें आपल्या हातीं घेतले. एक महाजनवाडी पूर्ण करण्याला ज्या फंडाला एकोणतीस वर्षें लागलीं, त्याच फंडानें वैश्य विद्याश्रम, दुसरी महाजनवाडी व दत्तमंदीर अशीं तिन्हीं खर्चाचीं व जोखमाचीं कामें एकदम शिरावर घेतलीं. हें कशाचें द्योतक ? पहिली महाजनवाडी उघडल्यानंतर जें सामर्थ्य आणि जो आत्मविश्वास मंडळींच्या मनांत उत्पन्न झाली. त्याचेंच हें दृश्य फल होय. हीं तिन्हीं ध्येयें तडीस नेण्याचा ज्ञातिफंडानें कसा प्रयत्न केला हें सांगण्यापूर्वीं मध्यंतरीं घडलेल्या एका गोष्टीचा विचार करूं.

श्रीक्षेत्र नाशीक येथें जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्य डॉक्टर कुर्तकोटी यांचे अध्यक्षतेखालीं मिति श्रावण व १३ शके १८४२ रोजीं महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषदेचें पहिलें अधिवेशन व्हावयाचें होतें. परिषदेच्या चालकांकडून महाराष्ट्रांतील हिंदुधर्माच्या छत्राखालील सर्व जाती, उपजाती व धार्मिक संस्था यांना परिषदेंत भाग घेण्याविषयीं आमंत्रण करण्यांत आलें होतें. आपल्या समाजाला या परिषदेंत भाग घेणें आवश्यक वाटून त्यानें श्रावण व० ६ शके १८४२ रोजीं श्री. गणपत विठोबाशेट मोरे व श्री. जगन्नाथ गणपत ढवण यांची प्रतिनिधि म्हणून निवड केली. समाजाच्या या प्रतिनिधींनीं नाशिक येथें जाऊन समाजातर्फे परिषदेंत भाग घेतला. श्री. ढवण यांनीं श्रावण व. १४ शके १८४२ रोजीं 'सांप्रत प्रसंगीं सर्व महाराष्ट्रीय हिंदु धर्मियांनीं एकमेकाशीं सर्वांच्याच कल्याणासाठीं कसें उदारपणाचें धोरण ठेविलें पाहिजे, हें'परिषदेपुढें मांडलें. महाजनवाडीनें सुरू केलेल्या या चळवळीच्या काळांत समाजाबाहेरीलहि आपला हितसंबंध असलेल्या कार्यांत भाग घेण्याइतकी समाजाची तयारी झालेली होती. हें यावरून स्पष्ट दिसून येतें. असो.

फंडाच्या त्रिविध ध्येयांपैकीं वैश्य विद्याश्रमाचा विचार पुढील प्रकरणांत सविस्तर होणार असला, तरी तो विद्याश्रम तात्यांच्या हस्तें शके १८४३ च्या अक्षय्य तृतीयेस उघडण्यांत आला, एवढी गोष्ट या ठिकाणींहि नमूद करणें जरूर आहे. दत्तमंदीराचे कामास अद्याप सुरवात झालेली नसल्यामुळें त्याचाहि विचार करतां येत नाहीं. दत्तमंदीराच्या ध्येयाविषयीं एवढेंच सांगतां येईल कीं, या ध्येयाप्रीत्यर्थ श्री. धोंडू विश्रामशेट सुर्जेन व श्री. सदाशिव गोविंदशेट संसारे यांचेकडून देणग्या आलेल्या असून त्या मंदिराच्या कामास लवकरच सुरवात करण्यांत येईल. दुसरी महाजनवाडी हें ध्येय फंडानें कसें तडीस नेलें हें थोडक्यांत पाहूं. भायखळा पुलाच्या पली-

कडील मंडळींना मध्यवर्ती अशा ठिकाणीं एल्फिन्स्टन् रोडवर, दोन घरें विकावयास निघालेलीं, दुसऱ्या महाजनवाडीकरितां नेमलेल्या मंडळास आढळलीं. घरें पसंत पडलीं. परंतु त्यांतील एकच घर घ्यावयाचें म्हटलें तरी तितकीहि शिल्लक फंडाजवळ नव्हती. दुसरी महाजनवाडी उघडणें हें तर फंडानें ठरवूनच टाकिलें होतें. वैश्य विद्याश्रमाची मोरे–स्मारक–देणगीची स्थायिक रक्कम ज्ञातिफंडाकडे ठेवण्यांत आलेली होती. ती रक्कम, फंडाजवळ असलेली शिल्लक आणि कांहीं कर्ज काढून हीं दोन्हीं घरें मिति भाद्रपद व. १२ शके १८४४ रोजीं खरेदी करण्यांत आलीं. त्यांपैकीं एका घरांत महाजनवाडीकरितां जागा ठेवायचें ठरविण्यांत आलें. व पुढें श्रावण शु० ७ शके १८४५ शनिवार रोजीं ही दुसरी महाजनवाडी उघडण्याचा समारंभ श्री. गणपत विठोबाशेट ऊर्फ आण्णासाहेब मोरे यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. आपण मागें पाहिलेंच आहे, कीं पहिली महाजनवाडी होण्यास एकोणतीस वर्षें लागलीं, परंतु ही दुसरी महाजनवाडी, ध्येय ठरविल्यापासून तीन वर्षांच्या आंतच उघडली गेली. यावरून पहिली महाजनवाडी उघडल्यानंतर फंडाचे कार्याची कशी प्रगती होत चालली होती हें सहज दिसून येईल.

तात्या या समारंभाला हजर होते. एक महाजनवाडी उघडण्यास आपणांस २९ वर्षें लागतात, आणि आपले अनुयायी ही दुसरी महाजनवाडी अवघ्या तीन वर्षांत उघडतात हें पाहून त्यांच्या मनाला किती आनंद वाटला असेल? आपलें कार्य आपल्या देखत आपले अनुयायी जबाबदारीनें शिरावर घेत आहेत, आणि समाधानकारक रीतीनें चालवीत आहेत, हें पहाण्याचें ज्यांच्या नशिबीं असेल त्यांनाच तात्यांना त्या वेळीं झालेला आनंद अनुभवतां येईल. पहिली महाजनवाडी उघडीपर्यंत ‘ फंडाचे पैसे खाल्ले ’ असा फंडाचे चालकांवर कांहीं लोकांचा आक्षेप होता. पुढें महाजनवाडी उघ-

कोंकणस्थ वैश्यज्ञातिफंडाची शाखा—



**वैश्य विद्याश्रम, सासवनें.**

( पो. आवास, जि. कुलाबा. )

## प्रकरण ६ वें.

# वैश्य विद्याश्रम.

**कार्याणामुत्तमं कार्यं साधनानां च साधनम् ।**
**आधारः सर्वचेष्टानां राष्ट्रीयं लोकशिक्षणम् ॥**

—कै. गुरुवर्य विजापूरकर.

वैश्य विद्याश्रम म्हटला कीं श्री. गणपत विठोबाशेट ऊर्फ अण्णासाहेब मोरे यांचें नांव प्रथम येणें अगदीं साहजिक आहे. शके १८४३ च्या अक्षय्य तृतीयेस वैश्य विद्याश्रम सुरू झाला आणि तेव्हां पासून अण्णा सर्व समाजाला महशूर झाले. शके १८२६ मध्यें यज्ञोपवीताची चळवळ मुंबईंत सुरू झाली तेव्हां अण्णांचें प्रथम लक्ष समाजकार्याकडे लागलें. त्या चळवळींतहि ते प्रथम प्रामुख्यानें पडले नाहींत. जो सोळा सह्यांचा अर्ज शंकराचार्यांकडे पाठविण्यांत आला त्यांत अण्णांचें नांव नाहीं. अण्णा प्रथम जे समाजकारणांत पडले तें यज्ञोपवीताच्या चळवळीमुळें होय, हें मागें सांगितलेंच आहे. तथापि ज्ञातिफंडाचें कार्याशीं त्यांचा संबंध त्याच्याहि अलीकडील आहे. ज्ञातिफंडाशीं अण्णांचा संबंध कै. बाळकृष्णशेट बेर्डे यांच्यामुळें आला. फंडाचा 'संवत् १९६७।६८ चा' अहवाल तयार करण्याचे कामीं मदत करण्यासाठीं म्हणून शके १८३५ मध्यें अण्णांना बाळकृष्णशेटनीं बोलविलें. अहवाल तयार करीत असतांना अण्णांना फंडाचें कामाची हळूहळू माहिती होऊं लागली व त्यांचें मन फंडाचें कामाकडे लागूं लागलें. म्हणजे शके १८३५ पर्यंत ज्ञातिफंडाच्या कार्याशीं अण्णांचा संबंध आलेला नव्हता. नाहीं म्हणावयास शके १८२६ मध्यें उगाच ओझरता असा त्यांचा संबंध आलेला होता. धर्मशाळेसंबंधीं शके १८२४ मध्यें जी सभा झाली त्या सभेला अण्णांचे चुलते कै. नारायण बाळशेट मोरे हे

गेले होते. व त्यांनीं धर्मशाळेच्या पट्टींत ५०० रु. चा आंकडा घातलेला होता. आंकडा भरण्याचे पूर्वींच नारायणशेट हे माघ शु. ५ शके १८२५ मध्यें एकाएकीं मरण पावले. पुढें तो चुलत्यांनीं घातलेला आंकडा देण्याकरितां अण्णा मिति अधिक ज्येष्ठ शु. ९ शके १८२६ रोजीं तात्यांकडे गेले व ती रक्कम त्यांनीं तात्यांच्या स्वाधीन केली. हीच तात्यांची व अण्णांची पहिली भेट होय. असो. शके १८३५ मध्यें जरी त्यांचें मन ज्ञातिफंडाकडे लागलें तरी शके १८३८ पर्यंत म्हणजे महाजनवाडी उघडीपर्यंत त्यांनीं जबाबदारीनें कोणतेंहि कार्य अंगावर घेतलें नाहीं. महाजनवाडी उघडली तेव्हांपासूनच अण्णांच्या खऱ्या समाजकार्याला सुरवात झाली. शके १८३८ मध्यें ते समाजकार्यांत पडतात आणि शके १८४३ मध्यें म्हणजे अवघ्या पांच वर्षांचे आंत समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते बनतात. इतक्या अल्पावधींत ते इतक्या लवकर पुढें येतात याला त्यांच्या ठिकाणच्या सार्वजनिक कार्याच्या धडाडीबरोबरच दुसरा कोणता तरी गुण कारणीभूत झाला असला पाहिजे, अशी शंका साहजिक कोणालाहि येईल. समाजकार्य करणें हा अण्णांच्या कुलांतील अनुवंशिक गुण आहे. त्यांचे वडील कै. विठोबाशेट यांचा आणि तात्यांचा स्नेहसंबंध होता, व ज्ञातिफंडाचे कार्यांत ते अगदीं पहिल्यापासूनच एक प्रमुख होते. परिशिष्टांमध्यें जो सात कलमी ठराव दिला आहे त्यांत विठोबाशेटची सही तिसरी आहे. फंडाचे जे पहिले पांच मुख्य पंच किंवा ट्रस्टी नेमले त्यांतहि त्यांचें नांव असून या मुख्य पंचांच्याच नांवांनीं फंडाचा पहिला अहवाल प्रसिद्ध झाला आहे. विठोबाशेट माघ व १ शके १८१७ मध्यें वारले व त्यांचे बंधु नारायणशेट यांचेकडे त्यांचा व्यवहार आला. नारायणशेटना ज्ञातिफंडाचा किती अभिमान होता हें त्यांनीं धर्मशाळेकरितां घातलेल्या आंकड्यावरूनच दिसून येईल. अशा रीतीनें बाप, चुलते यांनीं ज्या फंडाचें कार्य केलें, त्या फंडाचें कार्य करणें हा अण्णांचा कुलधर्मच होता. हा अनुवंशिकगुण होता. तात्या खाजगी गोष्टींत आणि सभांमधूनहि या गुणांचा नेहमीं उल्लेख

करीत असत. या अनुवंशिक गुणामुळेंच अवघ्या पांच वर्षांत अण्णा समाज कार्यांत एकरूप होऊन जातात व पुढें येतात. घराण्यांतील कित्येक गुण कसे वंशपरंपरेनें चालत असतात त्याचें हें एक ठळक उदाहरण आहे. ज्या गोष्टी-कडे बापाच्या मनाची ओढ असते त्याच गोष्टींकडे मुलाचें मनहि स्वभा-वतः लागत असतें. बाप जो धंदा करतो तोच धंदा मुलानेंहि केला पाहिजे अशी सक्ति करणें जरी योग्य नसलें, तरी मुलाच्या मनाचा कल बापानें केलेल्या धंद्याकडे लागण्याचा जास्त संभव असतो. आणि याच मानवी मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तीवर चातुर्व-र्ण्याच्या कर्तव्याची विभागणी आपले शास्त्रकारांनीं केलेली आहे. असो. समाजसेवेचें बाळकडू अण्णांना न कळत त्यांचे वडील व चुलते यांचेक-डून मिळालेलें होतें. त्यांचे स्नेही बाळकृष्णशेट बेर्डे यांनीं त्यांना फंडा-कडे ओढतांच ही मूळवृत्ति जागृत झाली व या स्वाभाविक वृत्तीच्या प्रेरणेनें मोठ्या धडाडीनें समाजाचें कार्य करून ते अल्पावधींत पुढें आले.

ज्या वैश्य विद्याश्रमाच्या कार्याचा अण्णांनीं पुरस्कार केला तें कार्य वैश्यज्ञातिफंडानें आपली शाखा म्हणून सर्वस्वी शिरावर घेतलें आहे. ज्ञातिफंडानें आश्रमाच्या कार्याचा पुढाकार घेईपर्यंत शिक्षणप्रसाराचे कोण कोणते प्रयत्न ज्ञातिफंडाकडून झाले तें प्रथम पाहिलें पाहिजे, म्हणजे ज्ञातिफंड आणि ज्ञातिफंडाचें कार्य करणारी तात्या आदिकरून मंडळी यांना शिक्षणाचें महत्व कळलें होतें कीं नव्हतें, शिक्षणाचा प्रसार त्यांना पाहिजे होता कीं नको होता, याचा सहज उलगडा होईल. तात्यांना शिक्षणाचें महत्व सार्वजनिक कामाचा बराच अनुभव आल्यानंतर आयुष्याचे शेवटीं शेवटीं कळूं लागलें असें म्हणणारे असें एक तरी उदा-हरण दाखवूं शकतील काय, कीं आपल्या समाजांतील एखादा विद्यार्थी तात्यांकडे मदतीकरितां जातो व तात्या त्याला मदत करीत नाहींत.

तात्या कांहीं मोठे कोट्याधीश नव्हते, परंतु जें कांहीं त्यांनीं मिळविलें त्यांतील बराचसा भाग समाजांत शिक्षणप्रसार व्हावा म्हणून त्यांनीं खर्च केला आहे. आयुष्याचे शेवटीं तर शिक्षणप्रसारार्थ त्यांनीं आपलें सर्वस्वच अर्पण केलें असल्यामुळें तात्यांना शिक्षणाचें महत्व कळलें नव्हतें, असें म्हणणें म्हणजे बाहेर सूर्य प्रकाश पडला असतां आतां रात्र आहे असें म्हणण्याइतकेंच समंजसपणाचें होईल. वैश्य ज्ञातिफंडानें अगदीं सुरवातीला शिक्षणाचें कार्य कां अंगावर घेतलें नाहीं याचें कारण मागें आलेंच आहे. फंड ज्या परिस्थितींत स्थापन झाला त्या परिस्थितीमुळें त्याला महाजनवाडी हेंच मुख्य ध्येय ठरवावें लागलें आणि तेंच तडीस नेण्याचा त्याला प्रामुख्यानें प्रयत्न करावा लागला विद्यार्थ्यांना मदत करण्याची अशी सोय प्रथम फंडांत करण्यांत आली नसल्यामुळें फंडाकडे मदतीकरितां आलेल्या विद्यार्थ्यांची सोय, फंडाचे कार्यकर्ते कै. अण्णासाहेब चिखले, कै. पांडुरंग अनंतशेट बेंडे, कै. गोविंद दशरथशेट खेडेकर हे खाजगी रीतीनें करीत असत. परंतु खुद्द फंडानेंहि शिक्षण प्रसाराचा प्रश्न बरेच वर्षांपूर्वीं हातीं घेतलेला आहे. हें फंडाचे अहवालावरून कोणासहि दिसून येईल. कै. नारायण धोंडशेट कामेरकर यांनीं शके १८२९ मध्यें म्हणजे जवळ जवळ वीस वर्षांपूर्वीं पैसाफंडांतून विद्यार्थ्यांना मदत व्हावी अशी कळकळीची ज्ञातिफंडाकडे विनंति केली व तेव्हांपासून पैसाफंडाच्या उत्पन्नाचा एक अष्टमांश भाग केवळ शिक्षणप्रसारार्थ काढून ठेवण्यांत येऊन त्यांतून विद्यार्थ्यांना मदती होत आलेल्या आहेत. अशा रीतीनें वीस वर्षें शिक्षण प्रसाराचें कार्य ज्ञातिफंड करीत आलेला असून आज वैश्य विद्याश्रमाच्या द्वारें जें अत्यंत नमुनेदार कार्य करीत आहे, तें पाहून ज्ञातिफंडाला शिक्षणाचें महत्व कळलें नाहीं व कळत नाहीं असें म्हणणें किती हास्यास्पद आहे, हें सांगावयास नकोच.

शके १८४३ पर्यंत विद्यार्थ्यांना फी-पाटी-पुस्तकें याकारितां मदत करून मळलेल्या मार्गानेंच शिक्षण प्रसाराचें कार्य चाललेलें होतें. या

शिक्षणाचा जसा परिणाम समाजावर व्हावयाचा तसाच झाला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मनुष्य जें शिक्षण मिळवितो त्याचा व्यक्तीशः त्याच्यावर, त्याच्या समाजावर, त्याच्या राष्ट्रावर नेहमींच परिणाम होत असतो. शिक्षणाइतका दुसरा कशाचाहि इतका खोल परिणाम होत नाहीं. मनुष्यास जसें शिक्षण मिळतें तसा तो बनत जातो. राष्ट्राच्या, समाजाच्या किंवा व्यक्तीच्या भावी उन्नतीचा पाया त्याला आज मिळत असलेलें शिक्षणच होय. त्याचप्रमाणें त्याच्या पुढील अवनतीचेंहि कारण त्याचें आजचें शिक्षण होऊं शकतें. संपूर्ण रीत्या इंग्रजांच्या अमलाखालीं आपला देश गेल्यानंतर त्यांनीं शिक्षणखातें आपल्या हातीं घेतलें. थोडेसें 'यस् फ्यस्' करण्यापुरतें इंग्रजी येऊं लागलें कीं मोठमोठ्या पगाराच्या सरकारी नोकऱ्या मिळूं शकतात, हें पाहून लोकांनीं आपलीं मुलें–राष्ट्राचे भावी आधारस्तंभ–खाजगी शाळांतून काढून सरकारी शाळांत घातलीं. शिक्षण म्हणजे चाकरी करून भाकरी मिळविण्याचें साधन. असा शिक्षणाचा अर्थ होऊन बसला. परंतु हें शिक्षण नसून 'हमाली' आहे, त्यापासून राष्ट्राची उन्नति न होतां अवनति होण्याचा संभव आहे, हें कोणाच्याच लक्षांत येईना. त्या शिक्षणसंस्था म्हणजे 'हमालखाने' हें कोणास कळेना. ठिकठिकाणीं दगडाच्या शाळा उभारल्या. अशा शाळांतून बाहेर पडणारी मंडळी कोणत्या स्वरुपाची निघणार हें उघडच होतें. मोठ्या नोकऱ्या देणाऱ्या या नवीन शिक्षणाचा प्रसार प्रथम वरिष्ठ वर्गांत झाला. आणि ब्राह्मण, वर्णानें जे वरिष्ठ होते, तो वर्णाचा वरिष्ठपणा या नवीन शिक्षणानें त्यांचा नाहींसा झाला. ब्राह्मण्य म्हणजे काय? याचा उहापोह जाहीर रीत्या करावा लागतो, यावरून त्या वृत्तीचा किती लोप झाला याची सहज कल्पना येईल. नोकर तयार करणाऱ्या या कारखान्यांचा परिणाम ब्राह्मणांप्रमाणें इतर वर्गांवरहि थोडा मागून कां होईना पण झालाच. आपल्या वैश्य-

समाजाचा व्यापार बुडण्यास वैश्यवृत्तीला पोषक अशा शिक्षणाचा अभाव हेंच मुख्य कारण आहे. घाटावरून आगगाडी सुरू झाली म्हणून कोंकणांतील व्यापार बुडाला आणि आपला समाज कोंकणस्थ असल्यामुळें त्यांचा व्यापार बुडून त्यांनीं व्यापारी पेशा हळुंहळुं सोडून दिला हें म्हणणें यथार्थ नाहीं. भाटे, मारवाडी, मेमण कोकणांत व्यापाराकरता आल्याला किती दिवस झाले ? त्यांच्यावर आगगाड्यांचा रूळ कोठें फिरला नाहीं तो ? महाड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी वगैरे ठिकाणच्या व्यापाराची मुख्य किल्ली आज त्यांच्या हातांत आहे. एकवेळ या ठिकाणीं प्रमुख असलेल्या कोंकणस्थ वैश्य व्यापाऱ्यांचे वंशज भाटे, मारवाडी, मेमण यांच्या पायाजवळ खर्डेघाशी करीत आहेत हें समाजांत फिरून नीट पाहिलें कीं आपल्या समाजाचा व्यापार सुटण्यास काय कारण झालें हें स्पष्ट कळतें. आगगाडीचा रूळ त्यांच्यावरून न फिरतां आपल्या वरूनच फिरावा असें आपण देवाघरीं काय पाप केलें होतें ? केवळ तर्क लढवून इंग्रजी शिक्षण—सरकारी शिक्षण—आपला व्यापारी पेशा सुटण्यास कारणीभूत झालेलें नाहीं, असें म्हणणारे आपली दिशाभूल करून घेत असतात. यावर कोणी असा प्रश्न करतील कीं सरकारी शिक्षण म्हणजे इंग्रजी शिक्षणच ना ? मग आपल्या समाजांत इंग्रजी शिकलेले असे किती लोक आहेत ? इंग्रजी शिकलेले मुळीं फारसे लोक नाहींत आणि इंग्रजी शिक्षणानें आपला व्यापार बुडाला असें कसें म्हणतां येईल ? याच्यावर उत्तर म्हणून एवढेंच सुचवावयाचें आहे कीं सरकारी शिक्षण म्हणजे सरकारचे राज्याचा गाडा ओढणारे तयार करण्याचा कारखाना. इंग्रजी शिक्षणानें आमचा व्यापारी पेशा सुटला याचा अर्थ इंग्रजी भाषेच्या शिक्षणानें नव्हे. इतकेंच नव्हे तर आजच्या जगांतील सर्व हालचाली व्यापारी तत्वावर चाललेल्या आहेत. आजचें युग व्यापारी आहे. या युगांत जर व्यापारी पेशा ठेवा-

वयाचा असेल, तर इंग्रजी भाषेचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. म्हणूनच अलीकडे ज्या राष्ट्रीय शाळा व महाविद्यालयें निघालीं, त्यांत इंग्रजी भाषेला जरी मुख्य स्थान दिलेलें नसलें तरी तिची हकालपट्टीहि केलेली नाहीं. इंग्रजी शिक्षणावर कै. गुरुवर्य विजापूरकर, महात्मा गांधी वगैरे मंडळींचा जो कटाक्ष होता व आहे, तो इंग्रजी भाषेच्या शिक्षणावर नसून ज्या इंग्रजी–परकीय–पद्धतीनें आपल्या पिढीला शिक्षण मिळत आलें त्या पद्धतीवर होय. या परकी पद्धतीनें दिलें जात असलेल्या शिक्षणामुळें अलिकडील पिढी धर्मलंड बनत आहे, आर्य संस्कृतीला पारखी होत आहे, स्वाभिमानशून्यता जोरानें पसरत आहे, शरीरसंपत्तीचा झपाट्यानें ऱ्हास होत आहे, परावलंबीपणा वाटत आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, ‘ या हल्लींच्या शाळेंत मुलाला घातल्यावर त्याला पहिला धडा मिळतो तो हा, कीं तुझा बाप मूर्ख आहे. तुझे शिक्षक गाढव आहेत. तुझा धर्म खोटा आहे. तुझें राष्ट्र रानटी आहे. तुझा शिवाजी चोर लुटारू आहे. ’ असले संस्कार त्या दगडाच्या शाळांतून कोंवळ्या तरुण मुलांच्या मनावर होऊं दिल्यावर जर त्यांच्यांत महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें ‘ दास्यमनस्कता ’ उत्पन्न झाली तर त्यांत कांहीं नवल नाहीं. ‘ सरकारी शाळांतील शिक्षण गुलामगिरीच्या वळणावर मिळत असतें. ’ हे लोकमान्य टिळकांचे उद्गार त्या शिक्षणाचे राष्ट्रावर किंवा समाजावर घडलेले परिणाम पाहिले म्हणजे यथार्थ वाटतात. पेरावें तसें उगवणार. बाजरी पेरून गहूं कसा मिळेल ? मॅट्रिक किंवा बी.ए. झालेले आपल्या समाजांत थोडे असतील परंतु आज ते एका हाताच्या काय पण दोन्हीं हातांच्या बोटांवर मोजण्याइतकेंच आहेत असें नाहीं. त्यांतील कितीसे लोक आपल्या वैश्यवृत्तीप्रमाणें व्यापारांत पडले आहेत ? दुसऱ्या अनेक मार्गांनीं नांवलौकिकास ते येत असतील परंतु वैश्यवृतीनें नाहीं एवढेंच याठिकाणीं दाखवावयाचें आहे. या शिकलेल्या मंडळींनीं व्यापारी पेशा सोडल्यामुळें त्याचा परिणाम अर्धवट शिकलेल्या ,अनेक तरुणां-

वर होऊन व्यापारांत नांवलौकिकास येण्याची महत्वाकांक्षा तरूण पिढींतून लोपली गेली. भाटे, गुजराथी वगैरे लोकांच्या खाजगी शाळा अद्यापि असल्यामुळें त्यांच्या मुलांचें शिक्षण या खाजगी शाळांतून मुख्यत: होत असतें. व्यापार करण्याची महत्वाकांक्षा त्या लोकांत जी कायम आहे त्याचें कारण खासगी शिक्षणाचे त्यांचे हात असलेले प्रयत्न होत. अशा स्थितींत आपल्या उदासीनतेचा फायदा घेऊन व्यापारांत नांवलौकिकास येण्याची महत्वाकांक्षा धरून आलेले गुजराथी व भाटे आज शेट बनले व आपल्यांतील कित्येक त्यांचे गुमास्ते झाले. आपल्यांतलि ज्या लोकांवर परकी शिक्षणाचा फारसा परिणाम झालेला नाहीं ते लोक व्यापारालाच चिकटून असून त्यांतच नांवलौकिक कमवून आहेत. असे पिढीजात व्यापारी आपल्यांत थोडे असले तरी ते आहेत हें समाजांत फिरणारांना सहज दिसून येईल.

परकी शिक्षणाचा आपल्या समाजावर घडलेला अनिष्ट परिणाम कांहीं लोकांना दिसूं लागला होता. सरकारी शाळांमुळें जडलेला रोग जरी कांहींना स्पष्ट दिसला तरी त्याची खरी उपाय योजना मात्र स्पष्ट कोणास बरेच दिवस सुचली नाहीं. आणि एखाद्यास सुचली असली तरी ती मांडण्याचें धाडस मात्र कोणाच्यानें करवलें नाहीं. एखादा मनुष्य भयंकर रोगानें आजारी पडला म्हणजे सर्वांनाच रोगाची परीक्षा होते असें नाहीं. कांहीं लोकांनीं रोगाची परीक्षा केली तरी त्यावर औषधयोजना सुचत नाहीं. आणि कोणास औषधयोजना सुचली तरी औषध देण्याचें धैर्य होत नाहीं. तें धैर्य फक्त डॉक्टर वैद्यांनाच होतें. आपल्या समाजांतील व्यापारी वृत्तीचा दिवसानुदिवस लोप होत आहे. हा रोग अनेकांस दिसला व त्यावर काय उपाय योजना करावी म्हणून ठिकठिकाणीं विचार सुरू झाले. शिक्षणप्रसार झाला पाहिजे असें सामान्यत: सर्वांना वाटूं लागलें, आणि म्हणूनच शिक्षणप्रसाराचे निरनिराळे प्रयत्न जारीनें सुरू झाले.

वैश्य विद्यावर्धक समाजानें केलेल्या प्रयत्नाची हकीगत चौथ्या प्रकरणांत आली आहे. तो पहिला प्रयत्न होय. त्यानंतर ज्ञातिफंडानें केलेल्या

प्रयत्नाची माहितीहि वर सांगितली आहे. अशाच प्रकारचे शिक्षणप्रसाराचे प्रयत्न रत्नागिरी, मालवण वगैरे ठिकाणीं सार्वजनिक फंड उभारून करण्यात आले. पहिली महाजनवाडी उघडली तेव्हां कित्येकांनीं ' महाजनवाडींत बोर्डिंग काढावें. म्हणजे बाहेरगांवच्या विद्यार्थ्यांची सोय होईल आणि मुंबईतीलहि कित्येक विद्यार्थ्यांना बोर्डिंगाचा लाभ मिळून शिक्षणाचा प्रसार जोरानें होईल ' असे उद्गार काढले. शाळेंतील शिक्षणाला जोड म्हणून कांहीं वर्ग बोर्डिंगामध्यें सुरू ठेवून जर एखादें बोर्डिंग निघालें असतें, तर ते त्या वेळीं हवेंच होतें व त्याचा थोडा फार उपयोगहि झाला असता. अशा पवित्र कार्याला महाजनवाडीमध्यें जागा खात्रीनें मिळाली असती. परंतु बोर्डिंगाचे हे विचार म्हणजे ' मांजराचे गळ्यांत घाट बांधावी ' या विचारासारखेच होते. धडाडीनें असें बोर्डिंग काढणारा जर एकच कळकळीचा तरुण निघाला असता, तरीहि कामास सुरवात झाली असती. तथापि बोर्डिंगाची ही कल्पना अकस्मात् दुसऱ्याच एका ठिकाणीं मूर्त स्वरूपांत आली. कोल्हापुरच्या माजी महाराजांनीं कोल्हापुरांत निरनिराळ्या समाजांस बोर्डिंगाकरितां जागा दिलेल्या असून त्यांचीं तेथें बोर्डिंगें चालू आहेत. आपल्या समाजाचें तेथें बोर्डिंग नव्हतें. तेव्हां श्री. सदाशिव रामचंद्र थरवळ, श्री. आत्माराम रामचंद्र लांजेकर वगैरे मंडळींच्या खटपटीमुळें बोर्डिंगास योग्य अशी, पूर्वीं श्रीभारतीबुवांचा मठ म्हणून वाखाणत असलेली, जागा सरकारांतून मिळाली. बोर्डिंग सुरूं करण्याइतका पैसा व धान्य मिळून कायमच्या उत्पन्नासाठीं २०×१२० फूट मोकळी जागा मिळाली. ( या मोकळ्या जागेवर सध्यां एक लहानशी इमारत होऊन तिचें कायमचें उत्पन्नहि येऊं लागलें आहे. ) याप्रमाणें शके १८४२ मध्यें कोल्हापूर येथें वैश्य बोर्डिंग सुरूं झालें. बोर्डिंगासारख्या संस्थेचा पाया इमारतीनें घातला जात नसतो, तर तो तिला कायमचे वाहून घेणाऱ्या माणसांनीं घातला जातो इकडे तेथील मंडळींचें विशेषसें लक्ष

न गेल्यामुळें त्यांच्या कल्पनेप्रमाणें इमारत या स्वरूपांत, बोर्डिंग आहे. प्रचलित शिक्षणसंस्थांना खाजगी बोर्डिंगाची जोड देऊन शिक्षणांतील उणीवा कमी करणें, हें जरी ‘ शंभर नंबरी ’ कार्य नसलें तरी प्रयोग करण्यालायक कार्य आहे. परंतु तसा कोणताहि प्रयोग कोल्हापूर बोर्डिंगामध्यें झालेला दिसून आला नाहीं. जर कोणी आस्थेवाईक कार्यकर्ता निघाला, किंवा सध्यां बोर्डिंगानें स्वतःच्या खर्चानें एखादा विद्यार्थी तयार करून घेतला, तर कोल्हापूर बोर्डिंगाचें कार्य प्रयोग करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. सार्वजनिक शिक्षणप्रसाराचे प्रयत्न पहातांना, रत्नागिरी येथें थोडा वेळच कां होईना परंतु नमुनेदार सुरू झालेला, श्री. जनार्दन बाळकृष्ण बाष्टे यांच्या खाजगी प्रयोगाचा उल्लेखहि अवश्य केला पाहिजे. श्री. बाष्टे हे रत्नागिरींतील प्रसिद्ध व्यापारी असून त्यांची शिक्षण विषयक कळकळहि वाखाणण्यासारखी आहे. शके १८४० मध्यें आपल्या समाजांतील कांहीं मुलें जमवून त्यांनीं एक संस्था सुरू केली होती. श्री. श्रीराम गोविंद शेटये वगैरे तरुण मंडळींची सुरवातीला मदत होती. परंतु पुढें नाना आक्षेप या कार्यावर येऊन संस्थेचें पुढें पाऊल पडणें अशक्य झालें. व शेवटीं ती संस्था बंद झाली.

वैश्य विद्याश्रम सुरूं होईपर्यंत शिक्षणप्रसारार्थ समाजानें केलेल्या प्रयत्नाचा हा असा संक्षिप्त इतिहास आहे. हे सगळे प्रयत्न थोड्या फार फरकानें प्रचलित सरकारी शिक्षणाचाच प्रसार समाजांत करणारे होते. वैश्यवृत्तीचा जो लोप होत चाललेला होता त्यावर हे उपाय ठरले नाहींत. वैश्यवृत्तीला पोषक असा प्रयत्न स्वतंत्र रीत्याच व्हावयाला पाहिजे होता. सरकारी परीक्षा आणि सरकारी पदव्या यांचा मोह पुटें ठेवून केलेले प्रयत्न वैश्यवृत्तीला पोषक कसें होणार ? गुजराथी—भाटे लोकांमध्यें वैश्यवृत्तिच मुख्य आहे आणि तीच कायम रहावी म्हणून त्यांच्या स्वतंत्र शिक्षणाच्या संस्था आज किती तरी आहेत. आपल्या समाजामध्यें तशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

एक तरी संस्था होती कां ? मग वैश्यवृत्ति रहावी कशी ? आणि कोठें असली तर पुढें टिकावी कशी ? अर्थात् समाजाला जडलेल्या रोगावर उपाय म्हणजे सरकारी परीक्षा व सरकारी पदव्या यांचा मोह पुढें नसलेली अशी एखादी स्वतंत्र शिक्षणाची संस्था काढणें. आणि तोच उपाय अण्णासाहेब मोरे यांनीं वैश्य विद्याश्रमाची योजना मांडून सुचविला.

वैश्य विद्याश्रमाची योजना मांडल्यानंतरचा इतिहास थोडा फार सर्वांस विदित आहेच. परंतु आश्रम कल्पनासृष्टींत कसा विहार करीत होता हें फारसें कोणाला अवगत नाहीं. करितां तो इतिहास येथें थोडक्यांत देतों. प्रथम ‘ वैश्य विद्याश्रम ’ नांवाविषयीं विचार करूं. वैश्यविद्यार्थी संघ आणि वैश्य विद्याश्रम यांचा अनेक दृष्टींनीं निकट संबंध आहे. संघाच्याच कार्यानें आश्रमाचे कार्यास प्रोत्साहन मिळालेलें आहे. संघाच्या कार्यांचें आश्रमास प्रत्यक्ष कार्याचे बाबतींत प्रोत्साहन मिळालें असल्यामुळें नांवाच्याहि बाबतींत मिळालें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ‘ सनातनधर्मनीतिप्रवर्तक कमेटी ’ मार्फत मुंबईंत परीक्षा घेण्यांत येत असत व संघांतील विद्यार्थ्यांना तयार करून घेऊन त्या परीक्षांना बसविण्यांत येत असे. त्या कमेटीनें कै. गजानन भास्कर वैद्य यांचें ‘ आश्रम आणि आश्रमधर्म ’ हें पुस्तक एका परीक्षेकरितां नेमिलेलें होतें. मार्गशीर्ष शु. ५ शके १८४० रोजीं संघाच्या सभेंत या पुस्तकांतील विषयावर विवेचन करण्यांत आलें. मनुष्याच्या आयुष्याच्या पहिल्या कालास ‘ ब्रह्मचर्याश्रम ’ असें प्राचीन नांव आहे. परंतु अनेक कारणांनीं त्या नांवांतील शक्ति सध्यां लोपली असून तो शब्द उच्चारतांच त्यांतील खरा अर्थबोध होत नाहीं, असें ग्रंथ कर्त्यानें प्रथम दाखविलें असून आजच्या कालाला अनुरूप व साधें असें ‘ विद्याश्रम ’ हे नवीन नांव त्यांनीं सुचविलें आहे. ( गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम यांस अनुक्रमें त्यांनीं गृहाश्रम, सेवाश्रम, योगाश्रम अशीं

नांवें सुचविलीं आहेत. ) विद्याश्रम कीं ब्रह्मचर्याश्रम ? हा या ठिकाणीं आपला प्रश्न नाहीं. फक्त इतकेंच लक्षांत ठेवावयाचें कीं ' विद्याश्रम ' हा शब्द महाराष्ट्रांतील अत्यंत चिकाटीनें, आस्थेनें, प्रेमानें कार्य करणाऱ्या कै. गजाननराव वैद्यासारख्या हिंदुधर्माच्या मिशनऱ्यांकडून समाजास ज्ञातिफंडाचे महाजनवाडींत संघाचे सभेमुळें मिळाला. पुढें चैत्र शु.४ शके १८४१ रोजीं महाजनवाडींत झालेल्या वैश्य विद्यावर्धक समाजाच्या वार्षिक समारंभांत श्री. ढवण यांनीं ' विद्याश्रम ' या विषयावर एक स्वतंत्र निबंध वाचला होता. तो निबंध संघाच्या हस्तलिखित ' नवजीवन ' मालेच्या तिसऱ्या पुष्पांत समग्र आलेला आहे. अशा रीतीनें रूढ होत चाललेल्या ' विद्याश्रम ' शब्दामागें 'वैश्य' हा शुद्ध ज्ञात्यभिमानदर्शक शब्द जोडला जाऊन ' वैश्य विद्याश्रम ' हें नांव बनलें गेलें. श्री. मोरे यांनीं स्वतंत्र शिक्षणविषयक मांडलेल्या योजनेच्या फक्त ' नांवाचा ' हा असा इतिहास आहे. योजनेच्या अंतरंगाचा खरा इतिहास कसा आहे तो आतां आपण पाहू.

शके १८४१ च्या गणेशोत्सवांत कांदेवाडींतील केशवजी नाईकाच्या चाळींतील सार्वजनिक गणपतीपुढें ' राष्ट्रीय शिक्षण ' या विषयांवर कै. गुरुवर्य विजापूरकर यांचें व्याख्यान होतें. त्या व्याख्यानास श्री. अण्णा-साहेब मोरे हे श्री. ढवण यांना बरोबर घेऊन गेले. तें व्याख्यान ऐकून शिक्षणाकरितां आपण ज्ञातींत कांहींतरी प्रयत्न केलाच पाहिजे या श्री. अण्णासाहेबांच्या विचारास निश्चित स्वरूप प्राप्त झालें. व्याख्यान आटोपल्यावर कै. विजापूरकर कोणत्या ठिकाणीं उतरले आहेत याचा तपास करून श्री. अण्णासाहेब मोरे घरीं आले. बरीच रात्र होईपर्यंत त्यांचा त्या व्याख्यानावरच विचार चालला होता. दुसरें दिवशीं सकाळीं ढवण यांना बरोबर घेऊन अण्णासाहेब मोरे विजापूरकरांच्या भेटीला त्यांच्या बिऱ्हाडीं—सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीमध्यें—गेले. विजापूरक-

रांची ते बाहेर जाण्यापूर्वींच गांठ घेतां यावी ह्मणून, श्री. मोरे अगदीं लवकरच गेले होते. परंतु त्याच्याहि पूर्वीं विजापूरकर समर्थ विद्यालयाचें कामानिमित्त बाहेर गेलेले आढळले. थोड्याच वेळांत खांद्यावर घोंगडी घेतलेले असे प्रोफेसर अण्णासाहेब आले. त्यांचें उतार वय झालें असतांहि इतक्या लवकर उठून नित्य ठरून गेलेल्या कामधामास ते लागतात, आणि एवढा मोठा विद्वान् मनुष्य अंगावर घोंगडी टाकून मुंबईसारख्या शहरांत खुशाल फिरतो, याचा त्यांना भेटण्यास गेलेल्या मंडळींच्या मनावर काय परिणाम झाला असेल? असो. अण्णासाहेब मोरे यांनीं आश्रमाविषयींची आपली कल्पना त्यांच्यापुढें मांडली. ती ऐकून घेऊन गुरुवर्य विजापूरकर यांनीं मोकळ्या मनानें तीवर चर्चा केली. आणि शेवटीं 'या तुमच्या कल्पनेस माझी पूर्ण सहानुभूति आहे.' असा आशीर्वाद दिला. महाराष्ट्रांत 'राष्ट्रीय शिक्षणाचा जिवंत झरा' ह्मणजे गुरुवर्य विजापूरकर. 'राष्ट्रीय शिक्षण' या मंत्राचें अनुष्ठान त्यांनीं आयुष्यभर केलें व 'राष्ट्र समर्थ करावयाचें असेल तर राष्ट्रीय शिक्षणाचा मंत्र घ्या' असा त्यांच्या आयुष्याचा दिव्य संदेश आहे. आश्रमाच्या मूळ कल्पनेस ऋषितुल्य विजापूरकरांच्या व्याख्यानानें निश्चित स्वरूप यावें, आणि आश्रम कल्पनासृष्टींत असतांनाच त्याला त्यांचा आशीर्वाद मिळावा, हें आश्रमाचें खरोखर मोठें भाग्य होय. सत्कार्याला स्फूर्तिहि सत्पुरुषापासून मिळत असते याचें हें उत्तम उदाहरण आहे. ज्यानें परकीयांचा जाच व स्वकीयांचा उपहास सहन करून आयुष्यभर राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयत्न अविश्रांत चालू ठेविले, इतकेंच नव्हें तर 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' या न्यायानें संकटपरंपरेंतून त्या प्रयत्नांची जास्त जोमानें अशी वाढ केली, अशा कर्मयोग्याची स्फूर्ति व आशीर्वाद आश्रमाच्या मूळ कल्पनेला मिळावा यांत त्या ईश्वराचाच कांहीं तरी हेतु नसेल कशावरून?

सत्पुरुषाचा आशीर्वाद कार्यप्रवण करणारा असतो. विजापूरकरांचा आशीर्वाद घेतल्यानंतर अण्णासाहेब मोरे यांचे आश्रमाविषयींचे विचार

जास्त जोरानें फोंफावूं लागले. पुढें दोनचार दिवसांनीं, ढवण यांना बरोबर घेऊन ते संताक्रूस स्टेशनाचे जवळच त्या वेळीं असलेलें ‘ गुरुकुल ’ पहावयास गेले. अखिल हिंदुस्थानांत स्वतंत्र शिक्षणाचा अतिशय मोठ्या प्रमाणावर झालेला नमुनेदार प्रयत्न म्हणजे ‘ गुरुकुल ’ होय. स्वामी दयानंद सरस्वती सारख्या पुण्यपुरुषांची ती स्फूर्ति होय. स्वामी श्रद्धानंदासारख्या सत्पुरुषांची ती कीर्ति होय. अशा गुरुकुलाचा प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यावर आश्रमाचें एकंदर स्वरूप निश्चित होऊन तें ताबडतोब योजनेच्या रूपानें आखलें गेलें.

विजापूरकरांनीं आश्रमास स्फूर्ति दिली. गुरुकुलानें दिशा दाखविली. परंतु अद्याप तींत ‘ राम ’ उत्पन्न झालेला नव्हता. त्या रामाची जोड आपल्या तात्यांकडून आश्रमास झाली. एके दिवशीं महाजनवाडींत तात्यांना आश्रमाची ती लिखित योजना वाचून दाखविण्यांत आली. योजनेच्या प्रत्येक शब्दागणिक त्यांना आनंदाच्या उसळ्या येत होत्या. योजना संपूर्ण ऐकल्यावर ‘ समाजाला चांगले दिवस राम दाखविणार ’ असे उद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडले. तात्यापुढें कोणतेंहि कार्य ठेवा. ते एकदम आपलें मत कधींच देत नसत. एकादें कार्य त्यांना फारच पसंत पडलें तर ‘ बारा आणे पसंत आणि पंधरा आणे नापसंत ’ या शब्दांत त्यांनीं आपली पसंती व्यक्त करावी. यापेक्षां जास्त शाबासकीची अपेक्षा तात्यांकडून तरी करतां येत नसे. परंतु विद्याश्रमाची योजना ऐकन त्यांनीं आपली पूर्ण संमति दिली हें पाहून अण्णासाहेब मोरे यांनाहि मोठें आश्चर्य वाटलें. आणि ज्या अर्थीं तात्यांनाहि आश्रमाची योजना ‘ सोळा आणे ’ पसंत पडली त्या अर्थीं योजनेंत कांहीं तरी ‘ राम ’ आहे असें अण्णासाहेबांस वाटलें व आश्रमाची योजना समाजापुढें मांडण्याचें निश्चित ठरविलें.

विजापूरकरांची स्फूर्ति, गुरुकुलाची दिशा, आणि तात्यांचा राम या तीन गोष्टींचा लाभ मिळवून आश्रमाची योजना सर्व समाजापुढें

आश्विन शु. १० शके १८५१ रोजीं श्री. घोंडू विश्रामशेट सुर्जन यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या दसरासंमेलनांत मांडली गेली. नंतर योजनेवर प्रो. विश्वनाथ गोपाळ शेट्ये यांचें अधिकार युक्त असें भाषण झालें. प्रो. शेट्ये यांचा समाजामध्यें अनुपम असा दर्जा आहे, व तो तसाच राहील यांत शंका नाहीं. ते वैश्य विद्यावर्धक समाजाचे एक मुख्य संस्थापक आहेत. त्यांनींच आपल्या समाजामध्यें 'वैश्य–मासिक' म्हणून प्रथम नियतकालिक सुरू केलें. वैश्य मासिकाचा पहिला अंक चैत्र शु. १ शके १८३२ मध्यें निघाला. पहिल्याच अंकांत आपल्या धोरणाचें संपादकांनीं खालील शब्दांत आविष्करण केलेलें आहे. "समाजामध्यें विद्याविषयक खटपट करण्याकरितां, त्यांना सशास्त्र व्यापारी माहितीची ओळख करून देण्याकरितां, नैतिक, सामाजिक वगैरे चालीरीतीमध्यें नीट शिस्तीचें वळण लागेल व तद्वारा एकीच्या बळावर समाजाचें पाऊल उन्नतीकडे पडेल असा प्रयत्न करण्याकरितांच फक्त या मासिकाचा जन्म आहे." असें उच्च, समाजाला पोषक असें व्यापक धोरण ठेऊन प्रो. शेट्ये यांनीं मासिक सुरू केलें व त्यांच्याच संपादकत्वाखालीं शके १८४० पर्यंत तें चाललें. शके १८३५ पासून त्यांना कांहीं वर्षे एकमार्गी वाङ्मयसेवक व सज्जनमहाशय श्री. निळकंठ भाऊ गांधी यांची जोड मिळून मासिकांत अंतर्बाह्य बऱ्याच सुधारणा होऊन तें मासिक महाराष्ट्रांतील नियतकालिकांत बरेंच वरच्या दर्जाचें मानलें जाऊं लागलें. वैश्य मासिकाचे द्वारें प्रो. शेट्ये यांनीं मराठी भाषेची जशी सेवा केली, तशीच कांहीं नाटकें लिहूनहि त्यांनीं वाङ्मयाची सेवा केलेली आहे. त्यांनीं 'धी नाईट हाय स्कूल' म्हणून रात्रीची शाळा बरेंच वर्षे नमुनेदार अशी चालविली, व आज अस्पृश्यांच्या मुलाकरितां प्रमुख या नात्यानें एक शाळा मुंबईत ते चालवीत आहेत. वैश्य समाजांत 'राष्ट्रीय वैश्य संघ' ही संस्था त्यांनीं महाजनवाडींत आश्विन शु. १४ शके १८३९ रोजीं कै. गजानन भास्कर वैद्य

यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापून करून व आपले सहकारी श्री. पांडुरंग हरि धामणस्कर यांच्यासह दौरे काढून लो. टिळकांच्या स्वराज्य विषयक चळवळीलाहि हातभार लाविला. अशा कर्तबगार विद्वानाचें योजनेवरील पहिलेंच व्याख्यान मग तें महत्वाचें कां मानलें जाऊं नये? प्रो. शेटये यांनीं हें महत्वाचें भाषण करण्यापूर्वी योजना वाचण्यास नेऊन टिपणें करूनहि आणलेलीं होतीं. परंतु मोठ्या दुर्दैवानें त्यांचें योजनेवर सामान्यतः प्रतिकूल असेंच भाषण झालें. सामान्यतः म्हणण्याचें कारण एवढेंच, कीं भाषणाचे शेवटीं "योजनेच्या बाबतींत माझे जे मतभेद आहेत ते मी आपणांपुढें प्रामाणिकपणें मांडले आहेत. त्याचा वाटल्यास विचार करा किंवा करूं नका. परंतु या योजनेप्रमाणेंहि जरी कार्य सुरूं झालें तरीहि सर्वांत मला जास्त आनंद होईल एवढेंच मला सुचवावयाचें आहे." असे उद्गार त्यांनीं काढले. राष्ट्रीय शिक्षणावर जे सामान्यतः आक्षेप येत असतात तशाच प्रकारचे योजनेवर प्रो. शेट्ये यांनीं आक्षेप घेतले. शेट्यांचें या भाषणाचा एकंदर समाजावर अनिष्ट असाच परिणाम झाला. योजना 'एक वैश्य बंधु' या नांवानें समाजापुढें आलेली होती, तरी ज्या अर्थी ती फंडाचे चिटणीसांनीं प्रसिद्ध केली, त्याअर्थी ती फंडचालकांपैकींच कोणाची तरी असली पाहिजे असा लोकांनीं कयास बांधला. फंडचालकांवर टीका करणाऱ्यांना आतां टीका करण्यास हें नवीन साधन मिळालें. योजनेला प्रथम प्रतिकूल असलेल्या प्रो. शेट्यांचे मागें उभें राहून त्यांनीं टीका करण्यास सुरवात केली. प्रो. शेट्ये यांनीं दुसऱ्यांच्या संपादकत्वाखालीं गेलेल्या वैश्य मासिकांतून दोन लेख लिहिले. त्यांनीं टीका करणारांना स्फूर्ति आली. आणि सर्व बाजूंनीं योजनेवर खाजगी किंवा जाहीर टीका होऊं लागल्या. टीका—चर्चा व्हावी म्हणूनच योजना मांडलेली होती. तेव्हां विध्वंसक स्वरूपाच्याहि जरी कित्येकांनीं टीका केल्या तरी योजनावाल्यामंडळींना त्याचा विषाद

वाटला नाहीं. परंतु योजना केवळ थट्टा आहे, योजना मांडून शिक्षणाची कुचेष्टा करण्याची आपली हौस योजनाकारांनीं फेडून घेतली आहे. योजनाकारांनीं योजना मांडतांना जे वीस हजाराचें आश्वासन दिलें होतें, त्याहि बाबतींत संशय प्रदर्शित होऊं लागले. अशा प्रकारचे योजनाकारांच्या शुद्ध हेतूबद्दल जे उद्गार निघूं लागले त्याबद्दल मात्र कोणासहि वाईट वाटेल.

प्रो. शेख्ये यांनीं योजना मांडली त्या वेळीं केलेली टीका आणि पुढें वैश्यमासिकांत केलेली टीका जरी योजनेवर प्रतिकूल होती तरी ती अगदीं प्रामाणिक मतभेदामुळेंच त्यानीं केली होती. म्हणून त्यांची स्वतःची योजनेविषयीं खात्री पटल्यावर धर्मोन्नतिमालेंत एक लेख लिहून आपलें बदललेलें मत त्यानीं प्रांजलपणें जाहीर केलें. त्या ठिकाणीं ते म्हणतात. " गुदस्त सालीं शिक्षणासाठीं स्वतंत्र शाळा निघावी, असें मला वाटत नव्हतें, ही गोष्ट मी प्रांजलपणें कबूल करतों. पण यंदा पालटलेल्या परिस्थितीप्रमाणें इतर शाळा व विद्यालयाबरोबर आपला विद्याश्रमहि निघाल्यास त्यांत कांहीं वावगें होत आहे असें न वाटतां; उलट अशी स्वतंत्र शाळा निघाल्यास व त्यांत व्यापारी वर्गास उपयुक्त अशा पूर्व शिक्षणाची सोय करतां आल्यास सांप्रतच्या राष्ट्रीय शिक्षणाला थोडेफार हातभार लावल्याचें श्रेयहि प्रस्तुत संस्थेच्या चालकांना मिळेल असें मला वाटूं लागलें आहे." प्रो. शेख्ये यांनीं आपलीं योजनेविषयींचीं मतें बदलल्याबरोबर ती जाहीर केली. पण ज्यांनीं फंडाचे कार्यावर टीका करणें हें ध्येयच मानलें होतें त्यांची थोडीच समजूत होणार होती ? शेख्ये यांच्या नांवाचा फक्त मिळेल तितका दिवस त्यांनीं उपयोग करून घेतला आणि शेख्यांच्या नांवाचा उपयोग आतां करतां येत नाहीं, असें दिसतांच त्यांच्या तोंडाला ' मधाचें बोट ' लागलें अशी कुत्सित टीका करण्यास सुरवात केली. शेख्ये यांनीं आपलें मत कार्य पटतांच बदललें परंतु त्यांच्या प्रतिकूल टीकेमुळें योजना ' अशक्य अयोग्य ' असे जें सामान्य लोकांचें मत

बनलें तें मात्र तितक्या लवकर परत बदलण्यासारखें नव्हतें. यावरून जबाबदार अशा व्यक्तीनें मत देतांना किती सावधगिरी ठेविली पाहिजे एवढी गोष्ट मात्र स्पष्ट दिसून येईल. पुढें प्रो. शेट्ये यांनीं आश्रमाचें कार्य इतकें उचलून धरिलें आहे कीं, आश्रमाच्या चालकांपैकींच तेहि आज आहेत.

अशीरीतीनें योजना मांडल्यानंतर तीविरुद्ध असें वातावरण उत्पन्न झालें. इतक्यांत निराशा उत्पन्न करणाऱ्या दोन गोष्टी घडल्या. पहिली गोष्ट विठोबा बाळशेट ऊर्फ अण्णासाहेब चिखले यांचा मृत्यु. कै. अण्णासाहेब चिखले यांचा दर्जा सर्व समाजास महशूर आहे. अनेक वर्षें तात्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनीं काम केलेलें होतें. व ते समाजाचे व फंडाचे कित्येक वर्षें अध्यक्ष होते. असा शांत स्वभावाचा वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुढारी समाजास क्वचितच लाभतो. फंडावर जीं नाना संकटें आलीं त्या वेळीं त्यांचीच सल्ला मुख्यतः मार्गदर्शक झाली आहे. त्यांची सल्ला इतकी अचुक असे कीं त्यांच्या सहकाऱ्यांनीं त्यांना त्याबद्दल 'बॅरिस्टर' असें म्हणावें. ते मनाचे अत्यंत उदार असून शैक्षणिक कामाबद्दल त्यांचा आदर निरतिशय होता. त्यांच्याकडून आपल्या समाजाच्याच नव्हे तर समाजाबाहेरीलहि अनेक विद्यार्थ्यांस कितीतरी मदत झालेली आहे. विद्याश्रमाची योजना मांडल्यानंतर अवघ्या तीनचार महिन्यांचे आंत मुंबईत मिति पौष व. ४ शके १८४१ रोजीं त्यांचें देहावसान झालें. कै. अण्णासाहेब चिखले यांच्या मृत्युचा आश्रमाचे योजनेवर अतीशय परिणाम झाला व ती मागेंच पडते कीं काय अशी परिस्थिति उत्पन्न झाली. त्यानंतर बरोबर सहा महिन्यानीं आषाढ व. ८ शके १८४२ रोजीं हरचिरी येथें बाळकृष्ण अनंतशेट बेर्डे वारले. बेर्डे यांचें घराण्याची समाजकार्याबद्दलची ख्याती बरीच जुनी आहे. कै. पांडुरंग अनंतशेट बेर्डे हे समाजाचे व फंडाचे कार्यकारी असे चिटणीस होते. पांडुरंगशेट समाजकार्यांत पडल्यापासून त्यांची तात्यांना फारच मदत झाली.

व्यापारानिमित्त, त्यांच्या भेंडीबाजारांतील पानाचे वखारीवर आपले समाजांतील व्यापारी हरहमेश येत. फंडाविषयीं कोणाच्या काय कल्पना आहेत, कोणाचे काय आक्षेप आहेत वगैरे सर्व गोष्टींची खडान्‌खडा माहिती त्यांच्या वखारीवर मिळत असे. त्यांची वखार म्हणजे फंडाची कचेरीच होती. फंडाच्या सभा महाजनवाडी उघडीपर्यंत त्यांच्याच वखारीवर होत. पांडुरंगशेट हेहि मनाचे उदार असून धर्मशाळेच्या वेळेपासून म्हणजे १८२८ पासून त्यांचें समाजकार्याकडे लक्ष लागलें. धर्मशाळेच्या पट्टींत आंकडा घालण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला होता. शिक्षणविषयक त्यांची कळकळ मरणसमयीं त्यांनीं आपले बंधू कै. बाळकृष्णशेट यांचेजवळ जी इच्छा प्रदर्शित केली तीवरून दिसून येते. पांडुरंगशेटच्या मागून त्यांचे बंधू बाळकृष्णशेट आले. त्यांची समाजविषयक आस्था पांडुरंगशेटपेक्षांहि कंकणभर सरसच होती. बाळकृष्ण हे कर्ते असे समाजाचे व फंडाचे चिटणीस होते. त्यांची दृष्टि माणसें जोडण्यांकडे कशी होती हें आपण मागें पाहिलेंच आहे. फंडाचे विरुद्ध टीकास्त्र सुरूं असतां त्यांनीं अत्यंत धीम्मेपणानें फंडाचें कार्य चालविलें इतकेंच नव्हे तर टीकेच्या काळांतहि त्याची प्रगति केली. पांडुरंगशेटप्रमाणेंच शिक्षणप्रसाराविषयीं त्यांची हांव दांडगी होती. वैश्य विद्याश्रमाच्या योजनेला त्यांचा मोठा पाठिंबा होता, व ते हयात असते तर आर्थिक दृष्ट्या आश्रमाला कितीतरी लौकर स्थैर्य आलें असतें. अशा प्रकारचा आश्रमाचा पाठिंबा नाहींसा झाल्यामुळें जिकडे तिकडे निराशा पसरली. योजना कधीं फलद्रुप होणार हे अनिश्चित होऊन बसले. सारांश टीकांच्या भाडिमारामुळें योजना ‘ अशक्य अयोग्य ’ असें वाटूं लागलें होतें आणि वरील दोन आपत्तीमुळें एकंदर निराशा उत्पन्न झाली होती.

परंतु परमेश्वरी योजना तशी नव्हती. आश्रमाची योजना कार्यस्थितींत उतरण्याची त्याची योजना आंतून निराळ्याच तऱ्हेनें चालली

होती. नासिक येथें भरलेल्या हिंदुधर्मपरिषदेकरितां श्री. अण्णासाहेब मोरे व ढवण असे दोन प्रतिनिधि निवडलेले मागें आलेंच आहे. परिषदेहून परत आल्यावर त्यांनीं परिषदेपासून बोध म्हणून सांगितला. महाजनवाडी उघडल्यानंतर जे पूजासमारंभ महाजनवाडींत सुरूं झाले त्यांत समाजाचे व फंडाचे पंचमंडळामार्फत एक ' सत्यनारायण ' करण्याचा, श्री. केशव कृष्णशेट देवळेकर, श्री. बाबूराव लक्ष्मणशेट संसारे, श्री. गोविंद बाबाजीशेट जैतपाल, कै. विठोबा बाळशेट तोडकरी ( मृत्यु आषाढ व. ८ शके १८४४ ) यांच्या विशेष खटपटीमुळें प्रघात पडला होता. भाद्रपद व. ५ शके १८४२ रोजीं पंचमंडळमार्फत पूजा समारंभ झाला. त्या प्रसंगीं श्री. मोरे व ढवण यांनीं परिषदेविषयीं माहिती सांगितली. श्री. ढवण यांनीं त्या वेळीं " समाजाची खरी सुधारणा करावयाची असेल, तर शिक्षणाचें कार्य आपण हातीं घेतलें पाहिजे. आज जसा समाजानें परिषदेंत भाग घेतला तसा आपला हितसंबंध असलेल्या बाहेरच्या चळवळींतहि भाग घ्यावा. त्याचा थोडाफार फायदा समाजाला मिळेल. त्यानें दृष्टि विशाल होईल. परंतु समाजाची खरी सुधारणा शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतल्याशिवाय होणार नाहीं हें मात्र खास. " अशा अर्थाचें भाषण केलें. समारंभ आटोपला व मंडळी घरोघर गेली. व्याख्यातेहि घरीं गेले. 'शिक्षणाचा प्रश्न हातीं घ्यावा असें आपण दुसऱ्यास सांगतों परंतु आपला कांहीं त्या प्रश्नांशीं संबंध आहे कीं नाहीं ?' असा तो प्रश्न समाजापुढें टाकणाऱ्यांना रात्रभर विचार करावा लागला. विद्याश्रमाची योजना धर्मोन्नतिमालेच्या पहिल्या पुष्पांत छापून समाजापुढें मांडलेली होतीच. परंतु वर सांगितलेल्या परिस्थितीमुळें तीवर विचार करणें मात्र बंद होतें. समाजानें शिक्षणाचा प्रश्न हातीं घ्यावयाचा म्हणजे विद्याश्रमाच्याच योजनेचा समाजानें स्वीकार करून कार्याला सुरवात करावयाची, असा विचार करून ढवण सकाळींच योजनाकारांकडे आले व " आज सायं-

काळीं कांहीं मंडळींशीं मला बोलावयाचें आहे. " असें त्यानीं सांगितलें " ठीक आहे आज सायंकाळीं बसूं या " असें अण्णासाहेब मोरे यांनीं सांगितलें. तात्या व रा. तुकाराम पुंडलीकशेट शेटचे यांना त्याप्रमाणें ढवण यांनीं जाऊन कळविलें. श्री. गजानन रघुनाथशेट देवळेकर व कै. लक्ष्मण केरोबा लुभण ( मृत्यु वैशाख शु. ६ शके १८४८ ) हे अण्णा-साहेब मोरे यांचे घरींच होते. ठरल्याप्रमाणें ही मंडळी अण्णा मोरे यांचें घरीं ( लॅमिंगटन रोड ) सायंकाळीं ५ वाजतां जमली. ढवण यांनीं, योजना मांडल्यापासून तिची कशी स्थिति झाली तें थोडक्यांत मांडून अशक्य, अयोग्य मानल्या जात असलेल्या योजनेचा प्रयोग करून पाहणें अवश्य आहे असें सांगितलें. ' फंड जर जबाबदारी घेण्यास तयार असेल तर कितीहि मुलें जमोत–पांच जमली तरीहि हरकत नाहीं–आपण हा प्रयोग पांच वर्षेंपर्यंत करण्यास तयार आहोंत. प्रयोग जर यशस्वी ठरला तर मग कायमचें हें कार्य शिरावर घ्यावें. " ढवण यांनीं आपला विचार मांड-तांच श्री. अण्णासाहेबांनीं सांगितलें, " या प्रयोगांत मी आश्वासन दिलेले वीस हजार रुपये खर्च झाले तरी मी करण्यास तयार आहे. " पैशाला पैसा ओढतो तेव्हां आश्वासनाच्या वीस हजाराचा खर्च प्रयोगांत न करतां त्याचें फक्त व्याज घेऊन व दुसरी जी मदत मिळेल ती घेऊन आश्रम सुरूं करावा असें सुचविण्यांत आलें.

आश्रमाची योजना समाजापुढें मांडण्यापूर्वीं तात्यांना वाचून दाखविण्यांत आली होती. त्या वेळीं त्यांनीं ' समाजास चांगलें दिवस राम दाखविणार. असे उद्गार काढले होते. तेव्हांपासून या क्षणापर्यंत योजनेविषयीं कांहीं एक ते बोलले नव्हते, परंतु होत असलेले प्रकार पहात होते. त्यांचें मनांत योजनेविषयीं कांहींतरी निश्चित विचार मात्र चाललेले असावेत. कारण योजना कार्यस्थितींत उतरण्याविषयीं विचार चालला असतांना अण्णासाहे-बांनीं तात्यांना "तात्या काय ठरवयावयाचें ?" असा प्रश्न करतांच कोणत्याहि

प्रकारचा विचार न करतां त्यांनीं एकदम "राम पुरें करील. कामाला सुरवात होऊं द्या." तात्यांनीं 'राम' पुरें करील असें म्हणतांच सर्वांना उत्साह वाटला. तात्यांच्या राम या शब्दांत खरोखरीच राम होता. विद्याश्रम ह्मणजे कांहीं लहानसान काम नव्हतें. परंतु तात्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. त्यांनीं पूर्ण आत्मविश्वासानें 'राम पुरें करील' असें ह्मणतांच जमलेल्या सर्व मंडळींना आनंद वाटला. ज्ञातिफंडाचे पंचमंडळापुढें हे विचार मांडावयाचें असें ठरून आश्रम केव्हां सुरूं करावयाचा याचाहि याच वेळीं खल झाला. अण्णासाहेबांनीं लागलेंच पंचांग काढून 'अक्षय्यतृतीया' हाच शुभ दिवस सुरवात करण्यास ठीक आहे' असें ह्मटलें. तात्यांना ही कल्पना पसंत पडल्यावर ती पंचमंडळास पसंत होणार याविषयीं शंकाच नव्हती. परंतु रीतसर ती कल्पना समाजाचे व फंडाचे पंचमंडळापुढें ठेवण्यांत येऊन पांच वर्षे प्रयोगादाखल० आश्रम उघडण्याचें निश्चित ठरलें. याच वेळीं दुसरी महाजनवाडी, व दत्तमंदीर होहि प्रश्न पुढें ठेवण्यांत येऊन मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें फंडाचीं त्रिविध ध्येयें आंखलीं गेलीं.

योजना मांडल्यानंतर बरोबर एक वर्षांनीं योजना मुक्रर झाली. व तसें आश्विन शु० १० शके १८४२ रोजीं श्री. दत्तात्रय सीताराम खेडेकर बी. ए., एलूएलू. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या समाजाचे दसरासंमेलनांत, 'शके १८४३ च्या अक्षय्यतृतीयेस पांच वर्षें प्रयोगादाखल आश्रम सुरूं होणार, असें जाहीर करण्यांत आलें. त्याच वेळीं ढवण यांनीं पांच वर्षेंपर्यंत आश्रमाचें कार्य करण्यास आपण तयार आहोंत असें जाहीर रीत्या सांगितलें. त्याचबरोबर त्यांनीं हेंहि सांगितलें कीं, "श्री. अण्णासाहेब मोरे, व श्री. विश्वनाथ गोपाळ शेख्ये यांचें शिक्षणाचे बाबतींत माझ्यावर जे अगणित उपकार झाले आहेत, त्यांतूनच अंशतः उतराई होण्याचा मार्ग ह्मणून हें कार्य मी करणार आहे." त्यानंतर अण्णासाहेबांनीं सासवनें येथील आपला बंगला पांच वर्षेंपर्यंत आश्रमास वापरण्यास देण्याचें जाहीर केलें.

याप्रमाणें आश्रम सुरू होण्याचें निश्चित झाल्यानंतर जी कांहीं पूर्व तयारी करावी लागते ती करण्यास सुरवात झाली. पहिली तयारी म्हणजे माणसांची. एका मनुष्यानें कांहीं आश्रम चालत नव्हता. आश्रमाला कळकळीची कार्यकर्ती माणसें मिळवून देण्याच्याहि ईश्वरी योजना निराळ्याच दृष्टीनें चालल्या होत्या. शके १८४२ च्या मार्गशीर्ष महिन्यांत नागपूर येथें राष्ट्रीय सभा भरल्यानंतर सरकारी शिक्षणावरील बहिष्काराची एक मोठी लाट सर्व हिंदुस्थानभर सुरू झाली. त्या वेळीं आपल्या समाजांतील कांहीं विद्यार्थ्यांनीं राष्ट्रीय सभेच्या हांकेला ' ओ ' देण्याकरितां शाळा, महाविद्यालयें सोडिलीं. आश्रमाचे सुरवातीस ढवण यांचेबरोबर श्री. बाळकृष्ण केरो लुमण, श्री. राजाराम सीताराम कापडी, श्री. शिवराम बाळकृष्ण मलुष्टे हे व पुढें सहा महिन्यानंतरच श्री. शंकर धोंडो सार्दळ हे जे आश्रमांत आले, ते सर्व या लाटेमध्यें राष्ट्राच्या हांकेसरसे शाळा व महाविद्यालयांतून बाहेर पडलेले होते. विद्याश्रमाची योजना तीन महिन्यापूर्वींच मुक्रर झालेली होती. आश्रमाविषयीं त्यांच्यात अगदीं पहिल्यापासून आपलेपणा होता. शाळा महाविद्यालयाचा अभ्यास त्यांनीं तहकूब केलेला होता. अशा स्थितींत आश्रमाला शक्य तितकी आपण मदत करावयाची असें ठरवून ती सर्व मंडळीं आश्रमसेवेस सज्ज झाली. असा हा चारपांच तरुण मंडळींचा संघ आश्रमास सुरवातीसच लाभला. ही सर्व मंडळी जशी शाळा महाविद्यालयांमध्यें एकमेकांची स्नेही होती, तशीच वैश्य विद्यार्थीसंघामुळें एकमेकांची सहकारीहि होती. अशी पुष्कळ दिवस एकत्र बसली उठलेली, एकत्र काम केलेली, जिवाभावाची मंडळी आश्रमास अगदीं सुरवातीला मिळाली व पुढें दोन तीन महिन्यांचे आंत श्री. शंकर लक्ष्मण चौधरी हेहि मित्रभावानें मिळाले. या सर्वांच्या मदतीवर आश्रमाचें कार्याची थोड्याच दिवसांत नमुनेदार अशा पायावर उभारणी झाली.

आश्रमाचा मुख्य घटक ब्रह्मचारी. आपल्या समाजाला शिक्षणाकरितां मुलें दूर ठेवण्याची अद्याप फारशी संवय नाहीं. तेव्हां मुलें कोण

पाठविणार ? मुलें कितीसी जमणार ? अशा प्रथम शंका होत्या. परंतु आश्रम निघण्याचें निश्चित झाल्यानंतर कित्येक पालकांकडून मुलांचीं नांवें सुचविण्यांत आलीं. व आश्रमाकरितां स्वतंत्र इमारत बांधल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें स्पष्ट दिसूं लागलें.

परंतु सुरवातीला सांपत्तिक दृष्ट्या आश्रमाची स्थिति काय होती ? योजना मांडली त्या वेळचें वीस हजारांचें आश्वासन व योजना मुक्रर झाली तेव्हां, श्री. धोंडो विश्रामशेट सुर्जन यांचे १२५ रु., श्री. सदाशिव गोविंदशेट संसारे २५ रु. व श्री. सीताराम तुकारामशेट मोरे ५ रु. याप्रमाणें देणग्या. या देणग्यांनींच आश्रमफंडाची सुरवात झाली असल्यामुळें यांना विशेष महत्व आहे. आश्रम सुरूं होण्याचे पूर्वीं शके १८४२ च्या मार्गशीर्षांत कुलाबा जिल्ह्यांत व शके १८४३ च्या चैत्र महिन्यांत संगमेश्वर–देवरुखपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यांत असे प्रचारकांचे दोन दौरे निघाले होते. या दोन दौऱ्यांतील अडीच तीन हजार रुपये. एवढाच काय तो सुरवातीचा आश्रमद्रव्यनिधि. आणि या निधीच्या बळावर आश्रम सुरूं करावयाचा ? केवढें धाडस होतें ? तात्यांना विचारण्यांत आलें. तात्यांनीं आश्रमाचे बाबतींत सगळाच हवाला रामावर दिलेला होता. त्याप्रमाणें तो इमारतींच्याहि बाबतींत दिला. आश्रमाचे कल्पनेच्या सुरवातीपासूनच तात्यांच्या मुखांतून ‘ राम ’ निघाला कीं अण्णासाहेबांचें पाऊल पुढें. हें मागें आपण पाहिलेंच आहे. याहि वेळेस तसेंच झालें. लागलेच अण्णा सासवन्यास निघाले. बरोबर कै. लक्ष्मणशेट लुमण, ढवण आणि महाजनवाडीच्या वेळेपासून ‘ समाजाचे ऑनररी मेस्त्री ’ म्हणून प्रसिद्धीस आलेले श्री. बाळकृष्ण बाबाजीशेट कोकाटे हेहि होते. ही सर्व मंडळी श्री. गजाननशेट देवळेकरांसह आश्रमाकरितां जागा कोणती पसंत करण्याची तें पाहूं लागली. आपल्या वाडींतच पश्चिम बाजूस आश्रम बांधावा अशी अण्णासाहेबांनीं सूचना आणिली. इत-

वयांत शेजारच्या कांट्याकुट्यांनीं युक्त अशा वाडींत मंडळी सहज शिरली. ती वाडी देवळेकरांची होती. श्री. गजाननशेट देवळेकर यांना के. लुमण यांनीं विचारलें. 'काय रे गजानन, येथें इमारत बांधावी नाहीं?' श्री. देवळेकरांनीं एका क्षणाचाहि विलंब न लावतां रुकार दिला. देवळेकरांचें घराणें आपल्या समाजांत कोणत्या दर्जाचें होतें तें आपण मागें चौथ्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. फंडस्थापण्याचें पूर्वींचें हें घराणें अत्यंत नांवा-जलेलें असें होतें. फंडाचा जो 'सातकलमी' ठराव दुसरीकडे दिला आहे त्यांत पहिलेंच नांव बापू हरशेट देवळेकर हें आहे. श्री. गजाननशेट हे याच बापू हरशेटचे नातू होत. समाजकार्यांत पूर्वींपासून पुढारलेलें देवळे-करांचें घराणें. आर्थात् घराण्याचा हा अनुवंशिक गुण गजाननशेटमध्येंहि वसत असल्यामुळें त्यांनीं एकदम होकार दिला. व दुसरे दिवसांपासून म्हणजे चैत्र शु. १ शके १८४३ पासून आश्रमाच्या इमारतीच्या कामास श्री. बा. बा. कोकाटे व श्री. ग. र. देवळेकर यांचे देखरेखीखालीं सुरवात झाली. व आश्रम उघण्याचे दिवशीं पहिल्या इमारतीचें काम बहुतेक पूर्ण झालें.

आश्रम हा समाजानें शके १८०५ पासून केलेल्या सर्व चळवळींचा कळस होता. तो कळस कोण चढवणार ? ज्या तात्यांनीं समाजकार्याचा पाया घातला त्यांनींच चढवावयाचा हें अगोदरच निश्चित होतें. अध्यक्ष निवडण्याचे बाबतींत, महाजनवाडी उघण्याचे वेळीं जो प्रकार घडला तोच याहि वेळीं घडला व शेवटीं तात्यांनाच हार खावी लागून अध्यक्षांचा 'हार' नाइलाजानें स्वीकारावा लागला. वैशाख शु. ३ शके १८४३ मंगळवारीं आश्रम उघडण्याचें आमंत्रणपत्रिकेद्वारा जाहीर करण्यांत आलें. एक वेळ 'अशक्य अयोग्य' कोटींतील मानली जात असलेली आश्रमाची योजना अवघ्या दीड वर्षांत शक्य कोटींत आलेली पाहून सर्वांस आश्चर्य व आनंद वाटला.

अखिल समाजाच्या भाग्योदयाचा तो दिवस. मग कोणाला आनंद वाटणार नाहीं ? शके १८०५ पासून समाजोन्नतीचे जे निरनिराळ्या ठिकाणीं प्रयत्न झाले त्या सर्व प्रयत्नांचें संयुक्त दृश्य फळ म्हणजे आश्रम. शके १८०९ सालीं पैसाफंड स्थापन झाला, हा समाजाच्या भाग्योदयाचा पाया होय. शके १८३८ सालीं महाजनवाडी उघडली गेली, हा समाजाच्या भाग्योदयाचा मध्य होय. आणि शके १८४३ सालीं वैश्य विद्याश्रम उघडला हा समाजाचे भाग्योदयाचा कळस होय. ज्यांनीं पाया घातला तेच कळसहि चढविण्यास लाभले, हा केवढा योगायोग ? स्वतः खणलेल्या तलावाचें पाणी पितांना मनुष्यास तें किती रुचकर लागतें, किंवा स्वतः लाविलेल्या झाडाचें फळ खातांना तें किती गोड लागतें, हें सांगून कोणासहि कळणार नाहीं. त्याच प्रमाणें स्वतः स्थापन केलेल्या कार्यावर कळस चढलेला पाहून त्या स्थापकास किती आनंद वाटत असतो यांची सांगून कशी कोणास कल्पना येईल ? धन्य ते तात्या, कीं आपल्या कार्यावर कळस चढत असलेला त्यांना स्वतःला दिसला ! भाग्यवान तो पुरुष, कीं त्याला आपणच पाया घातलेल्या कार्यावर आपल्याच हस्तें कळस चढविण्याचें भाग्य लाभलें.

ठरल्याप्रमाणें वैशाख शु. ३ शके १८४३ मंगळवारीं अक्षय्यतृतीयेस सायंकाळीं ३॥ वाजतां आश्रमाचे पहिल्या इमारतीच्या पुढें उभारलेल्या मंडपांत सभा भरली व अध्यक्षांनीं ‘ रामाच्या आज्ञेनें हा आश्रम उघडल्याचें मी जाहीर करतों ’ असें म्हटलें. तेव्हांपासून ही ज्ञानगंगा सुरू झाली. त्या वेळीं २९ ब्रह्मचारी त्या गंगेंत अवगाहन करण्याकरितां तयार होते. शके १८३८ मध्यें तात्यांनीं चारी धामांची गंगा आणून समाजाचा आळस व पाप धुवून टाकिले आणि शके १८४३ मध्यें समाजांतील अज्ञान धुवून टाकण्याकारितां ही ज्ञानगंगा सुरू केली.

प्रकरण सातवें.

# अखेर.

मृत्यु न ह्मणे हा विख्यात । मृत्यु न ह्मणे हा श्रीमंत ।
मृत्यु न ह्मणे हा अद्भूत । पराक्रमी ॥
मृत्यु न ह्मणे पुण्य पुरुष । मृत्यु न ह्मणे हरिदास ।
मृत्यु न ह्मणे विशेष । सुकृती नर ॥

—श्रीसमर्थ

पंचासीच्या पुढें तात्या पूर्ण वैराग्यशील असे बनले होते, हें मागें आलेंच आहे. धंद्यारोजगारावरून त्यांचें मन उडून गेलें होतें. फंडाचे कार्याविषयीं त्यांना काळजी वाटण्यासारखी स्थिति नव्हती. तात्या अगदीं पहिल्यापासून फंडाचें कार्यांत एक गोष्ट पहात आलेले होते कीं, कालनियमाप्रमाणें एक गेला तरी ईश्वर त्या जागीं दुसरा उभा करीत आहे. ती परंपराच लागून गेली होती. श्री. महादेव बाळकृष्णशेट बेंडे यांनीं आपल्या चुलत्यांची व वडिलांची परंपरा तशीच चालूं ठेवल्याचे पाहून तात्यांना आनंद वाटत असे. बाळकृष्णशेट बेंडे व गणपतशेट मोरे या जोडीला तात्या 'रामलक्ष्मण' असे म्हणत असत. परंतु बाळकृष्णशेट वारले व ती जोडी फुटली. तथापि ईश्वरानें लहानपणींच महादेवशेटना स्फूर्ति देऊन समाजकामांत ओढलें. तसेंच श्री. हरिभाऊ संभुशेट शेटये यांचे वडील संभु रामचंद्रशेट शेटये हे फंडस्थापनेच्या वेळचे पंच आहेत. हें दुसरीकडे दिलेल्या सातकलमी ठरावावरून वाचकांस दिसून येईल. संभुशेट शेटये यांचे चैत्र व. ८ शके १८२२ रोजीं देहावसान झालें. आपल्या वडिलांनीं सुरूं केलेलें हें कार्य आहे हें ओळखून हरिभाऊसुद्धां

महाजनवाडी उघडल्यापासून फंडाचें कार्याकडे आस्थेनें पाहूं लागले. दुसरी महाजनवाडी घेण्याचे वेळीं त्यांनीं आर्थिक दृष्ट्या जी जबाबदारी घेतली तीमुळें तर ती महाजनवाडी इतक्या त्वरित झाली. हरिभाऊ हे आज फंडाचे एक प्रमुख चालक आहेत. श्री. तुकाराम पुंडलीकशेट शेट्ये हेतर फंडाच्या कार्यांतील या सर्वांत जुने असे अनुभवी कार्यकर्ते आहेत. त्यानीं फंडावर आलेले बरेवाईट प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. त्यांतून फंडास बचावण्याकरितां त्यांनीं अत्यंत परिश्रम घेतलेले आहे. त्यांनीं तात्यांच्या निकट सहवासांत बरेंच दिवस फंडाचें कार्य केलें असल्यामुळें त्यांचा आभिमान स्फूर्तिजन्य असाच आहे. कोटांतील श्री. सदाशिव गोविंदशेट संसारे हे एक सालस मनाचे गृहस्थ महाजनवाडी उघडल्यानंतरच फंडांत लक्ष घालूं लागले. श्री. बाळकृष्ण हरशेट शेट्ये यांचा व तात्यांच्या परिचय फार दिवसांचा. गीतापाठाकरितां किती तरी वर्षें हमेश हे तात्यांबरोबर जात असत. त्यामुळें तात्यांच्या कार्याकडे यांचें लक्ष लागणें सहाजिकच आहे. अशीं एक कां दोन किती तरी मंडळी फंडाचे कार्याचा पुढाकार घेणारीं पुढें येत होती. फंडाचे महाजनवाडीचे बाबतींत ' महाजनवाडी ' हीं फंडाची शक्ति आहे. त्या शक्तीच्या उपासनेकरितांच फंड स्थापन झाला. परंतु ती पहिली महाजनवाडी जीर्ण होत चालली आहे. ती नवीन बांधणें हें फंडापुढें एक मोठें कार्य आहे. ती महाजनवाडी सतत उभी राहील तरच सभाजाचें एकंदर कार्य चालणार आहे. ' असें ते नेहमीं म्हणत असत. आणि जी नवीन मंडळी कामाला पुढें येत होती ती पाहून तर आपले अनुयायी आपली ही इच्छा पूर्ण करतील असें त्यांना वाटत होतें. सारांश फंडाचे बाबतींत त्यांचें मन अगदीं निश्चित झालें होतें. व म्हणून वयाच्या पन्नास वर्षांपासूनच परमार्थाकडे लागलेलें त्यांचें मन महाजनवाडी उघडल्यानंतर तिकडेच जोरानें ओढ घेऊं लागलें. आतां आपणास कशाचीहि काळजी नाहीं. ' रामाची केव्हां मेहरबानी होईल

ती खरी ' अशा प्रकाराचे विचार त्यांच्या मनांत एक सारखे घोळूं लागले, व तसें त्यांना भेटण्यास आलेल्या इष्टमित्रांजवळ ते बोलूं लागले.

परंतु वैश्य विद्याश्रम उघडल्यानंतर मात्र त्यांच्या मनानें उलट खाल्ल्यासारखें दिसूं लागलें. त्यांचें जरी खरें अंतःकरण अंतरींच्या आत्मारामाकडेच लागलेलें होतें तरी आश्रम सुरूं झाल्यानंतर त्यांचे विचार निराळ्या दिशेनें सुरूं झाले. ' मी आणखी दहा वर्षे तरी मरत नाहीं ' असें ते म्हणूं लागले. कथाकीर्तन वगैरे आपल्या नित्यव्यवसायांत खंड पडतो म्हणून ते मुंबईच्या बाहेर जाण्यास राजी नसत. तात्यांचें अंतःकरणांत मातृभूमीविषयीं किती प्रेम होतें याचें उदाहरण पुढें येईलच. त्या मातृभूमीच्या दर्शनास पूर्वीं एक दोन वर्षांनीं ते जात असत. परंतु शेवटीं पांच सहा वर्षांत एकदाहि ते आव्यांस गेले नाहींत. तीर्थयात्रेहून आल्यावर तात्या मलकापुरास आपल्या अक्काचे नातू श्री. एकनाथ बाळशेट गांधी यांचे घरीं फक्त एकदां गेले होते. म्हणजे मुंबईच्या बाहेर जाणें त्यांनीं वर्ज्यच केलें होतें. परंतु आश्रम उघडल्यानंतर एका वर्षांत तीन वेळ ते आश्रमांत गेले. म्हणजे अनुयायांकडे सर्व समाजाचें काम सोंपवून मोकळें होत असलेलें त्यांचें मन आश्रम उघडल्यावर परत समाजकार्याकडे पूर्वीपेक्षांहि जास्त जोरानें लागलें. तात्यांच्या मनाची अशी स्थिति होण्याचें कारण वैश्य विद्याश्रम उघडून समाजावर आलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांना पूर्ण होती हेंच होय. आणि ही जाणीव अंतकाळपर्यंत त्यांच्या मनांत कायम होती. शरीरानें प्रत्यक्ष जाणें शक्य होतें तोंपर्यंत आश्रमांत ते गेले. परंतु कविवर मोरोपंतांनीं वर्णिल्याप्रमाणें

कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली ॥
पुरस्सरगदासवें झगडतां तनू भागली ॥

अशी त्यांची स्थिति झाल्यावर शरीरानें त्यांना आश्रमांत जाणें अशक्य

झालें. परंतु मन मात्र त्या तपोवनाकडे जें लागलें होतें तें कायमचेंच. आश्रमाचें पहिल्यावर्षाचें कार्य त्यांनीं स्वतः पाहिलें होतें. आश्रम उघडण्यास ते प्रथम गेले. नंतर पहिल्या अधिवेशनाचे शेवटीं आश्विन व. ६ शके १८४३ रोजीं दुसऱ्यानदा गेले. शके १८४४ च्या अक्षय्य तृतीयेस आश्रमाचा प्रथम वार्षिक समारंभ श्री. बाळकृष्ण हरशेट शेळ्ये यांचे अध्यक्षतेखालीं झाला. त्या वेळीं अध्यक्षांबरोबर तात्या तिसऱ्यानदा गेले. हीच त्यांची आश्रमांतील शेवटची खेप. आश्रमाची खरी अंतर्बाह्य सुधारणा व वाढ त्यांना स्वतः पहाण्यास मिळाली नाहीं. द्रव्यनिधीची वाढ, इमारतींची वाढ, मुलांच्या संख्येची वाढ ही आश्रमाची बाह्य वाढ. या बाबतींत जरी बरीचशी वाढ तात्यांच्या हयातींतच झाली, तरी ती झालेली वाढ त्यांच्या प्रत्यक्ष दृष्टीखालून जाण्याचा योगमात्र दुर्दैवानें आला नाहीं. आश्रमाचें व्यापक ध्येयानुकुल कार्यक्रम आंखून घेऊन तदनुसार एक सूत्रि असें कार्य चालणें आणि त्याचीं खरीं फळें प्रत्यक्ष दिसूं लागणें, ही आश्रमाची अंतरवाढ. ही खरी वाढ दिसण्यास कालावधि लागणारच. परंतु शील—शरीर—स्वावलंबन—स्वाभिमान अशी आतां सर्वमान्य झालेली आश्रमीय चतुःसूत्रि आंखली जाऊन तिला अनुकूल असा आश्रमांतील कार्यक्रम ठरला जाऊन त्याचें संपूर्ण रीत्या पालन करण्याचे जे प्रयत्न चालूं आहेत त्यामुळें अंतरवाढीला सुरवात झाली असून थोडी फार पूर्व चिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. बाह्य वाढीची कल्पना वृत्तान्तांवरूनहि बरीचशी येऊं शकते.परंतु अंतरवाढ मात्र बाहेरून दिसणारी नाहीं. ती प्रत्यक्ष आश्रमांत जाऊन सूक्ष्मरीतीनें पहाणारांनाच दिसूं शकेल. ती पहाण्याकरितां 'आठपंधरा दिवस आश्रमांत राहण्यास मी निश्चित येणार' असें प्रस्तुत लेखकाजवळ त्यांनीं कितीदां तरी सांगितलें होतें. आश्रमांतील किंवा आश्रमांतून आलेले कोणीहि भेटलें तरी ' आश्रमाचें कसें काय चाललें आहे ? ' ही चौकशी ते इतक्या आस्थेनें व कळकळीनें

करीत कीं आपल्या घरचीहि खुशाली मनुष्य अशा तऱ्हेनें करणार नाहीं. आश्रमांत एखादा समारंभ असला कीं तात्याकडे आमंत्रण यावयाचें आणि त्या वेळीं त्यांनीं 'तुमचा समारंभ यशस्वी होईल.' असा आशीर्वाद द्यावा, आणि म्हणावें, " मला समारंभाकरितां यावयाचें नाहीं. फुरसती अंतीं थोडे दिवस रहाण्यासच यावयाचें आहे " विशेषतः ज्येष्ठ व. ५ शके १८४४ रोजीं वाईच्या प्राज्ञपाठशाला मंडळाचे उदार मतवादी अध्यक्ष वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे यांच्या नेतृत्वाखालीं पस्तीस ब्रह्मचाऱ्यांचा एकत्र उपनयनसंस्कार झाला त्यावेळीं, आणि श्रावण शु. १४ शके १८४५ रोजीं ब्रह्मर्षि महादेवशास्त्री दिवेकर यांच्या हस्तें पंचायतन स्थापना झाली त्या वेळीं, आश्रमांत येण्याची त्यांची अतीव उत्कंठा असतांना, तो योग त्यांच्या शरीरप्रकृतिमुळें घडून आला नाहीं. आपण हातीं घेतलेले धार्मिक प्रश्न अशा रीतिनें आश्रमांत सोडविले गेले हें ऐकून त्यांना अत्यंत समाधान वाटलें. आश्रमाचे तृतीय वार्षिक समारंभाचे वेळीं ( अक्षय्यतृतीया शके १८४६ ) आमंत्रण देण्यांस प्रस्तुत लेखक जराजर्जरित तात्यांकडे गेला असतांना त्यांनीं ' येत्या आश्विनमध्यें आठ पंधरा दिवस आश्रमांत रहाण्यास निश्चित येतों' असें अभिवचन दिलें होतें. इतकेंच काय पण मरणापूर्वी पंधरा वीस दिवस अगोदर हाच प्रश्न प्रस्तुत लेखकानें काढला असतां वरीलप्रमाणेंच आपला संकल्प त्यानीं सांगितला. परंतु ' संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें परमेश्वराची इच्छा उभी असते' हेंच नित्य तत्व अखेर खरें ठरलें. आणि अखेरीस ज्या ठिकाणीं तात्यांनीं आपलें सर्व चित्तवित्त लाविलें त्या आश्रमाला त्यांच्या पुण्यमय भेटीचा लाभ पहिल्या वर्षाचे पुढें लाभला नाहीं.

फक्त ' वैश्य विद्याश्रम ' उघडून तात्या मोकळे झाले असें नाहीं. आपल्या हस्तें आश्रम उघडला गेला आहे त्यामुळें आपल्या शिरावर केवढी जबाबदारी आहे, याची तात्यांच्या अंतःकरणांत पूर्ण जाणीव होती.

आपण कार्य सुरू केलें तेव्हां आपणांकडून शक्य असेल तितकें चिरस्थायित्व त्याला दिलें गेलें पाहिजे या तात्यांच्या कर्तव्यनिष्ठेमुळेंच आश्रमाला आजचें स्वरूप आलेलें आहे. आश्रमाच्या एकंदर सर्व विस्ताराचा विचार या ठिकाणीं करावयाचा नाहीं. परंतु तात्यांनीं, आपल्या हयातींत आश्रमाच्या चिरस्थायित्वाचा कसा पाया घातला आहे, एवढेंच मुख्यतः पहावयाचें आहे. आश्रम सुरू झाला तेव्हां 'प्रयोगादाखल' असें स्पष्ट म्हटलेलें होतें. जोंपर्यंत वैश्य ज्ञातिफंडानें आश्रमाचें कार्य कायमचें शिरावर घेतलें नाहीं तोंपर्यंत त्याला खरें स्थैर्य नाहीं, हें जाणून आश्रमास स्थायिक स्वरूप देण्याचा प्रश्न जेव्हां पुढें आला तेव्हां तात्यांनीं त्याला पूर्ण पसंति दर्शवून आपला होकार दिला. आपल्या समाजांत इतकी लोकादरास व विश्वासास पात्र झालेली ज्ञातिफंडाशिवाय दुसरी कोणती संस्था आहे ? तेव्हां आश्रमासारख्या अत्यंत महत्वाच्या कार्यांचा 'तें आपलेंच कार्य' म्हणून फंडानें स्वीकार केल्याशिवाय मनुष्यबल आणि द्रव्यबल याची वाढ कशी व्हावी ? ज्या कार्यांत वाढ नाहीं तें कार्य आहे त्या स्थितींतहि राहूं शकत नाहीं, असा निसर्गाचा कायदा आहे. झाडाची वाढ खुंटली कीं त्यांतील जोम कमी होऊं लागून तें मृत्युपंथास लागतें. आकाशांत उडविलेला चेंडु वर जाण्याचा बंद झाला कीं तो खालीं येऊं लागतो. वर न जातां जितक्या उंचावर गेला तेथेंच तो स्थिर राहत नाहीं. ज्या कार्यांत प्रगति नाहीं त्या कार्यांत स्थैर्य नसतें, अधःपात असतो. म्हणूनच सार्वजनिक कार्याचें काय किंवा व्यक्तिगत कार्याचें काय नेहमीं प्रगतिपर असेंच धोरण ठेवावें लागतें. मनुष्यबल व द्रव्यबल यांत वाढ होऊन आश्रमाचें कार्य नेहमीं प्रगतिपर रहाण्यास तें ज्ञातिफंडानें कायमचें शिरावर घेणें जरूर होतें. म्हणूनच आश्रमाला 'स्थायिक स्वरुप देण्याचा ठराव' येतांच तात्यांना तो पटला आणि ज्ञातिफंडानें त्यावर आपला शिक्कामोर्तब श्रावण व. २ शके १८४३ रोजीं मारला.

हा ठराव करण्यांत ‘ मनुष्यबळ आणि द्रव्यबळ ’ या दोन बलांची आश्रमास जोड मिळावी असा हेतु होता आणि त्याप्रमाणें तो साध्यहि झाला. कारण आश्रमास कायमची वाहून घेणारीं अशीं माणसें एका मागून एक हळुंहळुं मिळूं लागलीं तर दुसऱ्या बाजूनें देणग्या व वर्गण्या यांच्या रूपानें सर्व कोंकणस्थ वैश्यासमाजांतून द्रव्याचा ओघ अश्रामाकडे वाहूं लागला. योजनाकरांच्या वीस हजारांच्या आश्वासनाविषयीं शंका कारणारांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, योजनाकार श्री. अण्णासाहेब मोरे यांनीं आश्वासनाची फक्त ‘ सव्याजच ’ फेड केली असें नाहीं, तर शैक्षणिक प्रेमामुळें ‘ अडीच्या दिढी ’ त्यांनीं दिलें आहे. कारण वीस हजाराचें मूळ आश्वासन असतांना त्याचे तीस हजार सव्वा करून व रोख देऊन आश्वासनांतुन तें पूर्णपणें मुक्त झाले. आश्रमाचे कार्यास स्थायिक स्वरुप देण्यांत आल्याबरोबर श्रीमंतापासून गरीबापर्यंत ज्यांनीं त्यांनीं आपापल्या इच्छेप्रमाणें आंकडे घातले व ४।८ दिवसाचें आंत वीस हजाराचें वर आश्रमाचा द्रव्यनिधि जमला. तात्या आश्रमाला काय देतात हें जाणण्याची उत्सुकता कित्येकांची होती व तात्यांनीं प्रथमच पांच हजार सव्वा रुपयांचा आंकडा घातलेला पाहून ती त्यांची उत्सुकता पूर्ण झाली. परंतु तात्या अत्यंत खोल मनाचे होते. आश्रमाला चिरस्थायित्व देण्याविषयींचे त्यांचे विचार त्यांच्या खास सहकाऱ्यांनाहि शेवटपर्यंत कळले नाहींत. पुढें आश्रमाच्या इमारतींकरितां त्यांनीं दहा हजारांचें कर्ज दिलेलें होतें. तें कर्ज ते देणगी म्हणून आश्रमास देतील अशी कित्येकांची अपेक्षा होती. परंतु तात्यांच्या ‘ राम ’ शब्दांत कोणता राम आहे हें अखेरपर्यंत त्यांनीं कोणासहि कळूं दिलें नाहीं, बरोबरच आहे. गरजेल तो पडेल काय ? म्हणूनच आश्रमाच्या चिरस्थायित्वाबद्दल त्यांची जी योजना होती ती बाहेर सर्वांना अज्ञात होती. द्रव्यबल जसें आश्रमास पाहिजे तसें मनुष्यबळहि त्याबरोबरच अवश्य

हवें, हें एकेचाळीस वर्षांच्या सार्वजनिक चळवळीच्या अनुभवानें त्यांनीं पूर्ण ठरविलें होतें. म्हणूनच आश्रमास एखादा मनुष्य कायमचा मिळत आहे असें त्यांना सांगितलें कीं त्यांना कल्पनातीत आनंद होत असे. व अशा मनुष्यास प्रोत्साहन देऊन त्याला ते कार्यप्रवण करीत असत. तात्यांच्या वागण्यामध्यें, बोलण्यामध्यें दुसऱ्यास कार्यप्रवण करण्याची महा शक्ति होती. दुसऱ्यास कार्याला लावण्याची शक्ति तात्यांच्यांत किती होती हें तात्यांची सभेंतील भाषणें व खाजगी संभाषणें ज्यांनीं ऐकलीं असतील तेच जाणूं शकतील. ज्ञातिफंडाच्या कार्यांत काय आणि आश्रमाच्या कार्यांत काय जी कांहीं मंडळी आज कार्य करीत आहेत त्यांतील बऱ्याच जणांस तात्यांच्या प्रसवशक्तीची मदत झालेली आहे. ‘ द्रव्याभावीं मुलें घेतां येत नाहींत असें म्हणण्याचा प्रसंग आश्रमावर येऊं द्यावयाचा नाहीं. ’ अशी तात्यांची मोठी महत्वाकांक्षा होती. ‘ ज्ञातिफंडानें अखिल समाजाच्या उन्नतीचें हें आश्रमाचें कार्य सतत केलेंच पाहिजे. ज्ञातिफंडावर व अखिल समाजावर ही जबाबदारी आहे. आणि ती जबाबदारी त्यांनीं पार पाडलीच पाहिजे. ’ असें तात्या नेहमीं म्हणत असत. असो. अशा प्रकारें मनुष्यबल व द्रव्यबल आश्रमास मिळून आश्रम चिरस्थायी करण्याचे विचार त्यांचे अखेरपर्यंत चाललेले होते.

सार्वजनिक कार्यांत ‘ हें करावें तें करावें, ’ ‘ असें नको तसें हवें, ’ वगैरे बोलण्याइतकें सोपें जगांत दुसरें कांहींच नाहीं. बोलून चालूनच तें सार्वजनिक कार्य, तेव्हां तें सर्वांनींच करावयाचें. परंतु त्या सर्वांत आपणहि एक आहोंत याची ओळखहि बहुतेकांस नसते मग पुढचें करणें दूरच ‘ परोपदेशे पांडित्य ’ करण्याची जणूं काय सार्वजनिक कार्यांत पूर्ण मुभा आहे, असेंच कित्येकांस वाटत असतें. तात्या ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ अशा उच्च कोटींतील होते. म्हणून आश्रमाची समाजावर व फंडावर जी जबाबदारी आहे तिची जाणीव सर्वांना अधिकारवाणीनें करून देत अस-

तांना आपल्यावरील जबाबदारी आपण कशी पार पडणार याची योजना त्यांनीं अगाऊंच आपले मनांत कायम ठरवून ठेविली होती. 'आपल्या मिळकतीच्या उत्पन्नांतून आश्रमास दर महा १५० रुपये अव्याहत मिळत जावे.' अशी त्यांची ती मनांतील योजना होती. आश्रमाविषयीं केवढी ही कळकळ! आश्रमाविषयीं एवढी कळकळ त्यांना कां वाटावी? त्यांचा व्यक्तिगत प्रपंच नव्हता असें थोडेंच आहे? त्यांच्या मिळकतीला कोणी वारस नव्हता असेंहि नव्हतें. त्यांना तीन मुलगे झाले होते व ते तिघेहि लहानपणींच वारले खरें पण दत्तक घेऊन आपली सर्व मिळकत त्याचे स्वाधीन त्यांनीं केली असती तर त्यांचा कोणीहि हात धरणारा नव्हता. मग आश्रमाविषयींच त्यांना इतकी कळकळ कां वाटत होती? याचें खरें कारण तात्यांचा संसार 'घरदार—मुलेंबाळें' यांच्या पुरताच नव्हता. ते व्यक्तिगत प्रपंचांत पडले पण त्यांनीं खरा प्रपंच समाजाचा केला. तात्या जन्मले ते समाजाकरितांच. तात्यांनीं आयुष्यांत जें कांहीं केलें ते समाजकार्यच केलें. आणि जातांना ते समाजकार्यच करून गेले. सारांश समाजाशीं सर्वस्वी समरस झालेल्या पुरुषास व्यक्तिगत संसार कसा सुचणार आणि सुचविला तरी कसा रुचणार? सर्व समाज हें त्यांचें एक विशाल कुटुंब होतें. अर्थात् समाजांतील मुलेंही आपलींच मुलें असें त्यांना वाटलें आणि म्हणूनच त्या मुलांच्या शिक्षणाची जी होईल तितकी अव्याहत अखंड सोय आपल्याकडून व्हावी असें वाटून त्यांनीं मनामध्यें वर उल्लेखलेली अनुकरणीय अशी योजना करून ठेविली. आश्रमाकरितां—आपल्या लाडक्या अपत्याकरितां—त्यांना जितकें करतां येण्यासारखें होतें तितकें केलें. परंतु आश्रमाचें कार्य केवढें मोठें आहे याची त्यांना खरी जाणीव असल्यामुळें 'पांच लाख रुपये आश्रमाचा द्रव्यनिधि जमेल तेव्हांच आश्रम चिरस्थायी होईल.' असें ते नेहमीं बोलत असत. 'आश्रम चिरस्थायी कसा होईल?' ही काळजी तात्यांना शेवटपर्यंत लागून राहिलेली होती. जणूं काय तो हृद्रोगच त्यांनीं लावून घेतला होता.

हवें, हें एकेचाळीस वर्षांच्या सार्वजनिक चळवळीच्या अनुभवानें त्यांनीं पूर्ण ठरविलें होतें. म्हणूनच आश्रमास एखादा मनुष्य कायमचा मिळत आहे असें त्यांना सांगितलें कीं त्यांना कल्पनातीत आनंद होत असे. व अशा मनुष्यास प्रोत्साहन देऊन त्याला ते कार्यप्रवण करीत असत. तात्यांच्या वागण्यामध्यें, बोलण्यामध्यें दुसऱ्यास कार्यप्रवण करण्याची महा शक्ति होती. दुसऱ्यास कार्याला लावण्याची शक्ति तात्यांच्यांत किती होती हें तात्यांची सभेंतील भाषणें व खाजगी संभाषणें ज्यांनीं ऐकलीं असतील तेच जाणूं शकतील. ज्ञातिफंडाच्या कार्यांत काय आणि आश्रमाच्या कार्यांत काय जी कांहीं मंडळी आज कार्य करीत आहेत त्यांतील बऱ्याच जणांस तात्यांच्या प्रसवशक्तीची मदत झालेली आहे. ‘ द्रव्याभावीं मुलें घेतां येत नाहींत असें म्हणण्याचा प्रसंग आश्रमावर येऊं द्यावयाचा नाहीं. ’ अशी तात्यांची मोठी महत्वाकांक्षा होती. ‘ ज्ञातिफंडानें अखिल समाजाच्या उन्नतीचें हें आश्रमाचें कार्य सतत केलेंच पाहिजे. ज्ञातिफंडावर व अखिल समाजावर ही जबाबदारी आहे. आणि ती जबाबदारी त्यांनीं पार पाडलीच पाहिजे. ’ असें तात्या नेहमीं म्हणत असत. असो. अशा प्रकारें मनुष्यबल व द्रव्यबल आश्रमास मिळून आश्रम चिरस्थायी करण्याचे विचार त्यांचे अखेरपर्यंत चाललेले होते.

सार्वजनिक कार्यांत ‘ हें करावें तें करावें, ’ ‘ असें नको तसें हवें, ’ वगैरे बोलण्याइतकें सोपें जगांत दुसरें कांहींच नाहीं. बोलून चालूनच तें सार्वजनिक कार्य, तेव्हां तें सर्वांनींच करावयाचें. परंतु त्या सर्वांत आपणहि एक आहोंत याची ओळखहि बहुतेकांस नसते मग पुढचें करणें दूरच ‘ परोपदेशे पांडित्य ’ करण्याची जणूं काय सार्वजनिक कार्यांत पूर्ण मुभा आहे, असेंच कित्येकांस वाटत असतें. तात्या ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ अशा उच्च कोटींतील होते. म्हणून आश्रमाची समाजावर व फंडावर जी जबाबदारी आहे तिची जाणीव सर्वांना अधिकारवाणीनें करून देत अस-

तांना आपल्यावरील जबाबदारी आपण कशी पार पडणार याची योजना त्यांनीं अगाऊंच आपलें मनांत कायम ठरवून ठेविली होती. 'आपल्या मिळकतीच्या उत्पन्नांतून आश्रमास दर महा १५० रुपये अव्याहत मिळत जावे.' अशी त्यांची ती मनांतील योजना होती. आश्रमाविषयीं केवढी ही कळकळ! आश्रमाविषयीं एवढी कळकळ त्यांना कां वाटावी? त्यांचा व्यक्तिगत प्रपंच नव्हता असें थोडेंच आहे? त्यांच्या मिळकतीला कोणी वारस नव्हता असेंहि नव्हतें. त्यांना तीन मुलगे झाले होते व ते तिघेहि लहानपणींच वारले खरें पण दत्तक घेऊन आपली सर्व मिळकत त्याचे स्वाधीन त्यांनीं केली असती तर त्यांचा कोणीहि हात धरणारा नव्हता. मग आश्रमाविषयींच त्यांना इतकी कळकळ कां वाटत होती? याचें खरें कारण तात्यांचा संसार 'घरदार—मुलेंबाळें' यांच्या पुरताच नव्हता. ते व्यक्तिगत प्रपंचांत पडले पण त्यांनीं खरा प्रपंच समाजाचा केला. तात्या जन्मले ते समाजाकरितांच. तात्यांनीं आयुष्यांत जें कांहीं केलें ते समाजकार्यच केलें. आणि जातांना ते समाजकार्यच करून गेले. सारांश समाजाशीं सर्वस्वी समरस झालेल्या पुरुषास व्यक्तिगत संसार कसा सुचणार आणि सुचविला तरी कसा रुचणार? सर्व समाज हें त्यांचें एक विशाल कुटुंब होतें. अर्थात् समाजांतील मुलेंही आपलींच मुलें असें त्यांना वाटलें आणि म्हणूनच त्या मुलांच्या शिक्षणाची जी होईल तितकी अव्याहत अखंड सोय आपल्याकडून व्हावी असें वाटून त्यांनीं मनामध्यें वर उल्लेखलेली अनुकरणीय अशी योजना करून ठेविली. आश्रमाकरितां—आपल्या लाडक्या अपत्याकरितां—त्यांना जितकें करतां येण्यासारखें होतें तितकें केलें. परंतु आश्रमाचें कार्य केवढें मोठें आहे याची त्यांना खरी जाणीव असल्यामुळें 'पांच लाख रुपये आश्रमाचा द्रव्यनिधि जमेल तेव्हांच आश्रम चिरस्थायी होईल.' असें ते नेहमीं बोलत असत. 'आश्रम चिरस्थायी कसा होईल?' ही काळजी तात्यांना शेवटपर्यंत लागून राहिलेली होती. जणूं काय तो हृद्रोगच त्यांनीं लावून घेतला होता.

मनाला हा रोग तर तितके शरीराला दुसराच रोग. वयाच्या पन्नासीच्या पुढें तात्यांना ' अंतर्गळ ' किंवा ' अंत्रवृद्धि ' या नांवाचा रोग जडलेला होता. इंग्रजीमध्यें त्यालाच ' हर्निआ ' ( Hernia ) असें नांव आहे. हा रोग पोटाच्या स्नायूंची शक्ति कमी झाल्यानें होतो. वैद्यविनोदांत या रोगाचें वर्णन ' पक्वाशयाचे ठायीं कुपित झालेला वायु जेव्हां आंतडें दुमडून स्वस्थानापासून खालीं नेतो तेव्हां अंडसंधींत आंतडें ग्रंथीसारखें करितो, तो ग्रंथी दाबला असतां वायु शब्द करीत आंत जातो आणि पुनः सोडला असतां अंडाची शीर फुगवीत येतो त्यास अंत्रवृद्धि म्हणतात. ' असें केलेलें आहे. मनुष्याचें अंगांत जोंपर्यंत ताकद असते तोंपर्यंत त्यापासून विशेष त्रास होत नाहीं. परंतु शक्ति क्षीण झाल्यावर मात्र तो फार त्रासदायक होतो. मरणापूर्वीं पांच सहा वर्षांपासून ते ठकत चालले होते. परंतु लहानपणीं दुधदुभत्यावर त्यांचें शरीर वाढलें असल्यामुळें तरुणपणींहि आहारविहार अगदीं नियमित ठेवल्यामुळें आणि नेहमीं आनंदवृत्ति राखिल्यामुळें त्यांची शरीरप्रकृति अगदीं उतारवय होईपर्यंत निकोप राहिली होती. वयोमानाप्रमाणें प्रकृति क्षीण होऊं लागली व त्या रोगानें त्यांना त्रास देण्यास सुरवात केली. तेव्हांपासून त्यांनीं घर सोडून मुंबई बाहेर जाण्याचें वर्ज्य केलें. दहाबारा वर्षें ते धोबीतलावावर पिकेट रोड येथें होणाऱ्या प्रवचनाला नित्यनेमानें जात असत. त्यांची बसण्याची जागा× अगदीं ठरलेली असे. जेव्हां अतिशयच त्रास होऊं लागला तेव्हां प्रवचनालाहि जाण्याचें त्यांना बंद करावें लागलें. दोन दिवस तात्यांची जागा उघडी

× तात्या प्रस्तुत लेखकास मार्गशीर्ष शु. १ शके १८४१ रोजीं प्रवचनास मुद्दाम घेऊन गेले होते. त्याच वेळीं ' ही आमची नित्य बसण्याची जागा ' म्हणून त्यांनीं दाखविली. ती जागा प्रवचनकाराच्या पुढें थोडी उजव्या हातास आहे. प्रस्तुत लेखक तेथें गेला त्या दिवशीं ' मासानां मार्गशीर्षोऽहम् ' असें श्रोतृसमूहापुढें फळ्यावर लिहून ठेवलेलें चांगलें आठवतें.

दिसल्याबरोबर नियमित तेथें जाणाऱ्या मंडळींनां हे ‘ छत्रीवाले ’ कोठें आहेत, म्हणून शंका आली. व तात्या आजारी असल्याचें समजल्यावर त्यांतील कित्येक मंडळी तात्यांना पहाण्यांस घरींहि येऊं लागली. महाजनवाडींत कसलीहि सभा होवो तात्या हजर नाहींत असें कधीं व्हावयाचेंच नाहीं. शके १८४५ च्या पौष महिन्यापासून महाजनवाडींतहि येणें त्यांचें बंद झालें. पौष व. ५ शके १८४५ रोजीं महाजनवाडींत पंचांची सभा भरली होती. हीच त्यांची महाजनवाडीला शेवटची भेट. त्या निर्जिव इमारतीला जर त्या वेळीं कळतें कीं, ज्यांनीं आपली उभारणी केली तो यापुढें आपणांस भेटणार नाहीं तर तीहि ढळढळां रडूं लागली असती आणि आपल्या जन्मदात्याच्या पायाला मिठी मारून, त्याचे चरणांवर तिनें अश्रूंचा अभिषेक धरला असता. त्या सभेंत जे ठराव झाले आहेत त्यांत एल्फिन्स्टन रोडवरील महाजनवाडी शेजारीं दुकानें काढण्याची परवानगी, व वैश्य विद्याश्रमाच्या अपुऱ्या इमारतींची कामें पुरी करण्याची परवानगी देण्याचे दोन महत्वाचें ठराव मंजूर झाले. खालीं अध्यक्ष या नात्यानें तात्यांनीं सही केली आहे. हेंच त्यांनीं केलेले शेवटचे ठराव आणि हीच त्यांची शेवटची सही. यानंतर महाजनवाडींत येणें नाहीं, सभेंत बसणें नाहीं, ठराव करणें नाहीं, कांहीं नाहीं. त्या दिवशीं महाजनवाडी तात्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाला कायमची मुकली आणि पंचमंडळींहि तात्यांच्या अनुभवाच्या अशा सल्लामसलतीलाहि कायमची अंतरली.

‘ मी कांहीं इतक्यांत जात नाहीं ’ असा ते सर्वांना धीर देत होते, परंतु ‘ आपला अंतकाळ जवळ आला ’ असें मात्र त्यांना पक्कें समजून चुकलें होतें. आपण फार दिवस आतां वाचत नाहीं, असें त्यांना वाटूं लागतांच आपल्या अखेरच्या योजनेप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्याची त्यांनीं घाई आरंभली. एके दिवशीं श्री. दशरथ वासुदेवशेट कोलते व श्री. पांडुरंग नारायण चिखले यांना जवळ बोलावून त्यांनीं सांगितलें ‘ हें घर मोडावयाचें माझ्या मनांत आलें आहे. रहायला कुठें तरी जागा पहा.’ श्री. दशरथशेट हे

तात्यांचे पुतणे असून आपला धंदारोजगार त्यांनींच पुढें चालवावा अशी तात्यांची इच्छा होती. श्री. पांडुरंगराव हे तात्यांचे स्नेही कै. अण्णासाहेब चिखले यांचे नातु असून केवळ मित्रप्रेमास्तव मित्राच्या निधनानंतर तात्यांनीं त्यांना जवळ केलेले होते. तात्यांच्या इच्छेप्रमाणें दुसरी जागा बघण्यांत आली. कर्मधर्मसंयोगानें फंडानें शके १८१० मध्यें ठाकुरद्वार येथें जें पहिलें घर घेतलें व जें अद्यापहि फंडाचें घर म्हणून संबोधलें जात आहे त्या घराशेजारींच अगदीं लागूनच ही जागा मिळाली. तात्यांना उचलून या नवीन बिऱ्हाडीं नेण्यांत आले व लागलेंच चैत्र शु. १ शके १८४६ रोजीं तात्यांच्या घराचें कामास सुरवात करण्यांत आली. या तात्यांच्या नवीन घरास जें ‘ श्रीआंबेश्वर भुवन ’ असें नांव दिलें आहे तें घराचे कामास सुरवात करतांना ‘ श्रीआंबेश्वर ’ असें त्यांनीं खातें घातलें होतें त्यावरूनच होय.

अशा स्थितींमध्यें तात्यांनीं हें घराचें काम कशाला काढलें हें कोणासच कळेना. दशरथशेट, पांडुरंगराव मंडळीशिवाय तात्यांनीं घराचें कामास कां सुरवात केली याची कोणासच कल्पना बांधतां येईना. आपण फार दिवसाचे सोबती नाहीं खरें पण हें घर आपण पुरें करूं, आपल्या समक्ष जी कांहीं नातेवाईकांची सोय करावयाची ती करूं, आणि घराच्या उत्पन्नांतील ‘ सिंहाचा भाग ’ ( Lion's share ) आपल्या हातानें आश्रमाला देऊं. इतकें होईपर्यंत कांहीं आपण जात नाहीं अशी तात्यांची खात्री असावी. घराचें कामास मोठ्या तातडीनें सुरवात झाली. धर्मशाळा ज्या सरीफ भाई थावरांनीं बांधून दिली त्यांच्याच देखरेखीखालीं हें घराचें काम चाललें होतें. सरीफभाईनीं कान्ट्रॅक्टरचा धंदा सोडला होता. परंतु केवळ तात्यांच्या मोहबतीखातर त्यांनीं हें घर बांधण्याचें काम अंगावर घेतलें. जुनें घर पाडलें. पाया खणला. तो भरला. तळ मजलाहि बहुतेक पूर्ण झाला. वरतीं माळें चढलीं.

परंतु इकडे त्या इमारतीचा खांब, त्या इमारतीचाच कसला सर्व समाजाचा खांब, जो तात्या तो डळमळूं लागला. आप्तेष्टांचीं अंतःकरणें डळमळलीं. तात्या अत्यवस्थ आहेत हें ऐकून त्यांच्या समाजबंधूंचें धैर्य खचलें. इष्टमित्र हळहळले. त्यांचे आप्तेष्ट समाचारास येऊं लागले. समाज बंधु भेटीस धावूं लागले. इष्टमित्र धीर देऊं लागले. तात्यांच्या सुश्रुषेस त्यांच्या तिघीहि बहिणी आलेल्या होत्या. दशरथशेटे व पांडुरंगराव यांनीं सर्व प्रयत्न करून पाहिले. सर्व औषधोपचार झाले. परतु जेथें आयुष्याचीच दोरी तुटली येथें मानवी उपाय काय करणार ? सर्वांनीं आशा सोडली. शेवटीं काय होणार हें तात्याहि समजून चुकलें. परंतु त्यांनीं चेहऱ्यावरील आनंद मावळूं दिला नाहीं.

अखेरीस श्रावण व. १ शुक्रवारीं सायंकाळीं उलटी होऊन उचकी लागली. त्या रात्रींपासून ते बेशुद्ध झाले. अण्णासाहेब मोरे यांचेकडे मनुष्य आला. अण्णांनीं डॉक्टर नेले व शुद्धीवर आणण्याचे जितके उपाय होते तितके करून पाहिले. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं श्रावण शु. ४ शके १८४६ सोमवारीं पहाटे ४॥ वाजतां तात्यांनीं देह ठेविला. ज्योत ज्योतींत मिळाली ! तत्व तत्वांत एकरूप झालें ! ! आणि मागें चंदनाप्रमाणें परोपकारार्थ झिझलेला तात्यांचा देह मात्र राहिला ! ! !

ती काळ रात्र संपली नाहीं तोंच ही अशुभ वार्ता गांवभर वाऱ्यासारखी पसरली. मुंबईच्या चारी दिशेला असणाऱ्या वैश्यबंधूंना ही बातमी समजली व ते तात्यांच्या शेवटच्या दर्शनास आले. तात्यांचे अनेक इष्टमित्रहि जमले. स्मशानयात्रेस ११॥ वाजतां सुरवात झाली. पुढें नळबाजार येथील वैश्य मंडळीचा ‘ श्रीरामदास प्रासादिक भजनी मेळा. ’ ठाकुरद्वाराहून निघून फणसवाडींतून ही स्मशानयात्रा कांदेवाडींतील महाजनवाडीसमोर आली. महाजनवाडीसमोर तात्यांचा मृतदेह उतर-

ण्यांत आला. समाजाचे व फंडाचे तर्फे दुय्यम चिटणीस श्री. हरिभाऊ संभु शेट्ये यांनीं एक 'शाल' तात्यांच्या शवावर घातली व मुख्य चिटणीस श्री. अण्णासाहेब मोरे यांनीं हार घालून वंदन केलें. त्यानंतर कोटकुलाबा, मार्केट, मांडवी, नळबाजार, गिरगांव, भायखळा, परेल, दादर वगैरे ठिकाणच्या वैश्य मंडळींनीं पुष्पहार चढाविलें. त्या वेळचा तो देखावा जसा गंभीर तसा अपूर्वहि होता. ज्या महाजनवाडीसाठीं तात्यांनीं तीस वर्षे तपश्चर्या केली, त्या महाजनवाडीसमोर तात्यांचा मृत देह ठेविलेला, ज्या समाजाचे उद्धाराकरितां तात्यांनीं आपलें उभें आयुष्य वेंचलें तो समाज सभोंवतीं उभा. अशा स्थितींत समाजातर्फे अद्याप कोणाचाहि झाला नसेल असा बहुमान तात्यांचा मृतदेहाचा करण्यांत आला. महाजनवाडीनें डोळे भरून तात्याना एकदा पाहिलें आणि हृदयांत साठवून ठेविलें. नंतर स्मशानयात्रा पुढें चालूं झाली व मुगभाटमधून गिरगांव रस्त्यानें सोनापुरांत दुपारीं तीन वाजतां ती पोंहचली. चिता रचण्यांत आली. चंदनकर्पूरपरिमल द्रव्यें वरतीं ठेवण्यांत आलीं. तात्यांचा स्थूल देह अग्निसात् होण्यापूर्वीं प्रो. विश्वनाथ गोपाळ शेट्ये व श्री. तुकाराम पुंडलीकशेट शेठ्ये यांनीं अत्यंत हृदयस्पर्शीं अशीं तात्यांचे गुणवर्णनपर भाषणें केलीं. अग्निसंस्कार करण्यांत आला. चितेंतून ज्वाळाचे लोट जों जों निघूं लागले, तों तों दिग्मूढ होऊन सभोंवतीं उभ्या असलेल्या मंडळींच्या हृदयांतून शोकाचे हुंदके येऊं लागले. कांहीं वेळानें चिता शांत झाली. परंतु मंडळीच्या हृदयांत पेटलेला शोकाग्नि कसा शांत होणार? तात्यांचा देह पुनः दृष्टीस पडणें शक्य नव्हतें. परंतु तात्या खरोखर मृण्मयशरीरांत नव्हते. ते आपल्या कामगिरींत होते. तेव्हां जरी तात्यांचा पार्थिव देह दृष्टिआड झाला, तरी त्यांची कामगिरी दृष्टीआड होणारी नव्हती. तिचेंच चिंतन करीत मंडळी घरोघर परतली. मर्ति गेली आणि किर्ति राहिली!!

---

प्रकरण आठवें.

# सामाजिक कामगिरीचें स्वरूप.

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा हो खेद । भक्त जनीं ॥

—श्रीसमर्थ.

श्रीसमर्थांच्या प्रयाणकालीं 'इतःपर या मूर्तीचें दर्शन घडणार नाहीं' म्हणून सर्व शिष्यमंडळींस अत्यंत वाईट वाटलें. त्या वेळीं वर शिरोभागीं दिलेले शब्द उच्चारून समर्थांनीं आपल्या कृतीकडे बोट दाखविलें. त्याचप्रमाणें तात्यांच्या प्रयाणकाळीं जर कोणी विचारलें असतें, "तात्या, आम्ही तुम्हांला आतां कोठें हो पहावें ?" तर "मला पैसाफंडांत पहा ! मला महाजनवाडींत पहा ! ! मला वैश्य विद्याश्रमांत पहा ! ! !" असेंच तात्यांनीं त्यास त्रिवार सांगितलें असतें. तात्या—खरे तात्या—गेले नाहींत. ते आपल्या कामगिरींत आहेत. त्या कामगिरीचें यथार्थ स्वरूप कळलें तर असें वाटेल कीं, तात्या गेले कसले ? तात्या चिरंजीव आहेत.

कित्येकदां दुर्दैवानें असा चमत्कार पहावयास मिळतो कीं, एखादा पुण्य पुरुष आपलें जीवितकार्य करून जातो. लोकांपुढें त्याचें कार्य मूर्तिमंत उभें असतें. परंतु त्या कार्याचें स्वरूप कोणतें या मुख्य बाबतींतच दुमत होतें. या महत्वाच्या प्रश्नावरच मोठीं रणें माजून रहातात. परंतु आपल्या चरित्रनायकाचें जीवितकार्य इतकें रेंखीव आणि निश्चित आहे कीं, तात्यांनीं आपल्या आयुष्यांत काय केलें ? याचें उत्तर एखादा शाळेंतील विद्यार्थीहि देऊं शकेल. तात्यांच्या जीवितकार्याचे बाबतींत

कधींहि दुमत होणार नाहीं इतकें तें रेखीव आहे. तात्यांच्या कामगिरींत कधींहि दुमत होणार नाहीं इतकी ती निश्चित आहे.

तात्यांचें कार्य त्यांचे समाजापुरतेंच होतें. ते मोठ्या धर्मकारणांत पडले नाहींत कीं, राजकारणाच्या आखाड्यांत उतरले नाहींत. समाजाच्या चतुःसीमेंतच त्यांनीं आपलें जीवितकार्य केलें. परंतु तें इतकें उत्तम केलें, इतकें नमुनेदार केलें कीं, त्याला आपल्या समाजाच्या इतिहासांत दुसरी जोड मिळणार नाहीं. थोर पुरुषाचें मुख्य लक्षण ‘ ज्याच्या हातून मोठें कार्य होतें तो थोर ’ असें नसून ‘ हातीं घेतलेलें कार्य जो उत्तम प्रकारें करतो तो थोर ’ असें आहे. तात्यांनीं धर्मकारण, राजकारण हातीं घेतलें नाहीं. त्यांनीं समाजकारणच हातीं घेतलें आणि तें त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें करून दाखविलें कीं, त्याला कोणत्याहि समाजांत क्वचितच तोड मिळेल. कोणतें कार्य ‘ जीवितकार्य ’ म्हणून ठरवावयाचें हें पुष्कळ अंशीं परिस्थितीवर अवलंबून असतें. कोणतें कार्य आपण करणार हें ठरविण्यास मनुष्य सर्वस्वी मुखत्यार नसतो. लोकमान्य टिळक, दे. बं. दास अशा महात्म्यांनींहि ‘ राजकारणाच्या आखाड्यांत आम्हांला इच्छेच्या विरुद्ध पडावें लागलें. ’ असेंच म्हटलें आहे. आणि आज महात्मा गांधीहि तसेंच म्हणतात. यावरून मनुष्याचा खरा थोरपणा त्यानें हातीं घेतलेल्या कामावरून न ठरवितां त्यांनीं ज्या पद्धतीनें तें कार्य केलें तीवरून ठरविला पाहिजे. तात्यांनीं समाजकारणच केलें खरें. पण तें अशा तऱ्हेनें केलें कीं, समाजकारण करणाऱ्या कोणीहि त्यांचें उदाहरण आदर्श म्हणून घ्यावें. त्यानीं जी समाजाची कामगिरी केली ती अशा पद्धतीनें केली कीं, समाजाचे कामांत पडणाऱ्या प्रत्यकानें त्यांचें उदाहरण कित्ता म्हणून पुढें ठेवावें. त्यांनीं जी ज्ञातीची सेवा केली ती अशी नमुनेदार केली कीं, कोणत्याहि ज्ञातीसेवकानें त्यांचें उदाहरण नमुना म्हणून मानावें. सारांश तात्या समाजकारणांत पडले पण त्यांत इतके उच्च कोटीला पोंहचले

आहेत कीं, समाजकारणांत ते अतुल, अनुपम ठरले आहेत. समाजकारणांत तात्या हे ' उपमानपद ' झाले आहेत. तात्यांचें जीवनचरित्र अशा प्रकारचें झालें आहे कीं, समाजकारणशास्त्राचे नियम त्यांच्या चरित्रावरून बसवावेत.

समाजकारणांत तात्या शके १८०५ मध्यें पडले. त्या वेळीं त्यांचें वय एकवीस वर्षांचें होतें. त्या वेळीं ते अगदीं तरुण होते. तात्यांच्या वयाचे त्यांच्या समाजांतील तरुण त्या वेळीं कोणता मार्ग आंखीत होते ? आणि तात्यांनीं कोणता आंखला ? धंदारोजगार करावा, पैसाआडका मिळवावा, घरेंदारें बांधावींत आणि मानमान्यतेस चढावें, हें तरुणांच्या पुढील ध्येय. तात्यांनींहि हें सर्व केलें. त्यांनीं धंदारोजगार केला, त्यांत दोन पैसेहि मिळविले, घरदारहि बांधलें, मानमान्यताहि मिळविली. परंतु तात्यांचें हें ध्येय नव्हतें. समाजसेवा हें त्यांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय ठरविलें. त्यांना काय कमी होतें म्हणून त्यांनीं हा मार्ग स्वीकारला ? त्यांना घरदार होतें, आई होती, बहीणभाऊ होते, नुक्तेच लग्न झालें होतें. नोकरीचाकरीहि चांगली लागली होती. मग हा समाजसेवेचा मार्ग त्यांनीं कां पसंत केला ? सामान्य लोकांचा राजमार्ग सोडून त्यांनीं हा बिनमळलेला मार्ग कां अंगिकारला ? या मार्गांत त्यांनीं कोणतें सुख पाहिलें ? या ' फंदांत ' त्यांना कोणता मोठेपणा दिसला ? समाजसेवेंत संकटें आहेत, त्रास आहे, उपहास आहे, हें त्यांना दिसलें नाहीं काय ? हें सर्व त्यांना स्पष्ट दिसत होतें. परंतु त्याबरोबरच त्यांना आपल्या आयुष्याचें ध्येय स्पष्ट दिसत होतें. संकटांना, त्रासाला, उपहासाला भिऊन ध्येयच्युत होणारा ' वीर ' कसला ? तात्या खरे वीर होते. समाजकारणांतील सर्व अडचणी, अपमान ठाऊक असतांना त्यांनीं भर तारुण्यांत समाजकारण हें ध्येय मानलें. सर्व आयुष्यभर तें एकच कार्य चालविलें आणि अत्यंत थोर दर्जा प्राप्त करून घेतला. हा त्यांचा दर्जा इतका थोर आहे कीं, त्यामुळें त्यांना समाजकारणांत वर म्हटल्याप्रमाणें उपमानपद प्राप्त झालें आहे.

तात्यांनीं समाजाकरितां काय केलें तें त्यांच्या जीवनचरित्रांत मार्गे आलेंच आहे. या ठिकाणीं त्यांच्या एकेचाळीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांतील कामगिरीचें थोडक्यांत स्वरूप पहाणें आहे. प्रथम त्यांच्या कामगिरीचें व्यापक स्वरूप कसें आहे तें पाहूं. हें व्यापक स्वरूप समजण्यास तात्यांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरवात होण्यापूर्वीं आपल्या समाजाची स्थिति काय होती आणि आज काय आहे तें प्रथम पाहिलें पाहिजे. त्या दोन परिस्थितींत जो फरक दिसेल त्यांत तात्यांची करामत आहे. तात्यांच्या सार्वजनिक आयुष्यास सुरवात होण्यापूर्वीं आपल्या समाजाची जी कांहीं स्थिति होती ती त्यांच्याच शब्दांत सांगतों. एकदा महाजनवाडींतील वाचनालयांत प्रस्तुत लेखकानें तात्यांना प्रश्न केला, "तात्या, तुम्हीं मुंबईत आलां त्या वेळीं समाजाची कशी काय स्थिति होती ?" त्यावर तात्यांनीं सांगितलें, "अहो कसली समाजस्थिति घेऊन बसलांत! स्वतःचीच ज्यांना ओळख नाहीं त्यांना इतरांची-समाजाची कसली ओळख असणार? आपला दर्जा काय? आपण कसें वागलें पाहिजे? याची ओळख कोणासच नव्हती. अहो तुम्ही कोण ह्मणून विचारलें तर 'आह्मी वैसवानी' एवढें उत्तर त्यांना माहीत." तात्यांच्या सार्वजनिक आयुष्यास सुरवात होण्यापूर्वीं समाजाची काय स्थिति होती, याचें कितीहि भेसूर असलें तरी अगदीं यथार्थ चित्र, तात्यांच्या वरील उद्गारांनीं डोळ्यांपुढें उभें रहातें. ही स्थिति अभिमानास्पद होती ह्मणून तात्यांनीं सांगितली असें नाहीं. समाजकार्यकर्त्यांना वस्तुस्थितीचें ज्ञान तंतोतंत असणें अत्यंत आवश्यक आहे. वस्तुस्थिति चांगली असो वाईट असो. अभिमानास्पद असो मान खालीं घालावयास लावणारी असो, आहे तशी ती घेतली पाहिजे. वस्तुस्थितीकडे कानाडोळा करून वागणारास ती कशी बदलतां येणार? आतां तात्यांच्या प्रयाणकालीं समाजाची काय स्थिति आहे ती पहा. आज कशी स्थिति आहे हें दुसऱ्यानें सांगावयासच नको.

' आपण वैदिक त्रैवर्णिकांपैकीं वैश्य आहोंत ' याची पूर्ण ओळख आज प्रत्येकास आहे. आज ही स्वत्वाची जाणीव समाजास झाली आहे ती कोणी करून दिली ? कोण गुरु भेटला ? तात्यांनींच ती ओळख करून दिली. तात्यांच्याच स्वरूपांत समाजास गुरु भेटला.

मुकीं बिचारीं कुणीं हका
अशीं मेंढरें............

या स्थितीला पोंहचलेल्या आपल्या मूळच्या शार्दूलस्वरूपांच्या समाजाला तात्यांनीं उपनिषदांतील गोष्टींतल्या वाघाप्रमाणें स्वत्वाची ओळख पटवून दिली. स्वतःस विसरून गेलेल्यास स्वत्वाची ओळख होणें हा फरक कांहीं लहानसान नाहीं. उपनिषदांतील वाघानें स्वतःचा विसर पडलेल्या वाघाला आपलें खरें स्वरूप पटवून दिलें आणि मग त्या ओळख पटलेल्या वाघानें आपलें कर्तव्याचरण आपोआपच केलें. त्याचप्रमाणें समाजास ' तुम्ही वैश्य आहां ' हें दाखवून तात्या गेले आहेत. त्या आपल्या चातुर्वर्ण्यांतर्गत दर्जाप्रमाणें समाज वागणारच. तशी वागण्यास त्यानें सुरवातहि केली आहे. तात्यांच्या सामाजिक कामगिरीचें हें असें व्यापक स्वरूप आहे.

तात्यांच्या कामगिरीचें स्थूल स्वरूप दिसतें आहे. वैश्य ज्ञातिफंड हा तात्यांच्या कामगिरीचा पाया आहे, महाजनवाडी हा तिचा मध्य आहे, आणि वैश्य विद्याश्रम हा कळस आहे. पाया मजबूत असल्याशिवाय कळस चढवून उपयोग नाहीं. आणि कळस चढविल्याशिवाय नुसत्या मजबूत पायाला शोभा नाहीं. पाया आणि कळस यांचा जसा अन्योन्य संबंध असतो. तसाच वैश्य ज्ञातिफंड आणि वैश्य विद्याश्रम यांचा आहे. एकाशिवाय दुसऱ्याचें चालत नाहीं. परंतु पायावर नुसता कळस चढवितां येत नाहीं. पायावर इमारतीचा मधला भाग अवश्य पाहिजे. तो मधला भाग किंवा मध्य म्हणजेच महाजनवाडी. आपण मागें

पाहिलेंच आहे कीं, ज्ञातिफंड शके १८०९ मध्यें स्थापन करून तात्यांनीं आपल्या खऱ्या सामाजिक आयुष्याचा पाया घातला. पाया मजबूत बांधण्याचें काम त्यांनीं २९ वर्षें केलें. इतक्या अवधींत मधून मधून पाया कोसळत होता, ढांसळत होता. पण तात्यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें तो पाया सतत उद्योग करून आंतून मजबूत बांधून घेतला व त्यावर स्वहस्तें शके १८३८ मध्यें महाजनवाडी उभारली. इमारत बांधल्यावर मग सोयीवार अशी दालनें, उपदालनें बांधलीं गेलीं. आणि घरांत रहाणाऱ्या सर्वांनीं आपापणांस सोयीवार अशीं दालनें घेतलीं. अशा रीतीनें मंदीर गजबजून गेलें. परंतु कळसाशिवाय मंदिराला कशी शोभा येणार? कळसाशिवाय आंतील देवाच्या दिव्यत्वाची ओळख परक्यास कशी पटणार? तो कळस तात्यांनींच शके १८४३ मध्यें चढविला आणि आपल्या द्विजत्वाची ओळख जगाला पटवून दिली. तात्यांच्या सामाजिक कामगिरीचें हें स्थूल किंवा दृश्य स्वरूप आहे.

परंतु स्थूल—सूक्ष्म, दृश्य—अदृश्य अशी प्रत्येक वस्तूचीं दोन स्वरूपें असतात. स्थूल सर्वांना दिसतें. दृश्य झटकन डोळयांत भरतें. परंतु सूक्ष्म किंवा अदृश्य स्वरूप पाहिल्याशिवाय, फक्त बाह्य स्थूल स्वरूपावर लक्ष ठेवल्यानें, खरें स्वरूप कळणार कसें? मातीच्या, दगडाच्या, धातूच्या मूर्ति भक्त पूजेकरितां घेतो. तो जीवेंभावें त्यांची पूजा करतो. गंधाक्षतापुष्पें त्यांवर चढवितो. धूपदीप दाखवून नैवेद्य समर्पण करतो. परंतु त्या भक्ताचें लक्ष त्या स्थूल मूर्तीच्या पलीकडे असतें. तसें असलें तरच त्या पूजेचें सार्थक. त्याचप्रमाणें तात्यांच्या सामाजिक कामगिरीचें स्थूल स्वरूप पाहूनच समाधान मानून न घेतां त्यांच्या कामगिरीचें सूक्ष्म स्वरूपहि पाहिलें पाहिजे?

पैसाफंड हें कशाचें द्योतक आहे? शके १८३९ मधील माधवबागेंतील त्या प्रसिद्ध व्याख्यानांत ‘ एका मनुष्यानें दिलेल्या एका रुपयापेक्षां चौसष्ट इसमांनीं एक एक पैसा करून दिलेल्या एका रुपयाची किंमत मला

जास्त आहे. ' असें जें लोकमान्यांनीं सांगितलें त्याचा अर्थ काय ? एका मनुष्यानें दिलेल्या एका रुपयाबरोबर एकच अंतःकरण आपणांस मिळतें; परंतु चौसष्ट इसमांनीं मिळून दिलेल्या एका रुपयाबरोबर चौसष्ट अंतः-करणाचा आपणांस लाभ होतो. पैसाफंड याचा खरा अर्थ एकी—अंतःकरणाची एकी—असा आहे. पैसाफंड हा तात्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा पाया. म्हणजे तात्यांनीं आपलें सार्वजनिक कार्य खऱ्या एकीच्या पायावर उभारलेलें आहे. 'पांचामुखीं परमेश्वर' असें आपण नेहमीं म्हणतों. त्याचा अर्थहि हाच आहे कीं, पांच अंतःकरणें एकत्र झालीं कीं त्यांतून परमेश्वरी शक्ति उत्पन्न होते. पैसाफंड स्थापनेच्या वेळच्या सात कलमी ठरावांत 'दैव' हा शब्द आठवेळ आलेला आहे. त्या दैव शब्दाचा अर्थ 'ईश्वरी शक्ति' असाच आहे. चार लोक एकत्र जमले म्हणजे दैव जमलें असें आपण म्हणतों. म्हणजे चार लोकांचीं अंतःकरणें एकत्र झालीं कीं ईश्वरी सामर्थ्य ठेवलेलेंच. पैसाफंड म्हणजे एकी अर्थात् 'ईश्वरी शक्ति' होय. हेंच समर्थांनीं सांगितलेलें 'भगवंताचें अधिष्ठान'. पैसाफंडाच्या पायावर म्हणजे भगवंताच्या अधिष्ठानावर तात्यांची सर्व कामगिरी उभारलेली आहे. म्हणूनच ती यशस्वी झाली आहे. भगवंताचें अधिष्ठान प्रथम न ठेवतां अंगीं सामर्थ्य असूनहि केलेल्या सर्व चळवळी फोल होतात असें श्रीसमर्थच सांगतात. समर्थांच्या उपदेशानुसार तात्यांनीं आपली सर्व चळवळ भगवंताच्या अधिष्ठानावर म्हणजे एकीच्या पायावर उभारलेली होती. प्रत्येक समाजकार्य करणारानें तात्यांच्या सामाजिक कामगिरीचा पाया कोणता तो नीट पहाणें जरूर आहे. सध्याचें युग लोकशाहीचें आहे. 'संघे शक्तिः कलौ युगे' अशी स्मृति आहे. करितां ऐक्याच्याच बळावर आज कोणतीहि चळवळ यशस्वी होऊं शकेल. हें ओळखूनच पैसाफंड हा तात्यांनीं आपल्या कामगिरीचा पाया मानला.

महाजनवाडी हा तात्यांच्या कामगिरीचा मध्य आहे. पण महाजन-वाडी म्हणजे काय ? महाजनवाडीनें काय केलें ? महाजनवाडी म्हणजे

दगड—माती—चुना यांचा गोळा नव्हें, हें आपण मागें पाहिलें आहे. महाजनवाडी म्हणजे नवजीवन. महाजनवाडीनें एकां नवीन कालास सुरवात केली आहे. त्या कालास आपण ‘ चळवळीचा काल ’ असें नामाभिधान दिलें आहे. महाजनवाडी हें चळवळीचें द्योतक आहे. ‘ अनुद्योगिता आड ये उन्नतीला ’ अशी कव्युक्ति आहे. आपल्या समाजांमधील अनुद्योगिता किंवा आळस धुऊन टाकण्याकरितांच जणुं काय तात्यांनीं चारी धामांचें तीर्थ आणून सर्वांना पाजिलें. तें तीर्थ प्राशन करतांच चळवळ करण्यासाठीं सर्व समाज बद्धपरिकर झाला. मोठ्या धडाडीनें उद्योगास लागला. ‘ चळवळ ’ ऊर्फ उद्योग हेंच एकंदर सर्वप्रकारच्या उन्नतीचें मूळ कारण आहे. जीं जीं राष्ट्रें वैभव शिखरावर आज चढलीं आहेत, तीं तीं केवळ उद्योगाचेंच बळावर. पाश्चात्य संस्कृतीविषयीं ज्यांचें मन विटलें आहे असे महात्माजीहि सांगतात कीं ‘ उद्योग हा गुण पाश्चात्यांपासून आपण अवश्य घेतला पाहिजे. ’ ‘ रिकामा जाऊं नेदी क्षण ’ हें भाग्याचें लक्षण आहे. हा उपदेश सर्व जगताला आणि त्यांत विशेषतः आपणा महाराष्ट्रीयांना समर्थांनीं दिला आहे. महाजनवाडी हा तात्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा मध्य. याचा खरा अर्थ चळवळ हा तात्यांच्या एकंदर कामगिरीचा मध्य बिंदु होता. आळस झाडून टाकून सर्वांनीं उद्योगाला लागणें हा महाजनवाडीचा अर्थ आहे. ‘ आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ’ हें तत्व जसें व्यक्तीला लागू आहे, तसेंच तें समाजाला व राष्ट्रालाहि लागू आहे. महाजनवाडी उघडल्याबरोबर समाजाचे डोळे उघडले म्हणजे दीर्घकाल अशा निद्रेंतून समाज जागा झाला आणि उद्योगाला लागला. ‘ उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ’ लक्ष्मी उद्योगी पुरुषासच माळ घालते. आळसी करंट्याकडे ती तुच्छतेनें पहात असते. करितां समाजाला जर भाग्योदयाला चढवावयाचें असेल तर अजगरासारखें घोरत न पडतां, किंवा शेकमहंमदासारखें हवेंत किल्ले

बांधीत न बसतां उद्योगाला लागा, चळवळ करा. चुकलात तरीहि हरकत नाहीं. ईश्वर मार्ग दाखवील. पण आळशी बनूं नका. हा महाजनवाडीचा तत्वार्थ आहे.

वैश्य विद्याश्रम हा तात्यांच्या कामगिरीचा कळस होय. आपलेंच शिक्षण आपणच जबाबदारीनें हातीं घेणं याचेंच नांव वैश्य विद्याश्रम. ज्यांना आपलेपणा वाटत नाहीं ते काय शिक्षण देणार ? आपलेपणा-शिवाय शिक्षण नाहीं. आईचें दुध व दाईचें दूध यांमध्यें वस्तुतः काय फरक असतो ? परंतु मुलाला आईचें दूध मानवतें आणि दाईचें मानवत नाहीं. असें कां ? आईच्या ठिकाणीं आपलेपणा असतो तो दाईच्या ठिकाणीं नसतो, हेंच त्याचें कारण.

' उपाध्यान्दशाचार्यः आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं तु पितॄन्‌ माता गौरवेनातिरिच्यते ॥

या श्लोकांत मनूनें ' दहा उपाध्यायांपेक्षां एक आचार्य, शंभर आचार्यांपेक्षां एक पिता, आणि हजार पित्यापेक्षां माता गौरवानें अधिक आहे' असा जो उपाध्यायापासून मातेपर्यंत चढता क्रम ठेविला आहे तो कां ? आईचा आपलेपणा वडिलांपेक्षां जास्त, वडिलांचा आचार्यांपेक्षां जास्त, आणि आचार्यांचा उपाध्यायापेक्षां जास्त. याच साठीं मुलांचें शिक्षण परक्यांचे हातीं देण्याइतका नादानपणा जगांत दुसरा कोणताहि नाहीं. परक्यांनीं ' वाघिणीचें दूध ' जरी दिलें तरी तें पचत नाहीं. त्याचें सेवनानें पुष्टि येण्याचे ऐवजीं रेच मात्र होऊं लागतात. हिंदीराष्ट्राला तें वाघिणीचें दूध पचलें नाहीं त्याचें मुख्य कारण देणारांत आपलेपणा नव्हता हेंच होय. अर्थात् पूर्ण आपलेपणा ठेवून समाजांत शिक्षणाचा प्रसार करणें हेंच आश्रमाचें कार्य. हाच आपलेपणा आपलेंच नियंत्रण, आपलीच परीक्षा, आणि आपलीच पदवी या त्रिपुटीवर उभारला आहे. सारांश

आश्रम म्हणजे समाजाचें शैक्षणिक चिमकुलें स्वराज्य. आश्रमाचें हें असें सूक्ष्म स्वरूप आहे.

तात्यांच्या सामाजिक कामगिरीचें यथार्थ स्वरूप हें असें आहे. यांतच त्यांचा आयुष्याचा संदेश आहे. पैसाफंड हा त्यांच्या कामगिरीचा पाया. तेव्हां प्रत्येक वैश्यबंधूनें पैसाफंडाचे वर्गणीदार होऊन पैशाबरोबर आपलीं अंतःकरणें एकत्र केलीं पाहिजेत. महाजनवाडी हा तात्यांच्या कामगिरीचा मध्य. म्हणून आळस टाकून देऊन उद्योग ऊर्फ चळवळीची कांस प्रत्येकानें धरली पाहिजे. विद्याश्रम हा त्यांच्या कामगिरीचा कळस. अर्थात् परकी शिक्षणाचा मोह सोडून देऊन आपलेपणा असलेलें शिक्षण आपल्या भावी पिढीला दिलें पाहिजे. हाच तात्यांच्या आयुष्याचा संदेश आहे. हा संदेश प्रत्येकानें हृदयांत सांठवला पाहिजे, कृतींत उतरवला पाहिजे. शेवटीं तात्यांच्या निधनानंतर प्रथम प्रसिद्ध झालेल्या ज्ञातिफंडाच्या अहवालांत म्हटल्याप्रमाणें " कों. वैश्य ज्ञातिफंड या पायालां अढळ करून, महाजनवाडी या मध्याला नेहमीं उभी ठेऊन व वैश्य विद्याश्रम या कळसाला चळवळींत ठेवून, त्यांच्या आत्म्याला अखेरची शान्ति देणार नाहींत कां ? " असाच आज सर्व समाजापुढें प्रश्न आहे.

## प्रकरण नववें.

# व्यक्तिमहात्म्य.

थोर महात्मे होऊनि गेले, चरित्र त्यांचें पहा जरा ।
आपण त्यांच्या समान व्हावें हाच सांपडे बोध खरा ॥
जग हें त्यजितां भवसागरिंच्या वाळवंटिवर तरी जरा ।
चार पाउलें उमटवुं आपुलीं, ठेवुं खुणेचा मार्ग बरा ॥
—कै. हरिभाऊ आपटे.

तात्यांची आपल्या एकंदर समाजावर इतकी छाप होती कीं, तिची यथार्थ कल्पना पुढील पिढीला नीटसी करतांहि येणार नाहीं. तात्यांच्या अनुयायांना तात्यांचा शब्द वेदतुल्य वाटत असे. कोणताहि प्रश्न निघो, त्याच्यावर कितीहि मतभेद होवोत, कितीहि वाद माजोत, पण शेवटीं तात्यांनीं निर्णय दिला कीं तो वज्रलेप. इतकी त्यांच्या अनुयायांना त्यांच्या शब्दाची किंमत होती. समाजांत कोणीहि कसलेंहि समाजकार्य करण्यास निघो, त्याला तात्यांच्या सल्ल्याची व आशीर्वादाची प्रथम आवश्यकता भासावयाची. तात्यांचा रुकार मिळाल्याशिवाय आपली चळवळ समाजांत रूढ होणार नाहीं आणि तात्यांनीं 'राम पुरें करील' असें म्हटल्याशिवाय आपल्या चळवळींत राम उत्पन्न होणार नाहीं, असें प्रत्येक कार्यकर्त्यास नेहमीं वाटत असे. कोणतीहि 'पट्टीपासोडी' निघो. तात्यांचा पहिला आंकडा पडला कीं, आपलें अर्धें अधिक कार्य झालें, असें वाटून प्रत्येक 'पट्टीवाला' अगोदर तात्यांचीच भेट घेत असे. तात्यांचें वर नांव दिसलें कीं 'कसली पट्टी?' 'या पैशाचें काय करणार?' वगैरे शंका कोणाच्याहि मनांत न येतां शक्त्यनुसार सर्वांचे आंकडे पडावयाचेच. 'दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये' या न्यायानें जर कधीं

कोणाच्या मनांत समाजाचे कामाविषयीं शंका निघाल्या आणि चलबिचल सुरू झाली आणि तात्या फक्त उभे राहिले कीं, सर्गांची शंकानिवृत्ति ताबडतोब होत असे. आणि आपणास ही शंका आली तरी कशी, म्हणून त्यांचा त्यांनाच पश्चात्ताप होत असे. इतकी आपल्या अनुयायांवर, चहात्यांवर, कार्यकर्त्यांवर, टीकाकारांवर तात्यांचें वजन होतें. अशा कोणत्या गुणांमुळें तात्यांनीं लोकांचीं मनें जिंकिलीं होतीं? अशा कोणत्या गुणांमुळें तात्या जनतेच्या अंतःकरणसिंहासनावर विराजमान झाले होते? अशा कोणत्या गुणांमुळें ते अखिल समाजाचे 'अनभिषिक्त भूपति' झाले होते? कोणत्या गुणांमुळें तात्यांच्या अनुयायांना त्यांचेविषयीं अढळ आदर वाटत असे? कोणत्या गुणांमुळें चहात्यांचें त्यांचेवर निरतिशय प्रेम होतें? आणि त्यांच्या कोणत्या गुणांमुळें कार्यकर्त्यांना त्यांच्यापासून दिव्य प्रेरणा प्राप्त होत असे? तात्यांजवळ अशी काय सत्ता होती, अशी काय शक्ति होती, असा काय अधिकार होता कीं, त्यांना लोकांनीं इतका मान द्यावा? या सर्वांचें कारण तात्यांचें व्यक्तिमहात्म्य.

तात्यांचें व्यक्तिमहात्म्य त्यांच्या शुद्ध सात्विक आचणांत आहे. तात्यांचें घराणें भाविक होतें. त्यांचे आजोबा व वडील पांडुरंगाचे भक्त होते. तात्यांचे धनी प्रागजीशेट धार्मिक वृत्तीचा मनुष्य होता. त्यांचा सतत सहवास कित्येक दिवस तात्यांना घडलेला होता. यामुळें तात्यांची मनोभूमिका भावनाप्रधान होती. अशा मनोभूमिकेंत तरुणपणींच श्रीमद्भगीतेसारख्या 'धर्मग्रंथांपैकीं एक अत्यंत व निर्मल तेजस्वी हिऱ्याचा, प्रकाश पडला व त्याचाच परिणाम त्यांचें आचरण शुद्ध सात्विक बनण्यांत झाला. ठाकुरद्वारावरील काळ्या रामाचे देवळांत कान्हेरे शास्त्री यांचें गीतेवरील प्रवचन तात्यांनीं भर तारुण्यांत ऐकलें आणि तेव्हांपासून त्यांना गीतेचा छंद लागला. त्यांना तिचें वेडच लागलें. त्यांनीं ती मुखोद्गत करून टाकली. फुरसतीच्या वेळीं, ते एकटेच असतांना गीतेंतील

श्लोक म्हणत• बसलेले नेहमीं दिसत असत. मनोभूमिका मूळचीच संस्कारक्षम आणि भगवान् श्रीकृष्णाच्या ओजस्वी गीतेची पेरणी मग ' अभयं सत्त्वसंशुद्धि ' वगैरे दैवी गुणांची वाढ तात्यांच्या ठिकाणीं झाली यांत काय आश्चर्य ? उपनिषद्ग्रंथांशींहि त्यांचा थोडाफार परिचय होता. महाराष्ट्रीय साधुसंतांपैकीं तुकाराम त्यांनीं चांगला पचवला होता. या सर्व धार्मिक वाचनाचा श्रवणाचा त्यांच्या आचरणावर कायमचा असा परिणाम झाला. तात्यांचें त्यांच्या समाजावर जें वजन होतें त्याचें मुख्य कारण हेंच होतें. हिंदुस्थानचें हवापाणीच असें आहे कीं, सात्विक वृत्तीच्या माणसाचा लोकांवर परिणाम व्हावा. तुकाराम, रामदास यांची जी लोकांवर छाप होती ती याच कारणामुळें, आणि आज लोकमान्य, महात्माजी यांची जी जनतेवर छाप आहे तिचेंहि मुख्य कारण हेंच होय.

तात्यांच्या शुद्ध सात्विक आचरणांत त्यांच्या शुद्ध साध्या रहाणीचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. थोरपणाचीं बीजें साध्या रहाणींतच असतात. मुंबईसारख्या घटोत्कची बाजारांत तात्यांनीं आपलें सर्व आयुष्य काढलें. परंतु त्यांची रहाणी बालबोध वळणाचीच राहिली. नेसावयाचा जगन्नाथी धोतरजोडा, अंगांत बाराबंदी, तीवर डगला, डोकींवर पगडी, आणि खांद्यावर उपरणें. यांत त्यांचा बिलकूल फरक झाला नाहीं. शेवटीं शेवटीं त्यांचा डगलाहि गेला. भर तारुण्यांत तात्या एकटे मुंबईत येऊन रहातात आणि त्यांच्या पोषाखांत मोहमयी मुंबईतील कोणतीहि ' फॅशन ' शिरत नाहीं. यावरून त्यांचें मन किती खंबीर होतें याची चांगलीच साक्ष पटते. त्याचप्रमाणें उभ्या आयुष्यांत त्यांनीं चहा कधीं ओंठालाहि लाविला नाहीं. किती मनोनिग्रह ? चहा, पोषाख या किरकोळ गोष्टी आहेत असें कोणी म्हणतात. परंतु ज्याप्रमाणे पैसा पैसा जमत रुपाया होतो त्याचप्रमाणें आचरणांतील किरकोळ वाटणाऱ्या गोष्टींवरून मनुष्याचा एकंदर आचार बनत असतो. पै पै जोडली कीं रुपया आपोआप बनतो. तसेंच

लहानसान गोष्टींत मनुष्यानें आपलें मन आवरलें म्हणजे, तो मोठ्याहि गोष्टींत आवरूं शकतो. किरकोळ गोष्टींची उपेक्षा करणारास मोठ्या गोष्टीहि साधत नाहींत असा अनुभव आहे. तात्यांचा नियमितपणा नमुनेदार होता. कार्यकर्ते तर प्रथम नियमित पाहिजेत. एकाच्या अनियमितपणाचा अनेकांवर परिणाम होतो. सभा असली कीं, तात्या वेळेवर हजर. दुसरे केव्हांहि येवोत. पण दुसऱ्यास उशीर होणार या सबबीवर त्यांना कधींहि उशीर होत नसे. नोकरीवर असतांना त्यांचा नियमितपणा कसा होता हें मागें सांगितलेंच आहे. त्यांचे नेहमींचे जाण्यायेण्याचे रस्ते ठरीव असत. रस्त्याच्या एका बाजूनें जावयाचें तर नेहमीं त्याच बाजूनें. कधीं म्हणून दुसरीकडे पाय पडावयाचे नाहींत. त्यांचा एकंदर दिनक्रम मुंबईसारख्या ठिकाणीं कोणालाहि हेवा करण्यासारखाच होता.

तात्यांनीं पाळला असा दिनक्रम पाळणें सामान्य माणसांना साधावयाचें नाहीं. सकाळीं पांचवाजतां ते उठत व उषःपान करीत. सहा वाजेपर्यंत त्यांचें प्रातःस्मरण चाले. ‘ उठी गोपाळजी धांव धेनूकडे ’ आणि ‘ घनश्याम सुंदरा श्रीधरा ’ या त्यांच्या आवडत्या भूपाळ्या असून ‘ अनुदिनि अनुतापें ’ व ‘ उत्तम जन्मा येउनि ’ हीं त्यांचीं आवडीचीं करुणाष्टकें असत. तुकारामाचे अभंग, कबीर, मिराबाई, सूरदास यांचीं पद्येंहि ते मधून मधून म्हणत. ‘ सुंदर तें ध्यान ’ या अभंगानें ते भजनास प्रारंभ करीत असत. त्यानंतर शौच्य मुखमार्जन स्नान. प्रकृति ठकेपर्यंत त्यांनीं थंडपाण्याचेंच स्नान केलें व आपले कपडे स्वतः हातानें धुतले. साडेसातपासून साडेनऊपर्यंत संध्या, देवपूजा व ग्रंथवाचन चाले. व्यंकटेशस्तोत्र, विष्णुसहस्रनाम व गीता यांचा नेहमींचा पाठ असे. नंतर साडे अकरा वाजतां भोजन. भोजनहि सात्विक साधें असे. भोजनोत्तर थोडी शतपावली करून दुकानावर जात ते पांचवाजेपर्यंत दुकानावर. पांचवाजतां जे दुकानावरून निघत ते देवदर्शन घेऊन पुराणप्रवचन ऐकून साडेसात-

वाजतां दुकानावर परत. नित्य देवदर्शनांत माधवबागेंतील लक्ष्मीनारायण, पांजरपोळांतील सूर्यनारायण, कांदेवाडींतील श्रीकृष्ण, विद्यारंभभाईच्या वाडींतील दत्त, ठाकुरद्वारचा काळाराम यांचें दर्शन घेऊन मुंबादेवीचें दर्शन. कोठें पुराणप्रवचन असलें तर यांतील कांहीं कार्यक्रम कमी करून तिकडे जात. त्यानंतर दुकानावर आले कीं, विक्री मोजून व मांडून घरीं येत. आठ सव्वाआठ वाजतां माणसांनीं दुकान बंद करावें व चावी तात्यांजवळ आणून द्यावी. रात्रौ साडेआठ वाजतां देवाला धुपारती व नैवेद्य दाखवून नऊ वाजतां फराळ. नंतर कांहीं वाचन करून भजन करीत व अकरा वाजतां झोंपीं जात. भर तारुण्यांत असतांना साताच्या पूर्वीं पूजा अर्चा आटोपून ते दुकानावर येत. सकाळीं फक्त एक पंचपात्रीभर दूध किंवा गुळपाणी येवढेंच. त्यावर दुपारीं एक दोन वाजतां भोजन. या त्यांच्या कार्यक्रमांत फरक फक्त आपल्या कोणा बंधूची मृत्यूची बातमी समजली तर किंवा समाजाच्या सभा असल्या तर होत असे. कोणाचा मृत्यु समजला तर वाटेल तें नुकसान होत असलें तरी तात्या जात असत. छत्र्यांचा व्यापार म्हणजे फारकरून हंगामी चालतो. पावसाळ्याचें मोसमीचे दिवसांत रोज हजार पंधराशें विक्री येते. अशा वेळीं जर कोणाचा मृत्यु समजला, तर माणसें दुकानावर नसली तरी दुकान बंद करूनहि तात्या कित्येकदा गेलेले आहेत. असा त्यांचा रेखीव दिनक्रम असे. मुंबईसारख्या शहरीं राहून इतक्या साधेपणानें, निर्व्यसनानें, नियमितपणानें, आणि धार्मिक वृत्तीनें ज्यानें आयुष्य कंठिलें तो खरोखर धन्य होय. हा त्यांचा एकंदर कार्यक्रम पाहिला कीं ते एक ‘ सांसारिक साधु पुरुषच ’ होऊन गेले असें वाटूं लागतें.

तात्यांचा दानशूरपणा तर सुप्रसिद्धच आहे. ‘ मनुष्य मिळवितो तें सर्व त्यांनीं स्वतःकरितांच खर्च करणें हें पाप आहे. ’ येथून त्यांच्या उदारतेला सुरवात होते. ‘ मनुष्यानें आपला संसार सुखी करण्याकरितां जें मिळतें त्याचे तीन भाग करावेंत. एक भाग स्वतःकडे खर्च करण्यास, दुसरा दानधर्माकडे, आणि तिसरा त्यानें शिल्लक ठेविला पाहिजे. ’ असें त्यांचें मत

असे. तात्यांचा दानधर्म एकाच विशिष्ट गोष्टींत होत असे असें नाहीं. तात्यांकडे किती बैरागी–गोसावी आले असतील, किती यात्रेकरू आले असतील, किती पूजायज्ञयाग करणारे आले असतील, किती घरें बांधणारे आले असतील, किती लग्न करणारे आले असतील, किती फंडवाले आले असतील, किती विद्यार्थी आले असतील. यांची नोंद आतां मृत्युलोकीं मिळणार नाहीं. कारण तात्या तशी नोंद ठेवीत नसत. ही नोंद मृत्युलोकीं नसली तरी चित्रगुप्ताचे दरबारीं खात्रीनें असेल. ' दे दान गुप्त उपकार करी न बोले ' अशांपैकीं तात्यांचा दानधर्म होता. दानधर्म करण्यांत त्यांना जातपातगोत आडवी येत नसे. इतकेंच नव्हें तर आंग्लकवि गोल्डस्मिथ यानें

Careless their merits or their faults to scan,
His pity gave ere charity began.

असें जें एका उपाध्यायाचें वर्णन केलें आहे, तसाहि प्रकार तात्यांच्या हातून दानधर्माचे बाबतींत घडला असेल. 'दान मागण्यास आलेला याचक पात्र कीं अपात्र हा प्रश्न हिशेबी मनानें सोडविला नाहीं तोंच त्यांचे हात दान करून मोकळे होत असत.' या सर्व दानांत विद्यादानाकडे प्रत्यक्ष त्यांच्या हयातींतच किती खर्च झाला असेल याचा अंदाजहि करतां येणार नाहीं. आश्रम सुरू झाल्यानंतर तात्यांच्या प्रत्यक्ष खर्चाचीं आश्रमांत पांचसात तरी मुलें आलीं होतीं. त्या मुलांचा खर्च कोणाकडून होतो ही गोष्ट आश्रमाधिकाऱ्यांनाहि बरेंच दिवस कळली नाहीं: यावरून त्यांची दानपद्धति किती गुप्त होती याची चांगलीच कल्पना येते. एखाद्या विद्यार्थ्याची शिक्षणाची जबाबदारी अंगावर घेतली कीं, मग त्याच्या मार्गांत कितीहि अडथळे येवोत ते अडथळे दूर करीत त्याला शेवटपर्यंत शिकवावयाचेंच असा त्यांचा निर्धार होता. असाच एका विद्यार्थ्याचा प्रश्न त्यांच्यापुढें आला होता. त्या विद्यार्थ्यानें आश्रमांतील शिक्षण पुरें केलेंच पाहिजे म्हणून इकडे त्याला शिक्षणाला खर्च करावयाचा व तिकडे त्यांनीं नोकरी करून जें

मिळविलें असतें तितकें त्याचें घरीं त्याचा पगार म्हणून द्यावयाचें. इतकेंच नव्हें तर त्या मुलाच्या शिक्षणासाठीं त्याचें सर्व कुटुंबहि पोसण्याची त्यांची तयारी होती. या गोष्टी प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. शिक्षणाविषयीं मदत करण्याचे बाबतींत ते फारसा विचार करीत नसत. असाच एका डॉक्टरीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रश्न घेऊन प्रस्तुत लेखक तात्यांकडे गेला. त्यांच्यापुढें प्रश्न टाकतांच एक मिनिटाचाहि विचार न करतां तात्यांनीं आपला होकार दिला. केवढें हें अलोट शिक्षणप्रेम ! ' दर महा १५० रु. आश्रमास अव्याहत मिळत जावेत ' ही जी तात्यांची शेवटची योजना तीवरून त्यांच्या अतुल शिक्षणप्रेमाची खरी कल्पना कोणासहि येईल. सारांश तात्यांच्या या शिक्षणप्रेमाचे बाबतींत ' तात्या-सारखे तात्याच ' याच अनन्वय अलंकारांतच त्यांचें यथार्थ वर्णन करतां येईल.

तात्या हातानें जसे सढळ होते तसे मनानेंच उदार होते. तात्या जुन्या पिढींतील होते परंतु त्यांचीं मतें उदार होतीं. आकुंचित वृत्तीचे असे ते नव्हते. जुन्याचा त्यांना जसा अभिमान होता तसाच नव्यांतील चांगुलपणाहि त्यांना मान्य होता. ' पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि किंचित् नवमित्यवद्यम् । ' या उदार मताचेच ते होते. परंतु अनेक वर्षांच्या अनेक लोकांच्या अनुभवांनीं सिद्ध झालेलीं तत्त्वें सोडून, केवळ नाविन्याला घेऊन नाचणाऱ्यांबरोबर जाण्याला ते तयार नव्हते. एकीकडे आपणास जुन्या पिढींतील म्हणून घेऊन कांहीं लोक ' जुनें तें सगळेंच सोनें ' असा आग्रह धरून बसत असतात. दुसरीकडे नाविन्याच्या नवलाईनें हुरळून जाऊन कांहीं लोक ' नवें तें सगळें हवें ' असा हट्ट धरून बसतात. तात्या स्वतः जुन्याचे अभिमानी होते, पण तो अभिमान जुन्यांतील दोष न काढण्याच्या थराला गेला नव्हता. आज जें जुनें, तेंच कांहीं वर्षांपूर्वी नवें म्हणून लोकांना वाटत होतें. व आज जें नवें तें पुढें कांहीं वर्षांनीं जुनें होणार, हें त्यांना स्पष्ट दिसत होतें. आणि तशाच दृष्टीनें त्यांनीं कित्येक-

बाबतींतील आपलीं मतें बनविलेलीं होतीं. अशीं जीं तात्यांचीं कांहीं बाबतींतील मतें होतीं त्यांचें फक्त दिग्दर्शनच येथें करतों. ( १ ) लग्नविधिः—हा आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाचा असा संस्कार. सर्व आयुष्याला वळण लावणारा हा संस्कार. परंतु किती वधू-वरांना त्याचें महत्त्व कळतें? तेव्हां मुला–मुलींची लग्नाची वयोमर्यादा वाढविली पाहिजे असें त्यांना वाटत असे. मुलाला नवराबायकोचें पोट भरण्याची ताकद नसतांना त्याचा लग्न सोहाळा करणें म्हणजे त्याचा संसार दुःखी करणें होय. लग्नांमध्यें फाजील डामडौल करण्याच्या हौसेमुळें निष्कारण पैशापरी पैसा खर्च होतो आणि लग्नांतील धार्मिक विधींचें महत्व कमी होतें. आपल्या पुतण्यांचें लग्न त्याचप्रमाणें आपल्या नातींचें लग्न तात्यांनीं त्यांच्या प्रौढ वयांतच केलीं. लग्नांतील डामडौल कमी केल्याशिवाय त्या विधीला गांभीर्य येणार नाहीं, हें प्रमाण दाखविण्यासाठीं महाजनवाडींत त्यांनीं स्वखर्चानें कित्येक लग्नें विधियुक्त अगदीं कमी खर्चांत करून दाखविलीं आहेत. ( २ ) पुनर्विवाहः—पुनर्विवाहाचें निष्कारण स्तोमहि त्यांनीं माजविलें नाहीं कीं, तो सर्वस्वी त्याज्यहि मानला नाहीं. वैधव्यदशा आली असतां सदाचरणानें आयुष्य कंठणाऱ्या स्त्रिया केव्हांहि पूज्यच. परंतु तसें शक्य नसल्यास पुनर्विवाहाचा मार्ग गौण असला तरी तो स्वीकारणेंच चांगलें. असें त्यांचें मत असे. आपल्यामध्यें आज ती रूढी आहेच तेव्हां या प्रश्नाला निष्कारण महत्त्व देण्याचें कारणच नाहीं असें मात्र ते म्हणत असत. ( ३ ) व्यापार-धंदाः—या बाबतींत त्यांचीं मतें निश्चित होतीं. व्यापारांत लबाडी केल्याशिवाय चालत नाहीं हें मत त्यांना बिलकूल मान्य नव्हतें. खरा व्यापारी प्रामाणिकच असतो. आणि शेवटीं प्रामाणिकपणानें चालविलेल्या व्यापारांत यश मिळतें. प्रामाणिक व्यापाऱ्याचीच बाजारांत पत असते. आणि पत हें तर व्यापारांतील मुख्य भांडवल होय. व्यापारांत

दिवाळें काढण्यापेक्षां मरण पुरवलें असें ते म्हणत असत. महात्मा गांधी यांनीं ' सत्याचे प्रयोगांत ' दक्षिण आफ्रिकेंत रहाणाऱ्या पोरबंदरच्या मेमणांमध्यें आपसांत ठरलेला ' मरण आलें तरी पुरवलें, परंतु दिवाळें काढावयाचें नाहीं ' असा जो ठराव दिलेला आहे, त्याप्रमाणेंच तात्यांचें तंतोतंत मत होतें. व्यापारांत दिवाळे काढण्याच्या व्यापाऱ्यांच्या वृत्तीमुळें आपल्या व्यापाराला एकंदर लबाडीचें स्वरुप आलें आहे. असा व्यापार करणें नैतिक दृष्ट्या पाप आहे. समाजांतील व्यापाराविषयीं त्यांचें असें मत असें कीं एकाच लहानशा व्यापारांत सर्वांनीं चिकटून न रहातां व्यापाराचे निरनिराळे मार्ग शोधून काढले पाहिजेत. तात्यांनीं स्वतः जो छत्रीचा व्यापार केला तोहि याच नवीन दिशेचा उपक्रम होता. परदेशांशीं व्यापार करणाऱ्या आपल्यांत कंपन्याहि निघाल्या पाहिजेत असें त्यांना वाटत असे. असा कोणी लायक मनुष्य निघाल्यास तात्यांचा त्याला पाठिंबा असे. श्री. परशुराम नारायण वायकूळ यांनीं शके १८३५ मध्यें ' धी कमर्शियल सोसायटी, लिमिटेड ' या नांवाची कंपनी काढून अशाच प्रकारचा जो उपक्रम केला होता त्याला तात्यांची सहानुभूति होती व तात्यांचे नांव त्या कंपनीच्या ' डायरेक्टर्स ' मध्येंहि होतें. ( ४ ) धार्मिकः—धार्मिक बाबतींत ज्या सुधारणा करावयाच्या त्या कोणाला न दुखवतां केल्यानेंच पाऊल पुढें पडतें. धार्मिक प्रश्न हें नेहमींच मनुष्याला विकारवश करणारे आहेत, ही त्यांची धोक्याची सूचना असे. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाच्या बाबतींत त्यांचें असें ठाम मत होतें कीं, आपल्या अंगीं पात्रता आणली ह्मणजे दुसराहि आपणास मान देतो. अंगीं पात्रता न आणतां वितंडवाद घालून घोंटाळे माजविण्यांत काय फायदा ? तात्यांच्या या धोरणामुळेंच आपल्या समाजाची नौका या वादाचें वादळांत न सांपडतां योग्य दिशेनें सर्वांच्या सहानुभूतीनें पुढें जाऊं शकली. आपण जर शुद्ध बुद्धीनें वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागण्याची इच्छा केली तर ब्राह्मण वर्गाहि तशी मदत करण्यास तयार होईल, असें

त्यांना वाटत होतें आणि तसा अनुभव उपनयनसंस्कार, पंचायतनस्थापना इत्यादि प्रसंगीं आश्रमामुळें आलेला त्यांनीं स्वतः पाहिलाहि. (५) कुटुंबपद्धतिः—कुटुंब ही 'जनीं जनार्दन' पहाण्यास शिकविणारी पहिली शाळा. वडील माणसें, बायका, मुलें यांनीं गजबजलेल्या कुटुंबांत रहाण्यास भाग्य लागतें. आपली 'अविभक्त कुटुंबपद्धति' याचमुळें उत्तम होय. कुटुंबांतील यजमानानें पक्षपात होणार नाहीं असें नेहमीं धोरण ठेविलें पाहिजे. आणि कुटुंबांतील इतर मंडळींचा यजमानावर विश्वास असला पाहिजे. कुटुंबांतील असंतोषास पुष्कळ अंशीं स्त्रिया कारणीभूत होत असतात. करितां त्यांच्याहि मनाची वाढ झाली पाहिजे. स्त्रियांबरोबर हलक्या कानाचे पुरुषहि कुटुंबांतील असंतोषास कारण असतात. एकूण कुटुंब हें लहानसें राज्यच असतें. तें स्वराज्य करणें हें कुटुंबाचा नेता व अनुयायी यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असते.'

तात्यांचें आपल्या कुटुंबांतील मंडळीविषयीचें प्रेम स्वयंभूच होतें. म्हणूनच आपल्या समाजाची पूजा बांधण्याची त्यांची मनांत योजना चालली असतांना आपल्या कुटुंबीय मंडळींस ते विसरले नाहींत. त्या योजनेंत मुख्यतः ज्या समाजाची त्यांनीं अहर्निश सेवा केली त्या समाजाच्याच भाग्योदयाकरितां निघालेल्या आश्रमाची पूजा त्यांनीं बांधली असली, तरी आपल्या कुटुंबीय मंडळींनाहि 'फूलना फुलाची पाकळी' देण्यास ते चुकले नाहींत. यावरून 'मनुष्याचा अर्धा जीव त्याच्या स्वतःच्या शरीरांत असतो व अर्धा त्याच्या आप्तेष्टांच्या शरीरांत असतो' या वचनाची यथार्थता पटून येते. त्या तात्यांचा योजनेमुळें आश्रमाला कसें स्थैर्य आलें आहे याचा विचार मागें आलाच आहे. कुटुंबीय मंडळीस ते अजीबात विसरले नाहींत हें सांगतांना ते आपल्या 'देवालाहि' विसरले नाहींत, कारण आपल्या देवाची पूजा अखंड चालली जावी म्हणूनाहि त्यांत व्यवस्था केलेली आहे.

तात्यांचें व्यक्तिमहात्म्य अनंत आहे. त्याचें किती वर्णन करावें? पण एक 'लाखांतली गोष्ट' लक्षांत ठेवणें जरूर आहे. तात्यांच्या

*योजनेप्रमाणें सर्व गोष्टी ज्या इमारतीच्या उत्पन्नांतून होणार त्या इमारतीला त्यांनीं कोणतें नांव दिलें? त्या इमारतीला नांव देतांना त्यांना त्यांच्या प्रिय जन्मभूमीची आठवण झाली. आंबा ही तात्यांची जन्मभूमी आणि तेथील देवतेचें—आंबेश्वराचें—नांव आपल्या इमारतीस देऊन आपल्या शेवटच्या योजनेंत 'जन्मभूमीचें स्मरण केलें.' मनुष्याचें मनांत जन्मभूमीविषयींचें प्रेम सतत जागृत असतें हेंच खरें. तात्यांचा फक्त जन्म आंब्यास झाला. त्यांचें बहुतेक बालपण मलकापुरास गेलें. पुढील सगळे आयुष्य मुंबईस गेलें. असें असतांना ते आपल्या जन्मभूमीस विसरले नाहींत. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' म्हणजे जन्मदाती आणि जन्मभूमि या स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ होत. हें तत्त्व अगदीं सत्य आहे. तात्या मलकापुरास गेले, कोल्हापुरास गेले, मुंबईस गेले, चारी दिशेस गेले. इतकेंच काय पण स्वर्गांत गेले तरीहि त्यांची जन्मभूमि 'आंबा' त्यांच्या हृदयांत सतत जागृत होती. ते आपल्या धन्याच्या गळ्यांतील ताईत होते परंतु जन्मभूमीला विसरले नाहींत. समाजांमध्ये ते अत्यंत थोर अशा मानमान्यतेस चढले परंतु त्या वेळीं त्यांना आपल्या जन्मभूमीची विस्मृति झाली नाहीं. देवदूत त्यांना सन्मानानें स्वर्गांत नेण्याकरितां विमाने घेऊन आले त्या वेळींहि त्यांचें लक्ष जन्मभूमीकडेच शेवटीं कवि वासुदेव शास्त्री खरे यांचेच खालील खडे बोल खरे.

**पोटासाठीं भटकत जरी दूरदेशीं फिरेन।**
**मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन॥**
**नेवो, नेतें, जड तनुस या दूर देशास दैव।**
**राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव॥**

* तात्यांच्या शेवटच्या इच्छेप्रमाणें व योजनेंप्रमाणें त्यांच्या वारसानीं त्यांच्या ५०००० पन्नास हजार रुपये मिळकतीचें (त्यांच्या मिळकतीची प्रत्यक्ष किंमत ५६८५५।-॥ रु. इतकी आहे.) ट्रस्टडीड कों. वैश्यज्ञातिफंडाचे ट्रस्टींच्या नांवें भाद्रपद व. २ शके १८४६ रोजीं करून ती मिळकत फंडाने स्वाधीन केली आहे. त्या मिळकतीच्या उत्पन्नांतून ट्रस्टडीडमधील शर्तींप्रमाणें आश्रमास दरमहा १५० रु. येत असून उत्पन्नाचा इतर विनियोगहि शर्तींप्रमाणें होत आहे.

## प्रकरण दहावें.

# उपसंहार.

Only the actions of the just,
Smell sweet, and blossom in their dust.

*J. Shirley.*

पहिल्या सात प्रकरणांत तात्यांचें जीवन चरित्र वर्णिलें, आठव्यांत त्यांच्या कामगिरीचें स्वरूप दाखविलें, नवव्यांत त्यांचें व्यक्तिमहात्म्य निवेदन केलें, आणि आतां या दहाव्या प्रकरणांत उपसंहार करून हें चरित्र लेखन संपवावयाचें. चरित्र रेखाटलें, त्यापासून घ्यावयाचा बोध सांगितला कीं चरित्रकाराचें काम संपलें. तात्यांच्या आजच्या चरित्रकाराचें चरित्रलेखनाचें काम संपलें तरी उद्यांच्या चरित्रकारांना हें तात्यांचें वाढतें चरित्र लिहावेंच लागेल. कारण तात्यासारखा चरित्रनायक ज्या चरित्राला मिळाला तें चरित्र कधींच संपणार नाहीं. पैसाफंड, महाजनवाडी, आश्रम हीं तात्यांचीं सत्कृत्यें आहेत. कोणतींही सत्कृत्यें अजर–अमर असतात. त्यांच्या कर्त्यांच्या मृत्यूनंतरच तीं फोंफावत जातात. अर्थात् तात्यांची सत्कृत्यें पुढें वाढतीं आहेत; म्हणजे तात्यांचें ‘ स्वतःसिद्ध स्वरूप ’ वाढणारें आहे. तात्यांचें असें हें भावी स्वरुप आजचा चरित्रकार कसें जाणूं शकेल ? त्यानें जाणलें तरी तो तें कसें लिहूं शकेल ? आणि त्यानें लिहिलें तरी तें आज भविष्य असल्यामुळें इतिहास म्हणून कोण कसें खरें मानील ? सारांश तात्यांच्या वाढत्या आयुर्दायाचें चरित्रकार पुढें जन्मास येणारे आहेत तेच तें लिहितील एवढेंच ‘ उपसंहार ’ म्हणून सुचवून तात्यांच्या चरित्रलेखनांत स्वतःला धन्य मानून घेणारी ही लेखणी खालीं ठेवितों.

॥ ब्रह्मार्पणमस्तु ॥

# परिशिष्ट १

## को. वैश्य ज्ञातिफंडाच्या स्थापनेच्या वेळचा सातकलमी ठराव.

॥ श्री ॥

## कोंकण प्रांतांतील मुंबापुरीं वास्तव्य करणारीं वैश्यज्ञातीचे फंडांतील व्यवस्थापक पंचाचे ठराव.

**तारीख १ माहे आगष्ट सन १८८७ इ०**

१ दररोज दर दुकानास पाव आणा, व प्रत्येक नोकरीवाल्या असामीकडून दरमहा शक्तीनुसार १ रु. ·॥· ·।· २ आणे प्रमाणें द्यावेत.

२ रोज पाव आण्याबद्दल पंचमार्फत तिकीट मिळेल व नोकरीवाले असामींस पावती मिळेल.

३ फंडांतील वेवस्थापक मंडळीनें व दैवानें महिन्यांतून एक वेळ जमून फंडाबद्दल सर्व प्रकारें विचार करून सर्वांनीं एका सल्यानें चालावें.

४ फंडासंबंधीं योग्य खर्च असेल तो करावा. दुसरी रकम दैवाच्या विचाराशीवाय खर्च करूं नये.

५ फंडांतील वसुलाचा हिशेब पंचाकडून दरमाहा दैवानीं पाहावा. व शिलक सारवळी मिळवून बाकी रकम राहील ती पंचांनीं दैवाचा विचार घेऊन योग्य वाटेल त्या असामीकडेस ठेवावी व तो आंकडा दरमहा दैवास जाहीर केला जाईल.

६ पहिले कलमाप्रमाणें ज्या असामीकडोन वर्तणूक न होवून हरकत होईल त्याजवर दैवाच्या सल्यानें पंचहुकूम फरमावतील तो कबूल आहे.

७ सभेच्या वेळीं दैवांस या फंडाबद्दल कोणतीही जरूर लागेल त्या वेळीं पंचांतून कांहीं मंडळी गैरहजर असेल तर त्यांची सबब न ऐकतां हजर असलेल्या पंचाकडून दैवांनीं जें काम करणें तें करावें.

७ एकूण सात कलमी ठरावाप्रमाणें चालावें.

## पंचांच्या सह्या.

१ बापू हरशेट देवळेकर हस्तें धोंडू बाबाजी.
१ नारायण भिकशेट खातू
१ विठोबा बाळशेट मोरे दस्तुर खुद्द
१ सखाराम पांडशेट बेर्डे.
१ काशिराम मुळशेट देवळेकर द०
१ केशव गणशेट गांदी दस्तुरखुद्द.
१ गोविंद दशरथशेट खेडेकर.
१ हरी धारशेट दस्तुरखुद्द.
१ तुकाराम भिकशेट रेडीज दस्तुरखुद्द.
१ काशिराम धोंडशेट प्रसादे नी० तागडी द०
१ कृष्णा राघोबाशेट साडविलकर द० तुकारामाचे.
१ बाळसेट सदाशिवशेट खातू द० गोविंद बाबाजी.
१ भिकशेट काशिशेट लखेश्री.
१ शिताराम सखारामशेट मापुसकर.
१ सखाराम धोंडशेट कुडतळकर.
१ संभु रामचंद्रशेट शेट्ये द० नारायण विटशेट.
१ सिताराम रामशेट गांगण दस्तुरखुद्द.
१ भिकू भागशेट शेट्ये दस्तुरखुद्द.
१ जयराम बापूशेट लवंददस्तुरखुद्द.
१ दाजी दशरथशेट कोकाटे दस्तुर भाऊ दशरथ.
१ सदाशिव साबाजीशेट शेट्ये दस्तुरखुद्द.
१ बापू गणशेट कोलवणकर.
१ नारायण पांडशेट रेडीज राहणार तलवली.
१ आत्माराम बाबाजीशेट रेडीज दस्तुरखुद्द.
१ नारायण विटशेट शेट्ये दस्तुरखुद्द.

१ बाबाजी गणशेट थरवळ.
१ लक्ष्मण नारायणशेट कोकाटे दस्तुरखुद्द.
१ बाळकृष्ण नामदेवशेट कोलत्ये दस्तुरखुद्द.
१ सखाराम गणशेट बेर्डे दस्तुरखुद्द.
१ गणु रामशेट मापुसकर.
१ गोविंद सखारामशेट नारकर.
१ विठ्ठू रघुशेट गांदी.
१ बाळशेट गोपाळशेट लखेश्री.
१ सिताराम बाळशेठ शिरगांवकर.

---

# परिशिष्ट २

### कों. वैश्यज्ञातिफंडाचा पहिल्यावर्षाचा अहवाल.

## वार्षिक रिपोर्ट.

कोकण प्रांतांतील मुंबापुरीं वास्तव्य करणारी वैश्यज्ञातीच्या फंडाबद्दल तारीख १ आगष्ट सन १८८७ पासून तारीख ३१ जुलई सन १८८८ पर्यंतचा वार्षिक रिपोर्ट व्यवस्थापक मंडळी यांजकडोन देण्यांत येतो कीं आमच्या ज्ञातबंधूंनीं आज एक वर्ष पर्यंत या फंडाबद्दल पुष्कळ मेहनत घेऊन बरेंच उत्तेजन आणलें. असो. फंड उभारण्याचा विचार होऊन मंडळीनें मनावर घेतल्यासारखें खरोखर त्यांच्या मेहनतीचें व दृढ निश्चयाचें फळ आज आपल्या ज्ञातबांधवांच्या दृष्टीस पडत आहे. जर कदाचित यापूर्वीं आमच्या ज्ञातीबांधवानीं या फंडाला आरंभ केला असता तर पुष्कळ बकौकटी येऊन रक्कमही बरीच मोठी जमली असती. परंतु आतां गेल्या गोष्टीबद्दल उद्गार काढून उपयोग नाहीं सांप्रत सुरू असलेल्या फंडाबद्दल आमचे ज्ञातबांधवानीं अशींच मेहनत व श्रम घेऊन योजिलेला फंड सिद्धीस नेण्यास झटत असावें. हल्लीं सर्व ज्ञातीहून आपलें पाऊल

अशा कामीं फारच मागें आहे तसें नसण्याविषयीं ज्ञाती अभिमान बाळगून जेवढी मेहनत घेववेल तेवढी घेण्यास अनमान करूं नये आणि सदहू आपल्या ज्ञातबांधवानीं योजलेलें कार्य शुक्लेंदुवत वृद्धिंगत होत असावें.

## हल्लीं फंडाबद्दल जमा झालेल्या रकमेचा आकडा.

**जमा.**

| | |
|---|---|
| ४८६॥ | मागील शिल्लक सन १८८३ सालपैकीं. |
| २२५४।= | दिडकीपैकीं ता. १ आगष्ट ते ३१ जुलई सन १८८८ पर्यंत. |
| १२६ | ज्ञातीचे गुन्हेगार मंडळीचे दंडाबद्दल. |
| १०२३। | मोठ्या वर्गणीबद्दल. |
| २२ | वाऱ्यापैकीं क्रॉफर्ड मार्कीटांतील दुकानदार यांजकडून. |
| २४३।≡ | नोकर लोकांच्या उग्राणीबद्दल |
| ५ | पु. विवाहाबद्दल. |
| ४१६०॥‑ | |

**खर्च.**

| | |
|---|---|
| ९७।≡॥। | सभेसंबंधी, पाकीटें, खुर्दा, वटाव, छपाई वगैरे खर्च. |
| ५२४॥ | नोकर लोकांच्या पगाराबद्दल. |
| ६२१॥।≡॥। | |
| ३५३८॥‑। | शिल्लक ता. ३१ जुलई १८८८ रोजीं राहिली ती. |
| ४१६०॥‑ | |

व्यवस्थापक.

**भिकु भागशेट शेट्ये.**
**विठोबा बाळशेट मोरे.**
**बाबाजी गणशेट थरवळ**
**तुकाराम भिकशेट रेडीज.**
**नारायण भिकशेट खातु.**

# सूचिपत्र.

## तात्यासाहेब कोलते यांच्यासंबंधीं ठळक गोष्टींची सूचि.

( अंक पृष्टांचे आहेत. )

मूळ ठिकाण १, पूर्वज १–३, जन्म ३, बालपण व शिक्षण ५–७, वडिलांचा मृत्यु व जबाबदारी ८, कोल्हापुरांत नोकरी ९, मलकापुरांत वसूलावर १०, मुंबईस प्रयाण ११–१२, तंबाकूच्या गादीवर १२, प्रागजी पेराजची भेट १३, प्रागजी हिरजी आणि कंपनीच्या पेढींवर १४, नोकरींतील वागणूक १५–१६, घराकडे १६, लग्न १७–१८, धनीनोकरसंबंध १९–२१, नोकरी सोडली २२–२५, स्वतंत्र धंदा २५–२७, धंदा कसा केला ? २८–२९.

सत्समागम व सार्वजनिक कार्याचें बीजारोपण ३१–३४ सार्वजनिक कार्याचें वेड ३४–३५, गुजराथ्यांच्या महाजनवाडींतील अपमान ३६–३७, महाजनवाडीची कल्पना ३८, पैसाफंडाची कल्पना ४१, पैसाफंडाची स्थापना ४२–४४, फंडाचें पहिलें वर्ष ४५–४६, फंडांत फूट ४६–४७, प्लेगमुळें फंड बंद ४७–४८, पांचकळश्यांच्या धर्मशाळेंतील अपमान ४८–४९, फंडास परत सुरवात ४९, धर्मशाळा ४९–५०, यज्ञोपवीत प्रकरण व तत्प्रसंगीं धोरण ५०–५८, स्वयंसेवक मंडळ व तत्संबंधीं धोरण ५८–६४, वैश्य विद्यावर्धकसमाज व तत्संबंधीं धोरण ६४–७०, चारी धामांची यात्रा ७१-७४ महाजनवाडी उघडली ७४–७६, समाजास तीर्थप्रसाद ७६, महाजनवाडीचा परिणाम ७७–८०, मोफत वाचनालय ८०, वैश्यधर्मोन्नतिफंड ८१, वैश्यधर्मोन्नतिमाला ८१, वैश्यविद्यार्थीसंघ व त्यावरील प्रेम ८३–८६, फंडापुढें

तीन महत्वाचीं कामें ८७, दुसरी महाजनवाडी उघडली ८९--९८, वैश्यविद्याश्रमाची कल्पना सोळा आणे पसंत १०४, आश्रमासंबंधीं आत्मविश्वास ११२, आश्रम उघडला ११५--११६, फंडासंबंधीं मन निश्चिंत ११७--११८, आश्रमाविषयीं आस्था व कळकळ ११९--१२१, आश्रमाबद्दल काळजी व त्यास चिरस्थायित्व देण्याबद्दल योजना १२२--१२५, शारीरिक व्याधी १२६, महाजनवाडीस शेवटची भेट १२७, अखेरच्या योजना १२८, अत्यवस्थ व अवसान १२९, स्मशानयात्रा व अपूर्व सन्मान १२९--१३०

सार्वजनिक कामगिरीचें निश्चित स्वरूप १३१--१३२, व्यापक स्वरूप १३३--१३५, स्थूल स्वरूप १३५--१३६, पैसाफंडाचा खरा अर्थ १३६--१३७, महाजनवाडीचा तत्वार्थ १३८--१३९, वैश्य विद्याश्रमाचें सूक्ष्म स्वरूप १३९--१४०, आयुष्याचा संदेश १४०, पुढारीपण १४१--१४२, धार्मिक ग्रंथपरिचय १४२--१४३, शुद्ध सात्विक आचरण १४३--१४४, दिनचर्या १४४--१४५, दानशूरपणा १४५--१४७, मनाचा उदारपणा १४७--१४८, कांहीं मतें १४८--१५०, कौटुंबिक मंडळीवरील प्रेम १५०, जन्मभूमीवरील प्रेम १५१, वाढतें चरित्र १५२.

॥ शुभं भवतु ॥

REFBK-0003047